(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष डॉ. सतीश पाटील)

श्री. सुनील केदार : अध्यक्ष महोदय, सभागृहात आवश्यक ती गणपूर्ती नाही.

तालिका सभाध्यक्ष : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सकाळी 10 ते 10.45 वाजेपर्यंत सभागृहाची विशेष बैठक असल्यामुळे, त्यासाठी गणपूर्तीची आवश्यकता लागत नाही.

सन्माननीय सदस्य श्री. सुभाष पाटील यांनी अर्धा-तास चर्चेला सुरुवात करावी, अशी माझी त्यांना विनंती आहे.

.....2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : रोहा, मुरुड, तळा खाडीपट्टयात व अंबा नदीच्या जांभूळटेप (जिल्हा रायगड) भागात अवैधरित्या रेतीचा उपसा होत असल्याबाबत

मु.शी. : रोहा, मुरुड, तळा खाडीपट्टयात व अंबा नदीच्या जांभूळटेप (जिल्हा रायगड) भागात अवैधरित्या रेतीचा उपसा होत असल्याबाबत या विषयावरील सन्माननीय सदस्य श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक 44598 ला दिनांक 10 मार्च, 2016 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. सुभाष पाटील, वि.स.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. सुभाष पाटील (अलिबाग) : अध्यक्ष महाराज, "रोहा, मुरुड, तळा खाडीपट्टयात व अंबा नदीच्या जांभूळटेप (जिल्हा रायगड) भागात अवैधरित्या रेतीचा उपसा होत असल्याबाबत" या विषयावरील सन्माननीय सदस्य श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स. तारांकित प्रश्न क्रमांक 44598 ला दिनांक 10 मार्च, 2016 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महोदय, पूर्वी रायगड जिल्हा भाताचे कोठार म्हणून ओळखला जात होता. 10 ते 15 वर्षापूर्वी ड्रेझींगच्या माध्यमातून रेती काढली जात होती. परंतु, त्यास परिवहन विभागाने बंदी बंदी घातलेली आहे. तेथील स्थानिक लोकांनी मागणी केल्यामुळे बुडीने रेती काढण्यास राज्य शासनाने परवानगी दिलेली आहे. यापूर्वी रेतीच्या संदर्भात अनेक वेळा सभागृहात चर्चा झालेल्या आहेत. यापूर्वीच्या अधिवेशनामध्ये रेतीच्या संदर्भात शासनाने अनेक जाचक अटी लावलेल्या आहेत. यामध्ये अवैधरित्या रेतीचा उपसा करणारा ट्रक पकडला तर तो दोन वर्ष सोडला जाणार नाही, रेती उत्खनन करणाऱ्या दोषी लोकांच्या विरोधात मोक्का कायद्यान्वये कारवाई केली जाईल अशा प्रकारच्या अनेक जाचक अटी लावल्या आहेत. प्रत्यक्षात रायगड जिल्ह्यात अशा प्रकारची कोणतीही

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

गोष्ट होत नाही. शासनाने बुडीने केवळ 2 ते 4 फुटापर्यंत रेती उपसा करण्याची परवानगी दिलेली आहे. परंतु, सेक्शन पंपाच्या माध्यमातून 25 ते 30 फुटापर्यंत रेती काढली जात आहे. त्यामुळे

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुभाष पाटील.....

खाडीलगत असणाऱ्या जमिनींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. माझ्या मतदारसंघात रेती उपसा करणाऱ्या लोकांना विरोध केला तर जात पंचायतीच्या कायद्यानुसार कारवाई केली जात आहे. माझ्या मतदारसंघातील मुरुड, चोरडे ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये अवैधरित्या रेती उपसा करणाऱ्या लोकांच्या विरोधात जात पंचायतीच्या कायद्यानुसार कारवाई केली जात आहे. सदरहू अर्धा-तास चर्चा महसूल विभागापुरती मर्यादित न राहता, त्यामध्ये गृह विभाग आणि पर्यावरण विभागाचा अंतर्भाव केला पाहिजे, अशी माझी मागणी आहे. रेती उपसा करणाऱ्या लोकांच्या विरोधात अनेक जाचक अटी लावलेल्या आहेत. त्यामुळे पोलीस स्टेशनमध्ये मोठ्या प्रमाणावर दंड वसूल केला जात आहे. अवैधरित्या रेती नेणाऱ्या ट्रकमुळे रस्त्यांची अवस्था देखील अतिशय वाईट झालेली आहे. परिवहन विभागाने यासंदर्भात लक्ष देण्याची गरज आहे. रायगड जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर महसूल गोळा केला जात आहे. राज्य शासनाकडे 3 हजार कोटी रुपये आहेत. रायगड जिल्ह्यातील खराब रस्ते पूर्ण करण्यासाठी निधी दिला जात नाही. सन्माननीय सदस्य श्री. भरतशेठ गोगावले यांनी या विषयाच्या संदर्भात तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी संबंधितांवर गुन्हे दाखल केले आहेत काय असा प्रश्न उपस्थित केला असता, संबंधित मंत्र्यांनी गुन्हे दाखल केले आहेत, असे उत्तर दिले होते. तसेच मंत्री महोदयांनी 90 हजार रुपयांची रेती पकडल्याची माहिती दिली होती. सद्य:स्थितीत रायगड जिल्ह्यातून लाखो ब्रास रेतीचे उत्खनन केले जात आहे. खोटी तक्रार दाखल केल्यामुळे संबंधितांवर गुन्हा दाखल केले जात आहेत. या माध्यमातून पोलिसांकडून मोठ्या प्रमाणावर व्यवहार होत आहे. रेती पकडल्यानंतर ती पुन्हा त्यालाच दिली जाते, असा प्रकार सातत्याने होत आहे. रायगड जिल्ह्यात अनेक शासकीय कामे करावयाची आहेत. रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेची आणि हॉस्पिटलची कामे करावयाची आहेत. रेती पकडल्यानंतर शासकीय कामे, जिल्हा परिषदेच्या शाळेची आणि हॉस्पिटलची कामे करणाऱ्या ठेकेदारांनाच रेती दिली पाहिजे. रायगड जिल्ह्यास समुद्र किनारा लाभलेला आहे. पोलिसांकडे गस्ती नौका आहेत. माझ्या मतदारसंघातील कासळी येथे मोठ्या प्रमाणावर अवैधरित्या रेती उपसा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुभाष पाटील.....

केला जात आहे. तहसीलदार कार्यालयातील रेती उत्पादकाकडून दमदाटी केली जात आहे. आज देखील अवैधरित्या रेती उपसा केला जात आहे. तहसीदार आणि प्रांत हे रेती उपसा करणाऱ्या लोकांकडे दुर्लक्ष करीत आहेत. माननीय महसूल मंत्री श्री. एकनाथराव खडसे यानी रेतीच्या संदर्भात अनेक घोषणा केलेल्या आहेत. परंतु, प्रत्यक्षात घोषणांची अंमलबजावणी होत नाही. सेक्शन पंप पकडले जाणार काय ? आज शासकीय कामे करण्यासाठी रेतीची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता आहे. रेती उपसा केल्यामुळे समुद्रकिनारी असणारी जमीन खराब झालेली आहे. तरी, यासंदर्भात शासनाकडून धोरण ठरविले जाणार काय ?

श्री. संजय राठोड (महसूल राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुभाष पाटील यांनी महत्वपूर्ण अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे. राज्य शासनाने रेतीच्या संदर्भात धोरण तयार केलेले आहे. आताच सन्माननीय सदस्य श्री. सुभाष पाटील यांनी अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून रेतीच्या संदर्भातील आवश्यक ती माहिती दिलेली आहे. रेतीच्या संदर्भात अनेक गुन्हे दाखल केले जात आहेत.

अध्यक्ष महोदय, भा.द.वि. कलम 379 प्रमाणे पर्यावरण संरक्षण कायद्यातील कलम 1986 कलम 1519 महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या माध्यमातून या ठिकाणी 1966 कलम 48 यासंदर्भात पाचपट दंड आकारण्याबाबत शासनाने धोरण आखलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी जप्तीचा उल्लेख केलेला आहे. राज्यामध्ये वारंवार रेती उपसा करणाऱ्या संबंधितांच्या विरोधात MPDA कायद्यांतर्गत कारवाई केलेली आहे. सागरी किनारपट्टी आणि खाडीच्या संदर्भात शासनाने दिनांक 21 मे, 2015 रोजी धोरण जाहीर केलेले आहे. राष्ट्रीय हरीत लवाद आणि मेरीटाईम बोर्ड यांच्याशी समन्वय साधून राज्य शासनाने अशा प्रकारचे धोरण आणलेले आहे. या धोरणाच्या माध्यमातून रेतीचे अवैध उत्खनन करणाऱ्या संबंधित दोषी लोकांच्या विरोधात कठोर कारवाई केलेली आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुभाष पाटील यांनी रायगड जिल्ह्याच्या संदर्भातील अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे. रोहा, मुरुड, तळा या ठिकाणी रेती उपसा करणाऱ्या दोषी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. संजय राठोड.....

लोकांच्या विरोधात कारवाई केलेली आहे. रोहामधील 79 प्रकरणांमधून 18 लाख 29 हजार रुपयांचा दंड वसूल केलेला आहे. तसेच 6 दोषी लोकांच्या विरोधात गुन्हे दाखल केले आहेत आणि या प्रकरणात आतापर्यंत 13 आरोपींना अटक झालेली आहे.

अध्यक्ष महोदय, मुरुडमध्ये अवैधरित्या रेतीचा उपसा होत असून त्या ठिकाणी एकूण 10 प्रकरणांमध्ये नियमानुसार दंड वसूल केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, तळामध्ये अवैधरित्या रेतीचा उपसा होत असून त्या ठिकाणी नियमानुसार दंड वसूल केलेला आहे. पोलीस आणि परिवहन विभागाचे सहकार्य घेऊन रायगड जिल्ह्यात अवैधरित्या रेती उपसा करणाऱ्या दोषी लोकांच्या विरोधात कारवाई केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी जप्त केलेली रेती शासकीय कामासाठी द्यावी अशी देखील एक मागणी केलेली आहे. या विषयाच्या संदर्भात भविष्यात धोरण आखण्यासाठी सन्माननीय सदस्यांसमवेत एखादी बैठक आयोजित केली जाणार आहे आणि त्यानुसार उचित कार्यवाही केली जाणार आहे.

डॉ. सुनील देशमुख : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुभाष पाटील यांनी रायगड जिल्ह्याच्या संदर्भातील अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदयांनी धोरणात्मक बाबीचा उल्लेख केलेला असल्यामुळे मी या ठिकाणी बोलण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, रेतीचे ठेकेदार 10 हजार किंवा 25 हजार ब्रास असा ठेका घेतात आणि वाहुतक करण्याच्या संदर्भातील ठेका घेतला जातो. परंतु, रेती वाहतुक करणाऱ्या लोकांनी 2 ब्रासच्या ऐवजी त्यांनी 3 ब्रास रेतीची वाहतूक केल्यामुळे पोलीस, तलाठी किंवा तहसीलदाराकडून कारवाई केल्यानंतर त्यांना शिक्षा दिली जाते. संबंधित ठेकेदार 10 हजार ऐवजी 30 हजार ब्रास रेती विकत असून, त्याच्या विरोधात कोणतीही कारवाई केल्याचे दिसून येत नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.सुनिल देशमुख .....

रेती व्यवसाय हा जगातील एकमेव असा व्यवसाय आहे. आपण मार्केटमध्ये गेल्यानंतर एक किलो साखर मागितली परंतु त्याने दीड किलो साखर दिली. दीड किलो साखर घेऊन जातो त्याच्यावर कारवाई केली जाते, परंतु ज्याने दीड किलो साखर दिली, त्याच्यावर मात्र कारवाई होत नाही. शासनाने एखाद्याला लिलावामध्ये 10 हजार ब्रॉस रेतीचा ठेका दिला. त्या ठेकेदाराने 10 हजार ब्रॉसचे पैसे दिले, परंतु संबंधित ठेकेदाराने 10 हजार ब्रॉसऐवजी 25 हजार ब्रॉस रेती विकतो, तरी त्याच्यावर कारवाई केली जात नाही. रेती विकणाऱ्यावर कारवाई होत नसून वाहतूक करणाऱ्यावर मात्र करवाई केली जाते. याचे कारण असे की, त्यांचे साटेलोटे असतात. ज्याप्रमाणे रेती वाहतुकदारावर कारवाई केली जाते त्याप्रमाणे ठेकेदाराचा रेतीचा ठेका का रद्द केला जात नाही? दोन ब्रॉस रेतीऐवजी तीन ब्रॉस रेती दिली तर त्याचा ठेका रद्द केला पाहिजे. आपण वाहतूकदाराला का शिक्षा करता? ज्याच्या पिशवीमध्ये दीड किलो साखर आहे त्याला तुम्ही पकडून जेलमध्ये टाकतात, त्याला शिक्षा करतात, परंतु खरेतर विकणारा शासनास चुना लावतो. याप्रमाणे रेती विकणाऱ्या ठेकेदारावर शासन कारवाई करणार आहे काय? रेतीऐवजी दगडाचा चुरा वापरण्यासाठी शासनाने लोकांना इन्टेनसिव्ह दिले पाहिजे, तर लोक दगडाचा चुरा वापरतील. या निमित्ताने माझा प्रश्न असा आहे की, त्या रेतीच्या ठेकेदारावर मंत्री महोदय काय कारवाई करणार आहेत, या दोन प्रश्नांच्या उत्तरासंदर्भात मंत्री महोदय कृपया खुलासा करतील काय?

श्री.संजय राठोड : अध्यक्ष महाराज, राज्यामध्ये जेव्हा रेतीचे घाट लिलाव करतो, तेव्हा ठेकेदाराने किती उत्खनन केले पाहिजे, हे लिलावाच्या वेळेस ठरले जाते. त्यापेक्षा जास्त उत्खनन केले आणि शासकीय यंत्रणेकडे कोणी तक्रार केली तर त्याचे मोजमाप होते. राज्यामध्ये अनेक ठिकाणी अशा प्रकारची कारवाई झालेली आहे. सन्माननीय सदस्यांची अशी तक्रार असेल तर त्याची चौकशी करून त्यांच्याविरुध्द कारवाई केली जाईल. आपण ज्यांना रेती घाट देतो, त्या अनुषंगाने माहिती मिळाली तर आपण संबंधिताविरुध्द कारवाई करतो. रेतीची वाहतूक करणाऱ्या ट्रकमध्ये रेती ओव्हर लोड असेल तर त्यांच्यावर कारवाई झालेली असून त्यांना दंड झालेला आहे. असे प्रकार लक्षात आल्यानंतर असे लिलाव रद्द केलेले आहेत.

श्री.सुनिल केदार : अध्यक्ष महाराज, मंत्री महोदयांनी सांगितले की, रेतीसंबंधी बऱ्याच प्रमाणात चर्चा, तक्रारी होतात. बऱ्याच ठिकाणी वेगवेगळे प्रकार घडतात. हे सर्व रेतीचे घाट हा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनिल केदार..

त्या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात हा त्यांचा अधिकार आहे. आंध्र प्रदेश सरकारने धोरण घेतलेले आहे की रेतीचा लिलाव ग्रामपंचायतीने करावा. आपल्या राज्यात पंचायत ॲक्ट मान्य केलेला आहे. ग्रामपंचायतीचे मजबुतीकरण करण्यासाठी केंद्र सरकारकडून कायदा करुन घेतलेला आहे. ज्यावेळेला रेतीचा लिलाव होतो, ऑक्शन होतो त्यावेळेस चढाओढ होते आणि त्यामध्ये जो जास्त किंमत सांगेल त्याला ठेका दिला जातो. त्यानंतर तो ठेकेदार किंमत वसूल करण्यासाठी नको ती कामे करतो. रेतीसंबधी असलेल्या तक्रारी, त्यामध्ये अनेक लोक गुंतलेले आहेत. रेती घेणाऱ्या ठेकेदाराला तेथे सहजासहजी व्यवसाय करता येत नाही. तलाठी पासून सर्व लोक त्यांच्या पाठीमागे असतात, ही गोष्ट खरी आहेत. यामुळे माफिया तयार होतात. रेतीचे उत्पन्न ग्रामपंचायतीला देण्याच्या दृष्टीने पंचायत ॲक्टनुसार हा व्यवसाय ग्रामपंचायतीला हॅण्डओव्हर करावा. हा विषय संपविण्याच्या दृष्टीने आंध्र प्रदेश सरकारने जी भूमिका घेतलेली आहे, त्याप्रमाणे सरकार धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय?

श्री.संजय राठोड : सन्माननीय सदस्य श्री.सुनिद केदार यांनी अतिशय चांगली सूचना या ठिकाणी केलेली आहे. पेसा कायद्यातंर्गत ज्या ग्रामपंचायतींनी मागणी केलेली आहे, त्या परिसरात रेतीचा घाट देण्याचे धोरण आहे. आंध्र प्रदेश राज्यासंबधी जी सूचना केलेली आहे ती माहिती घेऊन निश्चितपणे योग्य ती कारवाई करु. राज्यामध्ये युतीचे सरकार आल्यानंतर रेतीच्या संदर्भात वर्षभरात अनेक चांगले निर्णय या शासनाने घेतलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.सुनिल केदार यांची सूचना तपासून त्यासंदर्भात भविष्यात कार्यवाही करण्याचा प्रयत्न शासनाकडून करण्यात येईल.

श्री.सुभाष पाटील : अध्यक्ष महाराज, रेती लिलावाच्या संदर्भात जे नियम केले आहेत त्यामध्ये बारकावे असता कामा नये. शासन बुडीने रेती काढण्याची परवानगी देतात परंतु काम सन्माननीय सदस्य पंडित शेठला देतात. जसे मजूर संस्थेमध्ये मजूर असतात त्यांच्याकडे त्यांची ओळख असते. खरोखर जे बुडीने रेती काढतात त्यांनाच रेतीचा ठेका मिळाला पाहिजे. मला रेतीचा ठेका मिळायला नको. जेथे 18 लाख रुपयांचा महसूल जमा केला जातो तेथे रोज एक कोटी रुपयांचा महसूल जमा होईल. रोहा येथे तहसील कार्यालयाच्या 100 मीटर अंतरावर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष पाटील...

पोलीस चौकी आहे. तेथे सीसीटीव्ही कॅमेरे लावायला पाहिजेत. तेथे खाजगी लोक 500 रुपये ब्रॉस अवैध रितीने वाळू विकतात. त्यामुळे शासनाचे नुकसान होते. मी आमदार होण्यापूर्वी आणि आमदार झाल्यानंतरही तक्रार केली, परंतु त्यावर कारवाई झालेली आहे. नवीन तहसीलदार आणि प्रंत आले की, चित्रपटामध्ये जसा ड्रॉमा केला जातो, तसा ते ड्रॉमा करतात. रेती रोह्याची आणि पेनला पकडतात. तलाठी, सर्कल अधिकारी यांची रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर संपत्ती आहे. तेथिल तलाठ्याकडे दोन दोन कोटी रुपयांचे बंगले आहेत. या शासनाने निर्णय चांगला घेतलेले आहेत म्हणून आपण सत्तेत आलात. सन्माननीय सदस्य डॉ.पतंगराव कदम मंत्री होते तेव्हा आमची रेती बंद केली होती. एखाद्या आमदाराविरुध्द तक्रारी केली तर त्या आमदाराला जेलमध्ये टाकले जाते, परंतु सरकारी अधिकाऱ्याविरुध्द वारंवार तक्रारी केल्यानंतर त्यांच्यावर गुन्हा दाखल होत नाहीत. त्यांच्या संपत्तीची चौकशी होत नाही. रायगड जिल्ह्यातील रेतीच्या पट्टयामध्ये असणारे सर्कल, तलाठी, प्रांत अधिकारी आणि तहसीलदार यांच्या संपत्तीची चौकशी होणार आहे काय? तेथिल जकात नाके आणि पोलीस चौक्यांवर सीसीटीव्ही लावणार आहात काय? रायगड जिल्ह्यतील खाडीमध्ये पोलिसांसाठी गस्ती नौका आहे. आम्ही तहसीलदारांना सांगितले तर तहसीलदार सांगतात की, आम्हाला तेथे जाता येत नाही. या गस्ती नौकेचा अवैध रेतीची चोरी पकडण्यासाठी उपयोग करणार काय?

श्री.संजय राठोड : अध्यक्ष महाराज, हातपाटी आणि डुबीच्या मार्फत रेती काढण्यासंबधी शासनाने निर्णय घेतलेला आहे. रायगड जिल्ह्यातील लोक हातपाटी आणि डुबीने रेती काढतात त्यासाठी तलाठी कार्यालय, तहसीलदार कार्यालयामध्ये जाहिरात प्रसिध्द केलेली होती. रायगड जिल्ह्यात एकूण 52 अर्ज आले होते. त्यातील 28 अर्जदारांना हातपाटी आणि डुबीच्या मार्फत जे रेती काढतात त्यांना परवाने दिलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी अधिकाऱ्यांच्या चौकशी संदर्भात प्रश्न उपस्थित केला आहे. सन्माननीय सदस्यांनी लेखी तक्रार केली तर त्याची चौकशी करुन शासन निश्चितपणे त्यांचेवर कारवाई करेन.

श्री.सुभाष पाटील : मी यापूर्वी स्वत: तक्रार केलेली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

06-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) B-4

ADB/ AKN/ ST/ 10:10

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्यांनी पुन्हा आता मंत्री महोदयांना पत्र द्यावे.

श्री.राजेंद्र पाटणी : अध्यक्ष महाराज, मुरुम आणि रेतीची जितकी रॉयल्टी वाढली तितका भ्रष्टाचार वाढला. आंध्र प्रदेश राज्याने ज्याप्रमाणे रेतीवरील रॉयल्टी उठविली त्याप्रमाणे रेती आणि मुरुम यावरील रॉयल्टी उठवून यामध्ये होणारे नुकसान भरुन काढण्यासाठी सिमेंटवरील व्हॅट वाढविण्यात यावा. यामुळे भ्रष्टाचार कमी होईल. सिमेंटवरील व्हॅट वाढविले तर तेवढा महसूल शासनाला मिळेल. सिमेंटवरील व्हॅट वाढविण्यासंबधीचा विचार शासन करणार आहे काय?

श्री.गिरीश बापट : अध्यक्ष महाराज, अर्धा-तास चर्चा या शीर्षकाखाली आपल्याकडे नियमावली आहे. आपल्याकडे संबधित सन्माननीय सदस्य विषय मांडतात आणि मंत्री महोदय त्याला उत्तर देतात. सन्माननीय सदस्यांना त्यावर पुन्हा एखादा प्रश्न विचारण्याची संधी दिली जाते. त्यावर एखाद्या सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारायचा असेल तर त्यासाठी पत्र देणे आवश्यक असते. आता पहिली अर्धा-तास चर्चा सुरु होऊन 20 मिनिटे झाली आहेत. एक तासात आपल्याला पाच अर्धा-तास चर्चा संपवयाच्या आहेत. अध्यक्ष महाराज, आपण सन्माननीय सदस्यांना ही बाब अवगत करावी.

यानंतर C-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. संजय राठोड : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राजेंद्र पाटणी यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने मी हे सांगू इच्छितो की, मी याचे उत्तर यापूर्वीच दिलेले आहे. आंध्र प्रदेशचा या ठिकाणी उल्लेख झाला. आंध्र प्रदेश सरकारचे काय धोरण आहे हे आम्ही नक्कीच जाणून घेऊ. त्यातील चांगल्या गोष्टी महाराष्ट्र शासन नक्कीच स्वीकारेल आणि योग्य ती कार्यवाही करील.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुभाष पाटील यांनी तक्रार दिलेली आहे, असा उल्लेख केलेला आहे. त्यांनी स्पेसिफिक तक्रार दिलेली आहे असे त्यांचे म्हणणे आहे, त्या अधिकाऱ्याची चौकशी केली जाईल.

तालिका सभाध्यक्ष : त्यांचे पत्र आल्यावर नोंद घ्यावी.

.....

पृ. शी. : डोंबिवली (जि.ठाणे) येथील औद्योगिक वसाहतीमधील रासायनिक कंपन्यांकडे प्रदूषण नियंत्रण मंडळाचे होत असलेले दुर्लक्ष

मु. शी. डोंबिवली (जि.ठाणे) येथील औद्योगिक वसाहतीमधील रासायनिक कंपन्यांकडे प्रदूषण नियंत्रण मंडळाचे होत असलेले दुर्लक्ष या विषयावरील तारांकित सूचना प्रश्न क्रमांक 40913 ला दिनांक 11 मार्च, 2016 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. सुभाष भोईर,वि.स.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी. : मानीव अभिहस्तांतरण प्रक्रिया सोपी करण्यासाठी तीन सदस्यीय समिती नेमणूक केल्याबाबत

मु. शी. : मानीव अभिहस्तांतरण प्रक्रिया सोपी करण्यासाठी तीन सदस्यीय समिती नेमणूक केल्याबाबत या विषयावरील तारांकित सूचना प्रश्न क्रमांक 47185 ला दिनांक 14 मार्च, 2016 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

ॲड. राहुल कुल (दौंड) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने मानीव अभिहस्तांतरण प्रक्रिया सोपी करण्यासाठी तीन सदस्यीय समिती नेमणूक केल्याबाबत या विषयावरील तारांकित सूचना प्रश्न क्रमांक 47185 ला दिनांक 14 मार्च, 2016 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात नियम 94 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महोदय, या अर्धा तास चर्चेतील विषय हा पुणे, मुंबई व माझ्या मतदारसंघातील दौंड या ठिकाणी राहणाऱ्या रहिवाशांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. गेल्या कित्येक वर्षापासून वेगवेगळ्या प्रकारच्या बांधकाम व्यावसायिकांनी आणि जागा मालकांनी वेगवेगळे प्लॉट्स डेव्हलप करून त्या ठिकाणी फ्लॅट्स बांधून ते विकले. परंतु, गेली कित्येक वर्ष त्या ठिकाणी राहणाऱ्या फ्लॅटधारकांच्या मालकीचा तो प्लॉट अजूनही झालेला नाही.

सन 1963 मध्ये मोफा कायदा अस्तित्वात आला. त्यानुसार 4 महिन्यांत सदर प्लॉटचे हस्तांतरण फ्लॅटधारकांच्या नावे असलेल्या सोसायटीच्या नावे करावे, अशाप्रकारचे बंधन घातले गेले. परंतु, बहुतांश ठिकाणी हे झालेच नाही, त्यामुळे सन 2005 मध्ये राज्यातील फ्लॅटधारकांची मागणी लक्षात घेऊन यामध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न करण्यात आला. सन 2010 पासून सदर नियमावली प्रत्यक्षात अंमलात आली. त्यातील त्रुटी लक्षात घेऊन, दिनांक 25 फेब्रुवारी, 2011 रोजी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. राहुल कुल....

एक नवीन नियमावली शासनाने तयार केली. त्यामध्ये डीडीआरला प्राधिकृत केले. त्यावेळेपासून मानीव अभिहस्तांतरणचा विषय खऱ्या अर्थाने गतीमान करण्याचा शासनाने प्रयत्न केला. परंतु, त्यामध्येही त्रुटी होत्या. सन 2011 च्या नियमावलीनुसार 12 डॉक्युमेंटस उपलब्ध करण्यासंबंधातील अटी सोसायट्यांवर घालण्यात आल्या होत्या. सन 2012 मध्ये त्या अटी कमी करुन 12 ऐवजी 7 अटींची पूर्तता करण्याचे बंधन सोसायट्यांवर घालण्यात आले. परंतु, मूळचे बांधकाम वेगवेगळ्या कारणांमुळे अपूर्ण असते, चुकीच्या पध्दतीने केलेले असल्याने त्याला ओ.सी. किंवा भोगवटा प्रमाणपत्र मिळत नाही. त्यामुळे आपण आजही विचार केला तर, मागच्या 10-15 वर्षात राज्यात असणाऱ्या 90 हजार सोसायट्यांपैकी फक्त 5 टक्के सोसायट्यांचे मानीव अभिहस्तांतरण झालेले आहे. कायदा अस्तित्वात आला, त्याची अंमलबजावणी व्हावी या करिता शासनाने त्यामध्ये वारंवार बदल केले. परंतु, बिल्डर लोकांनी त्यामध्ये सातत्याने वेगवेगळ्या त्रुटी ठेवल्याने मानीव अभिहस्तांतरण करण्यामध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणातील अडचणींना आपण आजही सामोरे जात आहोत. सभागृहात याविषयी सातत्याने मागणी झालेली आहे. यामध्ये शिथिलता आणण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, मला जे उत्तर प्राप्त झालेले आहे, त्यामध्ये काही प्रश्न उद्‌भवतात मी मंत्री महोदयांना आपल्या माध्यमातून हे सांगणार आहे की, आज महत्त्वाची अडचण ही भोगवटा प्रमाणपत्राची आहे. त्यामध्ये महानगरपालिका, नगरपालिका किंवा जी काही कंट्रोलिंग ऑथॉरिटी आहे, तिला त्यामध्ये शिथिलता आणण्यासंबंधात आपण काही आदेश किंवा सूचना करणार आहात काय ? मागच्या 5-10 वर्षांमध्ये राज्यातील सोसायट्यापैकी फक्त 5 टक्के सोसायट्यांचे मानीव अभिहस्तांतरण झालेले आहे. 95 टक्के सोसायट्यांचे मानीव अभिहस्तांतरण न होण्याचे कारण काय आहे, हे करण्यासाठी आपण त्यामध्ये काय पावले उचलणार आहात ? आपण उत्तरात असे नमूद केले आहे की, दिनांक 23.7.2015 रोजी राज्य शासनाने या संदर्भात समिती गठित केलेली आहे. त्याला आता जवळपास 8-9 महिने झालेले आहेत. त्या समितीचा अहवाल आलेला आहे काय, असल्यास आपण जे काही पूर्वीचे नियम केलेले आहेत, त्यामध्ये सुलभता आणण्यासाठी आपण काय बदल करणार ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. रविंद्र वायकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. राहुल कुल यांनी मानीव अभिहस्तांतरणाबाबतीत ही अर्धा तास चर्चा उपस्थित केलेली आहे. त्यांनी यावर बोलताना मुंबई, पुणे तसेच त्यांच्या येथील उदाहरण दिले आहे की, अनेक विकासक बांधकाम करतात. ती बांधकामे पूर्ण झाल्यानंतर 7/12 वर त्यांचेच नाव असते. 7/12 वर विकासकांचेच नाव राहिल्याने ती इमारत डिलॅपिडेटेड कंडिशनमध्ये असेल किंवा आणखी काही असेल किंवा त्या सोसायटीला जर ती डेव्हलप करावयाची असेल तर तसे करता येत नव्हते. हे वर्षानुवर्षे सुरु होते. यावर कोणताही निर्बंध नव्हता. मानीव अभिहस्तांतरणाबाबतीत त्याने 4 महिन्यात अभिहस्तांतरण केले पाहिजे असा नियम आहे. परंतु, तसे केले नाही तर त्यावर कोणता खटला होईल किंवा कायद्याने आणखी काही करता येईल याबाबत कायद्यात काही तरतूद नव्हती. त्यामुळेच आपला The Maharashtra Ownership Flats (Regulation of the Promotion, Construction, Sale, Management and Transfer) Act या सन 1963 च्या पहिल्या रेग्युलेटरी ॲक्टमध्ये तशा तरतुदी नव्हत्या. त्यामुळे शासनाने असे ठरविले की, The Maharashtra Housing (Regulation and Development) Act, 2012 इंट्रोड्युस करायचे. ते इंट्रोड्युस करीत असताना विधिमंडळामधील काही सदस्य घेऊन हे इम्प्लिमेंटेशन करण्याचे ठरले. त्याबाबत माजी गृहनिर्माण मंत्री महोदयांनी अनेक बैठका घेतल्या. त्यामध्ये अनेक सदस्य होते. हा कायदा झाल्यानंतर त्यामध्ये मानीव अभिहस्तांतरण 4 महिन्यांमध्ये झाले पाहिजे किंवा 60 टक्के लोक त्या ठिकाणी राहायला आले तर, मानीव अभिहस्तांतरण झाले पाहिजे अशी तरतूद त्यामध्ये होती.

अध्यक्ष महोदय, आता आपल्याला हे माहीत आहे की, केंद्र शासनाने नवीन The Real Estate (Regulation and Development) Act, 2015 म्हणजे रेरा इंट्रोड्युस केला आहे. हा कायदा इंट्रोड्युस केल्यामुळे आपला सन 2012 मध्ये जो एमएचए कायदा आणला होता तो रद्दबातल झाला. सन 1992 च्या कायद्याच्या अनुषंगाने हा कायदा निरसित केलेला आहे, तो रद्दबातल झालेला आहे. आता केंद्राचा कायदा आलेला आहे, आपल्याला या कायद्याचे इम्प्लिमेंटेशन करावयाचे आहे. त्या अनुषंगाने आपण योग्य ती कारवाई करू.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

हरकतीचा मुद्दा

श्री. योगेश सागर : अध्यक्ष महोदय, माझी हरकत आहे की, केंद्र शासनाचा कायदा आणि महाराष्ट्र हाऊसिंग ॲक्टचे मानीव अभिहस्तांतरणच्या विषयाशी काही घेणे-देणे नाही. अधिकारी स्वत:चे काहीही निष्कर्ष काढतात आणि मंत्री महोदयांना अशाप्रकारे ब्रिफिंग करतात, त्यामुळे सभागृहात चुकीच्या सर्व गोष्टी रेकॉर्डवर येतात.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. राहुल कुल यांनी साधा प्रश्न विचारलेला आहे. या सभागृहामध्ये बसलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांची ही भावना आहे की, मानीव अभिहस्तांतरणाच्या संदर्भात जेव्हा डेव्हलपमेंट ॲग्रिमेंट होते आणि बिल्डिंग प्रपोजलकडे किंवा संबंधित विभागाकडे प्रॉपर्टी डेव्हलपमेंटचा आराखडा सबमिट होतो त्यावेळेस त्याच्या आयओडी कंडिशनमध्ये हे नमूद केले पाहिजे की, तुम्हाला सीसी देण्याअगोदर तुम्ही ही प्रॉपर्टी डिम्ड करणार आहात की नाही ? असा हा सरळ प्रश्न आहे. यामध्ये कोणत्याही कायद्याचा संबंध नाही.

अध्यक्ष महोदय, ताबा प्रमाणपत्र व जमिनीचा काय संबंध आहे ? हे मानीव अभिहस्तांतरण जमिनीचे होत आहे, ते इमारतीचे होत नाही. इमारतीचे ताबा प्रमाणपत्र ही या मानीव अभिहस्तांतरण मधील एक कंडिशन होती. अशा जाचक 17 अटी होत्या. मी आता असे सांगणार नाही की, आमचे शासन किंवा यांचे शासन, तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी कॉन्फरन्सेस घेतल्या, सर्व सोसायट्यांच्या चेअरमनना, सेक्रेटरींना पत्र पाठवली. तत्कालीन गृहनिर्माण खात्याचे सचिव श्री. सीताराम कुंटे कॉन्फरन्स घेण्यासाठी संपूर्ण मुंबई शहरात फिरले, या सर्व विषयात मी जाणार नाही. परंतु, मानीव अभिहस्तांतरणामध्ये ताबा प्रमाणपत्राचा काही संबध नाही, हा जमिनीशी संबंधित आहे. जमिनीचे डेव्हलपमेंट्स राईट्स पूर्णपणे दिल्यानंतर त्याच बरोबर आयओडी कंडिशनमध्ये सी.सी. देण्याअगोदर तुम्ही जमीन ही सोसायटीच्या नावाने अभिहस्तांतरण करणार का, अशाप्रकारचा हा साधा प्रश्न आहे. केंद्र शासनाचा कायदा आणि महाराष्ट्र हाऊसिंग ॲक्ट याचा याच्याशी काही संबंध नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. योगेश सागर ....

मंत्री महोदयांनी स्पष्ट उत्तर देण्याची आवश्यकता आहे. मानीव अभिहस्तांतरणासाठी कोणतीही कंडिशन न ठेवता प्रॉपर्टीचे क्लिअरन्स क्लिअर असतील, प्रॉपर्टीचे टायटल क्लिअर असतील, प्रॉपर्टीवर सरकारचे काही देणे बाकी नसेल तर प्रॉपर्टीचे मानीव अभिहस्तांतरण करण्यासाठी 45 दिवसांची अट टाकून त्यानुसार अर्ज केल्यानंतर 45 दिवसांत त्यांना ते देण्यात आले नाही तर it is deemed to be conveyed अशाप्रकारची घोषणा या सभागृहात करणार आहात काय ?

D-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, यामध्ये अनेक अटीसंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. योगेश सागर यांनी सांगितले. ॲक्युपेशन सर्टीफीकेट ही त्यातील महत्वाची बाब होती. त्या ठिकाणी ॲक्युपेशन नसल्याकारणानेच आहे ते कनव्हेन्स होत नव्हते. आपण म्हटलेली बाब योग्य असून त्यास नाकारता येणार नाही. डीम्ड कनव्हेन्स, मानीव हस्तांतर झाले पाहीजे, ही शासनाची भूमिका आहे...(अडथळा)... यासंदर्भातील बाब या कायद्यामध्येच घेतली जाणार आहे.

श्री. अतूल भातखळकर : अध्यक्ष महोदय, सभागृहाची भावना अत्यंत प्रामाणिक आहे. परंतु माझे दोन, तीन महत्वाचे मुद्दे आहेत. मुंबई शहर आणि अन्य ठिकाणच्या इमारती संदर्भातील विचार करताना वेगळा विचार केला जाणार आहे काय. याचे कारण असे आहे की, मुंबई सोडून बाहेरच्या शहरातील म्हणजेच...(अडथळा)...मुंबई शहरातील इमारती 99.99 टक्के अधिकृत आहेत. मुंबई शहर सोडून म्हणजेच कल्याण, ठाणे, उल्हासनगर या ठिकाणचे तसेच इतर शहरातील वादविवाद मोठे आहेत. मुंबईतील 100 टक्के इमारती अधिकृत आहेत. पूर्वीच्या सरकारने देखील कायदा केला परंतु तो प्रत्यक्षात येत नाही. माझे थेट तीन प्रश्न आहेत. त्या ठिकाणी हौसिंग सोसायटी बांधून झाल्यानंतर त्या जमिनीची मालकी त्या हौसिंग सोसायटीची आहे, अशा प्रकारचा थेट कायदा सरकार करणार आहे काय, असा माझा पहिला प्रश्न आहे. तसेच याचे हेअरिंग डेप्युटी रजिस्ट्रारकडे केले जाते, परंतु त्याला राईट टू सर्व्हिस ॲक्ट लावून तीन महिल्यामध्ये किंवा चार महिन्यामध्ये किंवा योग्य कालावधीत त्याचा निर्णय तातडीने आला पाहिजे व त्याची स्पिकिंग ऑर्डर आली पाहिजे, असा माझा दुसरा प्रश्न आहे. तसेच त्यासंदर्भात आता 7 कागदपत्रे लागतात, ती मिनिमम म्हणजेच एक किंवा दोन कागदपत्रांच्या आधारावर डिम्ड कनव्हेन्सचा निर्णय डेप्युटी रजिस्ट्रार यांनी केला पाहिजे, असा नियम सरकार करणार आहे काय, असा माझा तिसरा प्रश्न आहे. आपण या तीन स्पेसिफिक प्रश्नांची उत्तरे द्यावीत. त्यामुळे सर्व सन्माननीय सदस्यांचे समाधान होईल.

श्री. रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांच्या भावना योग्य असून याबद्दल दुमत नाही. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी बैठक घेतली होती. सिंप्लीफाय करायला पाहिजे, बीसीसी असेल तरी त्याला दिली पाहिजे. यानुषंगाने सहकार आयुक्तांची समिती नेमण्यात आलेली आहे. या समितीच्या अनुषंगाने जे निर्णय होतील ते नेमलेल्या सहा जणांच्या समितीकडे येतील

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. रविंद्र वायकर.....

आणि त्यामध्ये तो निर्णय घेतलेला आहे. त्यामध्ये प्रधान सचिव गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली, प्रधान सचिव नगर विकास, प्रधान सचिव महसूल, प्रधान सचिव मदत व पुनर्वसन आणि सह सचिव यामध्ये सहकार विभागाचे सचिव निमंत्रित असतील. ही समिती त्यासंदर्भात निर्णय घेणार आहे आणि त्याबाबत शासन पॉझिटीव्ह राहिल.

तालिका सभाध्यक्ष : हे किती दिवसात करणार आहात, याचे उत्तर सन्माननीय सदस्यांना अपेक्षित आहे.

श्री. रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, शक्यतो लवकरात लवकर करण्यात येईल. त्यामाध्यमातून आपल्याकडे उत्तर आलेले आहे...(अडथळा)... नाही. आपण सांगता म्हणून नाही. ते तुम्ही लावले, आम्ही लवकर करु. तुम्ही 2012 पासून आतापर्यंत वेळ लावलेला आहे. केंद्र शासनाने केलेल्यामध्ये डिम्ड कनव्हेन्सबाबत तरतूद नसली तरी देखील राज्य शासनाकडे नवीन पुरक अधिनियम आणून गृहनिर्माण संस्थांचे हित जपाण्याची बाब विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने तपासून पुढील कार्यवाही लवकरात लवकर करण्यात येईल.

तालिका सभाध्यक्ष : लवकरात लवकर करण्यात येईल, असे राज्यमंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. आता आपण शेवटचा प्रश्न विचारावा.

ॲड. राहूल कूल : अध्यक्ष महोदय, माझ्या प्रश्नांची मंत्री महोदयांकडून उत्तरे मिळालेली नाहीत. परंतु इतर दोन सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नावर आपण दिलेल्या उत्तरातून माझी उत्तरे मिळाली. माझे दोनच विषय महत्वाचे आहेत. हा प्रश्न संपूर्ण राज्यासाठी महत्त्वाचा आहे. जवळपास 90 हजार सोसायट्या आहेत. जवळपास 5 कोटी लोकांसंदर्भातील हा विषय आहे. याबाबत सरकारने गांभीर्यतीने निर्णय घेणे अपेक्षित आहे. माझे दोनच प्रश्न आहे. सरकार हा प्रश्न मूळ इमारतीसंदर्भात घेत आहे. परंतु हा मूळ विषय जमिनीशी संबंधित आहे. त्यामुळे इमारतीचे काय होईल ते होऊ द्यावे. परंतु ती मूळ जमीन सोसायटीच्या नावे हस्तांतरित करण्यासंदर्भात आपण नवीन कायदा आणणार आहात काय, तसेच मोफाच्या अंतर्गत तरतूद आहे की, संबंधित डेव्हलपरने चार महिन्याच्या आत हस्तांतर करणे आवश्यक आहे. म्हणजे एक प्रकारे सर्व डेव्हलपर्स यांनी यामध्ये अनियमितता किंवा बेकायदेशीरपणा केलेला आहे. त्यांच्यावर आपण

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. राहूल कूल.....

कायदेशीर कारवाई करणार आहात काय. माझा तिसरा प्रश्न असा आहे की, मानवी अभिहस्तांतरण प्रक्रियेबाबत आपण आताच सांगितले की, "रेरा" नवीन लागू झालेला आहे. "रेरा"मध्ये मानवी अभिहस्तातरणाचा किंवा डिम्ड कनव्हीन्सचा विषय अंतर्भूत आहे काय, असा माझा आपल्या मार्फत राज्यमंत्री महोदयांना तिसरा प्रश्न आहे.

श्री. रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, कनव्हेन्स करणे म्हणजे संबंधित बिल्डींग नाही तर ती जागाच कनव्हेन्स केली तर ही संपूर्ण बाब होते. त्या रुमचे, घराचे, घेतलेल्या जागेचे मालक ते असतात. परंतु खालील जागेचेच कनव्हेन्स करायचे असते. त्यामुळे हा निर्णय दोन महिन्यात घेण्यात येईल.

---*---

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी. : "विदर्भातील सिंचन प्रकल्पाकडे होत असलेले दुर्लक्ष"

मु. शी. : "विदर्भातील सिंचन प्रकल्पाकडे होत असलेले दुर्लक्ष" या विषयावरील अतारांकित प्रश्न क्रमांक 17007 ला दिनांक 11 मार्च 2016 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. डी. मल्लिकार्जुन रेड्डी, वि.स.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

श्री. डी. मल्लिकार्जुन रेड्डी (रामटेक) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने "विदर्भातील सिंचन प्रकल्पाकडे होत असलेले दुर्लक्ष" या विषयावरील अतारांकित प्रश्न क्रमांक 17007 ला दिनांक 11 मार्च 2016 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात नियम 94 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महोदय, विदर्भातील सिंचन प्रकल्पाकडे होत असलेल्या दुर्लक्षाबाबत मी बोलणार आहे. 2016-2017 च्या अर्थसंकल्पामधील जलसंपदा विभागाकरिता 7,272 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून नागपूर जिल्ह्यामध्ये या विभागाने 5 जिल्ह्यांसाठी केवळ 50 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. विदर्भातील 31 प्रकल्प वन जमिनीमध्ये अडकलेले असून या वन जमिनीच्या माध्यमातून त्या प्रकल्पांची सूटका होईल किंवा कसे यासंदर्भात मंत्री महोदयांनी स्पष्ट करावे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, विदर्भातील पेंच धरणावर नागपूर जिल्ह्यापासून 15 किलोमीटर अंतरावर मध्यप्रदेश सरकारने पेंच नदीवर मध्यप्रदेश राज्यामध्ये छिंदवाडा जिल्ह्यात चौराई तालुक्यात चौराई धरण पूर्ण केलेले आहे. त्यामुळे पेंचमध्ये येणारे 1150 टीएमसी पाणी येत होते. परंतु या वर्षीपासून त्यामध्ये 40 ते 50 टक्के कपात होणार आहे. 1 लाख 20 हजार हेक्टर जमीन पेंच धरणामुळे सिंचनाखाली आलेली आहे. परंतु आता 40 ते 50 टक्के पाणी कपात होत असल्यामुळे 1 लाख 20 हजार हेक्टर्सवरील शेतकऱ्यांना या वर्षीपासून पाण्याची भयंकर टंचाई भासणार आहे. त्यांना सिंचनापासून वंचित रहावे लागणार आहे. हा गंभीर प्रश्न आहे. आपल्या शेतकऱ्यांना पाण्यापासून वंचित ठेवण्यात येऊ नये. आपले माननीय जलसंपदा मंत्री यांनी मध्यप्रदेशच्या जलसंपदा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. डी. मल्लिकार्जुन रेड्डी.....

विभागासोबत चर्चा करुन या शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी मी विनंती करतो. 1 लाख 20 हजार जमिनीवर गेल्या 30 वर्षांपासून सिंचन होत आहे. आता या शेतकऱ्यांना पाणी कोठून उपलब्ध करुन दिले जाणार आहे. याकरिता नवीन दोन, तीन धरण मंजूर करण्यात आले होते. कोची धरणाचे काम सुरु होते. परंतु त्याकरिता या वर्षी केवळ 1 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच पेंच प्रकल्पाची दुरुस्तीची कामे व उपाययोजनांकरिता केवळ 1 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. मी यासंदर्भात नागपूर जिल्ह्याच्या विशेष बैठकीमध्ये मुख्यमंत्री महोदयांची भेट घेतली होती. त्या बैठकीमध्ये याकरिता 300 कोटी रुपयांची तरतूद करण्यात येईल, असे जलसंपदा मंत्री महोदयांनी सांगितले होते. परंतु बजेटमध्ये ही तरतूद करण्यात आलेली नाही. विदर्भातील या रखडलेल्या सिंचनाच्या प्रकल्पाकडे आपण नेहमी असेच दुर्लक्ष करणार आहात काय. मागच्या सरकारनेही विदर्भाकडे असेच दुर्लक्ष केले होते. पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांनी विदर्भातील सिंचनाचा निधी तिकडे वळविण्याचा प्रयत्न केला होता. आपले सरकार तसेच करणार आहे काय, असा माझा प्रश्न आहे. सिंचनाच्या बॅकलॉग संदर्भात माननीय राज्यपालांच्या निर्देशाचे पालन आपले सरकार करणार आहे काय, याबाबतची स्पष्टता होणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या रामटेक मतदार संघातील सत्रापूर उपसा सिंचन योजनेचे काम 80 टक्केच झालेले आहे. याकरिता 2 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच खिंडशी फिडरकरिता केवळ 20 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

...E/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.डी.मल्लिकार्जुन रेड्डी.....

सर्व प्रकल्प पूर्ण करण्यासाठी 160 कोटी रुपयांची मागणी आम्ही जलसंपदा मंत्री महोदयांकडे केली होती. विदर्भातील रखडलेले सर्व प्रकल्प पूर्ण करण्यासाठी जलसंपदा मंत्री महोदय किती कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध करुन देणार आहेत ?

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, विदर्भातील सिंचन प्रकल्पाकडे होत असलेल्या दुर्लक्षाबाबत सन्माननीय सदस्यांनी अर्धा-तास चर्चा उपस्थित केली आहे. याचर्चेच्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या मतदार संघापुरते मर्यादित प्रश्न विचारले आहेत, त्यामुळे त्याचे सविस्तर उत्तर देणे कठीण आहे. तरी मी त्यांनी विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर देण्याचा प्रयत्न करणार आहे.

तालिका सभाध्यक्ष (डॉ.सतीश पाटील) : सन्माननीय सदस्यांनी विचारले की विदर्भातील सिंचन प्रकल्पाचा बॅकलॉग भरुन काढण्यात येईल का ?

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या मतदार संघातील प्रकल्पासंदर्भात प्रश्न विचारला असून मी त्यांच्या प्रश्नाचे उत्तर देईन. तसेच त्यांनी बॅकलॉग व विदर्भातील रखडलेल्या सिंचन प्रकल्पाबाबतचा महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. विदर्भामध्ये युआयडीसी अंतर्गत 11 मोठे प्रकल्प व 49 मध्यम व 788 लघु प्रकल्प पूर्ण झालेले आहेत. यामाध्यमातून जवळपास 7,01,709 हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे. 314 प्रकल्प बांधकामाधीन असून ते पूर्ण झाल्यानंतर त्यामधून 15,89,761 हेक्टर सिंचन क्षमता वाढणार आहे. माहे जून, 2015 अखेर पर्यंत 4,59,612 हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे. अशा प्रकारे सिंचन प्रकल्पाच्या माध्यमातून एकूण 11 लाख 61 हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे.

अध्यक्ष महोदय, अनेक सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी अनेक अडचणी येत आहेत व प्रकल्प पूर्ण होत नाहीत. विदर्भ असे एकमेव महामंडळ आहे की त्या ठिकाणी पैसे पडून आहेत. अमरावती महामंडळाकडे 4 हजार कोटी रुपये शिल्लक आहेत व इतर महामंडळाकडे पैशांची चणचण आहे. नागपूर विभागातील अमरावती महामंडळाकडे पैसे शिल्लक आहेत व ते खर्च होऊ

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन.....

शकत नाहीत, त्यामागील कारणेही तशीच आहे. सदरहू निधी खर्च न होण्यामागे भूसंपादनाची प्रमुख अडचण आहे. भूसंपादन कायदा, 2013 अंतर्गत नवीन अडचणी निर्माण होत आहेत. यावर उपाययोजना म्हणून सरकारने सरळ खरेदी पध्दत शोधली आहे. त्यानुसार शेतकऱ्यांशी सरळ वाटाघाटी करुन भूसंपादन करण्यात येणार आहे. भूसंपादनासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी मदत केली तर जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून सरळ वाटाघाटी पध्दतीचा अवलंब केला तर रखडलेले प्रकल्प लवकर होण्याकरिता मदत होईल. प्रकल्पासाठी अनेक लोक जमीन देण्याकरिता नकार देत असतात. आता प्रकल्पासाठी संपादित करण्यात येणाऱ्या जमिनींसाठी 5 पट मोबदला देण्यात येणार असल्याने लोक जमीन देण्याकरिता उत्साही आहेत. सरळ खरेदीच्या माध्यमातून हा प्रश्न मिटला तर प्रकल्प लवकर होण्यास मदत होईल.

अध्यक्ष महोदय, प्रकल्पांच्या संदर्भातील सर्वात महत्वाची अडचण म्हणजे सुधारित प्रशासकीय मान्यता ही आहे. हे सरकार येण्यापूर्वी मागील 5 वर्षामध्ये एकाही प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली नव्हती. आपणा सर्वांना कल्पना आहे की, हे सरकार आल्यानंतर मागील वर्षभरामध्ये जेवढ्या सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या तेवढ्या मागील 5 ते 7 वर्षात दिल्या गेल्या नाहीत.

अध्यक्ष महोदय, मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये वाशिम येथील 11 प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदरहू 90 कोटी रुपयांचे प्रकल्पांची किंमत आता 750 कोटी रुपयापर्यंत गेली आहेत. मागील 7-8 वर्षात सदरहू प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली नव्हती. यासंदर्भात मी मागील वेळी सदनामध्ये बोललो आहे. सुधारित प्रशासकीय मान्यता न दिल्याने काही प्रकल्प 50 कोटी रुपयांवरुन 500 कोटी रुपयांपर्यंत गेले तर काही हजार कोटी रुपयांपर्यंत गेले. मराठवाड्यातील काही कोल्हापूर बंधाऱ्यांचे रुपांतर आता बॅरेजमध्ये झाले आहे.

अध्यक्ष महोदय, अनेक सिंचन प्रकल्पासंदर्भात अडचणी निर्माण होऊन पीआयएल दाखल झाल्या होत्या. सदरहू प्रकल्प पूर्ण करावयाचे असतील तर त्यास सुधारित प्रशासकीय मान्यता द्याव्या लागणार आहेत. विदर्भातील प्रकल्पांना सर्वात जास्त सुधारित प्रशासकीय मान्यता दिल्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन.....

असून कोण कोणत्या प्रकल्पांना सुप्रमा दिली याबाबतची माहिती मी आपणास नावासह देईन. सन 2015-2016 अखेर 32 प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून वाशिम येथील 11 प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे. अशा प्रकारे एकूण 43 प्रकल्पांना शासनाने सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे. 78 प्रस्तावापैकी 46 प्रस्ताव ....

तालिका सभाध्यक्ष : सभागृहाच्या विशेष बैठकीच्या कामकाजाची वेळ 10 मिनिटे वाढविण्यात येत आहे.

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, काही प्रकल्प एसएलटीसीकडे प्रलंबित आहेत. काही प्रकल्प महामंडळाकडे प्रलंबित आहेत. याप्रकरणी असलेली सुधारित प्रशासकीय मान्यतेची अडचण आपण हळूहळू सोडविण्याचा प्रयत्न करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, कर्मचारी वर्ग ही देखील महत्वाची अडचण आहे. जवळपास 1,256 कनिष्ठ अभियंत्यांची पदे भरण्याची कार्यवाही सुरु केली होती परंतु त्याबाबत काही लोकांनी कोर्टामध्ये जाऊन भरतीस अडवणूक केली आहे. सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे ऐकून घ्यावे.

श्री.सुनिल केदार : सन्माननीय सदस्य श्री.डी.मल्लिकार्जुन रेड्डी यांनी सांगितले की, नागपूर जिल्ह्यातील कोची प्रकल्प आंतर राज्य प्रकल्प आहे.

तालिका सभाध्यक्ष : मंत्री महोदयांनी सभागृहाचा जास्त वेळ न घेता प्रश्नांची स्पेसिफिक उत्तरे द्यावीत.

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, सुधारित प्रशासकीय मान्यता देताना एसएलटीसी, ईटीसी, नियामक मंडळ यांच्या माध्यमातून जावे लागते. माझ्याकडे प्रस्ताव सादर केल्यानंतर लगेच मी सुप्रमा दिली, असे होऊ शकत नाही. प्रस्ताव पूर्ण असतील तर सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यासाठी आम्ही बांधील आहोत. जास्तीत जास्त सुधारित प्रशासकीय मान्यता कशा प्रकारे देता येतील याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. कोची प्रकल्पासंदर्भातील सुधारित प्रशासकीय प्रस्ताव शासनाकडे आला नाही.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी निधीच्या संदर्भात प्रश्न विचारला होता. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, सन 2015-16 मध्ये 3,302 कोटी रुपये व 37 लक्ष रुपये ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभाध्यक्ष : मंत्री महोदय महामंडळाकडे निधी पडून आहे त्यामुळे शासन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता कधी देणार आहे व किती प्रकल्पांना देणार आहे ?

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले आहे की, या सरकारने 42 प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिली असून मागील 5 वर्षांच्या काळात विदर्भातील एकाही प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली नव्हती. कोची प्रकल्पाच्या संदर्भातील सुधारित प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही अंतिम टप्प्यात आली आहे. याप्रकरणी तांत्रिक बाबी पूर्ण झाल्या तर सदरहू प्रकल्पास या महिना भराच्या कालावधीमध्ये सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

डॉ.सुनिल देशमुख : अध्यक्ष महोदय, 65 टक्के वेटेज कोठे गायब झाले, अमरावती विभागाचे एवढे मोठे प्रश्न प्रलंबित असताना मंत्री महोदयांनी अमरावती येथे येऊन कधी बैठक घेतली का ?

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, याप्रकरणी अनेक वेळा बैठका घेऊन अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली आहे. राज्यपाल महोदयांच्या निर्देशाप्रमाणे बॅकलॉग भरण्याचे काम सुरु आहे. अमरावती विभागामध्ये सर्वात जास्त सुधारित प्रशासकीय मान्यता दिल्या आहेत. अमरावती महामंडळाकडे प्रकल्पासाठी 4 हजार कोटी रुपये निधी पडून आहे. वन जमिनी, सुधारित प्रशासकीय मान्यता, भूसंपादन अशा अनेक प्रकारच्या अडचणी सदरहू विभागातील प्रकल्पाच्या संदर्भात आहेत. सन्माननीय सदस्यांनी याप्रकरणी शासनास मदत करावी. माननीय मुख्यमंत्री महोदय सदरहू प्रकरणी दर महिन्याला व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेतात, याबाबतची माहिती सन्माननीय सदस्यांना आहे. तसेच, अनेक बैठकीस ते स्वत: हजर होते.

डॉ.सुनिल देशमुख : अमरावती विभागाच्या अनुशेष निर्मूलनासाठी अमरावती विभागामध्ये मंत्री महोदयांनी कधी बैठक घेतली आहे काय ?

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, अमरावती येथे बैठक घेऊन अनुशेषाचे निर्मूलन होणार आहे काय ? माननीय मुख्यमंत्री महोदय दर महिन्याला व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन.....

माध्यमातून संबंधित अधिकाऱ्यांच्या बैठकीत प्रत्येक प्रकल्पाचा आढावा घेत आहेत. सन्माननीय सदस्यांच्या आग्रहानुसार अमरावती येथे बैठक घेण्याची आवश्यकता नाही, असे मला वाटते. सन्माननीय सदस्य हे जलसंपदा खात्याचे माजी मंत्री राहिलेले आहेत.

प्रा.विरेंद्र जगताप : माननीय जलसंपदा मंत्री अमरावती येथे सिंचन प्रकल्पाबाबत बैठक घेतील काय ?

यानंतर F-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीश महाजन : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांचे फार समाधान होत असेल तर मी अमरावतीला येऊन बैठक घेईल.

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य डॉ. सुनिल देशमुख आपण स्पेसिफिक प्रश्न विचारला त्याचे त्यांनी उत्तर दिले आहे. या विषयाची व्याप्ती मोठी आहे.

श्री. गिरीश महाजन : अध्यक्ष महोदय, आपण मला राहिलेल्या दोन मिनिटांच्या वेळात संपूर्ण विदर्भाची माहिती द्या तर ते शक्य होणार नाही. मला आपण यासाठी तासभर वेळ द्यावा. आता मी म्हटले संपूर्ण विदर्भाची माहिती सांगू काय तर ते म्हणतात की, फक्त माझ्या मतदार संघाचे सांगावे. दुसरे सन्माननीय सदस्य म्हणतात की, पेंच प्रकल्पाचे सांगावे, असे चालणार नाही. कारण अर्धा तास चर्चेवर बोलण्यासाठी लिमिटेशन आहे. आपण आम्हाला तास भर बोलण्यास परवानगी देणार नाहीत.

तालिका सभाध्यक्ष : त्यांचे म्हणणे असे आहे की, त्यांचे समाधान झालेले नाही.

प्रा. विरेंद्र जगताप : अध्यक्ष महाराज, विदर्भातील अमरावती विभागातील सिंचनाचा अनुशेष 2,31,239 हजार हेक्टरचा असल्याचे राज्यपालांच्या निदेशामध्ये मान्य केलेला आहे. यासाठी जो टाईमबाऊन्ड प्रोग्राम जोडपत्र 3 मध्ये दिला आहे. त्यानुसार गेल्या तीन वर्षापासून 3 ते 4 हजार कोटी रुपये विदर्भ सिंचन विकास महामंडळाचे अखर्चित आहेत. म्हणून सन्माननीय सदस्य डॉ. सुनिल देशमुख यांनी जी विनंती केली आणि आपण देखील मागच्या नियम 293 च्या चर्चेच्या उत्तराच्या वेळी हे मान्य केले होते की, 1 महिन्याच्या आत अमरावतीला येऊन माननीय राज्यपालांच्या निदेशांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अमरावती विभागातील 4 जिल्ह्यांचा सिंचनाचा भौतिक अनुशेष दूर करण्यासाठी मंत्री महोदय हे सुधारीत प्रशासकीय मान्यता, सुधारीत तांत्रिक मान्यता, रिक्त पदे भरणे, वन जमिनी सरळ खरेदी करणे ही सर्व प्रकरणे मार्गी लावण्यासाठी प्रधान सचिव जलसंपदा, प्रधान सचिव किंवा अतिरिक्त मुख्य सचिव, वित्त आणि संबंधित सर्व प्रमुख अधिकाऱ्यांसोबत अमरावतीला येऊन या संदर्भातील प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण 1 महिन्याच्या आत बैठक घेणार काय ?

तालिका सभाध्यक्ष : त्यांचे म्हणणे असे आहे की, आपण विभागाच्या अधिकाऱ्यांना घेऊन अमरावतीला बैठक लावणार आहात काय ? यासंबंधी आपण स्पेसिफिक उत्तर द्यावे. डिटेल्ड नको.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीश महाजन : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. विरेंद्र जगताप आणि डॉ. सुनिल देशमुख यांनी जो आग्रह धरला आहे यासंबंधी त्यांना माहिती आहे की, माननीय मुख्यमंत्री दर महिन्याला वॉररुममध्ये बसून अमरावती विभागाची व्हीसीद्वारे माहिती घेत असतात. या उपरही आपली जर इच्छा आहे तर मी अधिवेशन संपल्यानंतर 15 दिवसाच्या आत अमरावतीला येऊन सर्व अधिकाऱ्यांना आणून सविस्तर बैठक आपण त्या ठिकाणी घेऊ. 15 दिवसाच्या आत नागपूरला आणि अमरावतीला या दोन्ही ठिकाणी बैठका घेऊ. मी यासाठी महिनाभर म्हणत नाही तर 15 दिवसाच्या आत आपण बैठका घेऊ.

डॉ. सुनिल देशमुख : अध्यक्ष महाराज, सन्माननीय मंत्री महोदय विनाकारण पर्सनली घेत आहेत. मी पूर्वी जेव्हा सत्तारुढ पक्षाचा आमदार होतो तेव्हाही हा प्रश्न सातत्याने उचलत होतो. मी या खात्याचा मंत्री असताना सुध्दा आताचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस साहेब, श्री सुधीर मुनगंटीवार साहेब यांच्या खांद्याला खांद्या घेऊन लढलो आहे आणि पश्चिम महाराष्ट्राच्या नेतृत्वाच्या विरोधात लढलो आहे. तत्कालीन मंत्री श्री. जयंत पाटील आणि श्री. अजित पवार यांच्याशी भांडलो. परंतु त्यांनी कधी पर्सनली घेतले नाही. मी मंत्री असताना मी त्यांच्याशी भांडायचो. आपण हे पर्सनली का घेत आहात. हा प्रश्न ऐकून घ्यावा. माझे काय म्हणणे आहे की, यामधून आपल्याला मार्ग काढावयाचा आहे आणि आम्ही म्हणतो की.....

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य डॉ. अनिल देशमुख आपण स्पेसिफिक बोलावे. आपल्याला सभागृह 10.55 ला संपवावयाचे आहे. मंत्री महोदयांनी आपल्याला स्पष्टपणे सांगितले आहे की, ते बैठक घेणार आहेत. त्यामुळे आपले समाधान होईल. मंत्री महोदयांनी स्पष्टपणे सांगितले आहे. त्यामुळे आपल्याला त्या बैठकीत बोलता येईल आणि उत्तरे देखील मिळतील. त्या ठिकाणी सर्व अधिकारी राहतील.

श्री. सुनिल केदार : अध्यक्ष महोदय, सभागृहातील चर्चेला महत्व असते. म्हणून आम्हाला चर्चा येथेच करावयाची आहे. मंत्र्यांचे उत्तर चांगले व पॉझिटिव्ह आहे. मंत्री महोदय पॉझिटिव्ह आहेत. आमची आपल्या माध्यमातून एवढीच विनंती आहे की, पूर्ण पॉझिटिव्ह उत्तर ऐकून ही चर्चा येथे थांबवून आपण वेगळी चर्चा येथे करणार आहात काय, कारण आपल्याला माहिती आहे, आपण

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनिल केदार.....

सुध्दा जेव्हा या बाजूला होते त्यामुळे सभागृहातील चर्चेला जास्त महत्व असते आणि त्यामुळे प्रश्न सुटतात. त्यामुळे ही चर्चा थांबवून ठेवावी. नंतर आपण ही चर्चा घेऊ. मंत्री महोदय आम्हाला आपल्याबद्दल तक्रार नाही. म्हणून आमची विनंती मान्य करावी.

श्री. गिरीश महाजन : अध्यक्ष महोदय, मी पुन्हा सांगतो की अमरावती आणि नागपूरला एक एका आठवड्यामध्ये म्हणजे अधिवेशनानंतर 15 दिवसाच्या आत येतो. प्रत्येक प्रकल्पवाईज आपण त्या ठिकाणी सविस्तर चर्चा करु.

तालिका सभाध्यक्ष : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक आता पुन्हा 11.00 वाजता होईल.

(सभागृहाची विशेष बैठक सकाळी 10 वाजून 50 मिनिटांनी स्थगित झाली.)

G-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष)

पृ.शी./मु.शी. : तोंडी प्रश्नोत्तरे

धरणगांव ते नरवेल (ता.मलकापूर, जि.बुलढाणा) रस्त्याला
जोडणाऱ्या धोंगर्डी पोचमार्गाची झालेली दुरवस्था

(1) *48474 श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मलकापूर मतदार संघातील प्रजीमा ९ ला जोडणारा धोंगर्डी पोचमार्ग ह्या एकूण १.३० कि.मी. लांबीच्या रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे दुचाकी, चारचाकी वाहन धारकांना, शेतकरी व ग्रामस्थांना गैरसोयीचे झाले असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर रस्त्याचे मातीकाम ववखडीकरण करण्यासाठी २५ लक्ष रुपयांच्या निधीची आवश्यकता असून, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, बुलढाणा यांना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) व (२)२ स्थानिक लोकप्रतिनिधींनी तोंडी मागणी केलेली आहे.

(3) व (४) मलकापुर मतदारसंघातील धरणगांव ते नरवेल या प्रजिमा ९ ला जोडणारा धोंगर्डी पोचमार्ग हा ग्रामीण मार्ग क्र. ४० दर्जाचा रस्ता असून त्याची एकूण लांबी ३.५० कि.मी. आहे. सदर रस्त्याच्या ०/०० ते १/९०० कि.मी. लांबीचे रस्त्याच्या मजबुतीकरण व खडीकरणाचे काम मार्च २०१५ अखेर पूर्ण करण्यात आले आहे.

प्रश्नांकित १/९०० ते २/९०० या १ कि.मी. लांबीतील मजबुतीकरणासह मुरुमीकरणाचे काम स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या मागणीनुसार सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजनेमधून मंजूर असून निविदा स्तरावर आहे.

उर्वरीत २/९०० ते ३/५०० कि.मी. लांबीतील रस्त्याचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनेमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून सन २०१६-१७ मध्ये प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.48474.....

श्री.हर्षवधन सपकाळ : अध्यक्ष महोदय, मलकापूर मतदारसंघातील धरणगाव ते नरवेल हा पूर्णाकाठचा रस्ता आहे. सदरच्या रस्त्यावर खांदेश, मराठवाडा आणि विदर्भ यांच्या प्रवेशद्वाराजवळील हा रस्ता असून दरवर्षी पूर्णा नदीला पूर आल्यानंतर इतर पर्यायी रस्ते बंद पडतात. अशा स्थितीमध्ये या मागणीच्या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे. प्रश्नामध्ये दिलेले उत्तर बरोबर आहे. परंतु यासोबत कायमची मागणी आहे. जिल्हा परिषदेच्या इतर मार्गाच्या अनुषंगाने प्रश्न आहे की, बुलढाणा शहरातील ग्रामीण रस्त्यांकरिता या रस्त्यांसोबत एकत्रित स्वरूपाचे नियोजन शासन करणार काय?

श्री.दिपक केसरकर : अध्यक्ष महोदय, उत्तरामध्ये असे स्पष्ट लिहिलेले आहे की, 0/00 ते 1/900 कि.मी. रस्त्याचे काम पूर्ण झालेले आहे. 1/900 ते 2/900 निधी दिलेला आहे. फक्त 600 मीटरचे काम अपूर्ण राहिलेले आहे. या रस्त्याच्या खडीकरणासाठी पैसे उपलब्ध करून दिले जातील.

श्री.हर्षवर्धन सपकाळ : अध्यक्ष महोदय, सदरहू रस्ता हा नेहमीच खराब राहतो. या प्रश्नात बुलढाणा जिल्ह्याच्या सीमेपर्यंतचा रस्ता कव्हर झालेला आहे. बुलढाणा जिल्हयाच्या सीमेनंतर आदरणीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांच्या मतदारसंघातील रस्त्यांची अवस्था तीच आहे. मंत्री महोदयांना विनंती आहे की, हा थेट रस्ता नरवेल नॅशनल हायवे 6 पासून कोथळी या गावापर्यंतचा संपूर्ण रस्ता दुरूस्त करण्याच्या अनुषंगाने शासनाला विनंती आहे.

श्री.दिपक केसरकर : अध्यक्ष महोदय, हा जो रस्त्यांच्या संदर्भातील प्रश्न आहे याबाबत मी आधीच सांगितले की, 600 मीटर रस्त्याचे काम अपूर्ण राहिलेले आहे. यावर्षात सदर काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिलेले आहे. आपण सांगितलेल्या रस्त्याबाबत माहिती घ्यावी लागेल. सदर माहिती घेऊन त्यावर काय करता येईल याबाबत सभागृहाला अवगत करण्यात येईल.

श्री.संजय सावकारे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले हा रस्ता वारंवार खराब होत आहे. या रस्त्यांच्या मुरूमीकरणाचे काम मंजूर केलेले आहे. या रस्त्यांच्या डांबरीकरणासाठी शासन निधी उपलब्ध करून देणार आहे काय की जेणेकरून डांबरीकरण झाल्यानंतर रस्ता मजबूत राहील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.48474.....

श्री.दिपक केसरकर : अध्यक्ष महोदय, ग्रामीण विहार डांबरीकरणासाठी सीएमजीएसवाय ही नवीन योजना आणलेली आहे. परंत त्याचे नॉर्म्स आहेत. नॉर्म्समध्ये ज्यावेळी हा रस्ता येईल त्यावेळी त्याचा विचार करण्यात येईल.

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पागोरी पिंपळगाव (ता.पाथर्डी, जि.अहमदनगर) येथील वसुंधरा पाणलोट समितीच्या कामात झालेला गैरव्यवहार

(2) *45755 श्री.विजय औटी (पारनेर) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पागोरी पिंपळगाव (ता.पाथर्डी, जि.अहमदनगर) येथील वसुंधरा पाणलोट समितीच्या कामातील गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी कृषी विभागाचे मंडळ अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीची नेमणूक करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, समितीने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(3) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) होय.

(2), (3) व (४) मंडळ कृषि अधिकारी, करंजी हे दि.१४/१/२०१६ रोजी चौकशीकरीता गेले असता सदर गावातील ग्रामस्थांनी तणावपूर्ण परिस्थिती निर्माण केल्याने चौकशी झाली नाही. आता सदर चौकशी करण्याकरीता तालुका कृषि अधिकारी यांना आदेशीत करण्यात येत आहे.

श्री.विजय औटी : अध्यक्ष महोदय, पागोरी पिंपळगाव येथील वसुंधरा पाणलोट समितीच्या कामामध्ये जो काही गैरव्यवहार झाला आणि चौकशी करण्यासाठी मंडळ कृषी अधिकाऱ्यांना त्याठिकाणी पाठविले. मंडळ कृषी अधिकारी तेथे गेल्यानंतर तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली असे छापील उत्तरामध्ये म्हटलेले आहे. नेमकी तणावपूर्ण परिस्थिती निर्माण होण्याची कारणे काय? आता नेमकी त्यांच्याकडून ती चौकशी काढून घेतली. ज्याला नेमले त्याने चौकशीच केली नाही. आता ज्याला चौकशी करायला सांगत आहात तो किती कालावधीमध्ये ही चौकशी पूर्ण करणार आहे.

श्री.विजय शिवतारे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विजय औटी यांनी विचारलेला प्रश्न सत्य आहे. ग्रामस्थ आणि सरपंच पागोरी पिंपळगाव यांनी सन 2013 मध्ये झालेल्या कामात अनियमितता आणि भ्रष्टाचार झाला अशाप्रकारचे आरोप केले होते. असे आरोप केल्यानंतर जिल्हा कृषी अधिक्षक, अहमदनगर यांनी दिनांक 31.12.2015 च्या पत्रांन्वये चौकशी अहवाल कृषी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.45755.....

श्री.विजय शिवतारे.....

अधिकारी, अहमदनगर यांच्याकडून मागविला. त्यांनी बी.टी.सोनावणे यांना मंडळ कृषी अधिकारी म्हणून नियुक्त केले गेले. बी.टी.सोनावणे हे दिनांक 14.1.2016 रोजी दिलेल्या उत्तरात छापल्याप्रमाणे सदर गावामध्ये चौकशीसाठी गेले होते.

अध्यक्ष महोदय, परंतु अगोदरचे सरपंच ज्यांच्यावर आरोप आहेत आणि आताचे सरपंच या दोघांमधील हे आरोप प्रत्यारोप होते. संपूर्ण गाव याठिकाणी हजर होते. कृषी अधिकारी बी.टी.सोनावणे यांना गावकऱ्यांनी घेराव घातला आणि चौकशी होऊ दिली नाही. म्हणून ते परत आले. परत आल्यानंतर कृषी अधिकारी प्रभारी श्री.घुले हे त्याठिकाणी होते. यांना सदर कामासाठी आदेशित करण्यात आले होते. म्हणजे दिनांक 16.1.2016 रोजी त्यांना आदेशित केले आणि दिनांक 20.1.2016 रोजी श्री.किरण मोरे हे त्याठिकाणी रूजू झाले. यांना सदर काम सांगण्यात आले होते. यामध्ये त्यांनी चौकशीला सुरूवात केली. परंतु त्यांचे असे म्हणणे आहे की, 31 मार्च असल्याकारणाने सदर चौकशी पूर्ण करता आली नाही. यामध्ये आरोप असे आहेत की, पाणलोट समितीचे अध्यक्ष, माजी सरपंच होते त्यांनी लोकसहभागाची 5 ते 10 टक्के रक्कम भरायची असते ती न भरता ही कामे पूर्ण केली गेली. त्यांचा आराप असा देखील होता की, ज्या मशीनचे रजिस्ट्रेशन झालेले आहे, ज्यांना चेक दिले गेलेले आहेत. त्या चेक धारकांकडे स्वत:चे मशीनच नव्हते. शासनाच्या नियमाप्रमाणे रजिस्ट्रेशन असायला पाहिजे ते नव्हते अशाप्रकारचे आरोप आहेत. म्हणून श्री.मोरे यांना ही सर्व चौकशी करण्यासाठी 31 मार्च, 2016 पर्यंत वेळ कमी होता. संबंधितांना चेक दिलेले आहेत त्यांच्या नावाने मशीन रजिस्टर आहे किंवा नाही अशी बरीच चौकशी त्यांनी केलेली आहे. ज्यांन कामे केलेली आहेत, ज्यांना पैसे दिलेले आहेत. ज्यांनी कामे केलेली आहे ती व्यवस्थित झालेली आहेत की नाही या सर्वांची चौकशी करण्यासाठी त्यांनी थोडासा वेळ मागितलेला आहे. मी देखील त्यांना विचारले की, दीड महिन्यामध्ये आपण काही करु शकला नाही तर सात दिवसांमध्ये काय चौकशी करणार असे विचारले. परंतु त्यांनी सांगितले की, 31 मार्च असल्याकारणाने चौकशी पूर्ण होऊ शकली नाही. पुढचे सात दिवस त्यांना वेळ देण्यात

.....6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.45755.....

श्री.विजय शिवतारे.....

आलेला आहे. तालुका कृषी अधिकारी श्री.मोरे हे अहवाल सादर करतील आणि अहवाल सादर केल्यानंतर त्याप्रमाणे शासन संबंधितांवर कारवाई करेल.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विजय औटी यांनी जो प्रश्न विचारलेला होता. बाकीची बरीच माहिती मिळाली, पण विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही. प्रश्नामध्ये मंत्री महोदयांनी असे उत्तर दिलेले आहे की, पहिल्यांदा कृषी मंडळ अधिकारी, इचलकरंजी ते गेल्यानंतर गावातील लोकांनी तणावपूर्ण वातावरण निर्माण केल्याने चौकशी केली नाही असे सांगितले. आता नवीन कृषी अधिकारी गावामध्ये गेल्यानंतर सुध्दा तणावपूर्ण परिस्थिती निर्माण होऊ शकतेच. मग अशी तणावपूर्ण परिस्थिती निर्माण होणार असेल तर पोलीस बंदोबस्त होऊन चौकशी केली जाणार आहे काय? आता बाजूने तणावपूर्ण शांतता त्याठिकाणी होऊ शकत नाही. एकंदरीत उत्तरामध्ये बघितल्यानंतर असे लक्षात येते की, सर्व ग्रामस्थांचा याला विरोध आहे. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, नवीन कृषी अधिकारी नेमलेले आहेत ते 7 दिवसात अहवाल सादर करणार आहेत आणि आज तारीख 6 आहे म्हणजे उद्या 7 दिवस संपत आहेत. परंतु तो पुन्हा गावामध्य चौकशीसाठी गेल्यानंतर तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली तर तेथे पोलीस बंदोबस्त घेऊन याची सखोल चौकशी करून जे काही "दूध का दूध, पानी का पानी" जनतेच्या समोर येणार आहे. याबद्दल शासन कारवाई करणार आहे काय?

श्री.विजय शिवतारे : अध्यक्ष महोदय, जे काम झालेले आहे ते पागोरी पिंपळगाव येथील 912 हेक्टर क्षेत्र उपचारित करायचे आहे आणि त्याची किमत 61.31 लक्ष आहे. यातील 463 हेक्टरचे काम झालेले आहे. यासाठी 26.62 एवढा निधी खर्च झालेला आहे. 449 हेक्टर क्षेत्र उपचारित व्हायचे बाकी आहे. 463 हेक्टर जमिनीचा उपचारित झालेले आहे त्याचे चर बराबर आहेत की नाही, त्याची उंची बरोबर आहे की नाही, त्याची रुंदी बरोबर आहे की नाही हे सर्व तांत्रिकदृष्ट्या चेक करायचे आहे. पहिल्यांदा ज्यावेळेस बी.टी.सोनावणे गेले त्यावेळेस दोन आरोप करणारे आणि ज्यांच्यावर आरोप केले हे दोन्ही एकाच गावचे आहेत आणि त्यामुळे हा तणाव होता. परंतु तणावाचा आणि याचा तसा काही संबंध नाही. उपचारित झालेले क्षेत्र हे शेतीमध्ये

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.45755.....

श्री.विजय शिवतारे.....

आहे. म्हणून त्याचे तांत्रिकदृष्ट्या मुल्यांकन करण्यासाठी वेळ लागतो. मी देखील संबंधित अधिकाऱ्याला विचारले की, आतापर्यंत दीड महिन्यात जे झाले नाही ते 7 दिवसात कसे पूर्ण होईल. त्यांनी सांगितले की, बरीचशी चौकशी पूर्ण झालेली आहे. संबंधितांना ज्यांना चेक दिलेले होते त्यांच्या नावाने स्वतःचे मशीनच नव्हते. परंतु त्यांनी मौखिक माहिती अशी दिली की, ज्यांना चेक दिले त्यांच्या नावाने मशीन रजिस्ट्रेशन केलेले आहे. याची तांत्रिक तपासणी करायला कंपार्टमेंट बंडीग असेल तांत्रिकदृष्ट्या याचे मोजमाप घ्यायचे आहे यासाठी थोडासा वेळ लागेल. परंतु मी आपल्याला आश्वासित करतो की, आजपासून सात दिवसाच्या आत यासंदर्भातील पूर्ण तांत्रिक माहिती घेऊन 7 दिवसाच्या माहिती सादर करावी. म्हणजे पुढची कारवाई शासन करेल असे मी आश्वासन देतो.

H-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिपक चव्हाण : अध्यक्ष महोदय, यामध्ये जो गैरव्यवहार झाला आहे. त्यामध्ये पाणलोट समितीचे अध्यक्ष, कृषि सहायक आणि सर्व संगणमताने वैगरे वैगरे करतात. त्यामुळे तालुका अधिका-यांची चौकशी करुन काही निष्पन्न होणार नाही. माझी अशी मागणी आहे की, ही चौकशी आपण जिल्हा कृषि अधिक्षक किंवा विभागीय कृषि आयुक्त यांच्यामार्फत केली जाणार का ?

श्री.विजय शिवतारे : अध्यक्ष महोदय, दोन आरोपांपैकी एक आरोप अत्यंत महत्वाचा आहे. पाणलोट कमिटीचे अध्यक्षांना काही चेक देण्यात आले आहेत. कायद्यान्वये पाणलोट समितीचे अध्यक्ष देखिल काम करु शकतात. त्यामध्ये काही इतर गावातील लोक असतील. संगनमताने विशेषत: पाणलोट विकास कार्यक्रमामध्ये ब-याच तक्रारी आहेत. त्याबद्दल वाद नाही. परंतु आपण् जो प्रश्न विचारला तालुका कृषि अधिक्षक यांनी ती चौकशी करावी आणि ती चौकशी केल्यानंतर मोजमाप लपवण्याचे काहीच कारण नाही. कोणती कामे झाली त्याचे फोटोग्राफ सुध्दा आहेत. ते फोटोग्राफ चेक करण्यात येतील. त्याची तांत्रिक दृष्टया लांबी, रुंदी, मोजता येते. संपुर्ण माहिती येऊ द्या. तांत्रिक दृष्टया सर्व मोजमाप येऊ द्या. त्याच्या एम.बी. रेकॉर्ड केलेल्या असतात. रेकॉर्ड करणारे तांत्रिक अधिकारी वेगळे असतात. हे काम चेक करण्यासाठी संपूर्ण एक चैन आहे. त्या सर्व ठिकाणाहून कागद पत्रांच्या दस्ताऐवजासह आता किती मोजमाप झाले आणि त्यावेळी किती मोजमाप झाले. जे तांत्रिक एम.बी. रेकॉर्ड केलेले आहेत. ते सर्व चेकरुन काम केले जाईल. चुकीचे असेल तर कोणालाही पाठीमागे टाकले जाणार नाही. याबाबत निश्चितपणे कार्यवाही केली जाईल.

श्री.विजय औटी : अध्यक्ष महोदय, सन 2013 मध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. तणावपूर्ण परिस्थिती निर्माण होण्याचे कारण स्पष्ट आहे. त्या वेळच्या त्यागावचे सरपंच त्या ग्रामपंचायतीमध्ये झालेले सत्तांतर, नवीन सरपंचानी केलेल्या तक्रारी, जुन्या सरपंचानी केलेल भ्रष्टाचार झाकण्याच्या प्रयत्नामध्ये दोन गटामध्ये तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली. हे त्यातील वास्तव आहे असे असताना सन 2013 ची मापे सन 2016 साली घेणार ग्रामीण भगामध्ये, वसुंदरा पाणलोटाची कामे, कशी होतात, काय होतात जो वसुंदरा पाणलोट क्षेत्राचा अध्यक्ष असतो त्याच्या नावाने कदाचित त्याला काम करता येत असेल त्याच्याबद्दल आमची तक्रार नाही. प्रश्न विचारण्याचा माझा मुळ उद्देश

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आहे. सन 2013 साली कामे झाली ती कामे नियम बाहय पध्दतीने लोकांना वाटली गेली. त्याच्यामध्ये भ्रष्टाचार झाला. आपण ही रक्कम सांगितली ती 26 लाख रुपये बरोबर आहे. वातावरण असे निर्माण झाले आहे की, काम झाले 6 लाखाचे आणि बिले काढली 26 लाखांची. आता मला तुम्ही सांगा सन 2016 चा तालुक्याचा कृषी अधिकारी सन 2013 पासूनच्या कामाचा अहवाल यांना सादर करणार, त्याच्यावर अवलंबून राहून हे त्याच्यावर कार्यवाही करणार हे थोडेसे विसंगत वाटते. अधिवेशन संपण्यापूर्वी माहिती पटलावर ठेवणार आहात ही चांगली गोष्ट आहे. फक्त कृषि अधिका-याच्या चौकशीवर अवलंबून राहून चालणार नाही.

अध्यक्ष महोदय, कृषि खात्याकडून सिमेंटचे बंधारे बांधतो. आपली तक्रार असली की, त्यांच्याकडे तांत्रिक ज्ञान असणारे लोक नसतात. म्हणून कामे पाटबंधारे विभागाला देण्यात येतात. आता वसुंदराची पाणलोट क्षेत्राची कामे ज्या विभागामार्फत करतो त्याच विभागाचा तालुक्याचा अधिकारी तपासणारा असेल तर त्यातून सत्य बाहेर येईल की, काय ? याचे उत्तर मंत्री महोदय देतील काय ?

श्री.विजय शिवतारे : अध्यक्ष महोदय, सन 2013 साली झालेले काम इतका वेळ का झाला या संबंधातील तक्रार आली आहे. दिनांक 29.12.2015 रोजी दोन वर्षांनतर तक्रार आलेली आहे. त्यांनी सांगितले ते खरे आहे. ग्रामपंचायतीतला सत्ता बदल अगोदरचा जो सरपंच होता तो सत्तेतून बाजूला गेला. जे नवीन सरपंच आले एकमेकांच्या कुरघोडीमध्ये सुरुवात झाली. साधारणतः ती तक्रार लवकरच दिली पाहिजे होती. पैसे ताबडतोब दिले गेले होते. तरीही आलेली तक्रार चेक केली पाहिजे. तीची सत्यता पडताळून पाहिली पाहिजे. जसे आपण सांगितले 2013 मधले जरी काम असेल तरी रुंदी लांबी, बांध, कंपार्टमेंट मोजता येते. त्या तत्कालिन तांत्रिक अधिका-याने एम.बी. रेकॉर्ड केलेले आहेत. ते रेकॉर्ड आणि आता प्रत्यक्षातील रेकॉर्डस् याच्यात तफावत काय आढळली. निश्चितपणे त्याच्यातून लक्षात येईल, थोडाफार फरक एक दोन पावसाळे झाल्यानंतर माती वाहून जाते, पाच, दहा टक्यांचा फरक होऊ शकतो. एम.बी.मध्ये फरक आणि प्रॅक्टीकल जागेमध्ये फरक असेल तर ते आपल्याला चेक करता येईल. डिले होण्याचे उशीर होण्याचे मुख्य कारण काम झाल्यानंतर दोन वर्षांनी हया तक्रारी आलेल्या आहेत. त्याच्यामुळे तो डिले झाला.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.45755.....

श्री.विजय शिवतारे.....

डिसेंबर 2015 मध्ये तक्रार दिल्यानंतर ताबडतोब 10 दिवसांच्या आत मंडळ कृषि अधिका-याची नियुक्ती केली गेली. प्रभारी कृषि अधिका-याची नियुक्ती केली गेली. शासनाने अतिशय तत्परतेने केले. परंतु 31 मार्चमुळे थोडासा त्यांना वेळ लागला आहे. जर अशा प्रकारचे फसवणूकीचे, भ्रष्टाचाराचे काम झाले असेल तर कोणत्याही परिस्थिती कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. योग्य ती चौकशी करु अवगत करु.

अध्यक्ष : कामकाजाचे अंदाजपत्रक ग्रामपंचायतीच्या फलकावर लावण्याची पध्दत आहे का ?

श्री.विजय शिवतारे : अध्यक्ष महोदय, याची प्रक्रिया सांगतो. कायद्यानुसार, नियमानुसार पाणलोट विकास समिती स्थापन झालेली आहे. त्या पाणलोट विकास समितीचे चयन, त्याची निवडणूक देखील ग्रामस्थांच्या मार्फत होत असते. ते झाल्यानंतर संपूर्णपणे काय काय कामे या संदर्भामध्ये माहिती दिली जाते. चावडीवर लावली जाते. ग्रामसभेची त्याला मान्यता घेतली जाते. त्याच्यानंतर काम केले जाते. एखाद्या गावामध्ये असणारी पाणलोट विकास समिती, मला माहित आहेत की, अगोदरच्या काळात त्याच्यामध्ये बऱ्याच अनियमितता झालेल्या आहेत. मी विरोधी आमदार असताना माझ्या देखिल तक्रारी यासंदर्भात झालेल्या होत्या. काय झाले हे सर्वांना माहिती आहे ? निदान यामध्ये तशा प्रकारची तथ्ये आढळून आली याच्यापुढे अशा प्रकारचे काम करण्याची कोणाची डेरिंग होऊ नये याची काळजी घेतली जाईल.

श्री.भारत भालके : अध्यक्ष महोदय, कृषि पाणलोट समितीच्या बाबतीत ग्रामसभेला माहिती दिली जाते. मिटींग घेतली जाते ही वस्तुस्थिती आहे. ग्रामसभेने ग्रामपंचायतीने त्या एजन्सीला काम देऊ नका असे सांगितले. तरी आपल्या अधिकाऱ्यांनी त्याला केव्हा नकार दिला नाही व कामे दिलेली आहेत. अशा एजन्सी भ्रष्टाचार करुन अडकून पडलेल्या आहेत. त्यांना ब्लॅकलिस्टमध्ये टाकून भविष्यात तुम्ही या पध्दतीची जागृता करुन नव्याने कामांना प्राधान्य देणार आहात का ?

.....4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.45755.....

श्री.विजय शिवतारे : अध्यक्ष महोदय, या संदर्भीय प्रश्नांमध्ये तशा प्रकारचे आरोप नाहीत. सन्माननीय सदस्यांनी थोडे पेशन्स ठेवावेत. तुमच्या प्रश्नाला उत्तर देत आहे. ग्रामपंचायतीने सांगितले संबंधिताला काम देऊ नका असा ठराव केला असेल. तरही कृषि अधिका-याने त्याला काम दिले तर संबंधित कृषि अधिकाऱ्यावर कारवाई केली जाईल.

श्री.ग.आ. देशमुख : अध्यक्ष महोदय, 62 लाखांची कामे करायची होती. 26 लाखांची कामे केलेली आहे. त्याची चौकशी वैगरे सुरु आहे. बाकीच्या कामांच्या बाबतीत काय परिस्थिती आहे ? ती कामे पूर्ण झालेली आहेत का ? झाली नसल्यास, का झालेली नाहीत ?

श्री.विजय शिवतारे : अध्यक्ष महोदय, पिंपळगावामध्ये कंपांमेंट बंडींगचे काम आहे. ते 463 हेक्टर आहे. त्याच्यावर आतापर्यंत 26.62 लक्ष निधी खर्च झालेला आहे. याच प्रकल्पातंर्गत या गावामध्ये 449 क्षेत्र उपचारीत व्हायचे बाकी आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार ते काम पुढे पूर्ण करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

श्री. ग.आ. देशमुख : अध्यक्ष महोदय, दोन वर्ष काम अपूर्ण ठेवले ते निधीच्या अभावी अपूर्ण ठेवले की, आणखीन काही दुसरे कारण होते ?

श्री.विजय शिवतारे : अध्यक्ष महोदय, संपूर्ण राज्यामध्ये साधरणत: 1170 प्रकल्पांसाठी 6255 कोटी रुपयांची संपूर्ण केंद्र शासनाचा निधी होता. मी आपल्याला सांगू इच्छितो की, आतापर्यंत वितरीत निधी 2139 कोटी रुपये झालेला आहे. यामधून 2140 कोटी रुपयांचे खर्च देखील झालेले आहेत. त्यामुळे जसे पैसे मिळतील त्याप्रमाणे उर्वरित काम केले जाईल. 2140 कोटी रुपये आलेले आहेत. त्याचा 100 टक्के खर्च पूर्ण झालेला आहे. जसे पैसे उपलब्ध होतील. त्याप्रमाणे मार्ग काढला जाईल. केंद्र सरकारचा त्यांच्या पैशांच्या बाबतीत एकदा क्लीअरन्स मिळाला की राज्य शासनामार्फत जे काम राहिलेले आहे ते दखिल पूर्ण करु.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ठाणे जिल्ह्यातील शाई व काळू धरणांची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(३) * ***४१९२७ श्री.जितेंद्र*** **आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व)व:व** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील दिवसेंदिवससवाढत चाललेल्या शहरीकरणाबरोबरच वाढत्या लोकसंख्येच्या पाण्याची समस्या सोडविण्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या शाई व काळू धरणांची कामे अद्यापही अपूर्णावस्थेत असल्याची माहिती माहे जानेवारी, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच ठाणे जिल्ह्यातील पाण्याची समस्या सोडविण्याबाबत व जिल्ह्यातील भविष्यात वाढणारी पाण्याची मागणी यासंदर्भात मा.जलसंपदा मंत्री व मा.पालकमंत्री ठाणे जिल्हा यांच्यासमवेत दिनांक ३ मार्च, २०१६ रोजी वा त्यासुमारास बैठकही आयोजित करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीनुसार ठाणे जिल्ह्यातील पाण्याची समस्या सोडविण्यासाठी धरणांची कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ***?***

श्री. गिरीष महाजन : (१) हे अंशतः खरे आहे.

काळू धरणाचे काम मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये १/३/२०१२ पासून बंद आहे. शाई प्रकल्पाच्या भूसंपदानास स्थानिकांचा तीव्र विरोध असल्याने अद्याप चालू करता आलेले नाही.
(२) होय.
(३) व (४) शाई प्रकल्पास प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचा तीव्र विरोध असल्याने भूसंपादन प्रक्रिया अद्याप सुरु झालेली नाही. तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने काळू धरणाचे काम पूर्ण झालेशिवाय शाई धरणाचे काम हाती घेऊन नये असे कळविलेले आहे. त्यामुळे सदर कामास अद्याप सुरुवात केलेली नाही. काळू प्रकल्पाच्या बांधकामास मा.उच्च न्यायालयाचे अंतरिम आदेशा अन्वये स्थगिती दिली असल्याने काम दिनांक १.३.२०१२ पासून बंद आहे. मा.उच्च न्यायालयाचे आदेशान्वये आवश्यक संवैधानिक मंजूऱ्या प्राप्त करुन घेणेची कार्यवाही सरु आहे. वनजमीनीसाठी नक्त वर्तमान मूल्याची रक्कम भरणा करणेसाठी अद्याप मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने रक्कम उपलब्ध करुन दिलेली नाही. त्याबाबत पाठपुरावा चालू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, माझे दोन तीनच स्पेसिफिक प्रश्न आहेत. कारण हा प्रश्न हया आठवडयात दोन तीन वेळा लागला आहे. स्वत:मंत्री महोदय उपस्थित आहेत. हा विषय आपल्याला माहित आहे. आपण आमचे पालकमंत्री आहात. मुंबईची लोकसंख्या ज्या गतीने वाढते आहे. त्याच्या तिनपट ठाण्याची लोकसंख्या वाढते आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.41927 .....

श्री.जितेंद्र आव्हाड .....

सर्वाधिक महानगरपालिका असलेला जिल्हा म्हणजे ठाणे जिल्हा आहे. पण एक महानगरपालिका सोडली तर बाकीच्या महानगरपालिकांनी दुर्दैवाने पाणीपुरवठयाच्या स्त्रोताकडे लक्ष दिलेले नाही. त्यामुळे ठाणे जिल्हयातील महानगरपालिकांची आजची पाणीपुरवठयाची स्थिती अतिशय दयनीय आहे. याकरिता शासनाकडून अपेक्षा आहेत. त्यामुळे शासन व महानगरपालिकांनी मिळून अपूर्ण धरणे व आक्षेप असलेल्या धरणांबाबत चर्चा करावी. शेतकऱ्यांना त्यांचा मोबदला मिळाला तर शेतकरी नाही म्हणणार नाहीत. पण त्यासाठी त्यांच्याची चर्चा करावी लागेल, एखादी समिती स्थापन करुन त्यांना न्याय द्यावा लागेल. या प्रक्रियेला वेग देण्याची गरज आहे. 2003 पासून शाई व काळू धरणाचे काम प्रलंबित आहे. ही दोन धरणे झाली तर ठाणे जिल्हयाची तहान 2040 पर्यंत आपणास भागविता येईल व पाणी पुरविता येईल. शासन व मंत्री महोदयांनी यामध्ये जातीने लक्ष घालावे कारण दिवसेंदिवस ठाणे जिल्हयातील पाणी प्रश्न किती गंभीर होतो आहे हे आपणास माहिती आहे. या दोन्ही धरणाबाबत आपण सकारात्मक भूमिका घ्यावी. एमएमआरडीए म्हणते की, आमच्याकडे पैसे नाहीत. हा प्रश्न बाजूला ठेऊन पाण्याची गरज व निकड लक्षात घेता, शासन गांभीर्याने पुढे पाऊल टाकून काही निश्चित धोरण आखेल का ? महानगरपालिकेने स्वतंत्र स्त्रोत निर्माण करावेत, याबाबत मागील 25 वर्षांपासून महानगरपालिकांना सांगण्यात येत आहे, याची महानगरपालिकांनी अंमलबजावणी करावी असे निर्देश मंत्री महोदय देतील का ?

अध्यक्ष महोदय, आऊट ऑफ स्क्वेअर प्रश्न मी विचारीत आहे. आपण आम्हाला पाणी देणारे पालकमंत्री व जलसंपदा मंत्री आहात. आपल्या विभागाकडून पाणी येते. ठाणे शहरामध्ये एकाच भागात राहात असलेल्या सर्व लोकांना समान न्याय न देता एकाला 60 तास, एकाला 72 तास, 48 तास पाणी कट केले जाते. वास्तविक आपल्या विभागाचे पाणी आहे, म्हणून महानगरपालिका याबाबत करीत असलेला अन्याय दूर करण्यासाठी आपण जातीने लक्ष घालणार का ?

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी विचारलेला प्रश्न मुंबई व उपनगरासाठी महत्वाचा प्रश्न आहे. काळू आणि शाई धरणातून मुंबई उपनगरांना पिण्याचे पाणी व औद्योगिकीकरणासाठी पाणी ठेवणे प्रायोजित आहे. मुंबई महानगरपालिका व एमएमआरडीए यांच्या अखत्यारीत हे आहे. आमचा जलसंपदा विभाग फक्त

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.41927 .....

श्री.गिरीष महाजन .....

एजन्सी आहे. या दोन्ही धरणाकरिता मुंबई महानगरपालिका व ठाणे महानगरपालिका निधी देणार आहे. याची 2009 मध्ये मान्यता झाली असून कार्यरंभ आदेश झालेला आहे व तेव्हापासून हे प्रकल्प प्रलंबित आहेत. मुंबई व उपनगरामधील पाण्याची परिस्थिती सर्व सन्माननीय सदस्यांना माहिती आहे. आठवडयातून दोन-दोन दिवस कट लावाला लागत आहे. यावर्षी पाऊसही कमी झालेला आहे, त्यामुळे पाण्याची अडचण आहे. ही दोन धरणे पूर्ण झाली तर येथील पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली लागणार आहे. कारण 14.5 टीएमसी पाणी काळू धरणामध्ये व शाई धरणामध्ये 12.5 टीएमसी पाणी थांबणार आहे. एवढे पाणी थांबले तर पाण्याची कायमस्वरूपी गरज भागणार आहे ही बाब खरी आहे.

अध्यक्ष महोदय, काळू धरणाच्या बाबतीत सम्यक मुक्ती संघटना ही न्यायालयात गेलेली आहे. त्यांनी सांगितले की, यामध्ये अनेक तांत्रिक अडचणी आहेत. येथे वन जमीन व पर्यावरणाचाही प्रश्न आहे. खरे तर येथे पर्यावरणाचा प्रश्न लागू होत नाही. येथील 17 गावांचे पुनर्वसन होणार आहे. या गावांनी सम्यक मुक्ती संघटनेमार्फत या धरणाला विरोध केलेला आहे म्हणून या धरणाचे काम प्रलंबित आहे. न्यायालयाने सांगितले की, हे धरण बांधण्यात येऊ नये. या धरणाला स्थगिती दिलेली आहे. यामुळे या धरणाचे पुढील काम करता येत नाही.

अध्यक्ष महोदय, शाई धरणाच्या बाबतीत तसाच प्रश्न आहे. यामध्ये 12.5 टीएमसी पाणी थांबणार आहे. या धरणालाही हायकोर्टाने स्थगिती दिलेली आहे. तसेच एमएमआरडीएने आम्हाला पत्र दिलेले आहे की, जोपर्यंत काळू धरण पूर्ण होत नाही, तोपर्यंत शाई धरणाच्या कामाला आपण हात लावू नये व या कामाला सुरुवात करु नये. त्यामुळे दोन्ही धरणांचे काम थांबलेले आहे. आमचा निश्चित चांगला प्रयत्न या बाबत आहे पण अँटी करप्शन ब्युरोमार्फत या दोन्ही धरणाची चौकशी सुरु आहे. म्हणून गुंतागुंतीचा प्रश्न निर्माण झालेला आहे. तरीही काळू धरण लवकरात लवकर कसे पूर्ण करता येईल, याबाबत आम्ही पूर्ण प्रयत्न करीत आहोत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.41927 .....

श्री.गिरीष महाजन .....

अध्यक्ष महोदय, नवी मुंबई, ठाणे, मीरा-भाईंदर, उल्हासनगर, वसई, विरार या उपनगरातील पाण्याचे समान वाटपाबाबत सन्माननीय सदस्यांनी विचारले आहे. अनेक ठिकाणी आपण बघतो की, मीरा-भाईंदरला माणसी 80 लीटर पाणी मिळते, ठाणे व नवी मुंबईमध्ये 150-160 लीटर पाणी मिळते. म्हणून उल्हासनगर व मीरा-भाईंदर येथे मोठा प्रक्षोभ आहे. मोर्चे येत आहेत, लोक आंदोलन करीत आहेत. याकरिता आठवडयातून 2-3 बैठका होत आहेत. मी स्वत: ठाणे येथे सर्व संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेतली आहे. एमआयडीसीचे स्वत:चे धरण आहे. नवी मुंबईचे वेगळे धरण आहे. ठाण्याचे वेगळे धरण आहे. अशा प्रकारे त्या महानगरपालिकेने त्याबाबत नियोजन करावयाचे आहे. संबंधित आयुक्त व जिल्हाधिकारी यांना एकत्र बसवून सर्वांना समान पाणी देण्याबाबत आम्ही सांगितले आहे. सर्व नागरिकांना समान लीटर पाणी मिळण्याकरिता व समान कट लावण्याकरिता संबंधितांना आम्ही सूचना दिलेल्या आहेत. तसेच उल्हासनगरला 10 एमएलडी, मीरा-भाईंदरला 15 एमएलडी पाणी वाढवून देण्याबाबतही सूचना संबंधिताना देण्यात आलेल्या आहे.

श्री.उन्मेष पाटील : अध्यक्ष महोदय, ठाणे शहर व उपनगरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्नाबाबत मी विचारु इच्छितो.

श्री.जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, मी विचारले होते की, ठाणे महानगरपालिकेकडून एका विभागात 48 तास पाणी कट, दुसऱ्या विभागाला 72 तास पाणी कट केले जाते. यामध्ये आपण समानता आणणार आहात का ? कारण आपला जलसंपदा विभाग पाणी देतो. महानगरपालिकेचे स्वत:चे पाणी नाही. त्यामुळे ही समानता व समता आणण्यासाठी आपण येथून अधिकारी पाठवून त्यांना त्याबाबत आदेश देले जातील का ?

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, धरणातून पाणी देणे हे जलसंपदा विभागाचे काम आहे. महानगरपालिकेची स्वत:ची काही धरणे आहेत. एका वार्डात कमी पाणी येते, एका वार्डात जास्त पाणी येते हे बघणे जलसंपदा खात्याचे काम नाही तरी सुध्दा त्या संदर्भात मी बैठक घेतलेली आहे. संबंधित अधिकाऱ्यांना गेल्याच आठवडयात बोलावून समान पाणी वाटपाबाबत सूचनाही दिलेल्या आहेत. तरीही पाणी कमी जास्त होत असेल तर पुन्हा त्या अधिकाऱ्यांना बोलावून सूचना देण्यात येतील.

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.41927 .....

श्री.उन्मेष पाटील : अध्यक्ष महोदय, येथे पिण्याचे पाणी व संबंधित प्रकल्पाबाबत चर्चा सुरु आहे. परंतु काळू व शाई धरणाबाबत मोबालायझेशन ॲडव्हान्स कोणत्या कंपनीला देण्यात आलेला आहे का, त्या एजन्सीचे नाव काय, जर हा ॲडव्हान्स अनेक वर्षांपासून त्या कंपनीला दिला गेला असेल तर त्याचा वापर विहीत वेळेत झाला नसेल तर आपण संबंधितांची चौकशी अँटी करप्शन ब्युरोमार्फत करणार का ?

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, काळू धरणबाबत आगावू रक्कम उचल दिली गेलेली नाही. पण शाई धरणाकरिता 15 कोटी 15 लक्ष उचल देण्यात आलेली आहे. पण शाई प्रकल्पाची ए.सी.बी.मार्फत चौकशी सुरु आहे. याबाबतचा निर्णय येईल.

श्री.प्रताप सरनाईक : अध्यक्ष महोदय, ठाणे जिल्हयाचे दुर्दैव आहे. ठाणे जिल्हयाची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत गेलेली आहे तेव्हा धरणाचा विचार केला गेला. 2003 साली या धरणांच्या कामांना सुरुवात झाली व ते काम बंद झाले. मला एक बाब प्रकर्षाने सांगावयाची आहे की, न्यायालयाने निर्बंध घातले असतील व स्थगिती दिलेली असेल तर भविष्यात ती कामे होणार नाहीत का ? जलसंपदा मंत्री यांनी हताश होऊन सांगितले की, शाई धरणाचे काम आम्ही चालू करु शकत नाही आणि काळू धरणाचे काम न्यायालयामुळे बंद पडलेले आहे. मी विचारु इच्छितो की, जर न्यायालयाने निर्बंध उठविले नाही तर ती कामे चालूच होणार नाहीत का ? भविष्यात ठाणे जिल्हयाला जी पाणी टंचाई भेडसावणार आहे, त्याकरिता राज्य सरकारने काही उपाययोजना केलेली आहे का ? भविष्यात आणखी लोकसंख्या वाढणार आहे, मंत्री महोदयांनी हताश होऊन बोलत आहेत. या धरणांकरिता ठाणे जिल्हयातील सर्व लोकप्रतिनिधी पाठपुरावा करीत आहेत परंतु त्यांना यश येत नाही. राज्य शासनाच्या वतीने नेहमी मोघम उत्तर देण्यात येते. भविष्यातही अशा प्रकारची उत्तरे दिली तर आम्ही कोणाकडे जायचे, त्यामुळे याबाबत राज्य शासन कोणता निर्णय घेणार आहे, काळू व शाई धरणात न्यायालयाचा हस्तक्षेप असल्याने काम थांबले असेल तर राज्य शासनाने दुसरा काही पर्याय शोधलेला आहे का ?

यानंतर जे-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.41927.....

श्री.प्रताप सरनाईक.....

आमच्याकडे काही लोक बोलतात की, ज्या पध्दतीने मुंबई महानगरपलिकेला पाणी मिळत आहे. त्या भागामध्ये मोरबे व्यतिरिक्त इतर धरणांची निर्मिती झालेली नाही. हा प्रश्न अनेक वेळा सभागृहात आलेला आहे. लोक आम्हाला लोकप्रतिनिधी म्हणून जाबा विचारत आहेत. युती सरकारकडून लोकांच्या काही अपेक्षा आहेत. शासनाने याबाबत अशा प्रकारे हताश होऊन उत्तर देणे योग्य नाही. असे असेल तर आम्ही लोकप्रतिनिधी म्हणून कुठे जायचे ? या धरणाच्या कामाला स्थगिती दिली असेल तर ठाणे जिल्हयाला पाणीपुरवठा करण्याकरिता अन्य कोणता पर्याय शासनाने नियोजित केलेला आहे का ? ठाणे जिल्हयाला पाणीपुरवठा करण्याकरिता पर्याय उपलब्ध झाला असेल तर तशा पध्दतीची कार्यवाही राज्यशासन कधीपासून चालू करणार आहे ? मुंबई महानगरपालिका जर टनेलमधून पाणी आणत असेल आणि त्याकरिता वन खाते व सीआरझेडच्या तांत्रिक अडचणी येत असतील तर तसेच, त्यामध्ये जर न्यायालयाचा हस्तक्षेप असेल तर लोकांनी शेवटी पाण्याकरिता कुठे जायचे ? शासन या सर्व अडचणींवर मात करून ठाणे जिल्हयाला पाणीपुरवठा करण्याकरिता कोणती भूमिका घेणार आहे ?

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, खरे म्हणजे ही दोन्ही धरणे महानगरपालिका व एमएमआरडीए यांच्या अखत्यारितील आहेत. भविष्यकाळातील पाण्याची निकड लक्षात घेऊनच या भागामध्ये या दोन धरणांचे नियोजन शासनाने केले होते. यामध्ये अनेक तांत्रिक अडचणी आहेत. वन खात्याच्या 1000 हेक्टर जमिनीचा 228 कोटी रुपयाचा एनपीव्ही महानगरपालिकेने भरलेला नाही. एमएमआरडीएने देखील हे एनपीव्हीचे पैसे भरलेले नाहीत. हे धरण त्यांचे आहे. त्यांनी यातील पाणी लोकांना द्यावयाचे आहे. वन खात्याच्या यामधील अडचणी दूर झाल्या पाहिजेत. श्रमिक मुक्ती संघटना शेतक-यांच्या 32 गावांच्या पुनर्वसनाच्या अडचणी समोर ठेवून कोर्टात गेले. त्यामुळे कोर्टाने स्थगिती दिलेली आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून त्याच्या लगत असलेल्या या ठाणे उपनगराची लोकसंख्याही दिवसेंदिवस वाढत चालली आहे. दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून मुंबई शहराकरिता 30-35 टीएमसी पाणी देण्याकरिता प्रयत्न सुरु आहेत. असे झाले तर भातसा धरणावरील ताण कमी होऊन उर्वरित पाणी ठाणे उपनगराला देता येईल.

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन....

याकरिता अभ्यास व डीपीआर तयार झालेला आहे. याबाबत चर्चा चालू आहे. कोयनेतूनही पाणी आणता येते, याकरिता अभ्यास व डीपीआर चालू आहे. एमएमआरडीएने 228 कोटी रुपये एनपीव्हीची रक्कम भरली तर संघटना व गावक-यांशी बोलून धरणाच्या कामाला चालना देता येईल. शासनाची यामध्ये काम करण्याची तयारी आहे.

श्री.संजय केळकर : अध्यक्ष महोदय, ठाणे जिल्हयामध्ये पाणीटंचाईसंदर्भात माननीय मंत्री महोदय आले होते. त्या ठिकाणी त्यांनी अनेक उपाययोजना सांगितल्या होत्या. पोशीर धरणाचे जे झाले ते काळू व शाई धरणाचे होऊ नये. विरोधी पक्षामध्ये जे आता बसलेले आहेत, ते सत्तेत असताना त्यांनी 20 वर्ष पोशीर धरणाचे काम पूर्णत्त्वाला जाऊ दिले नाही. आता काळू आणि शाई धरणाच्या कामालाही स्थगिती मिळालेली आहे. यामध्ये संविधानिक मंजू-या प्राप्त करुन घेण्याची शासनाची कार्यवाही सुरु आहे. उच्च न्यायालयाची स्थगिती उठविण्यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे. ही स्थगिती उठण्याची ठाणे जिल्हयाची गरज आहे. या मंजू-या मिळण्याची कार्यवाही किती दिवसांमध्ये पूर्ण होणार आहेत ? वन जमिनीचे नक्त वर्तमान मुल्य म्हणून एमएमआरडीएकडून किती रक्कम भरणे आवश्यक आहे ? ठाणे जिल्हयाची लोकसंख्या आता 75-80 लाख च्या घरात पोहोचलेली आहे. पाण्याचा प्रश्न सोडविण्याकरिता शासनाने अग्रक्रम देणे महत्त्वाचे आहे. हे पूर्वीच्या काळामध्ये झाले नाही त्यामुळे आता आम्हाला पाणी टंचाई भोगावी लागत आहे. याकरिता शासन कोणत्या प्रकारची उपाययोजना करणार आहे ?

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, मुंबई व ठाणे उपनगर येथील लोकसंख्या सातत्याने वाढत आहे. या भागामध्ये शहरीकरण होऊन नव्याने इमारती उभ्या राहत आहेत. वन खात्याच्या संदर्भात काळू धरणासाठी एमएमआरडीने 228 कोटी रुपयांचा एनपीव्ही भरणे आवश्यक आहे. हा एनपीव्ही भरला तर या कामाला चालना मिळेल. एमएमआरडीएचे म्हणणे आहे की, या धरणाच्या कामाला कोर्टाची स्थगिती आहे, आम्ही पैसे भरुन काय करावे ? या धरणाच्या कामाला कोर्टाने स्टे दिल्यामुळे अडचणी निर्माण झालेल्या आहेत. पुढे काय करणार ? शासन म्हणून आम्हाला मुंबई व ठाणे उपनगराला पाणी द्यावे लागणार आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.41927.....

श्री.गिरीष महाजन.....

याकरिता दमणगंगा पिंजाळ हा नदीजोड प्रकल्प कार्यन्वित केला तर मुंबई व ठाणे जिल्हयाकरिता 30 -35 टीएमसी पाणी उपलब्ध होणार आहे. मुंबईला पाणी मिळाले तर भातसावरील ताण कमी होऊन उर्वरित पाणी ठाणे जिल्हयाला देता येईल. हे जर झाले तर पुढील 25 वर्ष तरी मुंबईला देण्यात येणा-या पाण्याची काळजी राहणार नाही. यासंदर्भात शासन प्रयत्नशील राहणार आहे.

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, मार्च 2012 मध्ये अंतरिम आदेश काढून कोर्टाने या प्रकल्पाला स्थगिती दिलेली आहे. आज चार वर्षानंतरही ती स्थगिती तशीच आहे. प्रकल्पाची किंमत वाढत आहे आणि त्यामुळे लोकांना हाल सोसावे लागत आहेत. या स्थगितीसंदर्भातील चेंबर हिअरिंग प्रिफ्रन्स घेऊन घेतली तर हे काम मार्गी लागेल. या केसला हलवायची गरज आहे. ठेकेदार लोकांना आणि संघटना प्रतिनिधींना कोर्टात पीआयएल दाखल करण्यास सांगत आहेत. यामुळे प्रकल्पाचे काम रखडून प्रोजेक्ट कॉस्ट वाढत आहे. या संदर्भात एजन्सीचे नाव विचारण्याचा आमचा आग्रह यासाठीच होता. याकरिता दुसरे काहीच कारण नव्हते. कंत्राटदारांची आता हीच मोडस ऑपरेंडी झालेली आहे की, लोकांना कोर्टात पाठवून पीआयएल दाखल करावयाला सांगावयाचे आणि प्रकल्प लांबणीवर टाकून त्याची किंमत वाढवून घ्यावयाची. या स्थगितीसंदर्भातील चेंबर हिअरिंग प्राधान्याने घेऊन या केससंबंधीचा निकाल शासनाने लावावा. शेकडो चौ.मी.क्षेत्रफळामध्ये 25 लाखाच्या वर लोकसंख्या झाल्यानंतर महानगरपालिका तयार होते. शासन किती महानगरपालिकांना पाणी पुरविणार आहे ? महानगरपालिकेची रचना करण्याच्या अगोदर लोकसंख्या 25 लाखाच्या वर असेल चौ.मी.क्षेत्रफळ 200 कि.मी.पेक्षा जास्त असेल तर महानगरपालिकेला स्वत:चे पाणी उभी करण्याच्या व्यवस्थेचे निर्बंध टाकून पालिकांना परवानगी शासन देणार आहे का ?

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी कोर्टाची स्थगिती लवकर उठविण्यासंदर्भातील प्रश्न विचारलेला आहे. कोर्टाला आपण असे सांगू शकत नाही की, महिनाभरामध्ये स्थगिती उठविण्यात यावी. दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर मुंबईला त्यातून कसे पाणी देता येईल,याचा डीपीआर तयार करण्यात आलेला आहे. शासन कोर्टाला स्थगिती उठविण्यासंदर्भात महिनाभरात स्थगिती उठवा असे सांगू शकत नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन.

तरी देखील हा पिण्याच्या पाण्याचा महत्त्वाचा प्रश्न असल्यामुळे जे प्रयत्न शासनाला करता येण्यासारखे आहेत, ते करणार आहे. दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून मुंबईला पाणी दिले तर भातसाचे पाणी ठाणे शहराला देता येईल. ही सर्व धरणे एकमेकांना पूरक आहेत. एमएमआरडीए 228 कोटी रुपयांचा एनपीव्ही भरणार नसेल तर हा प्रश्न प्रलंबित राहील. याबाबत महापालिकेला सूचना देण्यात येतील. याबाबत त्यांची बैठक घेण्यात येईल. एनपीव्ही भरण्यासंदर्भात व वैधानिक मान्यता मिळण्या संदर्भात शासन प्रयत्न करणार आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, मी पॉईंट ऑफ प्रोप्रायटीवर बोलत आहे.

अध्यक्ष महोदय, सन 2003 मध्ये विधानपरिषदेमध्ये शाई धरण ठाणे महानगरपालिकेला देण्यात यावे, अशा प्रकारचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. याकरिता लागणारे पैसे ठाणे महानगरपालिकेने शासनाला द्यावेत, शासन यामध्ये एक्झिक्यूटिव्ह एजन्सी म्हणून काम करेल. यामुळे हे धरण शासन बांधेल, असे ठरले होते. याकरिता ठाणे महानगरपालिकेने नकार दिला. त्यामुळे हे धरण एमएमआरडीकडे गेले. एनपीव्ही कोण भरणार ? शासन मायबाप आहे. याबाबत शासनाने जबाबदारीच घ्यायला नको. ठाणे महानगर पालिकेने पाणीपुरवठयाचे स्वतंत्र स्त्रोत निर्माण करणे आवश्यक आहे, असे धोरण असताना महानगरपालिका याच्यातून पळते कशी ? शाई व काळू धरण ठाणे महापालिकेला हवे आहे, तर महानगरपालिकेने एनपीव्हीची 228 कोटी रुपयची रक्कम भरावेत. ठाणे जिल्हयातील नागरिकांची तहान भागविण्याची ऑब्लिगेटरी आणि रेग्यूलेटरी डयूटी महानगरपालिकेची आहे शासनाची नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.41927.....

श्री. जितेंद्र आव्हाड.....

मंत्री महोदयांकडून 228 कोटी रुपये महानगरपालिकेने भरावे आणि काळू धरणाचे काम सुरु करुन ते ठाणे महानगरपालिकेला दिले जाईल असे स्पेसिफिक उत्तर दिले जाईल काय ?

अध्यक्ष महोदय, एमएमआरडीएने 228 कोटी रुपयांच्या संदर्भातील पत्र दिलेले आहे. मंत्री महोदयांनी माननीय वित्तमंत्र्याकडे 228 कोटी रुपयांची मागणी करण्याची आवश्यकता आहे. मंत्री महोदयांनी एनपीव्ही ठाणे महानगरपालिकेला भरावी लागेल अशा प्रकारचे कॉंक्रीट उत्तर देण्याची आवश्यकता आहे. धरण हवे असल्यास पैसे भरण्याची आवश्यकता आहे. विभागाने पैसे भरल्यानंतर धरण बांधून दिले जाईल अशी जबाबदारी घेतलेली आहे. विभागाने सर्वच जबाबदारी घेतली तर एकही जबाबदारी पूर्ण होणार नाही.

श्री. गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, सरकार फक्त एजन्सी म्हणून काम करीत आहे, असे मी पूर्वीच उत्तर दिलेले आहे. धरणे महानगरपालिकेच्या मालकीची असल्यामुळे त्यांनाच तो सर्व खर्च करावा लागणार आहे. शासनाकडून फक्त अंमलबजावणीचे काम केले जाणार आहे. मी यापूर्वीच उत्तर दिलेले आहे. संबंधित अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करुन पैसे भरण्याच्या संदर्भात सूचना दिल्या जातील.

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, सदरहू प्रश्नाच्या अनुषंगाने मंत्री महोदयांनी मुंबई महानगरपालिकेचा वारंवार उल्लेख केलेला आहे. प्रत्यक्षात मुंबई महानगरपालिकेचा कोणताही संबंध नाही. ठाणे महानगरपालिकेला एमएमआरडीएच्या पैशातून काळू आणि शाई धरण बांधणार आहे आणि जलसंपदा विभागाच्या माध्यमातून त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरात कोर्टात केस सुरु आहे, एमएमआरडीएने पैसे भरलेले नाहीत, सदर घोटाळ्यामध्ये संबंधित कंत्राटदाराच्या विरोधात कोर्टात केसेस सुरु आहेत अशा अडचणी नमूद केलेल्या आहेत. आज ठाणे शहराला पाण्याची नितांत गरज आहे. एमएमआरडीए आणि इम्प्लिमेंटचे अध्यक्ष मुख्यमंत्री आहेत. तसेच आवश्यक निधी देणारे माननीय वित्तमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. एमएमआरडीएचे धरण पूर्ण करण्यासाठी उच्चस्तरीय बैठक एका महिन्याच्या आत घेतल्यानंतर सकारात्मक निर्णय घेतला जाईल काय ?

.....2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, "होय" संबंधित अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करून सदरहू प्रश्न मार्गी लावण्याच्या संदर्भातील कार्यवाही केली जाईल.

अध्यक्ष : ठीक आहे. आता पुढील प्रश्न चर्चेला घेण्यात येईल.

.....3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

यवतमाळ येथील संरक्षित वन क्षेत्रातून सागवान वृक्षांची अवैधरित्या तोड केल्याबाबत

(४) * ४६५५७ श्री.राजु तोडसाम (अर्णी) सन्माननीय वने मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ येथील संरक्षित वन क्षेत्रातून सुमारे १३ ट्रक सागवान वृक्षाची तोड करून साग माल नागपूर व हैद्राबाद येथे तस्करीद्वारे पोहचविल्याचे दिनांक ७ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोषी आढळून आलेल्या व्यक्तींनी त्यांच्याकडे वन विभागाचे कोरे रहदारी पास असल्याबाबतची कबुली दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) दिनांक १५.१०.२०१५ रोजी पांढरकवडा आदिलाबाद रोडवर जप्त केलेल्या वाहनाची चौकशीमध्ये मुख्य आरोपीने सदर घटनेपूर्वी खाजगी मालकी क्षेत्रातील व एक प्रकरणी ई वर्ग शासन मालकीचे क्षेत्रातून अवैधरित्या तोड केलेल्या साग माल १३ ट्रक मध्ये भरुन वाहतूक केल्याचे कबूल केले आहे.

(२) हे खरे नाही. तथापि, दोषी असलेल्या व्यक्तींकडे रहदारी पासवर उपरीलेखन करुन त्याद्वारे मालाची मात्रा वाढविली असल्याचे आढळले.

(३) उक्त प्रकरणी मुख्य आरोपी याचे सह ७ आरोपींना अटक करुन न्यायालयात सादर केलेले आहे. तसेच प्रथमदर्शनी दोषी आढळलेले क्षेत्र सहायक, यवतमाळ व वनमजूर यांना निलंबीत करण्यात आलेले आहे व वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) यवतमाळ व सहायक वनसंरक्षक (जंकास व कॅम्पा) यवतमाळ यांना कारणेदाखवा नोटीस देण्यात आलेली आहे.

(४) विलंब झालेला नाही.

श्री. राजु तोडसाम : अध्यक्ष महोदय, यवतमाळ जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड केली जात असून, त्याकडे संबंधित अधिकाऱ्यांचे लक्ष नाही असे या प्रकरणातून दिसून येत आहे. वनरक्षक किंवा वनाधिकारी हे वनाचे संरक्षण करीत नाहीत. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड सुरु असून, त्यासंदर्भातील मोठे रॅकेट कार्यरत आहे. सदरहू प्रकरणात एकूण किती घनमिटर माल जप्त केलेला आहे, कोणकोणत्या सर्व्हेनंबरवरुन वृक्षतोड करण्याची परवानगी दिली, किती शेतकऱ्यांना वृक्षतोड करण्याची परवानगी दिली आणि कोणत्या अधिकाऱ्याने हॅमर आणि वाहतुक पास दिले आहेत असे माझे प्रश्न आहेत. तसेच या प्रकरणी मुख्य वनसंरक्षक श्री. गुरुप्रसाद यांनी सीसीएफ यांच्याकडे अहवाल दिल्यानंतरही पुढील कोणतीच कार्यवाही केलेली नाही. याचा अर्थ सीसीएफ यांचा या प्रकरणामध्ये संबंध आहे काय, असल्यास त्याची चौकशी केली जाईल काय ? या प्रकरणात मोठ्या प्रमाणावर अवैध वृक्षतोड झालेली असून, त्या झाडांची किंमत संबंधित अधिकाऱ्यांकडून वसुल केली जाईल काय ?

.....4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.46557.....

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, अवैध वृक्षतोड ही वनविभाग, राखीव वनक्षेत्र किंवा संरक्षित वनक्षेत्रातील नाही. अवैध वृक्षतोड ई-वर्ग महसुली भाग आणि खाजगी खातेदाराच्या शेतामधील आहे. शेड्युल वृक्षाची परवानगी घ्यावी लागते. शेतकऱ्यांच्या शेतामध्ये 15, 20 किंवा 25 झाडे असतात. अवैध वृक्षतोड करणाऱ्या लोकांचा एक गोरख धंदा आहे. अशी लोक परवानगी एका शेतकऱ्याची घेतात आणि पुन्हा त्यामध्ये ओव्हर रायटींग करीत असतात. यामध्ये 72 घनमिटरची परवानगी घेतलेली आहे आणि 72 पूर्वी 2 आकडा टाकून 272 केलेले आहे. 5.008 घनमिटर होते, त्याला 5 पूर्वी 1 आकडा टाकलेला आहे, तसेच दोन्ही शून्याच्या ठिकाणी 9 केलेले आहे, अशा प्रकारे 15.998 केलेले आहे. अशी त्या लोकांची काम करण्याची पध्दत होती. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी अशा प्रकारच्या लोकांवर पाळत ठेऊन संबंधित ट्रकला पकडले होते. 29 टी-1409 या ट्रकची तपासणी केल्यानंतर पुढील नियमानुसार कारवाई केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी कोणकोणत्या सर्व्हेनंबरवरुन वृक्षतोड करण्याची परवानगी दिली आणि किती शेतकऱ्यांना वृक्षतोड करण्याची परवानगी दिली असा प्रश्न विचारलेला आहे. वाघापूर गट क्रमांक 4 मधील झाडे तोडण्याची परवानगी दिली होती. पण त्यामध्ये संबंधितांनी अधिक झाडे तोडलेली आहेत. महसुली जागेवरील अवैध वृक्षतोड ही गट क्रमांक 8/18 पिंपरी, इजारा, गट क्रमांक 88 टेकडी या ठिकाणी स्थळ संख्या दोन आहे. 16 खाजगी शेतकरी आहेत. वाघापूर, पिंपरी, जिजबर्डी आणि लोहारा अशा ठिकाणी खाजगी शेतकरी आहेत. 19 प्रकरणांमध्ये अवैध वृक्षतोड झालेली असून, त्यामध्ये ओव्हर रायटिंग केलेले आहे. यामध्ये वनमजुर आणि वनपालास ताबडतोब निलंबित केलेले आहे. या प्रकरणी कोणताही उशीर झालेला आहे असे नाही.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, वनमंत्री महोदयांनी विस्ताराने आणि अधिकची माहिती दिलेली आहे. 72 झाडे तोडण्याची परवानगी घ्यायची आणि त्या 72 च्या पूर्वी 2चा आकडा टाकून 272 झोडे तोडण्याची परवानगी आहे असा प्रकार सुरु आहे. 500 घनमिटरऐवजी 2590 घनमिटर असे केले जात आहे. अशा पध्दतीने संबंधित लोक काम करीत होते आणि अवैध वृक्षाची वाहतुक करीत होते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.46557.....

श्री. भास्कर जाधव.....

अध्यक्ष महोदय, अवैध वृक्षाची वाहतुक करीत असताना संबधितांना निर्गमित पासेस देण्यात आले होते काय ? यामध्ये वनमंत्री महोदयांनी वनमजुर आणि वनपालास निलंबित केलेले आहे. यामध्ये निर्गमित पासेस देण्याचा अधिकार वनमुजर किंवा वनपालास नाही. वनपरिक्षेत्रपाल किंवा वनपाल यांना निर्गमित पासेस देण्याचा अधिकार आहे. यामध्ये ज्या अधिकाऱ्यांनी बोगस पासेस दिले आहेत किंवा संबधित लोकांना सहकार्य करण्यासाठी पासेस दिले आहेत, अशा अधिकाऱ्यांच्या विरोधात कारवाई केली आहे काय किंवा केली जाणार काय ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, यामध्ये संबंधितांना अधिकृत परवाना दिलेला असून, त्यामध्ये त्यांनी ओव्हर रायटिंग केलेले आहे. प्रत्येक खाजगी क्षेत्रातील परवानगी घेतलेल्या झाडांसाठी वाहतुक पास घेतला असून, त्यामध्ये सर्व ठिकाणी ओव्हर रायटिंग केलेले आहे. त्यामुळे त्यांनी वाहतुक पास चुकीचा केलेला आहे. हे काम वनक्षेत्रपाल आणि वनरक्षकाच्या मदतीने झालेले आहे. हे निदर्शनास येताच त्यांना ताबडतोब निलंबित केलेले आहे. सद्य:स्थितीत ट्रक जमा करण्याची कारवाई सुरु केलेली आहे. वन विभागाच्या नियमानुसार कोणतेही वाहन पकडले जाते, तेव्हा जप्तीची कारवाई न करता ते वाहेन ताबडतोब सरकार जमा करण्याची कार्यवाही केली जाते. या प्रकरणात देखील संबंधित वाहन सरकार जमा करण्याबाबत कार्यवाही केली जात आहे. यामध्ये एक मूलभूत प्रश्न निर्माण झालेला आहे. खाजगी क्षेत्रामध्ये निर्बंध आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना शेड्युल ट्री कापताना कायद्यानुसार अडचणी येत आहेत. अशा ठिकाणी कोणताही गैरप्रकार न होता नियमानुसार शेतकऱ्यांना त्यांच्या शेतामधील झाडे कापण्याची पूर्वपरवानगी सहजपणे देण्यासंदर्भातील बदल करता येईल काय हे तपासले जात आहे.

श्री. राजु तोडसाम : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी 2 लोकांवर कारवाई केली आहे, असे उत्तरात नमूद केलेले आहे. आमच्या भागात मागील 3 वर्षापासून अवैध वृक्षतोड करणारे रॅकेट सुरु आहे. माझ्या आर्णी विधानसभा मतदारसंघातील घाटंजी, सावडीसदबा, कडमना अशा चार ठिकाणच्या प्रकरणामध्ये गेल्या 3 वर्षापासून कारवाई सुरु आहे. त्यासंदर्भातील अहवाल अजून तयार

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

झालेला नाही. हा अहवाल केव्हा पूर्ण होणार ? भविष्यात प्राप्त होणाऱ्या अहवालानुसार कारवाई केली जाईल काय ?

L-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

मंत्री महोदयांनी सागितले की, 13 ट्रक पकडले. कबुली जबाब देणारा चांदभाई खान यांनी सांगितले की, आम्ही हैद्राबादला 11 ट्रक आणि जबलपूरला 10 ट्रक माल पाठविलेला आहे. श्री.चांदभाई खान याचे स्वत:चे आरा मशिन आहे.

अध्यक्ष : सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर मिळेल.

श्री.राजू तोडसाम : अध्यक्ष महाराज, आरा मशिन मालकावर कारवाई होणार आहे काय? अशी प्रकरणे मागील तीन वर्षापासून श्री.चांदभाई खान याच्या हातून झालेली आहेत. अशी किती प्रकरणे झालेली आहेत आणि किती लोकांवर आपण कारवाई केली, यासंदर्भात मंत्री महोदय कृपया खुलासा करतील काय?

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महाराज, यामध्ये एकूण 9 आरोपिपैकी शेख चांद शेख रहेमान यवतमाळ यांचेसह सात आरोपिंना अटक करण्यात आली आहे. हे 8 आरोपी दिनांक 17 एप्रिल, 2016 पर्यंत एमसीआरवर होते. आता ते जामीनवर आहेत. या प्रकरणातील श्री.मोहन रेड्डी याचा पोलीस तपास करीत असून तो फरार आहे. यांच्याकडून जबाब घेण्यात आला असून त्यांनी काही ठिकाणी अशा पध्दतीने घटना केल्याचे आढळले आहे. पोलीस याचा पूर्ण तपास करीत आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, तीन वर्षापासून अशा घटना घडत आहेत. या घटनांसाठी गुप्त निधी ठेवलेला असतो. सन्माननीय सदस्यांकडे गेल्या तीन वर्षातील अशा प्रकरणांची माहिती असेल तर त्यांनी आजच ती माहिती द्यावी. सन्माननीय सदस्यांकडे गेल्या तीन वर्षापासूनची माहिती आहे तर त्यांनी प्रश्न विचारण्याची वाट न पहाता विभागाला कळविणे गरजेचे होते. अध्यक्ष महाराज, मी आपल्या माध्यमातून सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करीन की, आपल्याला अशी माहिती कधीही मिळाली तर ती माहिती दुसऱ्या दिवशी आमच्यापर्यंत पाठवावी. तीन वर्षाची माहिती तारांकित प्रश्न लागेपर्यंत गुप्त ठेवली जात असेल तर ही बाब उचित नाही. तीन वर्षात अशा प्रकारे अवैध वृक्षतोड होत आहे. ही जबाबदारी जशी वन रक्षकाची आहे तशीच लोकप्रतिनिधी म्हणून आमचीही जबाबदारी आहे. अशा घटनांची माहिती मिळण्यासाठी गुप्त सेवा निधी स्थापन केलेला आहे. सन्माननीय सदस्यांना माहिती असेल, ती योग्य असेल तर आपण ज्याप्रमाणे लोकांना गुप्त सेवा निधी देतो त्याप्रमाणे सन्माननीय सदस्यांना गुप्त निधी देण्याचे आदेश काढीन.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

मौजे आंजर्ले (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील ताडाचा कोंड या वाडीतून जाणाऱ्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याकरीता निधी मिळण्याबाबत

(5) * 52281 श्री.संजय कदम (दापोली) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मौजे आंजर्ले (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील श्री.क्षेत्र कड्यावरचा गणपती हे प्राचीन काळचे मंदिर अतिशय प्रसिध्द असून दररोज शेकडो पर्यटक या मंदिरात दर्शनासाठी येत असतात, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, आंजर्ले मुख्य रस्त्यापासून श्री क्षेत्र कड्यावरचा गणपती मंदिरापर्यंतचा ताडाचा कोंड या वाडीतून जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाली असून, या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याकरीता, स्थानिक विकास निधी २५/१५ अंतर्गत तीस लाख रुपये इतका निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, असे निवेदन येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, या निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.दिपक केसकर, श्रीमती पंकजा मुंडे यांच्याकरिता: (१) होय, हे खरे आहे.

(2) होय, हे खरे आहे.

(3) व (४) आंजर्ले गणपती मंदीर जोड रस्ता हा ग्रामीण मार्ग क्र. ११७ दर्जाचा असल्याने २५१५ योजनेमध्ये या रस्त्याच्या कामाचा समावेश करता येत नाही. तथापि, सदर रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे रस्त्याचे डंबरीकरण नुतनीकरण करण्यासाठी रु.१८,६६,८०६/- इतक्या रकमेच्या अंदाज पत्रकास तांत्रिक मान्यता देऊन जिल्हा नियोजन अधिकारी यांच्याकडे प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविण्यात आले आहे.

श्री.संजय कदम : अध्यक्ष महाराज, मौजे आंजर्ले (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील श्री.क्षेत्र कड्यावरचा गणपती येथील बाजूच्या रस्त्यासंदर्भातील माझा प्रश्न आहे. यासंबंधी ग्रामविकास खात्याने तांत्रिक मान्यता देऊन प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. या रस्त्याचे काम किती दिवसात पूर्ण होणार आहे?

श्री.दिपक केसकर : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्यांनी दोन प्रश्न विचारले आहेत. "क" वर्ग पर्यटनाखाली गणपती मंदिराचे सुशोभिकरणाचे काम आणि दुसरे काम रस्त्याचे आहे. गेल्यावर्षी सुशोभिकरणाच्या कामाला मंजुरी देण्यात आलेली आहे. मी यासंदर्भात रत्नागिरीच्या माननीय पालकमंत्र्यांशी चर्चा केली असून त्यांनी मला आश्वासित केल्याप्रमाणे यावर्षामध्ये या रस्त्याला "क" वर्ग पर्यटनामध्ये मंजुरी देण्यात येणार आहे.

श्री.शशिकांत शिंदे : "क" वर्ग पर्यटनामधून निधी उपलब्ध करुन दिली जाईल असे मंत्री

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

महोदयांनी उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे की, निधी उपलब्ध करून दिला जाईल काय? आपण हा निधी कशातूनही द्यावा. यासंदर्भात पुढील डीपीडीसी मध्ये याची नोंद होऊन या रस्त्यासाठी 18 लाख रुपयांची तरतूद शासनामार्फत केली जाणार आहे काय?

श्री.दिपक केसरकर : अध्यक्ष महाराज, सदरचा निधी डीपीसी मधून देण्याच्या बाबतीत मी माननीय पालकमंत्र्यांना विनंती केलेली आहे. हा प्रस्ताव डीपीसी समोर सकारात्मक जाईल, असे मला माननीय पालकमंत्र्यांनी आश्वासन दिलेले आहे.

श्री.शशिकांत शिंदे : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे, त्याला न्याय मिळावा, अशी सन्माननीय सदस्यांची अपेक्षा आहे. मंत्री महोदयांनी पालकमंत्र्यांशी चर्चा केली किंवा कोणाशी चर्चा केली, त्याला आमचा विरोध नाही. आम्ही स्पेसिफिक प्रश्न विचारला आहे की, पुढील डीपीडीसी मध्ये तरतूद होईल काय, तशा प्रकारची प्रशासकीय मान्यता मिळवून ते काम सुरु होणार आहे काय?

श्री.दिपक केसरकर : अध्यक्ष महाराज, डीपीसी हे स्वत:चे कार्यक्षेत्र आहे. तेथे त्यांचे सदस्य सुध्दा असतात. मी आश्वासित केलेले आहे की, ही बाब डीपीसी समोर नेली जाईल आणि ते मंजूर करण्यासंबंधी सकारात्मक निर्णय घेतला जाईल.

श्री.प्रकाश आबिटकर: अध्यक्ष महाराज, मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे ते सभागृहाचा अवमान करणारे आहे. सभागृहात सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारल्यानंतर त्याला मंत्री महोदय उत्तर देतात, त्यातून एक धोरण तयार होते. इकडून घेतले आणि तिकडून दिले, हा काय प्रकार आहे? असे असेल तर आम्ही येथे कशाला प्रश्न मांडायचा? मुळात डीपीडीसीमध्ये रस्त्यांसाठी पैसे मिळत नाहीत. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला त्याला आपण हो म्हणून उत्तर सांगत असताना आता डीपीडीसीबद्दल कशाला सांगत आहात. हा प्रश्न राखून ठेवून यावर चर्चा करावी. हो किंवा नाही असे मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे अन्यथा आम्ही प्रश्न विचारायचे की नाही, असा आम्हाला प्रश्न पडतो.

श्री.दिपक केसकर : अध्यक्ष महाराज, मी आपल्या मार्फत सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, वेगवेगळ्या हेडखाली वेगवेगळे रस्त्यांचा अंतर्भाव असतो. "क" वर्ग

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पर्यटन आणि "क" वर्ग तिर्थक्षेत्र हे दोन्ही विषय डीपीसीकडे येतात. हे "ब" वर्गामध्ये असते तर राज्य सरकारने पैसे दिले असते. हे "क" वर्गामध्ये मोडत असल्यामुळे त्याला डीपीसी मधून निधी देण्यात येईल, असे मी स्पेसिफिक उत्तर दिलेले आहे.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महाराज, डॉ.दिपक केसरकर राज्यमंत्री आहेत. मंत्री महोदयांकडे ग्रामविकास, अर्थ तसेच नियोजन या खात्याचा कार्यभार आहे. आपण उत्तर बघितले तर नियोजन अधिकाऱ्याकडे प्रशासकीय मान्यतेकरिता पाठविण्यात आलेले आहे. नियोजन खात्याचे राज्यमंत्री आपण आहात त्यामुळे आपण डीपीडीसीला आदेश देऊ शकतात. सन्माननीय सदस्य 40 दिवसापूर्वी प्रश्न विचारतात. सन्माननीय सदस्यांचे एवढेच म्हणणे आहे की, यावर्षीच्या डीपीडीसीच्या अर्थसंकल्पात 18 लाख 66 हजार रुपयांची तरतूद करुन त्या कामाला मान्यता देण्यासंदर्भात तातडीने कारवाई आपल्या स्तरावरुन केली जाईल काय?

श्री.दिपक केसरकर : अध्यक्ष महाराज, आम्ही डीपीसीला आऊट ले मंजूर करुन देतो. त्यानंतर त्या कामांना मंजुरी देण्याचे काम संबधित माननीय पालकमंत्री आणि नियोजन मंडळ देते. आम्ही नियोजन मंडळाला तसे कळवू की, प्राधान्याने हे काम करावे.

....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डहाणू व पालघर (जि.पालघर) तालुक्यातील सुर्या प्रकल्पांतर्गत असलेल्या कालव्याचे बांधकाम क्षतिग्रस्त झाल्याबाबत

(6) * 53013 श्री.अमित घोडा (पालघर): सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) डहाणू व पालघर (जि.पालघर) तालुक्यातील सुर्या प्रकल्पांतर्गत असलेले कालवे ३० ते ३५ वर्षे जुने झाले असून धरणाचे मातीकाम तसेच बांधकाम क्षतिग्रस्त झाल्याने शेवटपर्यंतच्या गावांना शेतीसाठी पाणी पोहचत नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, कालव्याच्या दुरुस्तीबाबत शासनाकडे लोकप्रतिनिधींकडून वारंवार मागणी करण्यात येत असून, सुर्या धरणाचा डावा कालवा, बोरशेती येथे दोन ब्रिज बांधले नसल्याने लालोंडे व वेळगाव ह्या गावांमध्ये सर्व कालव्यांची कामे पूर्ण झालेली असतांनासुध्दा या गावांना पाणी पोहचत नाही, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सदरहू गावांना पाणी पुरवठा करण्याकरीता क्षतिग्रस्त झालेल्या कालव्याचे बांधकाम तसेच सुर्या धरणाचा डावा कालवा, बोरशेती येथे दोन ब्रिज बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) अंशतः खरे आहे.

धरणाचे मातीकाम सुस्थितीत आहे. तथापि कालव्याची वितरण व्यवस्थेसह कामे ३०-३५ वर्षा पुर्वीची असल्याने कालवा अस्तरीकरण व बांधकामे क्षतिग्रस्त होत आहेत. तथापि लाभक्षेत्रातील शेतकरी सिंचनापासून वंचित राहणार नाही यादृष्टीने दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या निधीतून तात्पुरती दुरुस्ती करुन सिंचनासाठी मागणी करणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना पाणी देण्यात येते.

(2) व (३) होय.

सुर्या डावा कालवा कि.मी. ३३ पर्यंत पूर्ण असून तेथपर्यंत पाणी सोडण्यात येते. बोरशेती भाग डावा कालवा कि.मी. ३४ च्या भागात आहे. सा.क्र. ३३/०५४ येथील जलसेतूच्या अधो बाजूस वनजमिन असून वनजमिनीच्या प्रस्तावास केंद्र शासनाच्या वनविभागाची अंतिम मान्यता मिळालेली नसल्याने भरावाचे काम करता आलेले नाही. पर्यायाने त्यापुढील लालोंडे व वेळगावच्या भागात (कि.मी. ३६ ते ३९ पर्यंत) वनजमिनी व्यतिरिक्त भागात कालव्याचे काम झालेले असले तरी कालवा सलगते अभावी पाणी सोडता येत नाही.

जुनी क्षतिग्रस्त बांधकामे व अस्तरीकरण कामांच्या कायमस्वरुपी दुरुस्तीचे प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावरुन प्रगतीपथावर आहे.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.अमित घोडा : अध्यक्ष महाराज, डहाणू व पालघर (जि.पालघर) तालुक्यातील सूर्या प्रकल्पातंर्गत असलेल्या कालव्यांची पाहणी शासनाने केव्हा केली आहे ? या कालव्याची दुरुस्ती करण्याकरिता दरवर्षी किती निधी देण्यात येतो? साखळी क्रमांक 33/54 येथे उर्ध्व बाजूस वन जमिनीच्या हद्दीतील दुरुस्ती करण्याकरिता वन विभाग तातडीने मान्यता देणार आहे काय?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 53013..

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महाराज, सूर्या नदीवर धामणी धरण आहे. त्या धरणावर उजवा कालवा आणि डावा कालवा असे दोन कालवे आहेत. सन्माननीय सदस्यांच्या मतदारसंघातून डावा कालवा जातो. हा 47 किलो मीटरचा कालवा आहे. हा कालवा गेल्या 35 वर्षापूर्वीचा जुना असल्यामुळे पूर्ण क्षमतेने यातून पाणी जात नाही, हे खरे आहे. या कालव्यामध्ये झाडी, झुडपी वाढल्यामुळे, मातीमुळे तसेच कालव्याचे अस्तरीकरण न झाल्यामुळे पूर्ण क्षमतेने त्या कालव्यातून पाणी जात नाही. पाण्याची गळती बऱ्याच प्रमाणत होते, अशी अनेक कारणे आहेत. हे खरे आहे की, तेथे पूर्ण क्षमतेने पाणी पोहचू शकत नाही. या अनुषंगाने आपण रिपेरिंगची कामे हाती घेतलेली आहेत. परंतु तेथे सुप्रमाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. सुप्रमा नसल्यामुळे आपल्याला पैसे खर्च करता येत नाहीत. चाऱ्या दुरुस्ती विशेष दुरुस्ती अंतर्गत हेडखाली एस्टिमेटस तयार केलेले आहे. लवकरात लवकर हे काम पूर्ण केले जाईल.

श्री.अमित घोडा. अध्यक्ष महाराज, वन विभागाची मान्यता मिळाल्यानंतर या कालव्याची कायमस्वरूपी दुरुस्ती केव्हापर्यंत करणे अपेक्षित आहे?

यानंतर M-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 53013 .....

श्री. गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, 33 कि.मी. पर्यंतचे काम पूर्ण झालेले आहे. सन्माननीय सदस्यांचा मतदारसंघ 33 ते 39 कि.मी. पर्यंत आहे.

अध्यक्ष : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

.....

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./ मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.सुधीर मुनगंटीवार (वित्त मंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील नियम 8 अन्वये वित्त विभागाची सन 2010-2011, सन 2011-2012 व सन 2014-2015 या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत व सन 2014-2015 या वित्तीय वर्षातील योजनेतर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय तरतूद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

अध्यक्ष : तरतूद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली.

.....

श्री. रविंद्र वायकर (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे सन 2014-2015 या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतो.

अध्यक्ष : वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले.

.....

श्री.विष्णू सवरा (आदिवासी विकास मंत्री): अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील नियम 8 अन्वये आदिवासी विकास विभागाची सन 2014-2015 या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत व योजनेतर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय तरतूद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

अध्यक्ष : तरतूद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. 5.4.2016 रोजी पार पाडलेल्या महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीतील शिफारशींबाबत.

मु.शी. : मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. 5.4.2016 रोजी पार पाडलेल्या महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीतील शिफारशींबाबत माननीय वन मंत्र्यांचे निवेदन.

श्री. सुधीर मुनगंटीवार (वन मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : कान्स आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये सहभागी होण्यासाठी तीन मराठी चित्रपट पाठविण्याचा निर्णय

मु.शी. : कान्स आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये सहभागी होण्यासाठी तीन मराठी चित्रपट पाठविण्याचा निर्णय यासंबंधी माननीय सांस्कृतिक कार्यमंत्र्यांचे निवेदन

श्री. विनोद तावडे (सांस्कृतिक कार्य मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, मी या निवेदनाच्या अनुषंगाने हे सांगू इच्छितो की, आतापर्यंत कधीही कान्समध्ये मराठी चित्रपट अशाप्रकारे जात नव्हते. आम्ही कान्सच्या संबंधितांशी बोललो, प्रयत्न केले. आता आपण तेथे दोन सदस्यांसहित मराठी चित्रपट पाठवून मराठी चित्रपटांचे पॉझिटिव्ह कँम्पेनिंग करण्याचा प्रयत्न केला आहे. उर्वरित माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

.....

...6/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./ मु.शी.: सदस्य अनुपस्थिती समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. शिवाजीराव नाईक (समिती प्रमुख) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सदस्य अनुपस्थिती समितीचा तिसरा अहवाल सभागृहाला सादर करीत आहे.

अध्यक्ष : सदस्य अनुपस्थिती समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

समितीने सादर केलेल्या अहवालात सर्वश्री रमेश कदम, सुरूपसिंग नाईक, चंद्रदीप नरके, क्षितीज ठाकूर, संग्राम जगताप, वि.स.स. यांना अहवालात उल्लेखिलेल्या कालावधीकरिता विधानसभेच्या बैठकीत अनुपस्थित राहण्याची अनुमती देण्यात यावी, अशी शिफारस केली आहे. तरी अनुमती द्यावी काय ?

अनुमती देण्यात येत आहे. सन्माननीय सदस्यांना तसे कळविण्यात येईल.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : अनुसूचित जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. रुपेश म्हात्रे (समिती प्रमुख) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जमाती कल्याण समितीचा दुसरा अहवाल सभागृहाला सादर करतो.

अध्यक्ष : अनुसूचित जमाती कल्याण समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---*---

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : सदस्यांच्या अटकेसंबंधी व त्यांच्या स्थानबध्दतेसंबंधी घोषणा.

अध्यक्ष : मला माननीय विशेष न्यायाधीश, पी एम एल ए तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश, शहर दिवाणी व सत्र न्यायालय, बृहन्मुंबई यांचेकडून दिनांक 5 एप्रिल 2016 रोजी असे कळविण्यात आले आहे की, सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. छगन भुजबळ यांना दिनांक 31 मार्च 2016 रोजी माननीय विशेष न्यायाधीश, पी एम एल ए तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश, शहर दिवाणी व सत्र न्यायालय, बृहन्मुंबई यांच्या न्यायालयासमोर हजर केले असता त्यांना आता दिनांक 13 एप्रिल 2016 पर्यंत न्यायालयीन कोठडीत पाठविण्यात आले आहे.

---*---

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : सदस्यांच्या अटकेसंबंधी व त्यांच्या स्थानबध्दतेसंबंधी घोषणा.

अध्यक्ष : मला वाचक पोलीस उप अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, औरंगाबाद यांच्याकडून असे कळविण्यात आले आहे की, सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. रमेश नागनाथ कदम, हे दहिसर पोलीस ठाणे, मुंबई येथील गु.र.न.336/2015 अंतर्गत कलम 406, 409, 411, 384, 120(ब), 34 तसेच भारतीय दंड संहिता सह कलम 13 (1) (क) (ड) लाचलुचपत प्रतिबंध कायदा सन 1988 अन्वये दि.31/08/2015 पासून मध्यवर्ती कारागृह आर्थररोड नाका, सातरस्ता, मुंबई येथे न्यायालयीन कोठडीत बंदिस्त असल्याने माननीय विशेष सत्र न्यायालय, जालना तसेच माननीय विशेष सत्र न्यायालय क्रं. 45, बृहन्मुंबई यांचे आदेशानुसार सन्माननीय सदस्यांना मध्यवर्ती कारागृह, आर्थर रोड, मुंबई येथून दिनांक 03/04/2016 रोजी 15.00 वाजता ताब्यात घेऊन त्यांना पोलीस ठाणे कदीम, जालना, जिल्हा जालना येथील गु.र.नं. 80/15 अंतर्गत कलम 420, 409, 120(ब), 109, 34 तसेच भारतीय दंड संहिता सह कलम 13 (1)(क), 13 (2) लाचलुचपत प्रतिबंध कायदा सन 1988 अन्वये दिनांक 04/04/2016 रोजी 02.00 वाजता अटक करण्यात आलेली असून त्यांना नमूद गुन्ह्यात मुदतीत मा. विशेष सत्र न्यायालय, जालना येथे रिमांड कामी हजर करण्यात येणार आहे.

---*---

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. ग. आ. देशमुख : अध्यक्ष महोदय, या सभागृहाचे पाच सन्माननीय सदस्य गैरहजर असल्याबद्दल त्यांना मान्यता देण्यात आली. सन्माननीय सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील हे हिवाळी अधिवेशन, नागपूर येथे अधिवेशनाच्या संपूर्ण कालावधीत आजारीपणामुळे गैरहजर होते. त्यांनी आपल्याकडे अर्ज केला होता. त्यासंदर्भातील उल्लेख या ठिकाणी झालेला नाही. त्याबाबतीत काय झाले, याची माहिती सभागृहाला देण्यात यावी.

अध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांचा अर्ज समितीपुढे आला होता किंवा कसे याबाबत सन्माननीय सदस्य श्री. शिवाजीराव नाईक यांनी माहिती द्यावी.

श्री. शिवाजीराव नाईक : अध्यक्ष महोदय, सदरहू अर्ज समितीपुढे आलेला नाही. सन्माननीय सदस्य 15 दिवसापेक्षा अधिक काळ गैरहजर असल्यास समितीपुढे अर्ज येतो. त्यापेक्षा कमी कालावधी असल्यास रजा मंजूर केली जाते.

अध्यक्ष : यावरुन सन्माननीय सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील यांची रजा मंजूर झाल्याचे दिसून येते.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. काही दिवसापूर्वी आम्ही हा विषय काढला होता. या राज्यात भारतीय जनता पक्षाच्या एक महिला कार्यकर्त्या श्रीमती मैथिली जावकर ह्या मथुरा येथे गेल्या...(अडथळा)...त्यांनी पोलीस स्टेशनमध्ये जाऊन त्यासंदर्भात एफआयआर दर्ज केला. महिला आयोगाच्या अध्यक्षासमोर काल एक तारीखही झाली, परंतु त्या गैरहजर होत्या. एका बाजूने एफआयआर दाखल करुनही श्री. गणेश पांडे यांना अटक झालेली नाही. दुसऱ्या बाजूने या पिडीत महिलेस फेसबूक व व्हॉट्सॲपच्या माध्यमातून आजही धमकाविले जात आहे. श्री. गणेश पांडे पूर्वी भारतीय जनता पक्षाचे युवा मोर्चाचे अध्यक्ष होते. आता त्यांना पदावरुन काढून टाकण्यात आले आहे. त्यांची हिस्ट्री फारशी चांगली नाही. त्यांचा अंडरवर्ल्डशी संबंध असणे, त्यांनी गुटख्याचा अनधिकृत व्यवहार करणे किंवा त्यांचे इतर बॅगराऊंड फार चांगले नाही. त्यामुळे या पिडीत महिलेस भीती वाटत आहे. या महिलेस भारतीय जनता पक्षाच्या कोणी प्रेशर खाली ठेवले याचा अंदाज येत नाही, नाव येत नाही. परंतु त्या महिलेस देखील बोलू दिले जात नाही. त्यांनी गुन्हा दाखल केलेल्या वर्सोवा पोलीस स्टेशनकडून देखील कोणतीही कारवाई केली जात नाही. महिला आयोगाच्या अध्यक्षाही भारतीय जनता पक्षाच्या असल्यामुळे त्या महिलेस न्याय मिळेल असे दिसत नाही. त्यामुळे त्या पिडीत महिलेस न्याय देण्याच्या दृष्टीने श्री. गणेश पांडे यांना तातडीने अटक करणे, हे पोलिसांचे कर्तव्य आहे. ...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : हा विषयासंदर्भात नियम 97 अन्वये सूचना देण्यात आली होती. परंतु तेव्हा प्रस्तावाला परवानगी नाकारण्यात आली होती. हा स्थगन प्रस्तावाचा विषय होत नाही. आपण स्थगनचा आधार घेऊनच बोलत आहात. जी माहिती सभागृहामध्ये दिली गेली नाही ती माहिती देणे, असा इन्फॉर्मेशनचा अर्थ होतो. ही माहिती सभागृहात देण्यात आली होती, त्यामुळे पुन्हा याच विषयावर पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनवर बोलता येणार नाही. त्यामुळे मी आपल्याला परवानगी देत नाही. कृपया आपण खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री. संतोष टारपे आपण बोलण्यास सुरुवात करावी.

श्री. संतोष टारपे : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. आज राज्यातील कानाकोपऱ्यातून मूळ आदिवासी आझाद मैदान, मुंबई येथे आलेले आहेत. त्यांच्या अशिक्षितपणाचा आणि असंघटीतपणाचा फायदा घेऊन बोगस लोकांनी हजारो, लाखो सर्टीफीकेट काढले आणि त्यांच्या घटनादत्त अधिकाऱ्यापासून त्यांना वंचित ठेवले. यासंदर्भात न्याय मिळण्याची त्यांची मागणी आहे. सरकारने मूळ आदिवासींच्या मागण्यांकडे लक्ष देऊन त्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष : सरकारने लक्ष द्यावे.

---*---

...6/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./ मु.शी. : स्थगन प्रस्तावाच्या सूचना.

अध्यक्ष : आज बुधवार, दिनांक 6 एप्रिल 2016 रोजी स्थगन प्रस्तावाच्या एकूण 4 सूचना प्राप्त झालेल्या आहेत. परंतु आज सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पाच्या अनुदानाच्या मागण्यांवर सभागृहात चर्चा व मतदान (आठवा व शेवटचा दिवस) तसेच चर्चारोध (गिलोटीन) असल्यामुळे विधानसभा नियम 251 (2) अन्वये स्थगन प्रस्ताव घेता येणार नाही. अत: मी सर्व सूचनांना अनुमती नाकारीत आहे.

---*---

...M/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, आम्ही यासाठी हा मुद्दा मांडत आहोत की, एका महिलेसंबंधी झालेल्या गोष्टी बाबत ती पुढे आली आहे. आपण तिचे पत्र वाचाले तर ..... बरोबर ज्या गोष्टी झाल्या त्यासंदभार्त चौकशी सुरु आहे....

अध्यक्ष : सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सदर विषय सभागृहामध्ये यापूर्वी येऊन गेला आहे. सन्माननीय सदस्यांनी आपल्या जागेवर बसावे.

श्रीमती वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहाला वचन दिले होते सदर प्रकरणी कारवाई करण्यात येईल, संबंधितास अटक करण्यात येईल. परंतु अशा प्रकारे कोणतीही कारवाई झालेली दिसून येत नाही. राज्य महिला आयोगाने याप्रकरणी तातडीने ॲक्शन घेण्याची आवश्यकता होती त्यांनी ती घेतल्याचे दिसून येत नाही. त्या महिलेने सांगितले की, मी माझ्या स्वाभिमानाचा लढा देण्यासाठी पुढे आले आहे.

अध्यक्ष : या विषयाबाबत मी निर्णय दिला आहे. सन्माननीय सदस्य श्री.हर्षवर्धन सपकाळ यांनी लक्षवेधी सूचना मांडावी.

श्री.हर्षवर्धन सपकाळ : अध्यक्ष महोदय, गोंधळामध्ये लक्षवेधीचे कामकाज घेणे योग्य होणार नाही.

अध्यक्ष : सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हा विषय सभागृहात दोन तीन वेळा येऊन गेला आहे.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहाला आश्वस्त केले होते की, आम्ही कोणाला मागे घालणर नाही, योग्य ते शासन करण्यात येईल. श्री.गणेश पांडे आजही दिवसाढवळ्या बाहेर फिरत आहे याचा अर्थ मुख्यमंत्री महोदयांनी त्याच्यावर कारवाई केली नाही. आपण सरकारला समज द्यावी व ताबडतोब श्री.गणेश पांडे प्रकरणी योग्य तो निवाडा करावा.

अध्यक्ष : सरकारने सभागृहात सांगितले असेल तर त्याचे पालन करावे.

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण पूर्णपणे फोल ठरल्याबाबत.
मु.शी. : शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण पूर्णपणे फोल ठरल्यासंबंधी **सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, राणाजगजितसिंह पाटील, ॲड. यशोमती ठाकूर, प्रा. वीरेंद्र जगताप, सर्वश्री विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री अस्लम शेख, जितेंद्र आव्हाड, शशिकांत शिंदे, जयंत पाटील, हसन मुश्रीफ, कुणाल पाटील, प्रकाश आबिटकर, वैभव नाईक, सुरेश गोरे, रुपेश म्हात्रे, मनोहर भोईर, गुलाबराव पाटील, डॉ. जयप्रकाश मुंदडा, डॉ. संजय रायमुलकर, डॉ. शशिकांत खेडेकर, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री संजय पोतनीस, सुनिल राऊत, प्रकाश फातर्पेकर, ॲड. राहुल कुल, ॲड. आशिष शेलार, श्री. बळीराम सिरस्कार, प्रा. मेधा कुलकर्णी, श्री. अबु आझमी** यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलडाणा) : अध्यक्ष महाराज, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील शाळाबाह्य मुलांची आकडेवारी निश्चित करण्यासाठी राज्य शासनाने गत वर्षी जुलै महिन्यात केलेले सर्वेक्षण पूर्णपणे फोल ठरल्यानंतर माहे जानेवारी महिन्यात पुन:सर्वेक्षण करण्यात आले मात्र यावेळचे सर्वेक्षण अधिकच फसल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, शासनाच्या पाहणीमध्ये केवळ २ हजार ७९२ विद्यार्थी शाळाबाहय असल्याचे आढळून आले असून माहे जुलै महिन्याच्या सर्वेक्षणात हाच आकडा १० हजार ३०६ एवढा असणे, काही स्वयंसेवी संस्था आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांची मदत घेऊन सर्वेक्षणासाठी आवश्यक तयारी न करणे, यामुळे या कामात मदत करण्यासाठी पुढे आलेल्या ८४ स्वयंसेवी संस्थांपैकी जवळपास ६० संस्थांनी या सर्वेक्षणातुन माघार घेणे, एका दिवसाच्या सर्वेक्षणात १० हजार मुले आढळली तर आता १५ दिवसांचा वेळ देऊनही प्रशासनाला फक्त अडीच हजार मुलेच सापडल्याची माहिती शिक्षण उपसंचालक कार्यालयातुन देण्यात येणे,शासनाने दोन वेळा केलेल्या सर्वेक्षणातुन फसवणुकच झाल्याचे दिसून येणे या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया".

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनोद तावडे (शालेय शिक्षण मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

अध्यक्ष : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हर्षवर्धन सपकाळ : अध्यक्ष महोदय, लक्षवेधीच्या अनुषंगाने माननीय मंत्र्यांनी सभागृहाच्या पटलावर निवेदन ठेवले आहे.

अध्यक्ष महोदय, या विषयाबाबत राज्य शासनाच्या शिक्षण विभागाच्यावतीने फार मोठे गुऱ्हाळ घोळले गेले आहे. शालेय शिक्षण विभागाकडून मुले शाळेत जाती, बसती व शिकती झाली पाहिजे या तीन विषयांना बगल देण्यात आली आहे. यापूर्वीच्या आकडेवारीच्या खोलात मी जाणार नाही. मंत्री महोदय व मुख्यमंत्री महोदयांच्या स्पार्क अहवालातील शाळाबाह्य विद्यार्थी संख्येचा उल्लेख मी पुन्हा करणार नाही.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र राज्यामध्ये बालकामगार किती आहेत, या प्रश्नाचे संसदेमध्ये उत्तर देण्यात आले होते की, 4 लाख 96 हजार बालके बालकामगार आहेत. एकंदरीत मंत्री महोदयांनी मंत्री पदाचा कार्यभार घेण्यापूर्वीची आकडेवारी, जनगनणेची आकडेवारी, संसदेमध्ये दिलेले उत्तर व प्रत्यक्षात या लक्षवेधीच्या उत्तरात जुलै, 2015 च्या सर्वेक्षात 54,648 मुले शाळाबाह्य आढळून आल्याची माहिती दिली आहे. शासनाने त्यानंतर राणा भीम देवी थाटात शाळाबाह्य विद्यार्थी राहणार नाही, असे सांगितले आणि सर्वांना कामाला लागण्याचे निर्देश दिले. त्यानुसार केलेल्या सर्व्हेमध्ये 74 हजार शाळाबाह्य विद्यार्थी आढळून आल्याची माहिती शासनाने दिली. याविषयाबाबत वरिष्ठ सभागृहामध्ये मंत्री महोदयांनी उत्तर दिले त्यापुढे विधानसभेच्या सभागृहात चर्चा होणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी शाळाबाह्य विद्यार्थी दाखवा व बक्षिस मिळवा, अशी घोषणा केली आहे. मी सदनाच्या माध्यमातून 35 हजार शाळाबाह्य विद्यार्थ्यांची यादी अत्यंत जबाबदारीने मंत्री महोदयांकडे सुपूर्द करतो. मला 2,500 रुपये त्यांच्या वेतनातून किंवा इतरांच्या वेतनातून मिळण्याची अपेक्षा नाही. शाळाबाह्य मुले शाळेत जावेत एवढीच माझी अपेक्षा आहे.

अध्यक्ष : सन्माननीय सदस्यांनी एवढे बोलत राहिल्यानंतर मंत्री महोदय त्यांच्या प्रश्नाला उत्तर कधी देतील ? आज सभागृहामध्ये गिलोटीन व इतर कामकाज घ्यावयाचे आहे. एक तासाच्या आत सर्व लक्षवेधीवरील चर्चा पूर्ण झाली पाहिजे.

....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हर्षवर्धन सपकाळ : अध्यक्ष महोदय, मी 7-8 प्रश्न विचारल्यानंतर आपण मला पुन्हा प्रश्न विचारण्याची संधी देत नाही. सर्व सन्माननीय सदस्य लक्षवेधीच्या चर्चेत भाग घेतील, ठीक आहे.

अध्यक्ष महोदय, शासनाने राणा भीम देवी थाटात जो काही कारभार केला त्यातून काय निष्पन्न झाले ? याप्रश्नाबाबत मंत्री महोदय गंभीर आहेत, मला त्यांच्यावर कोणताही आरोप करावयाचा नाही. पुढील शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी एकूण एक शाळाबाह्य बालकांना शाळेत प्रवेश देण्याकरिता शासन कोणती कार्यवाही करणार ? जी मुले गळतीत आहेत त्यांना शाळेत जाती, बसती, टिकती व शिकती होत आहेत अशा गैरहजर मुलांना पटावर दाखवण्यात येते त्यांच्या समावेशासाठी मंत्री महोदय कार्यवाही करणार का ?

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हर्षवर्धन सपकाळ यांनी शाळाबह्य मुलांचा मुद्दा उपस्थित केला आहे. शाळाबाह्य मुलांचा शोध घेण्याची प्रक्रिया वन टाईम नसून ती सातत्याने पुढे चालणारी आहे. दुष्काळामुळे स्थलांतर होत आहे, मोठ्या प्रमाणात कुटुंबे मराठवाड्यातून येत आहेत, अशी आपण चर्चा करीत असतो.

अध्यक्ष महोदय, यावेळी शाळाबाह्य मुलांच्या सर्वेक्षणासाठी एनएसएसच्या 21 हजार विद्यार्थ्यांना कामाला लावण्यात आले होते. या विद्यार्थ्यांकडून करावयाच्या सर्वेक्षणासंबंधी कॉलेजवर जबाबदारी सोपवून विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे ब्रिफिंग करुन काळजीपूर्वक काम होण्याकरिता गावपातळीवरील सर्वेक्षणाच्या कामाला लावण्यात आले होते. सदरचे सर्वेक्षण शेवटचे नाही. मी शाळाबाह्य मुलांच्या सर्वेक्षणाबाबत जिल्हा पातळीवरील व तालुका पातळीवरील शिक्षण अधिकारी यांचेबरोबर व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून प्रत्यक्ष बैठक घेतली. पुढील वर्षभरात ही योजना काटेकोर राबवून "शाळाबाह्य मूल दाखवा व हजार रुपये" मिळवा ही घोषणा करु शकलो पाहिजे. याप्रकारचा आत्मविश्वास आपल्या विभागाबद्दल आपल्याला यावा याकरिता त्यापध्दतीने शाळाबाह्य सर्वेक्षणाचे काम सुरु आहे. सन्माननीय सदस्यांकडे जर शाळाबाह्य विद्यार्थ्यांची नावे असतील तर त्यांनी ती द्यावीत त्यांची नोंद शाळाबाह्य बालके म्हणून करणत येईल. मी "शाळाबाह्य मुले दाखवा व हजार रुपये मिळवा" ही योजना अद्याप घोषित केली नाही, त्याबाबतचे प्रोसेडींग सन्माननीय

...6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे.....

सदस्याकडे आहे ते त्यांनी सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे-पाटील यांना दाखवावे. "शाळाबाह्य मुले दाखवा व हजार रुपये मिळवा" ही योजना जाहीर करु त्यावेळी ज्या जिल्ह्यात शाळाबाह्य बालक सापडेल तेथील शिक्षण अधिकाऱ्याच्या वेतनातून 500 रुपये, ज्या तालुक्यातील ते बालक असेल तेथील गट शिक्षण अधिकारी व विभागाच्या मंत्री महोदयांच्या वेतनातून 250 रुपये याप्रमाणे एक हजार रुपये देण्यात येतील. आम्ही सर्व ही जबाबदारी सामुहीक घेऊ. शिक्षण हक्क कायद्यानुसार शाळाबाह्य मूल राहू नये ही जबाबदारी शासनाची आहे व ती शासनाने उचलली पाहिजे. शाळाबाह्य सर्वेक्षणानंतर त्या शाळाबाह्य मुलांना एक शैक्षणिक कार्ड देणार आहोत. यामुळे विशेषतः स्थलांतरीत कुटुंब एका गावातून दुसऱ्या गावात गेल्यानंतर संबंधित गावात तो पुढील अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी प्रवेश घेऊ शकेल. अशा प्रकारे शाळाबाह्य मुलांना शैक्षणिक कार्ड दिल्याने त्याची नोंद सातत्याने कोठे ना कोठे राहील.

श्री.शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदय, शिक्षण हक्क कायद्यासंदर्भात मंत्री महोदय सकारात्मक आहेत. या अधिवेशनामध्ये एका प्रश्नासंदर्भात सभागृहात चर्चा झाली होती की, 20 विद्यार्थी संख्येच्या आतील पटसंख्या असणाऱ्याशाळा बंद करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

अध्यक्ष महोदय, मी ज्या भागातून येतो तो डोंगरी भाग असून तेथे दळणवळणाची सुविधा उपलब्ध नाही. या भागातील 20 विद्यार्थी पटसंख्या असलेल्या शाळा बंद झाल्या तर तेथील मुलांना 2 ते 3 कि.मी. पायी शाळेत जावे लागेल. शासनाकडून सांगण्यात येते की, विद्यार्थ्यांसाठी वाहनाची व्यवस्था करु, परंतु या भागामध्ये एस.टी.बस जात नसून खाजगी वडापची वाहतूक सुरु असते. डोंगरी विभागातील 20 विद्यार्थी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्यासंदर्भात फेर निर्णय घेऊन त्या शाळा पूर्ववत सुरु ठेवण्याचा निर्णय घेण्यात येईल काय ?

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, 20 विद्यार्थी पटसंख्या असलेल्या शाळांची आकडेवारी मी सांगितली होती. शाळेमध्ये एक विद्यार्थी जरी असला तरी तेथे तीन शिक्षकांना नियुक्त करावे लागते. मी दिलेल्या आकडेवारीमध्ये डोंगराळ व दुर्गम भागातील शाळांची संख्या 15 टक्के एवढी सुध्दा नाही. आता आम्ही कोणत्याच शाळा बंद केल्या नाहीत.

यानंतर P-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनोद तावडे.....

राज्याला आणि सभागृहाला माहिती व्हावी की, 5 विद्यार्थी आहेत आणि 3 शिक्षक आहेत. 10 विद्यार्थी आहेत आणि 3 शिक्षक आहेत. जो खर्च शिक्षकांच्या वेतनावर होतो तो जर आपण स्कूल बस करुन दिली तर कमी पडतो. अशी परिस्थिती विशेषत: डोंगराळ भागात किंवा जेथे विद्यार्थीनी आहेत त्याबाबत अजिबात विचार करता येत नाही. पण अहमदनगर, पुणे या ठिकाणची आकडेवारी दिली आहे. अद्याप यापैकी कोणत्याही ठिकाणांच्या शाळा बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला नाही. या ठिकाणी नुसती आकडेवारी दिली आहे. यावर समाजामध्ये चर्चा आणि विचार मंथन झाल्यानंतर यासंबंधी ठरवू. आपण काळजी करु नका. विद्यार्थ्यांना शिक्षण मिळण्याचा हक्क जोपासला जाईल. याबाबत डोंगरी भागातील विद्यार्थ्यांचा विशेष विचार करण्यात येईल.

श्री. किसन कथोरे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी शाळाबाह्य मुलांच्या बाबतीत एक चांगला निर्णय घेतला आहे. कोकणातील परिस्थिती विशेषत: ठाणे, पालघर, रायगड या जिल्ह्यांमध्ये विटभट्ट्यांवर काम करणाऱ्या कुटुंबांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न आहे. त्या ठिकाणी स्थलांतरीत मुले ही जास्तीत जास्त कातकरी समाजाची असतात. या मुलांच्या बाबतीत तातडीने निर्णय घेणे गरजेचे आहे. विटभट्टीवर असणारी मुले गावापासून बऱ्याच अंतरावर असतात. त्यांना शाळेपर्यंत जाणे अवघड असते. अशा मुलांसाठी शाळेमध्ये जाण्यासाठी काही तरी व्यवस्था करणार आहात काय, यांचे सर्व्हेक्षण झाले असेल तर मंत्री महोदयांनी माहिती घेणे आवश्यक आहे. कारण खऱ्या अर्थाने शिक्षणापासून जर कोणी वंचित असेल तर हा कातकरी समाज राहिला आहे. या कातकरी समाजासाठी आश्रमशाळा उभारणे किंवा शिक्षण देणे यासंबंधीचे निर्णय घेतले जातील काय ?

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महाराज, प्रामुख्याने मार्च एप्रिल महिन्यामध्ये विटभट्ट्यांवरील कामे सुरू होतात. त्यावेळी अशी कुटुंबे स्थलांतरीत होतात. ज्याला विशेषत: डहाणू आणि त्या परिसरात जगायला जाणे असा शब्दप्रयोग वापरला जातो. त्यामुळे विटभट्टी आणि दगड खाणी यामध्ये काम करणाऱ्यांसाठी आम्ही वेगळा सर्व्हे करु. मघाशी म्हटल्याप्रमाणे असे विद्यार्थी आयडेन्टीफाय झाल्यानंतर त्यांना शैक्षणिक कार्ड दिले जाईल की, जे आधारकार्डाशी जोडले जाईल. जेणेकरुन त्यांच्या कुटुंबाचे स्थलांतर झाल्यानंतरही शोध घेणे सोयीचे होईल. ते विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही हे आग्रहाने पाहण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, शिक्षणाचा अधिकार आणि अधिनियम 2009 हा जो कायदा आपल्या देशामध्ये अस्तित्वात आलेला आहे. हा कायदा एखाद्या राज्याने किंवा एखाद्या चर्चेतून अस्तित्वात आलेला नाही तर ही घटनात्मक दुरुस्ती आहे आणि घटनात्मक दुरुस्ती असताना 6 ते 14 या वयोगटातील मुलांना हक्काचे आणि सक्तीचे शिक्षण देण्याची तरतूद भारताच्या राज्यघटनेमध्ये करण्यात आलेली आहे. ज्यावेळी आपण घटनेमध्ये तरतूद करतो आणि त्या तरतुदीच्या आधारे हक्क देतो, त्यावेळी त्याची संपूर्ण अंमलबजावणी करण्याची जबाबदारी शासनाची आहे. मी गेले काही दिवस ऐकतो आहे की, शाळाबाह्य विद्यार्थ्यांच्या संदर्भात चर्चा सुरू आहे. मूळात घटनेने ही जबाबदारी संबंधित राज्य शासनावर टाकलेली आहे. खरे तर ही जबाबदारी संसदेने घ्यावयास हवी होती, केंद्र सरकारने घ्यायला पाहिजे होती. त्यांनी ती राज्य सरकारांकडे वळविली आहे. त्यानंतर राज्य सरकारांनी खासगी शिक्षण संस्थांकडे वर्ग केली. माझा प्रश्न असा आहे की, जे शाळाबाह्य विद्यार्थी आहेत त्यासंबंधी आपली खूप चर्चा चालू आहे की, ही शाळा सुरू करायची, दुसरी बंद करायची किंवा शिक्षक कमी करायचे. यामधून शासनाचे बर्डन वाढवावयाचे किंवा नाही. हा बर्डनचा प्रश्न नाही तर आपण त्या मुलांना हक्काचे आणि सक्तीचे शिक्षण देणार आहात की नाही, हा खरा प्रश्न आहे. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, अशा प्रकारे आपल्याला ज्या ज्या ठिकाणी अशी मुले आढळून येतील त्या त्या ठिकाणी कायद्याद्वारे प्रस्तावित केलेली शिक्षणाची सोय आपण करणार आहात काय ? करणार असाल तर किती दिवसामध्ये करणार. कारण आपण आपल्या निवेदनाद्वारे सांगितले आहे की, या सर्व्हेक्षणानंतर खूप मोठ्या प्रमाणात यामध्ये विद्यार्थी शिक्षणापासून वंचित असल्याचे आढळून आले आहेत. यामध्ये 74 हजार 971 मुले शाळाबाह्य आहेत. माझ्या मते या मुलांना शिक्षणाची सुविधा निर्माण न केल्यामुळे राज्य सरकारने या ठिकाणी घटनेची पायमल्ली केली किंवा त्यामध्ये घटनात्मक तरतुदींचा भंग केला आहे. त्यामुळे आता आपण खोलात न जाता या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय आपण कधी, कशी आणि किती दिवसात करणार आहात, हे या प्रश्नाच्या निमित्ताने सभागृहाला सांगावे.

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महाराज, शिक्षण हक्क कायद्याप्रमाणे जे विद्यार्थी शाळाबाह्य आहेत ते शोधण्याचे काम या शासनाने चांगल्या पध्दतीने केले आहे. आपण ही 74971 मुले शोधून काढली आहेत. यासाठी राज्य सरकारचे सर्व कर्मचारी कामाला लागले होते. एक दिवस आपण

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनोद तावडे.....

एनएसएसच्या 31 हजार विद्यार्थ्यांना घेऊन आपण काम केले आहे आणि अजूनही आपण पुढे काम करणार आहोत. या विद्यार्थ्यांना आपण जवळची जी शाळा असेल त्या शाळेत प्रवेश सुध्दा दिलेले आहेत. ते प्रवेश दिल्यानंतर त्यांचे सातत्य पुढे राहण्याच्या दृष्टीने त्यांना शिक्षण कार्ड दिले आहे. शाळेमध्ये जर त्यांचे ड्रापआऊट दिसले तर त्यांच्या उपस्थितीची माहिती घेतली जाते. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. हर्षवर्धन सकपाळ यांनी म्हटले त्याप्रमाणे शाळेत नुसते नाव नाही म्हणजे शाळाबाह्य नाही तर 30 दिवस तो अनुपस्थित राहिला तर तोही शाळाबाह्य मानला पाहिजे. त्यामुळे विद्यार्थ्यांची उपस्थिती ट्रॅक करणे आणि जर तो दोन-दोन तीन-तीन महिने येत नसेल तर त्याला शोधून काढून तो शाळेत येत राहिल हे पाहणे हे देखील या कायद्यामध्ये असून त्यानुसार आपण कार्यवाही करीत आहोत.

श्रीमती मेघा कुलकर्णी : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी वेगवेगळ्या वेळी म्हणजे 4 जुलै, 21 जुलै, आणि 15 जानेवारीला जे सर्व्हे करण्यात आले आहेत त्यामध्ये 74971 मुले शाळाबाह्य असल्याचे शासनाला आढळून आले आहे. परंतु आपल्याला जी आकडेवारी मिळाली त्यापेक्षा प्रत्यक्षात ही आकडेवारी खूप मोठी आहे. कारण शासनाच्या 2014 च्या अहवालात जाहीर केल्याप्रमाणे दीड लाख शाळाबाह्य मुले असल्याचे आढळून आले. मग सहा महिन्यांमध्ये 1 लाख मुले लगेचच शाळेत जायला लागली काय, दुसरा मुद्दा असा की, विजय केळकर समितीच्या अहवालानुसार राज्यामध्ये 1 ली ते 10 वी मध्ये एकूण 7 लाख विद्यार्थ्यांची गळती झाली आहे. या ठिकाणी आपण व्याख्येमध्ये गळती असलेली मुले सुध्दा शाळाबाह्य म्हणून मानले आहेत. दरवर्षी अशा प्रकारे 70 हजार मुलांची गळती होत असेल तर ही एका वर्षाच्या गळतीएवढी सुध्दा नाही.

अध्यक्ष महोदय, बालकामगारांची संख्या विचारात घेता संसदेच्या हिवाळी अधिवेशनामध्ये महाराष्ट्रातील संख्या चार ते साडेचार लाख संख्या दाखविली आहे. त्यामधील निम्मी संख्या जरी धरली तरी ही आकडेवारी खूप मोठी होते. यामध्ये दगडखाण कामगारांचा प्रश्न असेल. सर्व प्रकारच्या संख्या धरुन आकडेवारी इतकी प्रचंड होत असताना शासनाने तीन वेळा केलेल्या सर्व्हेक्षणामध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात तफावत का आढळून आली हा पहिला प्रश्न. यासंबंधी चुकीचे सर्व्हेक्षण झाले असेल तर याबाबत आपण संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही करणार

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती मेघा कुलकर्णी.....

आहात, तिसरा प्रश्न असा आहे की, जसे आपण प्रलोभनात्मक उपाय करतो किंवा आवाहनात्मक उपाय करतो तसे पालकांनी या सक्तीच्या शिक्षणाची अंमलबजावणी करणार यासाठी आपण कोणत्या उपाययोजन करणार आहात ?

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महाराज, जी दीड लाख मुलांची संख्या आहे. त्यानंतर शाळांना अनुदान देणे आणि शाळांना सरळ सॉफ्टवेअरद्वारे नोंदणी सुरू केली त्यामध्ये बऱ्याच शाळांनी त्यांच्या स्तरावर प्रयत्न करुन शाळेच्या पटावर ऑलरेडी विद्यार्थी आणले. ज्यावेळी मी स्वत: गट शिक्षणाधिकाऱ्यांशी चर्चा केली की, पूर्वी ही संख्या फार कमी होती तर आता ती कशी काय वाढली त्यांनी सांगितले की, त्या शाळांनी प्रयत्न केले आहेत. त्यानंतर त्या शाळांशी चर्चा केली तर ते म्हणाले की, मे महिन्यामध्ये त्या शाळांनी त्यांच्या स्तरावर गावांमध्ये कॅम्पेन्स चालविले होते. त्यामुळे ती आकडेवारी वाढली आहे.

Q-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे.....

बालकामगारांची जी आकडेवारी आहे यातील बरेचसे बालकामगार हॉटेलमध्ये काम करीत असतील तर ते सकाळच्या वेळेस कुठल्या ना कुठल्या शाळेत शिकत असतात. बालकामगार शाळेत जातच नाहीत असे नाही. या बालकामगारांच्या बाबतीत जी ठिकाणे आहेत त्या ठिकाणांचे सर्वेक्षण आपण वेगळ्या पध्दतीने करीत आहोत. ज्याठिकाणी दगडाच्या खाणी आहेत, वीट भट्टी आहेत तेथे बालकामगार असतात. ऊस तोडणी कामगारांची मुले बालकामगार असतात. शहरामधील हॉटेल्स आहेत अशा ठिकाणचे वेगळे सर्वेक्षण करणार आहोत. पालकांना त्याचे महत्व नाही म्हणून आपल्याला हक्कभंग आणायला लागला. मी विधीमंडळातील सर्व सन्माननीय सदस्यांना पत्र लिहिले होते की, यामध्ये आमदारांनी सुध्दा भाग घेतला पाहिजे. आपल्या मतदारसंघामध्ये शाळाबाह्य मुलांची ठिकाणे असतील, काही मुले लक्षात येत असतील तर ते निदर्शनास आणून द्यावे म्हणजे आम्ही त्यावर कार्यवाही करु. माझी यानिमित्ताने पुन्हा विनंती आहे की, विधीमंडळ सदस्यांनी आपआपल्या मतदारसंघातील अशी जी काही ठिकाणे असतील आणि असे निदर्शनास आले तर त्यांनी शासनाला त्वरित माहिती द्यावी. म्हणजे आमचे अधिकारी जाऊन त्या विद्यार्थ्यांचे नाव शाळेत नोंदवतील.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती मेघा कुलकर्णी यांनी याठिकाणी माहिती दिली. देशाच्या संसदेमध्ये जी आकडेवारी सादर केली त्या आकडेवारीप्रमाणे 4 लाख विद्यार्थी महाराष्ट्रामध्ये शाळाबाह्य आहेत. आता याठिकाणी 74 हजार 971 चा आकडा दिलेला आहे. यामध्ये क्लॅरिटी आली पाहिजे की, महाराष्ट्रामध्ये नेमका आकडा किती आहे. मंत्री महोदयांनी स्कीम जाहीर केली आणि 250 रुपये द्यायचे आहेत म्हणून हा आकडा कमी करु नये.

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, जर पैसे द्यायचे नसते तर अशा स्कीम आणल्याच नसत्या. उलट सर्वांनी मिळून एकत्रित येऊन आपल्याशाहू, फुले, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये अशा पध्दतीचे शाळाबाह्य मुले राहू नयेत यासाठी शिक्षण विभाग प्रामाणिकपणे यात प्रयत्न करीत आहेत. आपण सर्व लोकप्रतिनिधी आपआपल्या मतदारसंघात फिरत असतो.

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे.....

आपल्याला काही ठिकाण माहिती असतात की या गावांमधील मुले शाळेत जात नाहीत. हे आवर्जून सांगितले पाहिजे. त्याचा या सर्व प्रक्रियेला उपयोग होईल.

प्रा.वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, मुंबईमध्ये मधल्या काळात टीआयएसएस चा एक रिपोर्ट आला त्यानुसार बरीच मुले शाळाबाह्य असल्याचे निदर्शनास आले. मला मंत्री महोदयांना प्रश्न विचारायचा आहे की, यामध्ये विविध एनजीओ काम करीत असतात. आपण सांगत आहात की आपल्या मतदारसंघात काही असेल तर सांगा. आम्ही अशा ठिकाणी स्कूल केले. ज्याठिकाणी मुले काम करतात अशा ठिकाणी जाऊन त्या मुलांना शिकवायचे. याबाबत आपला पॉलिसी निर्णय काय आहे? दुसरे असे की, या मुलांना शोधून तुम्ही यांना कसे शिक्षण देणार आणि यांच्या राहण्याची व्यवस्था कुठे करणार आहात? महाराष्ट्रामध्ये जे एनजीओज काम करतात यांचे सुध्दा फार मोठ्या प्रमाणात जाळे आहे अणि यांना बरीच माहिती असते. त्यामुळे यांचा सुध्दा यात समावेश करून घेणार काय आणि त्यांना सुध्दा काही जबाबदारी देणार आहात काय असा माझा शासनाला प्रश्न आहे.

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, शाळाबाह्य मुलांच्या बाबतीत जीआर आहे तो मी पटलावर ठेवेन. कशी कशी मुले यात आहेत यांचे माहिती घेऊन पुढे त्यांचे आपण काय करतो याची सर्व माहिती या जीआरमध्ये मिळेल. या सर्वेक्षणामध्ये 700 एनजीओज प्रत्यक्ष सहभागी झाले होते. जिल्हानिहाय एकूण 850 एनजीओज आल्या होत्या. त्यातील काही सामाजिक संस्थांनी सर्वेक्षणाची जी पध्दत आहे त्याविषयी थोडी दुरुस्ती सुचविली होती. मी त्यांना आवाहन केले होते की, तुमच्या दुरुस्त्यांसह हे करण्यात येईल. हे जर पुढे ढकलले तर परीक्षा आहेत आणि मग हे होणार नाही. 21 हजार एनसीसीचे विद्यार्थी यात सहभागी झाले होते. या माझ्या आवाहनाला 700 एनजीओजनी सहभाग घेतला होता. सन्माननीय सदस्या श्रीमती वर्षा गायकवाड यांनी सांगितले त्याप्रमाणे सर्व सामाजिक संस्थांना बरोबर घेऊन हे अधिक चांगल्या पध्दतीने करु शकतो. कारण या विषयावर एनजीओज डेडीकेटेड काम करीत आहेत, त्यांची मदत पूर्णपणे घेत आहोत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हर्षवर्धन सपकाळ : अध्यक्ष महोदय, हा संपूर्ण महाराष्ट्राचा आणि सर्व मुले शोधण्याचा प्रश्न असल्याने याचे स्वरूप फार व्यापक आहे. यापूर्वी दोन ड्राईव्ह राबविण्यात आले होते. हे सर्व एकाच वेळी सर्व शाळा सर्व गावांना करण्यात आले होते. ज्यातील पहिल्या सर्वेक्षणात लोकप्रतिनिधी या नात्याने मी सुध्दा याचा एक भाग होतो. मला मंत्री महोदयांना प्रश्न विचारावयाचा आहे की, महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांचा किंवा काही तालुक्यांपासून सुरुवात करणात आहोत यासाठी शिक्षण यंत्रणा व्यस्त ठेवतो आणि पर्यायाने सरते शेवटी हाती काहीच लागत नाही. ते फोकस व्हावे, त्याची इंटेनसिटी निर्माण व्हावी म्हणून निवडक काही तालुक्यांपासून, जिल्ह्यांपासून याची सुरुवात करुन नंतर संपूर्ण महाराष्ट्राचा विचार करावा. जेणकरुन याच्या शेवटापर्यंत आपल्याला जाता येईल. यासंदर्भात शासन निर्णय घेणार काय?

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, सर्वेक्षणामध्ये ज्या तालुक्यांमध्ये अधिक कालबाह्य असण्याची शक्यता असते अशा वेगवेगळ्या सामाजिक कारणांमुळे माहिती होते. अशा तालुक्यांचा सर्वे करुन या तालुक्यांवर कॉन्सनट्रेटेड प्रयत्न करणे अशी जी आपली सूचना आहे त्याप्रमाणे कार्यवाही करु

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: राज्यातील काही ग्रामपंचायतींचे नगरपंचायतींमध्ये रूपांतर करण्याचा शासन निर्णय होऊनही त्यावर कार्यवाही न होणे.

मु.शी.: राज्यातील काही ग्रामपंचायतींचे नगरपंचायतींमध्ये रूपांतर करण्याचा शासन निर्णय होऊनही त्यावर कार्यवाही न होणे यासंबंधी सर्वश्री विजय औटी,गोपालदास अग्रवाल, कालिदास कोळंबकर, बसवराज पाटील, जयदत्त क्षीरसागर,सुनिल केदार, शंभुराज देसाई,वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्य शासनाने नव्याने निर्माण केलेल्या 93 नगर पंचायतीच्या निवडणूका होऊन नगर पंचायती अस्तित्वात येऊन चार महिन्यांचा कालावधी उलटूनही त्यांना आवश्यक असणारा अधिकारी/कर्मचारी वर्ग मंजूर न करणे, विशेषत: अहमदनगर जिल्हयातील पारनेर नगरपंचायत गोंदिया व भंडारा जिल्हयातील नगरपंचायती कार्यरत झाल्यानंतर अद्याप मुख्याधिकारी, रोखपाल, नगररचनाकार, स्थापत्यशास्त्रज्ञ इत्यादि कर्मचारी वर्गाची नियुक्ती करण्यात न येणे, नगरपंचायतीला आवश्यक असलेल्या अधिकारी/ कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यासाठी वित्त विभागाची परवानगी घेण्यात आली नसल्याने निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणी, याबाबत लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे निवेदन देऊनही कोणतीच कार्यवाही न होणे, गोंदिया जिल्हयातील सालेकसा, आमगांव तसेच भंडारा जिल्हयातील साकोली अशा एकूण तीन ग्रामपंचायती विसर्जित करून तिथे नगरपंचायती स्थापित करण्याबाबत घेण्यात आलेला शासन निर्णय, मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांच्या आदेशानुसार आमगांव खुर्द (जि.गोंदिया) ग्रामपंचायतीचे सालेकसा नगरपंचायतीमध्ये
विलीनीकरण करण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी होईपर्यंत सालेकसा नगरपंचायतीचा निवडणूक कार्यक्रम पुढे ढकलण्यात येणे, शासनामार्फत अद्यापही यासंदर्भात कोणताही निर्णय घेण्यात न आल्यामुळे जवळपास १३ महिन्यानंतरही सदरहू नगरपंचायतीच्या निवडणूका घेण्यास शासनास आलेले अपयश, तसेच सातारा जिल्हयातील कोरेगाव, वडूज, पाटण, दहीवडी, खंडळा व मेढा या सहा तालुक्यामधील ग्रामपंचायतींचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर करण्याचा शासन निर्णय होवूनही शासनाकडून त्यावर पुढे कोणतीही कार्यवाही न होणे, तसेच पारनेर नगरपंचायती क्षेत्रात असलेली भीषण पाणी टंचाईस शासनाने निधी उपलब्ध करून न दिल्याने पाणी टंचाईवर मात करण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजना करण्यास नगरपंचायत असमर्थ ठरणे, त्यामुळे जनमानसात शासनाविरूध्द निर्माण झालेला असंतोष, शासनाने आवश्यक निधी व पदाच्या नियुक्तीबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया

.....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभाध्यक्ष : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

.....6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय औटी : अध्यक्ष महोदय, मुळात ही लक्षवेधी सूचना सभागृहामध्ये आणण्याच्या मागे काही प्रमुख उद्देश आहेत. सरकारने काही धोरणात्मक निर्णय घेतले आणि नागरिकाच्या प्रक्रियेला राज्यात वेग यावा म्हणून काही नगरपंचायती याठिकाणी जन्माला घालण्यात आल्या. परंतु या नगरपंचायती जन्माला घालत असताना यासंदर्भातील कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध निश्चित करून किमान मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे पद नगरपंचायत अस्तित्त्वात आल्याची अधिसूचना निघाल्यानंतर 10 ते 15 दिवसात मुख्य कार्यकारी अधिकारी त्याठिकाणी हजर होईल अशाप्रकारची कोणतीही पूर्व व्यवस्था न केल्यामुळे आणि वित्त विभागाने त्यांची फाईल अनेक दिवस प्रलंबित ठेवल्यामुळे आज या नव्याने निर्माण झालेल्या नगरपंचायतींसमोर एवढे गंभीर प्रश्न निर्माण झालेले आहेत. म्हणून हा प्रश्न लक्षवेधीच्या माध्यमातून मी याठिकाणी मांडलेला आहे. उत्तरामध्ये मंत्री महोदय सांगतात की, पदांची निर्मिती करण्याच्या प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येत असून त्याबाबतचे आदेश लवकरच निगर्मित करण्यात येतील असे सांगण्यात येते. लवकरच या शब्दाची व्याख्या कधीतरी सभागृहाला कळाली पाहिजे. त्याठिकाणचे लोक इतक्या तणावाखाली 4-5 महिन्यांपासून जीवन व्यथित करीत आहेत. मुख्याधिकारी पदावर नेमणूकीसाठी नजीकच्या कालावधीत हे काय आहे. लवकरच आणि नजीकच्या हे काय आहे ते कळायला पाहिजे. या दोन शब्दांची व्याख्या जर राज्यमंत्री महोदयांनी सभागृहाला स्पष्ट केली तर पुढचे प्रश्न आम्हाला याठिकाणी विचारता येतील.

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, ज्या नगरपंचायती स्थापन झालेल्या आहेत यातील अधिकारी व कर्मचाऱ्याचा आकृतीबंध आणि पदनिर्मितीबाबत आपण पहिल्यांदा जेव्हा लोकसेवा आयोगाकडे मागणी केली होती. सन 2015 मध्ये मार्च, एप्रिलच्या दरम्यान 35 पदांची मागणी केली होती. त्यावेळेस हे निश्चित नव्हते की, किती नगरपंचायती होतील. परंतु त्यानंतर हा निर्णय झाला की आपल्याला 137 नगरपंचायती करून त्याचे प्रायमरी नोटीफिकेशन करणार होतो. त्यानंतर पुन्हा लोकसेवा आयोगाला मागणी केली की आम्हाला येथून पुढे यामध्ये 150 पदांची आणखी आवश्यकता आहे. त्यामुळे एकत्रित कार्यक्रम होऊन 185 पदांसाठी परीक्षा झालेली आहे आणि काल परवाच याचा निकाल लागला. त्यांचे पुढे जाऊन त्यांचा तीन महिन्यांचा जा प्रोफेशनल पिरीयड असतो तो गेल्यानंतर येत्या दोन ते तीन महिन्यात या सर्व लोकांना मुख्य कार्यकारी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

06-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) Q-7

SSK/ AKN/ ST/ 12:40

डॉ.रणजित पाटील.....

अधिकारी म्हणून नियुक्त करणार आहोत. तीन महिन्याच्या आत सर्व लोकांना याठिकाणी पाठविण्यात येईल. साधारणत: 185 लोकांना ज्यांची मागणी झालेली आहे. जे आपण महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून जी काही मागणी होईल. लोकसेवा आयोगाचा कालच निकाल लागलेला आहे. या सर्वांना प्रत्येक नगरपंचायतीच्या ठिकाणी पाठविण्यात येईल.

श्री.विजय औटी : अध्यक्ष महोदय, माझा मूळ प्रश्न असा आहे की, या पदांची निर्मिती करण्याचा मंत्रिमंडळाचा ठराव तरी झालेला आहे काय? याठिकाणी नगररचनाकाराचा पत्ता नाही. सिव्हील इंजिनिअर नाही, लेखापाल नाही. त्यामुळे आलेले पैसे सुध्दा कशा पध्दतीने खर्च करायचे हे काहीच समजत नाही.

R-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय औटी .....

एवढी गोंधळाची स्थिती निर्माण झालेली आहे. म्हणून मंत्री महोदयांनी स्पेसिफिक उत्तर सभागृहामध्ये दिले पाहिजे. या नव्याने निर्माण झालेल्या नगरपंचायतीमध्ये अमुक विशिष्ट कालावधीची एक तारीख जाहीर करा. त्याच्या आत या नेमणूका केल्या जातील. आकृतीबंध आणि मुख्य कार्यकारी अधिकारी पदाला राज्यमंत्री मंडळाची मान्यता घेण्यात आली आहे का ?

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, ही गोष्ट सत्य आहे. यावेळी जे अनुदान दिलेले आहे, ते खर्च करण्यासाठी तांत्रिक स्टाफ लागतो. तो तांत्रिक स्टाफ आणि इन्फ्रास्ट्रक्चर ते कप्यॅसिटर्स या नगरपंचायतीकडे आज नाही. म्हणून ते पैसे खर्च करायचे राहतील असे नाही, जिल्हाधिका-यांना कळविलेले आहे

तालिका सभाध्यक्ष : या पदांकरिता मंत्रिमंडळाची मंजूरी घेतली का ?

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, या पदनिर्मितीला वित्त विभागाची परवानगी आहे. त्याला पुढील मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये मंजूरी देणार आहोत.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑडर्र आहे. मंत्री महोदय सभागृहाची दिशाभूल करता आहेत. मंत्रिमहोदयांनी उत्तर देण्याच्या आधी सांगितले की, या पदांच्या संदर्भात आम्ही पब्लिक कमिशनकडे मागणी केलेली आहे. त्यांच्याकडून आलेल्या उमेदवारांच्या नंतर नियुक्त्या करु आता मंत्री महोदय असे सांगता आहेत की, राज्य सरकारने या नगरपंचयतीच्यासाठी आकृतिबंध मान्य केला का ? पदांना मंजूरी दिली का ? दिली असेल तर किती पदांना मंजूरी दिली ? आकृतिबंध मान्य केला असेल तर प्रत्येक नगरपंचायतीला किती कर्मचा-यांचा आकृतिबंध आहे. हे आधी सांगावे. नंतर पैसे खर्च करायचे ते पाहू.

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, मी आधीच सांगितले आहे की, पदनिर्मिती प्रस्तावाला वित्त विभागाची मान्यता मिळालेली आहे. त्यासोबतच मुख्याध्याधिकारी पदाची मान्यता घेतलेली आहे. नुकत्याच नगरपंचायती अस्तित्वात आलेल्या आहेत. त्यांना टप्याटप्याने टेक्निकल मॅन पॉवर आणि त्यांची निर्मिती व पदांना मान्यता घेतली जाईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राजेंद्र पाटणी : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, मुख्याधिकारी पदाची आम्ही मान्यता घेतलेली आहे व मागणी केलेली आहे. फक्त मुख्याधिकारी नेमून चालणार नाही. पूर्ण यंत्रणा उभी करावी लागेल. त्या नगरपंचायतीमध्ये सर्व स्टाफ पुर्ण उभा करावा लागेल. मंत्री महोदयांनी सांगितले मुख्याधिकारी आम्हाला भेटणार आहेत. तो आम्ही देऊ. त्याच्या व्यतिरिक्त पुर्ण स्टाफ नगरपंचायतीला देण्यासाठी आपल्याकडे काय धोरण आहे. किती दिवसात नगरपंचायतीला पुर्ण यंत्रणा उभी करुन देणार ? 80 टक्के नगरपंचायती अशा परिस्थिती उभ्या आहेत की, त्या कधीही आपल्या पायावर उभ्या राहू शकत नाहीत. म्हणून त्यांच्या सक्षमिकरणासाठी किंवा बाकीच्या नियोजनासाठी काय करणार आहात ? त्या-त्या शहराचे नियोजन झाले पाहिजे. नगरपालिकांना द्यायला ए.टी.पी. नाही या सर्वांना ए.टी.पी. देण्यासाठी आपल्याकडे काय नियोजन आहे.

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, पुढच्या कॅबिनेटमध्ये बाकीच्या पदनिर्मितीला सुध्दा सुनियोजन आणि प्लॅन डेव्हलप करण्यासाठी जे काही स्ट्रक्चर लागत असेल यासाठी मिनिमंम पदनिर्मिती लागते हया पदांच्या निर्मितीसाठी पुढच्या कॅबिनेटमध्ये म्हणजे 15 एप्रिलला होऊ घातलेल्या कॅबिनेटमध्ये त्याची मान्यता घेणार आहोत.

श्री.शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदय, नव्याने स्थापन झालेल्या नगरपंचायतींच्या असणा-या कर्मचारी व अधिकारी यांच्या संदर्भातील लक्षवेधी आहे. यासंदर्भात राज्य सरकारने निर्णय घेतला आहे की, तालुका प्लेस असणा-या गावांना नगरपंचायतीमध्ये स्थांत्तरीत करणार माझ्या मतदार संघातील पाटण हे तालुका प्लेस आहे. पाटणची नगरपंचायत करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारच्या नगरविकास विभागाकडे प्रलंबित आहे. मंत्री महोदय किती दिवसात ही नगर पंचायत नव्याने पाटणचा प्रस्ताव आलेला तो किती दिवसात मंजूर करणार ?

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, ही गोष्ट सत्य आहे की, काही नगरपंचायतीला, उदाहरणार्थ कोरेगांव, दहीवडी, खंडाळा, मेढा असेल कोरेगांवची आपण दि.5.3.2016 रोजी अंतिम सूचना केलेली आहे. साधरणतः या एप्रिल अखेर या राहिलेल्या सर्व नगरपंचायती 137 पैकी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील.....

109 झालेल्या आहेत. उर्वरित सर्व नगरपंचायती म्हणजे जेथे हायकोर्टाचे वैगरे बंधन नसेल अशा सर्व नगरपंचायती एप्रिल अखेर याबाबतचे सर्व अंतिम नोटीफिकेशन होऊन जाईल. तीन चार नगरपंचायती अशा आहेत की, त्यांची हाय कोर्टामध्ये पी.आय.एल.मध्ये याचिका दाखल आहे. किंवा तेथील स्थानिक सरपंच असतील, सदस्य असतील यांनी काही गावे त्यामध्ये समाविष्ठ करावे, काही नगरपंचायती ऐवजी नगरपरिषद करावी, किंवा नजिकची जास्तीची गावे आहेत. अशी तीन ते चार प्रकरणे वगळता बाकी सर्व नगरपंचायती एप्रिल अखेर जाहीर करण्यात येतील.

श्री.नितेश राणे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी या नगरपंचायती बद्दल समाधानकारक उत्तर दिलेले नाही. माझ्या मतदार संघामध्ये वैभववाडी नगरपालिका, सिंधुदुर्गमध्ये दोडामार्ग नगरपालिका ही वित्त राज्यमंत्री महोदय यांचे स्वतःचे मतदार संघामध्ये आहे. तेथे कर्मचारी नाही, निधी नाही, बसण्यासाठी इमारत नाही. लोक बोलायला लागले नगरपंचायत पेक्षा ग्रामपंचायत बरी होती. पावसाळया आधी तरी आमच्या या नगरपालिकांना पैसे, अधिकारी, इमारतीसाठी जागा शासन देणार आहे का ? याचे उत्तर स्पेसिफिक द्यावे. उत्तर फिरवून फिरवून न देता एकाच स्टेशनवर उतरुन उत्तर दिले तर आम्हालाही बरे होईल.

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, या संदर्भात मी कर्मचारी आणि अधिका-यांसाठी बोललो, मी, निधीसाठी, अनुदानासाठी 186 कोटी शासनाने गेल्या आठवडयामध्ये दिलेले आहेत. त्याचा चार्ट माझ्याकडे आहे. प्रत्येक नगरपंचायतीसाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. कुठलेच अनुदान दिलेले नाही हे म्हणणे योग्य होणार नाही. मी आपल्या वतीने सर्वांना अश्वस्थ करतो की, प्रत्येक नगरपंचायतीला यावर्षी अनुदान देऊ.

श्री.जयदत्त क्षिरसागर : अध्यक्ष महोदय, नव निर्वाचित नगरपंचायती आणि नव निर्वाचित नगरपरिषदांमधून राज्यातील 48 टक्के नागरीकीकरण होत आहे. या हिशोबाने त्या स्थापन केल्या. त्याला पूर्णत्व देण्यासाठी त्याला कार्यक्षम करण्यासाठी लक्षवेधी विचारण्यात आलेली आहे. आकृतिबंधाला मान्यता देऊन टप्याटप्याने पद भरु असे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी दिलेले

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयदत्त क्षिरसागर.....

आहे. हया टप्याटप्याने भरण्यामध्ये या नगरपरिषदांचा जीव मेटाकुटीला येईल. आज अशी परिस्थिती आहे की, निधी आहे. "असून अडचण नसून खोळंबा" अशी परिस्थिती त्या नगरपंचायती व नगरपरिषदांची झालेली आहे. त्यामुळे आपण स्पष्ट उत्तर द्यावे. किती अवधीमध्ये हा सगळा टेक्निकल स्टाफ, सफाई कामगार नगरपंचायत व नगरपरिषदेत केव्हा भरण्यात येईल ?

अध्यक्ष महोदय, राज्यामध्ये अ, ब, क, नगरपरिषदा गेल्या 15 वर्षापासून आर्थिक निकषाप्रमाणे आणि आकृतिबंधाप्रमाणे तिथला स्टाफ पॅटर्न भरावा म्हणून सातत्याने मागणी करीत आहेत. डायरेक्टर म्युनिसिपल ॲडमिनिस्ट्रेशनने त्यांच्या आकृतिबंधाला मान्यता देऊन विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांना रिक्त पदे भरण्याकरिता कळविलेले आहे. अत्यावश्यक सेवा पाणीपुरवठा, वीज याठिकाणी कर्मचारी, सफाई कर्मचारी नाहीत. त्याही बाबतीत मंत्री महोदय कृपया लक्ष देऊन आकृतीबंधाप्रमाणे अ, ब, क नगरपरिषदांचे प्रस्ताव गेल्या 10 वर्षापासून प्रलंबित आहे. पाच वर्षे संपली की, पुन्हा नवीन बिंदू नामावली नवीन प्रस्ताव पाठवा. तो तपासण्यात वर्ष दोन वर्षे निघुन जाते. आपण ती पदे भरत नाही. ती पदे केव्हा पर्यंत भरणार आहात याची माहिती द्यावी.

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, सध्याचा जो प्रश्न आहे तो नव्याने स्थापन झालेल्या नगरपंचायती आणि त्यांचा आकृतीबंध आणि पदाधिका-यांचा आहे. सन्माननीय सदस्यांनी अस्तित्वात असेल्या नगरपरिषदांबद्दलचा सुध्दा प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्याची सुध्दा पदे भरलेली नाहीत. अत्यावश्यक ज्या सेवा आहेत. त्याच्यासाठी पुरेसे मनुष्य बळ नाही. आपला प्रश्न होता, अस्तित्वात आलेल्या नगरपंचायतीसाठी आकृतिबंध, पदनिर्मिती कधी करणार आहात ? याचे उत्तर मी आधीच सांगितले आहे. आताही सांगतो आहे की, येत्या तीन ते चार महिन्यामध्ये या सर्व पदांची निर्मिती होईल जो काही आकृतिबंध ठरेल त्यासर्वांची पदे भरु यासाठीचे अनुदान जायचे आहे. जर अनुदानाची अडचण निर्माण झाली तर जिल्हाधिका-यांना सूचित करण्यात आलेले आहे. तात्पुरते जिल्हापरिषदेचे किवा पी.डब्ल्यू.डी.चे मनुष्यबाळ वापरुन हे पैसे खर्च करण्यासाठी त्यांची मदत घ्यावी.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील....

त्यांनी तात्पुरते जिल्हा परिषदेचे किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाचे मनुष्यबळ वापरावे व हा निधी खर्च करण्यासाठी त्यांची मदत घ्यावी.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी परिघाच्या बाहेरचे प्रश्न विचारले असतील तरीही त्याबाबत योग्य ते निदेश दिले जातील.

श्री.भिमराव धोंडे : अध्यक्ष महोदय, नव्याने स्थापन झालेल्या 109 नगरपंचायती आहेत. यांना 182.16 कोटी एवढे अनुदान दिलेले आहे. हे अनुदान ग्रामपंचायतींनासुध्दा मिळत होते. नगरपंचायत व ग्रामपंचायतीमध्ये अनुदान देण्याच्या बेसमध्ये काय फरक आहे, नगरपंचायत झाल्यानंतर या गावांना पूर्वी ग्रामपंचायत असताना जेवढे अनुदान मिळत होते त्यापेक्षा किती जास्त अनुदान नगरपंचायतींना मिळत आहे ?

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, ग्रामपंचायतींना अगोदर अनुदान दिले जायचे ते खाते वेगळे होते. आता रस्ते अनुदान, विशेष रस्ते अनुदान, वैशिष्टयपूर्ण अनुदान या नगरपंचायतींना देण्याबाबतचे आपले विशिष्ट धोरण आहे, त्या प्रोसीजरप्रमाणे आपण अनुदान देत असतो.

श्री.अनिल बाबर : अध्यक्ष महोदय, शासनाने 136 तालुका मुख्यालयाचे स्थांतर नगरपंचायत व नगरपरिषदांमध्ये करण्याचा प्राथमिक निर्णय केलेला आहे. त्यापैकी 109 नगरपंचायती व नगरपरिषदा झाल्या असून 28 राहिलेल्या आहेत. शासन निर्णयामध्ये मुख्यालय नसलेल्या गावांनाही नगरपरिषदा व नगरपंचायती झालेल्या आहेत. माझ्या मतदारसंघातील आटपाडी हे 25 हजार लोकसंख्येचे व मुख्यालयाचे गाव असून त्याचे स्थांतर नगर परिषदेमध्ये झालेले नाही. 30 एप्रिलपर्यंत याचे स्थांतर नगरपरिषदेमध्ये केले जाईल का ?

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, आटपाडी हे तालुका मुख्यालयाचे ठिकाण असून ते शासनाच्या विचाराधीन आहे. एप्रिल अखेरपर्यंत आटपाडी ग्रामपंचायतीचे नगरपरिषदेमध्ये स्थांतर करण्याचा निर्णय घेतला जाईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील .....

अध्यक्ष महोदय, अनुदान देण्याबाबतचा बेस व गाईडलाईन्स सर्व नगरपालिकांना सारख्याच राहतील. प्रत्येकाला वेगळया गाईडलाईन्स राहणार नाहीत. उदा. रस्ते अनुदान द्यावयाचे असेल तर आपण लोकसंख्येचा निकष लावतो. बाकीच्या नगरपालिकांना अनुदान देण्यासाठी ज्या प्रोसीजर व ले-डाऊन आहेत त्यासुध्दा याकरिता लागू राहतील.

श्री.बसवराज पाटील : अध्यक्ष महोदय, आताच मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे अनेक गावामध्ये ग्रामपंचायतींच्या नगरपंचायती व नगरपरिषदा केलेल्या आहेत. अशी अनेक गावे राज्यामध्ये आहेत की ती निकषामध्ये बसतात किंवा आपण त्याबाबतची घोषणा करु शकता. उदा. लातूर जिल्हयातील मुरुड गावाची आवश्यक तेवढी लोकसंख्या असून ते निकषामध्ये बसणारे गाव आहे. या गावचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे. मुरुड गावाकरिता नगरपंचायतीची घोषणा करणार का ?

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, शासनाच्या धोरणाप्रमाणे तालुका मुख्यालय असेल तर Irrespective of population प्रमाणे आपण तेथे नगरपंचायती दिलेल्या आहेत. यवतमाळ जिल्हयातील झरी जामनी या गावाची लोकसंख्या 3-4 हजार आहे. परंतु तेथे सुध्दा नगरपंचायत केलेली आहे. तालुका मुख्यालय असेल तर तेथे नगरपंचायत करावयाची आहे. 10 हजार पेक्षा जास्त लोकसंख्या असेल तर तेथेही नगरपंचायत करावयाची आहे. 25 हजार पेक्षा जास्त लोकसंख्या असेल तर तेथे नगरपरिषदेचा प्रस्ताव आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेले एखादे गाव राहिले असेल तर त्यामध्ये निश्चितपणे लक्ष घालण्यात येईल व तसा निर्णय घेण्यात येईल.

श्री.शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी अर्थसंकल्प सादर केलेला आहे. 100 पेक्षा जास्त नगरपंचायती, नगरपरिषदा पुन्हा यामध्ये समाविष्ट झालेल्या आहेत. 182 कोटी रुपये आपण मंजूर करुन दिलेले आहेत. प्रत्येक नगरपंचायतीला त्यांचा शेअर्स डायव्हर्ट होईल. नगरपंचायत झाल्यानंतर जनतेला तेथील जनतेला विकासाच्या मोठया अपेक्षा असतात. मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे की, तीन महिन्याच्या आत संबंधित मुख्याधिकारी व इंजिनियर यांची नियुक्ती ते करणार आहेत किंवा नगरपंचायत किंवा नगरपरिषदेला नियुक्त करण्याचे अधिकार

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत शिंदे .....

देणार आहेत. आपण या नगरपंचायतींना मागणीनुसार मागणीला निधी उपलब्ध करुन देण्यासाठी भविष्यकालीन गरज पाहता तत्काळ पुढील पुरवणी मागण्यांमध्ये जास्त निधी उपलब्ध करुन देणार का, तसेच तेथील कार्यालये व अनुषंगीक बाबींकरिता मागणीप्रमाणे त्यांना निधी देण्यासाठी तत्पर राहणार आहात का ?

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, ही गोष्ट सत्य आहे की, नगरपंचायत केल्यानंतर त्या गावचा चेहरामोहरा बदलतो. नगरपंचायतीमध्ये समाविष्ट करण्यासाठी आपण गावाची हद्द सुध्दा वाढवितो. मोठया लोकसंख्येनुसार प्लॅन डेव्हलपमेंट करण्यासाठी लागणारे टेक्नीकल मॅनपॉवर, मुलभूत गरजा भागविण्यासाठी लागणारे अनुदान सुध्दा जास्त लागणार आहे. या सर्व गोष्टी गृहीत धरुनच शासनाने हा निर्णय घेतला आहे की, प्लॅन डेव्हलप करताना नगरपालिकेच्या आतमध्ये ही सर्व गावे आणावी लागतील. या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन पुरवणी मागण्यांमध्ये अधिक निधी देण्यासाठी शासन प्रयत्नशील राहील.

श्री.कृष्णा गजबे : अध्यक्ष महोदय, नव्याने स्थापन झालेल्या क वर्ग नगरपंचायत क्षेत्रामध्ये मनरेगाअंतर्गत रोजगार हमी योजनेत अपूर्ण कामे झालेली होती. ते काम पूर्ण करण्यासाठी नगरविकास विभागाला निर्देश देणार का, मंजूर पण अपूर्ण कामांना रोजगार हमी योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करुन देणार का ?

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, मंजूर असलेली अपूर्ण कामे निश्चितच पूर्ण करण्यात येतील. यापुढे नरेगाची कामे, प्रोसेसमधील कामे, अर्धे झालेली कामे निश्चितपणे पूर्ण केली जातील.

तालिका सभाध्यक्ष : या लक्षवेधी सूचनेवर 12 सन्माननीय सदस्यांनी विविध प्रश्न विचारलेले आहेत. मागील 25 मिनिटांपासून ही लक्षवेधी सूचना चालू आहे.

श्री.भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, शासनाने ग्रामपंचायतीच्या ठिकाणी नगरपंचायती करण्याचा निर्णय घेतलेला आहे. वाढती शहरे पाहता हा महत्वाचा व चांगला निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्यामुळे येथे केंद्र सरकार, राज्य सरकार व डीपीसीपासून सर्वांचा निधी मिळणार

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भास्कर जाधव .....

आहे. हा चांगला निर्णय शासनाने घेतलेला आहे. माझा पहिला प्रश्न मुख्याधिकारी यांच्या नेमणूकीसंदर्भातील आहे. नगरपालिकेमध्ये वर्षानुवर्षे चीफ अकौंटटंट म्हणून काम करणाऱ्या हेड क्लर्क पैकी काही टक्के लोकांना आपण मुख्याधिकारी म्हणून घ्यावे अशी त्यांच्या संघटनेची कित्येक वर्षांपासून मागणी आहे. मागील सरकारने त्याबाबत तत्वतः त्यांना मान्यता देण्याचा निर्णय घेतला होता, कारण मी त्या खात्याचा राज्यमंत्री होतो. त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे धोरण शासनाने ठरविले आहे का ? चीफ अकौंटंटचा अनुभव व सेवा लक्षात घेता त्यांना मुख्याधिकारी म्हणून घेण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे धोरण शासनाने ठरविले आहे का ? आपण 182 कोटी सहायक अनुदानाकरिता बजेटमध्ये तरतूद केलेली आहे. पण आपण हे अनुदान 1 एप्रिल 2016 पासून पुढे देणार आहात, यापूर्वी ज्या नगरपंचायती स्थापन झालेल्या आहेत तेथे सहायक अनुदान मिळालेले नाही. त्यांना देखील आपण सहायक अनुदान देणार आहात का ? उदा.गुहागर नगरपंचायत आहे तसेच भोकर मतदारसंघातील तीन नगरपंचायती यांना अनुदान मिळाले नाही त्यांना अनुदान देणार आहात का ?

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली परिस्थिती सत्य आहे. त्यांनी नगरविकास खात्याचा राज्यमंत्री पदाचा कारभार पाहिलेला आहे. त्यांना याबाबतचा अनुभव आहे. मलाही लक्षात आले आहे की, अस्तित्वात असलेल्या नगरपालिकांमध्ये बऱ्याच जागेवर अतिरिक्त पदभार दिलेला आहे, कोठे जास्तीची जबाबदारी दिलेली आहे. नगरपालिकेतील चीफ अकौंट ऑफीसर यांच्या अनुभवाचा फायदा घेण्याकरिता व त्यांना मुख्याधिकारी पदावर नियुक्तीकरिता त्यांच्या संघटनेचीही प्रदीर्घ कालावधीपासून मागणी आहे. याबाबत शासन निश्चितपणे सकारात्मक विचार करील.

यानंतर टी-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील.....

सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न हा 182 कोटी रुपयांच्या सहायक अनुदानासंबंधीचा होता. यासंदर्भातील दिनांक 01 एप्रिल,2016 पासून ते लागू करण्याच्या निकषाबाबत त्यांनी शंका उपस्थित केली. दिनांक 01 एप्रिल,2016 पूर्वी निर्मिती झालेल्या नगरपंचायतींना निधीचे वाटप केलेले आहे. कोणाला किती मिळतील हे तक्त्यानुसार दिलेले आहे. 01 एप्रिल चा निकष न मांडता जे अनुदान आहे, त्याचे योग्य प्रमाणात सगळीकडे वाटप करण्यात येईल.

श्री.भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, माझी गुहागर नगरपंचायत सन 2013 मध्ये स्थापन झाली सन 2013 ते 2016 पर्यंतचे सहायक अनुदान त्यांना मिळालेले नाही. त्याचा विचार हे शासन करणार आहे का ? त्या पध्दतीने भोकर येथील 3 नगरपंचायतींचा विचार शासन करणार आहे का ?

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, ज्या नगरपंचायती सन 2013 पूर्वी स्थापन झालेल्या आहेत, त्यांना अनुदान देण्यात आलेले आहे, त्याचा सुध्दा शासनाने विचार केलेला आहे. हा निधी डेडिकेटेडली ज्या नगरपरिषदेच्या नावाने दिलेला आहे, त्यांना तो निश्चितपणे मिळणार आहे. याप्रमाणे नगरपंचायतींना निधीचे त्याचे वाटप करण्यात येईल. उर्वरित नगरपंचायतींबाबत योग्य त्या निकषांप्रमाणे अनुदान देण्यासंबंधीचा विचार केला जाईल.

श्री.गुलाबराव पाटील : अध्यक्ष महोदय, शासनाच्या निकषाप्रमाणे जेथे तालुका असेल तेथे नगरपंचायत केली जाईल, असे म्हटलेले आहे. जळगाव जिल्हयाची निर्मिती झाल्यापासून मुक्ताईनगर तालुका आहे. या तालुक्याचे नाव पूर्वी एदलाबाद असे होते. एदलाबाद असे नाव असतानाही तो तालुकाच होता. असे असतानाही आता मुक्ताईनगर तालुका असलेल्या ठिकाणी नगरपंचायत नसून अद्यापहि ग्रामपंचायतच कार्यरत आहे. आपण त्या जिल्हयाचे जावई आहात, म्हणून आमच्यावर अन्याय करणार आहात का ?

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, याच्यात निकष एकच आहे की, तालुका मुख्यालय असेल आणि ग्रामपंचायत असेल तर तेथे नगरपंचायत केली जाईल. तेथे तर शासनाने लोकसंख्या हाही निकष लावलेला नाही. तालुका मुख्यालय असेल तेथे ग्रामपंचायत असेल तर नगरपंचायत करण्यात येईल. 2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमित देशमुख :अध्यक्ष महोदय,लातुर तालुक्यामध्ये मुरुड ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये मतदारसंख्या 15,000 लोकसंख्या 30,000 आहे. या अटी व शर्तीमध्ये व निकषामध्ये बसत असताना मुरुड ग्रामपंचायतीला नगरपंचायतीचा दर्जा दिला नाही. ग्रामस्थांनी कोर्टामध्ये धाव घेतलेली आहे. सर्व निकषांमध्ये मुरुड ग्रामपंचायत बसत असेल तर शासन किती दिवसांमध्ये मुरुड ग्रामपंचायतीचे स्थांतर मुरुंड नगरपंचायतीमध्ये करणार आहे ?

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, मुरुड ग्रामपंचायत हे जर तालुक्याचे मुख्यालय नसेल तर तसे होणार नाही. मी पुन्हा सांगतो की, तालुका मुख्यालय आणि ग्रामपंचायत असे असेल तर त्याचे स्थांतर नगरपंचायतीमध्ये होईल. मुरुड तालुका मुख्यालय नसेल तरीही सन्माननीय सदस्य सांगत आहेत, ती बाब तपासून घेईल. तसे असेल तर शासन त्याबाबत सकारात्मक विचार करेल.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या अनुदानाच्या प्रस्तावांना मंजूरी प्रक्रियेसंदर्भात निर्माण झालेला संशय

मु.शी.: प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या अनुदानाच्या प्रस्तावांना मंजूरी प्रक्रियेसंदर्भात निर्माण झालेला संशय यासंबंधी सर्वश्री.विजय काळे, भिमराव तापकीर, जगदीश मुळीक, महेश लांडगे,श्रीमती माधुरी मिसाळ, श्री.अबु आजमी,वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विजय काळे (शिवाजीनगर) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील विनाअनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांचे पहिल्या टप्प्यातील अनुदानाचे सुमारे ९०० शाळांचे प्रस्ताव शिक्षण आयुक्तांनी प्रत्यक्ष जागेवर पाहणी न करताच विभागाकडे पाठविली असल्याची बाब निदर्शनास येणे, आयुक्तांनी प्रस्तावातील त्रुटीची पुर्तता शिक्षण संस्थाचालकांना स्वतःच्या कार्यालयात बोलावून करून घेतल्याचे निदर्शनास येणे, ही बाब एकूण प्रक्रियेबाबत निश्चितच संशय निर्माण करणारी असणे, वास्तविकतः ज्या शाळांनी प्रस्ताव सादर केले आहेत त्या शाळांकडे विद्यार्थीसंख्या पुरेशी आहे का, पायाभुत सुविधा आहे का, या बाबींची जागेवर जावून प्रत्यक्ष पाहणी करणे आवश्यक असताना ते टाळून असे प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाकडे सादर करण्यात येणे, परिणामी, यामध्ये अनुदानाचा गैरव्यवहार झाला असणे, या गंभीर प्रकाराची चौकशी करून शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री.विनोद तावडे (शालेय शिक्षणमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभाध्यक्ष : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय काळे : अध्यक्ष महोदय, प्रत्यक्ष 900 शाळांची पाहणी केली का ? या पाहणीमध्ये किती शाळांमध्ये त्रुटी आढळलेल्या आहेत ? या आढळलेल्या त्रुटींबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे ? जर या त्रुटी आढळल्या असतील आणि विभागीय संचालकांना त्याचे अधिकार असतील तर माननीय आयुक्तांकडे या त्रुटी तपासणीकरिता का जातात ?

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, कायम हा शब्द काढल्यानंतर या शाळांना अनुदान देण्यासंबंधी जवळ जवळ 2011 पासून 2013 पर्यंत विहित वेगवेगळया मुल्यांकनाच्या निकषानुसार अनुदान व इतर अटींवर तपासणी सुरु झाली. सर्वप्रथम जिल्हापातळीवर तपासणी सुरु झाली. त्यानंतर विभागीय पातळीवर तपासणी सुरु झाली. ज्यावेळी हे प्रस्ताव आयुक्तांकडे आले, त्यावेळी पुन्हा विविध संघटना, विना अनुदान पुर्ती संघटना यांनी याबाबत विविध तक्रारी दिल्या. पुन्हा विविध विभागाच्या उप संचालकांच्या माध्यमातून त्याची तपासणी झाली. हे सर्व होऊन आता प्रत्यक्ष आयुक्तांकडे हे प्रस्ताव आल्यानंतर काही जणांनी भेटून असे सांगितलेले आहे की, आमच्या काही त्रुटी राहिलेल्या आहेत. याचे निकष पुढीलप्रमाणे आहेत. शाळेची शैक्षणिक गुणवत्ता 50 माक,र् भौतिक सुविधा 35 मार्क, समुपदेशन केंद्र 3 मार्क, शाळेतर्फे सामाजिक विकासाच्या अनुषंगाने आयोजित करण्यात येणारे विविध उपक्रम 3 मार्क, शाळेतील विद्यार्थ्यांचा शालेय उपक्रमात सहभाग -5मार्क, इको फ्रेंडली उपक्रम, रेन वॉटर हार्वेस्टिंग, अपारंपारिक ऊर्जा, पाण्याचा पुर्नवापर आदिकरिता -4 मार्क याप्रमाणे गुणांचे विभाजन केलेले आहे. अशा विविध गुणांचे यामध्ये निकष आहेत. सुरुवातीच्या काळात याबाबत पुर्तता नव्हत्या, काही जणांनी नंतर त्यांच्या पुर्तता केल्या. आमचे मार्क वाढवा ते अनुदानाच्या यादीमध्ये आणा अशा ज्या पुर्तता करण्याच्या गोष्टी ऐन वेळी येत असतात. आता शासन अनुदान द्यायला सुरुवात करणार आहे. आता पुन्हा याची चौकशी करायला ही यादी थांबवावी लागेल. लोकांमध्ये असंतोष आहे, मला असे वाटते की, अशा ज्या काही स्पेसिफिक तक्रारी आल्या असतील, ज्यामध्ये अशा काही गडबडी असतील त्या जर स्पेसिफिक शाळांची प्रकरणे सन्माननीय सदस्य श्री.विजय काळे यांनी दिली तर त्याची चौकशी करण्यात येईल. सर्व चौकशी लावली तर अनुदान वाटप लांबणीवर जाईल, मला असे वाटते की, अनुदान वाटप लांबणीवर जाऊ नये.

....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय काळे : अध्यक्ष महोदय, मला माझ्या प्रश्नाचे पूर्ण उत्तर मिळाले नाही. माजी आयुक्तांच्या निदर्शनास सर्वप्रथम ज्या त्रुटी आल्या होत्या, त्यानुसार त्यांनी आदेश दिले की, प्रत्यक्ष जाऊन याची पाहणी करावी. त्या आदेशाचे पालन झाले का ? आतही त्यामध्ये काही त्रुटी राहिलेल्या आहेत. माननीय मंत्री महोदयांनी लेखी उत्तरात जे सांगितले की, आयुक्तांनी त्यांना आपल्या कार्यालयात बोलविले आणि त्रुटी पूर्ण करून घेतल्या. या त्रुटींच्या पुर्ततांची प्रत्यक्ष पाहणी केलेली नाही. मूळ प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही. माजी आयुक्त होते त्यांनी या 900 केसेसमध्ये पाहणी करण्याकरिता सांगितले होते. माजी आयुक्तांनी दिला त्याचे पालन झाले का ? त्रुटी पुर्ततांची प्रत्यक्ष कोणी पाहणी केली का ? पाहणीमध्ये या त्रुटी आढळून आल्या की नाही ? आता जे आयुक्त आहेत, त्यांनी सगळयांना आपल्या कार्यालयात बोलावून त्यांच्याकडून पुर्तता करून घेतली, हे बरोबर आहे का

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, माजी आयुक्तांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे आंतरविभागीय तपासणी केली गेली होती. त्यानंतर नवीन आयुक्तांनी त्रुटी पुर्तता करणा-या शाळांना बोलावून न घेता काही शाळांनी स्वत: येऊन आम्ही या या गोष्टींची पुर्तता केलेली आहे असे सांगितलेले आहे. किंवा काही शाळांची खोटी माहिती आहे, असे सांगितले अशा विषयातील जी माहिती आली ती तपासून घेण्याचे काम करीत आहोत.

श्रीमती माधुरी मिसाळ : अध्यक्ष महोदय, तत्कालीन शिक्षण आयुक्त श्री.चोकलिंगम होते. त्यांनी 2014 मध्ये या शाळांची तपासणी करण्याचे आदेश दिले होते. 1000 पेक्षा जास्त प्रस्ताव अनुदानाकरिता प्राप्त झाले होते. त्यामध्ये 689 शाळांची तपासणी झाली होती. त्या 689 शाळांपैकी 350 शाळा या अपात्र ठरलेल्या आहेत. नवीन शिक्षण आयुक्तांनी 641 प्रस्ताव मान्य केलेले आहेत. या 641 प्रस्तावामध्ये जे अनुदानास अपात्र ठरविण्यात आलेले होते, त्या शाळा यामध्ये घेतल्यात का ? दुसरी गोष्ट 689 शाळांची जी तपासणी केली त्याच्या व्यतिरिक्त ज्या राहिलेल्या ज्या शाळा होत्या त्यापैकी उर्वरित शाळांची तपासणी केली का ? कोणत्या आधारावर आताचे हे 641 प्रस्ताव मान्य केले ? वगळण्यात आलेल्या शाळा परत घेतल्या असतील तर शासनाचे हे जे नुकसान झालेले आहे, त्या नुकसानास जो अधिकारी जबाबदार आहे,

UNCORRECTED COPY // NOT FOR PUBLICATION

श्रीमती माधुरी मिसाळ.....

त्याच्यावर कारवाई करणार का ? लेखी उत्तरामध्ये संदिग्धतता आहे, त्रुटी तपासल्याशिवाय पुढील अनुदान देण्यात येणार नाही त्रुटी तपासायच्या म्हणजे तेथे जागेवर जाऊन तपासायच्या की ऑफिसमध्ये बसून तपासायच्या याचे

माननीय मंत्री यांनी उत्तर द्यावे.

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, उत्तरामध्ये स्पष्टपणे असे म्हटलेले आहे की, नोव्हेंबर,2011 आणि 16 जुलै,2013 मधील तरतुदीची पुर्तता झाल्याची खात्री केल्याशिवाय प्रत्यक्ष अनुदान वितरित न करण्याचे स्पष्ट निर्देश अनुदान पात्रतेच्या आदेशात दिलेले आहेत. हे निदेश त्रुटींची पुर्तता झाल्यानंतर जिल्हा विभागीय पातळीवर केलेले आहेत. यामध्ये सर्वात महत्त्वाचे म्हणजे ज्या शाळांनी कायम विना अनुदानित घेताना रोस्टर पाळले नव्हते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनोद तावडे.....

रोस्टरचे पालन केल्याशिवाय शासनाकडून अनुदान मिळत नाही. त्यावेळी त्यांनी रोस्टर पाळले असेल. मधल्या काळात बदल करुन आणलेला असेल, तर रोस्टरच्या आधारे शिक्षणाधिकारी यांच्याकडून एंडॉस करुन येते. त्यामध्ये शाळेचे इन्फ्रास्ट्रक्चर पहायचे असेल तर त्यासाठी प्रत्यक्ष शाळेतच जावे लागते. रोस्टर आणि उर्वरित गोष्टी तपासून घ्याव्या लागतात. आधार कार्ड आणि पटसंख्या हे ऑनलाईनवर आणल्यामुळे कार्यालयात आवश्यक ती माहिती मिळण्यास मदत होत आहे. कोणत्याही शाळेला मान्यता देण्यापूर्वी प्रत्यक्ष शाळेत जाऊन पाहणी केलेली असते, त्याशिवाय अशी परवानगी कोणालाही दिली जात नाही.

श्री अबु आजमी : अध्यक्ष महोदय, एज्युकेशन, तालिम ऐसी चीज है जो एक मुल्क की रीढ़ की हड्डी है. सरकार स्कूल नहीं खोल रही है. जिन स्कुलों को अनुदान नहीं मिलता है और वह स्कूल स्लम एरिया में है, वे लोग फीस ज्यादा लेते है. उनके पास इन्फ्रास्ट्रक्चर नहीं होता है. लाईब्रेरी, लेबोरेटरी खराब रहती है. जो स्कूल स्लम एरिया में है और अनुदान के लिए अप्लीकेशन की है, क्या उस बारे में प्रायोरिटी बेसिस पर ध्यान दिया जाएगा ? मायनॉरिटी कॉलेजेस में 80 प्रतिशत एडमिशन मॅनेजमेंट करता था और 20 प्रतिशत एडमिशन सरकार करती थी. लेकिन लिंगविस्टिक मायनॉरिटी ने जैसे गुजराती, सिंधी, मारवाड़ी जिनके यहाँ विद्यार्थी नहीं मिल रहे है, उन लोगों ने सरकार से ॲप्रोच किया. अब यह हो गया कि 80 प्रतिशत एडमिशन सरकार करेगी और 20 प्रतिशत एडमिशन मॅनेजमेंट करेगा. लेकिन मुस्लिम मायनॉरिटी में इतने बच्चे है कि 100 प्रतिशत एडमिशन कर सकते है. यह आर्टीकल 30 का उल्लंघन है. मैं यह जानना चाहता हूं कि क्या सरकार मुस्लिम मायनॉरिटी को 80 प्रतिशत मुस्लिम का एडमिशन हुआ करता था और 20 प्रतिशत एडमिशन सरकार करती थी, क्या उसको लागू करेंगे या नहीं ?

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, गरीब भागातील किंवा झोपडपट्यांमधील शाळांच्या संदर्भातील विचार केला जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी उच्च शिक्षणाशी संबंधित दुसरा प्रश्न उपस्थित केलेला आहे. मायनॉरिटी आर्टिकल 30 मध्ये नमूद केल्यानुसार मायनॉरिटी संस्थाना मायनॉरिटीचेच विद्यार्थी दिले जातील आणि असे विद्यार्थी मिळाले नाही तर इतर विद्यार्थी दिले जाणार आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

06-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) U-2

SGS/ ST/ AKN/ 13:20

श्री. भिमराव तापकीर : अध्यक्ष महोदय, संबंधित शिक्षण आयुक्तांनी 669 शाळांची प्रत्यक्ष जाऊन पाहणी केलेली होती. त्यानंतर त्यांनी 350 अपात्र शाळा असल्याचे घोषित केले होते. नवीन शिक्षण आयुक्त श्री. भापकर यांनी 641 शाळांना मान्यता दिलेली आहे. मान्यता देण्यात आलेल्या शाळांमध्ये 350 अपात्र शाळांचा समावेश केलेला आहे काय ?

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, अशा प्रकारच्या कोणत्याही शाळांना मान्यता दिलेली नाही. ही प्रक्रिया सन 2011 पासून सुरु आहे. रोस्टरचे प्रमाणपत्र आणून दिल्यामुळे संबंधित अपात्र होता. त्यांनी रोस्टर पाळल्याचे प्रमाणपत्र आणून दिले तर निकषमध्ये वाढ होत असते. अशांमध्ये केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. भिमराव तापकीर यांनी दिलेली माहिती खरी आहे असे समजली जाणार आहे. सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक माहिती दिली तर त्याची निश्चितपणे चौकशी केली जाणार आहे. सरसकट चौकशी करुन ही यादी थांबविणे हे राज्याच्या हिताचे नाही.

श्री. शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी दिलेला निर्णय योग्य आहे. मंत्री महोदयांनी सरसकट चौकशी करुन ही यादी थांबविणे हे राज्याच्या हिताचे नाही, असे जे उत्तर दिलेले आहे ते योग्य आहे. अनेक लोकांना त्या मान्यतेची खरोखर गरज आहे. शहरी भागात त्याचा परिणाम होत नाही. कारण देणगी घेतली तर त्याला अडचण येत नाही. ग्रामीण भागात शिक्षण प्रणाली पोहचत नाही. रयत शिक्षण अशा मोठ्या संस्था सोडल्या तर बहुतेक शिक्षण संस्था आर्थिक फायदा मिळत नसल्यामुळे ग्रामीण भागात जात नाहीत. अशा ठिकाणी मोठी अडचण निर्माण होते. यासंदर्भात मी आणि सन्माननीय सदस्य श्री. शंभुराज देसाई यांनी पूर्वीच माहिती दिलेली आहे. डोंगरी आणि आदिवासी भागात त्यांची फार आवश्यकता आहे. एखादा लोकप्रतिनिधी शिक्षण संस्था डोंगरी विभागामध्ये उभी करीत असेल तर त्यासाठी अनुदान मिळणे गरजेचे आहे. डोंगरी, दुर्गम आणि आदिवासी भागातील प्रस्तावास एखाद्या शिक्षण संस्थांनी मान्यता मागितली असेल तर त्यांना अनुदानित अशी मान्यता देणार काय ?

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, शासन निकषात बसत असेल तर तशा प्रकारची कार्यवाही केली जाईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. ज्ञानराज चौगुले : अध्यक्ष महोदय, उस्मानाबाद जिल्ह्यातील भोसले हायस्कुलमध्ये 37 वाढीव तुकड्या देण्यात आल्या होत्या आणि त्या ठिकाणी 57 शिक्षक आहेत. अशा ठिकाणी 20 टक्के, 40 टक्के, 60 टक्के आणि 80 टक्केनुसार अनुदान मिळाले आहे. सद्य:स्थितीत संबंधित शिक्षकांचे पगार सुरु नाहीत. नव्याने प्रस्ताव दिल्यानंतर 20 टक्के अनुदानावर घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. अनुदानित भोसले हायस्कुलमधील 57 शिक्षकांचे पगार दिले जाणार काय ?

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, पूर्वीच्या सरकारने "कायम" शब्द काढलेला होता. त्यानंतर टप्पा अनुदानाच्या नावावर फक्त पत्रे दिलेली आहेत. प्रत्यक्षात पैसा दिलेला नाही. आता नवीन शासन निर्णयानुसार थेट पैसे देण्याची कार्यवाही सुरु करीत आहोत. नवीन शासन निर्णयानुसार अनुदान मिळण्यास सुरुवात झाली तर टप्प्याटप्प्याने पुढील कार्यवाही केली जाणार आहे.

प्रा. मेधा कुलकर्णी : अध्यक्ष महोदय, रोस्टर पाळले गेले आहे किंवा कसे या एका मुद्यावर शाळा अपात्र ठरविण्यात आलेल्या नसून, पटसंख्या, इन्फ्रास्ट्रक्चरची कमतरता आणि इतरही अनेक मुद्यांच्या संदर्भात शाळा अपात्र ठरविण्यात आल्या आहेत. अशा प्रकारे 350 शाळांना आधी नकार आणि नंतर होकार दिलेला आहे. त्यानंतर मोठ्या प्रमाणात अधिकाराचा गैरवापर झाल्याच्या बातम्या संबंधित वर्तमानपत्रात छापून आलेल्या होत्या. यासंदर्भातील स्पष्टीकरण अजूनपर्यंत नागरिकांपर्यंत पोहचलेले नाही. त्यामुळे अधिकाराचा गैरवापर झाला, हे खरे आहे काय ?

अध्यक्ष महोदय, एकीकडे अनुदान देत दिले जात आहे. तर दुसरीकडे जुन्या अनुदानित आणि नामांकित शाळा बंद का करण्यात येऊ नये, अशा प्रकारच्या नोटिसेस दिल्या जात असून, ते खरे आहे काय ?

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, सदरहू प्रक्रिया सन 2011 पासून सुरु आहे. यामध्ये अनेक मुद्दे आहेत. यामध्ये काही जणांना वैयक्तिक मान्यता नंतर दिलेली आहे. प्रत्यक्षात अनुदान सुरु नाही. अनुदान सुरु होत आहे असे म्हटल्यानंतर संबंधितांकडून आवश्यक ती कागदपत्रांची पूर्तता केली जात आहे. पटसंख्येची माहिती आधार कार्डाच्या आधारे घेतली जात आहे. या माध्यमातून आकडेवारी आलेली असून, ती जर टॅली झाली आणि निकषात बसत असेल तर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

06-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) U-4

SGS/ ST/ AKN/ 13:20

श्री.विनोद तावडे.....

त्यापध्दतीने मार्क वाढविले जातात. अशाच गोष्टी घेतल्या जात आहे. या विषयात स्पेसिफिक दुसरे काही असेल तर त्याची चौकशी करण्यास मी तयार आहे. आपण सरसकट थांबवू नये एवढेच मला म्हणावयाचे आहे.

श्री. जयदत्त क्षीरसागर : अध्यक्ष महोदय, राज्यातील 900 प्राथमिक आणि माध्यमिक शाळांना अनुदान मिळत नाही. परंतु, शासनाने पहिला टप्पा देण्याबाबतचा निर्णय घेतलेला असून, तो अतिशय योग्य आहे. तपासणी, निकष आणि चौकशी केल्यानंतर प्रस्ताव आलेले आहेत. निकषामध्ये 20 पटसंख्येची अट आहे. अशी अट दुर्गम, डोंगराळ आणि आदिवासी भागात पाळणे हे संबंधित संस्थेला कठीण जाणार आहे. शिक्षण हक्क कायद्यामध्ये एक ते तीन कि.मी.च्या परिसरामध्ये मोफत आणि सक्तीचे शिक्षण दिले पाहिजे. यामुळे पटसंख्या कमी असते. तीन कि.मी.च्या अधिक अंतरावर जाता येत नाही. त्यामुळे दुर्गम, डोंगराळ आणि आदिवासी भागात खास सूट किंवा सवलत दिली जाणार काय ?

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, 20 पटसंख्यापेक्षा कमी असणाऱ्या शाळा बंद करण्याचा निर्णय आपल्या सरकारने घेतलेला होता. पण मी अद्याप तो अंमलात आणलेला नाही. डोंगराळ, दुर्गम आणि ज्या शाळेमध्ये विद्यार्थीनी आहेत, अशा शाळा बंद करण्याचे कोणतेही कारण नाही. कारण पालक आपल्या मुलीला लांबवरच्या शाळेत शिक्षण घेण्यासाठी पाठवित नाही.

V-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे....

ज्या मोठ्या शहरामध्ये 20 पेक्षा कमी पटसंख्या आहे तेथिल मुलांची दुसऱ्या ठिकाणी वाहनाने नेऊन व्यवस्था करता येईल

डॉ.शशिकांत खेडेकर : अध्यक्ष महाराज, ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा अतिशय खालावलेला आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधून "ई" लर्निंग तसेच संगणकासाठी सातत्याने मागणी होत असते. माननीय अर्थ मंत्र्याकडे हा प्रस्ताव दिला असता आम्हाला असे उत्तर मिळाले की, शिक्षण विभागाने हा प्रस्ताव नाकारला आहे. या निमित्ताने माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपण आमदार स्थानिक विकास निधीतून "ई" लर्निंगसाठी परवानगी देणार आहात काय?

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महाराज, आपण फक्त "ई" लर्निंगसाठी परवानगी आहे. डिजीटल शाळा करण्यासाठी परवानगी नाही. तसा आग्रह नियोजन आणि वित्त विभागाकडे करीत आहोत.

श्री.संजय केळकर : अध्यक्ष महाराज, शाळांच्या बाबतीत "कायम" हा शब्द मागील सरकारने काढून टाकलेला आहे, परंतु शाळांच्या अनुदानाकरिता वेगवेगळे निकष, मुल्यांकन, तपासणी, पात्रता यामुळे खूप दिरंगाई होते. अनुदानासाठी निरनिराळ्या शाळा, संस्था वाट बघत असतात. या सर्व तपासण्या करुन खालपासून वरपर्यंत प्रस्ताव येण्यासाठी खूप वेळ लागतो. ग्रामीण भागात शाळा, संस्था आहेत. या प्रस्तावाला गती देण्याकरिता शासन काही उपाययोजना करणार आहे काय?

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महाराज, जी यादी निकषात बसून मान्य झालेली आहे त्या यादीचे आता अनुदान सुरु करणार असून ते आपण वेळेत करणार आहोत.

सरदार तारा सिंह: अध्यक्ष महाराज, आपण माझ्याकडे बघितले आणि मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपला आभारी आहे. महाराष्ट्र राज्यातील किती शाळांना अनुदान देण्यात आले, किती शाळांना अद्याप अनुदान देण्यात आले नाही. या शाळांना कधीपर्यंत अनुदान दिले जाणार आहे?

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महाराज, दिनांक 20 जुलै, 2009 रोजी 1551 प्राथमिक

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

06-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) V-2

ADB/ AKN/ ST/ 13:30

श्री.विनोद तावडे....

शाळांचा "कायम" हा शब्द काढला असून त्यांची यादी सुरु आहे. त्यामध्ये वेगवेगळ्या 207, 52, 49, 78, 386 अशी तारीखवार माहिती आपणास हवी असेल तर सांगता येईल. मी सदरची माहिती पटलावर ठेवतो.

श्री.उन्मेश पाटील : अध्यक्ष महाराज, मी अतिशय महत्वाचा प्रश्न विचारु इच्छितो. महाग शिक्षणामुळे समाज अतिशय त्रासलेला आहे. बालवाडीमध्ये मुलाला प्रवेश घ्यायचा असेल पाच हजार रुपये, दहा हजार रुपये, एक लाख रुपयापर्यंत डोनेशन द्यावे लागते. माध्यमिक शाळेमध्ये अकरावीत प्रवेश घ्यायचा असेल तर इमारत निधी 25 हजार रुपये घेतला जातो. मेडिकल कॉलेज, इंजिनिअरिंग कॉलेजेसमध्ये एक लाख रुपये फी घेतली जाते. एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या 8 टक्के पैसा शिक्षणावर खर्च करणे अपेक्षित आहे, परंतु आपण केवळ एक टक्का खर्च करीत आहोत. अमर्त्य सेन म्हणतात की, शिक्षण आणि आरोग्य यावर प्राधान्यक्रमाने बजेट करणे आवश्यक आहे. या शाळांना विनाअनुदानित सारखा रोग जो या महाराष्ट्राला लागलेला आहे, त्यासंदर्भात मंत्री महोदय चांगले धोरण तयार करुन हा विनाअनुदानाचा रोग काढणार आहे काय?

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्यांची सूचना वित्त विभागाकडे अतिशय जोराने करीन.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

7 एप्रिल हा दिवस जागतिक आरोग्य दिन म्हणून साजरा करणेसंबधी

तालिका सभाध्यक्ष (श्री.योगेश सागर) : जागतिक आरोग्य संघटनेच्या वतीने दिनांक 7 एप्रिल हा दिवस दरवर्षी जागतिक आरोग्य दिन म्हणून जगभरात साजरा करण्यात येतो. या दिनानिमित्त जागतिक आरोग्य संघटनेमार्फत यावर्षी "बीट डायबेटीस" असे घोषवाक्य देण्यात आले आहे. त्यानुसार "बीड डायबेटीस" या कार्यक्रमांतर्गत गुरुवार, दिनांक 7 एप्रिल, 2016 रोजी दोन्ही सभागृहाचे सन्माननीय सदस्य तसेच शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचेकरिता शासनाच्या आरोग्यसेवा संचालनालयाच्या मार्फत मध्यवर्ती सभागृह, चौथा मजला, विधान भवन, मुंबई येथे सकाळी 11.00 ते सायंकाळी 5.00 या वेळेत मोफत मधुमेह तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

कृपया "बीट डायबेटीस" या कार्यक्रमास उपस्थित रहावे, ही विनंती.

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: अनुदानाकरिता मागण्या.

मु.शी.: सन 2016-2017 च्या अनुदानाकिरता मागण्या:

(1) सार्वजनिक बांधकाम विभाग

(2) अल्पसंख्याक विकास विभाग

(3) मराठी भाषा विभाग

तालिका सभाध्यक्ष : आता सार्वजनिक बांधकाम विभाग, अल्पसंख्याक विकास विभाग व मराठी भाषा विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक एच-2, एच-3, एच-4,एच-5, एच-6, एच-7, एच-8, एच-9, एच-11, झेडइ-1, झेडइ-2, झेडइ-3, झेडएफ-1, झेडएफ-2, झेडएफ-3, झेडएफ-4, झेडएफ-5 चर्चेला घेण्यात येतील. या मागण्यांचा तपशील कार्यक्रमपत्रिकेबरोबर वितरित केला आहे.

(प्रेस : सोबत जोडलेले मागण्यांसंबधीचे जोडपत्र छापावे.)

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभाध्यक्ष : आता सार्वजनिक बांधकाम विभाग, अल्पसंख्याक विकास विभाग आणि मराठी भाषा विभाग या विभागांच्या मागण्या चर्चेला घेण्यात येतील. विभागांच्या मागण्यांचा तपशील कार्यक्रमपत्रिकेसोबत जोडला आहे. विभागांच्या स्वीकृत कपात सूचनांची यादी सदस्यांना टपालखणाद्वारे वितरित करण्यात आली आहे. कपात सूचना न मांडता मान्य करण्यात आलेल्या कपात सूचनांची उत्तरे मा.मंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने तीस दिवसांच्या कालावधीत सदस्यांना पाठविण्याची प्रथा माहे जुलै, 2010 पासून मान्य झाली असल्यामुळे आता कोणीही कपात सूचना मांडणार नाही, असे मी गृहित धरतो.

या चर्चेसाठी चर्चारोधापर्यंत वेळ उपलब्ध आहे. यापैकी सत्तारूढ पक्षास संबंधित मंत्र्यांच्या उत्तरासह निम्मा वेळ व विरोधी पक्षास निम्मा वेळ देण्यात येईल. सदस्य वेळेचे बंधन पाळून मला सहकार्य करतील अशी मी अपेक्षा करतो. आता चर्चेला सुरुवात होईल.

...6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नसीम खान (चांदीवली) : अध्यक्ष महाराज, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील सार्वजनिक बांधकाम विभाग, अल्पसंख्याक विकास विभाग आणि मराठी भाषा विभागाच्या अनुदानाच्या मागण्यांना नापसंती व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

अध्यक्ष महाराज, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि मराठी भाषा विभागाच्या मागण्यांवर आमचे बाकीचे सहयोगी सन्माननीय सदस्य बोलणार आहेत. मी फक्त अल्पसंख्याक विकास विभागावर माझे मत मांडणार आहे. अल्पसंख्याक विभागाची स्थापना सन 2008-2009 या कालावधीत करण्यात आली. त्या पाठीमागची भूमिका अशी होती की, गेली अनेक दशकापासून चर्चा सुरु होती की, अल्पसंख्याक विभागाला न्याय मिळत नाही. अल्पसंख्याक विभागाला मूळ प्रवाहामध्ये आणण्यासाठी, त्यांना मूलभूत सुविधा देण्यासाठी, तसेच त्यांना शैक्षणिक क्षेत्रात पुढे नेण्यासाठी अल्पसंख्याक विभागाची स्थापना केली. अल्पसंख्याक विभाग स्थापन करण्याची शिफारस अनेक आयोगांनी केली होती. त्यानंतर शासनाने सन 2008-2009 मध्ये अल्पसंख्याक विकास विभाग स्थापन केला. या विभागाच्या माध्यमातून अल्पसंख्याक समाजामध्ये मुस्लीम, शिख, ख्रिश्चन, पारशी, बौध्द, जैन या समाजाला मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी विविध प्रकारच्या योजना सुरु करण्यात आल्या. सर्वप्रथम शैक्षणिक क्षेत्रामध्ये अल्पसंख्याक मुला/मुलींना मदत व्हावी म्हणून त्यांचेसाठी स्कॉलरशिप योजना सुरु करण्यात आली. मॅट्रीक पूर्व आणि मॅट्रीकोत्तर स्कॉलरशिप, व्यवसाय स्कॉलरशिप, वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये शिक्षण घेणाऱ्या मुला/मुलींना मदत करण्यासाठी स्कॉलरशिपची योजना सुरु करण्यात आली. कमी शिक्षण घेतलेल्या अल्पसंख्याक समाजातील तरुणांना रोजगार उपलब्ध व्हावा, त्यासाठी राज्यामध्ये आयटीआय मध्ये दुसरी पाळी, तिसरी पाळी सुरु करण्यात आली. पॉलिटेक्निक कॉलेजेस सुरु करण्यात आले. प्रत्येक जिल्ह्यात मुला/मुलींसाठी वसितगृहे स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. सन 2013-2014 पर्यंत अंदाजे 17 वसतिगृहाचे काम सुरु करण्यात आले.

यानंतर W-1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नसीम खान ....

राज्यामध्ये 44 आयटीआय सुरु करण्यात आले. 1517 पॉलिटेक्नीक सुरु करण्यात आले. शाळेमध्ये पायाभूत सुविधा देण्याची योजना सुरु करण्यात आली. अल्पसंख्याक बहुल क्षेत्रामध्ये महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायतींच्या माध्यमातून त्यांना पायाभूत सुविधांसाठी मदत करण्याची योजना सुरु करण्यात आली. अशाप्रकारच्या अनेक योजनांच्या माध्यमातून अल्पसंख्याक समाजाला या राज्यात दिलासा देण्यास सुरुवात झाली. मराठवाड्यातील मुस्लीम बांधवांना हज यात्रेला जाण्याकरिता औरंगाबादमध्ये हज हाऊसच्या कामाला सुरुवात करण्यात आली. विदर्भातील मुस्लीम समाजाला हज यात्रेला जाण्यासाठी नागपूर येथे हज हाऊस बांधण्यात आले.

अध्यक्ष महोदय, औरंगाबाद, नांदेड, सोलापूर, मुंबई अशा अनेक विभागात उर्दू भाषेला प्रोत्साहन देण्यासाठी उर्दू घर बांधण्याचा निर्णय घेण्यात आला व त्याचे कामही सुरु करण्यात आले. अशाप्रकारच्या अनेक योजनांसाठी दरवर्षी लागणारा निधी शासनाच्या माध्यमातून वेळोवेळी देण्यात आला. परंतु, दुर्दैवाची गोष्ट आहे की, सन 2016-2017 यावर्षी जो अर्थसंकल्प माननीय वित्त मंत्र्यांनी सादर केलेला आहे, त्यामध्ये या अल्पसंख्याक विकास विभागाला फक्त 330 कोटी रुपये दिलेले आहेत. दरवर्षी मार्चच्या बजेटमध्ये जेव्हा माननीय वित्त मंत्री तरतुदीबाबत घोषणा करतात तेव्हा त्यामध्ये शेवटी शेवटी 20 ते 30 टक्के कपात होत असते, हे आपण दरवर्षी पाहिलेले आहे.

अध्यक्ष महोदय, सन 2015-2016 जे बजेट आपण पहावे, त्यावेळेस अल्पसंख्याक विकास विभागाकरिता 405 कोटी रुपयांचे बजेट देण्यात आले होते. त्यातील किती पैसे खर्च झाले हे सांगावयाचे झाले तर जोपर्यंत वित्त विभाग पैसे रिलिज करणार नाही, तोपर्यंत विभाग पैसे खर्च कसे करणार ? गेल्या वर्षी केवळ 55 ते 60 टक्के एवढा निधी खर्च करण्यात आला. यावर्षी बजेटमध्ये केवळ 330 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. याचा अर्थ बजेटच्या माध्यमातून 100 कोटी रुपयांची तरतूद कमी करण्यात आलेली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(अध्यक्षस्थानी तालिका सभाध्यक्ष डॉ. सतीश पाटील)

श्री. नसीम खान ....

अध्यक्ष महोदय, हे शासन आता सत्तेवर आलेले आहे. या शासनाच्या पक्षाच्या लोकांनी घोषणा केलेली होती की, सबका साथ सबका विकास. सबका साथ घेतला परंतु, कोठे आहे सर्वांचा

विकास ? विकास नावाची गोष्ट या राज्यामध्ये दिसत नाही. काल आपण पाहिले की, लोकांमध्ये किती रोष निर्माण होत आहे. या सदनामध्ये या विधानसभेच्या गॅलरीमध्ये येऊन लोक विरोध करीत आहेत, मुर्दाबादच्या घोषणा देत आहेत, अशी परिस्थिती या राज्यामध्ये निर्माण होत आहे.

अध्यक्ष महोदय, आज अल्पसंख्याक समाज या राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात आहे. या राज्यामध्ये 12 ते 13 टक्के एवढे पॉप्युलेशन फक्त मुस्लीम समाजाचे आहे. जैन, ख्रिश्चन, शीख, बौध्द, नवबौध्द समाजाचेही लोक आहेत. या सर्व अल्पसंख्याक समाजाला आपण एकत्रित केले तर कमीत कमी 22 ते 23 टक्के एवढे अल्पसंख्याक या राज्यामध्ये आहेत. त्यांच्याकरिता बजेटमध्ये किती टक्के निधीची तरतूद केली जाते याचा विचार करण्याची गरज आहे. खरोखर या राज्यामध्ये अल्पसंख्याक समाजाला न्याय द्यायचा असेल, अल्पसंख्याक समाजाला मुख्य प्रवाहात आणायचे असेल तर या राज्यामध्ये या सरकारने पॉप्युलेशनप्रमाणे निधी देण्याची गरज आहे. त्यांच्याकरिता निधी वाढविला पाहिजे. ज्याप्रमाणे एस.सी., एस.टी. समाजाला दिलेला निधी आणखी वाढविला पाहिजे. तशाचप्रकारे अल्पसंख्याक समाजाचे पॉप्युलेशन 22 ते 23 टक्के आहे, त्यांच्या करिता कमीत कमी 10 टक्के निधी अल्पसंख्याक विकास विभागाला दिला पाहिजे. तेव्हाच आपण समजू शकतो की, या शासनाने या राज्यावर येण्यापूर्वी सबका साथ, सबका विकास अशी जी घोषणा केली होती, त्यानुसार यांच्या मनात सर्वांचा सन्मान आहे व सर्वांचा विकास करण्याची इच्छा आहे.

अध्यक्ष महोदय, सन 2013-2014 मध्ये या राज्यात जेवढ्या योजना सुरु होत्या, त्यानंतर कोठेही काही दिसत नाही. सन 2013-2014 मध्ये आम्ही 17 वसतिगृहांचे भूमीपूजन केले होते. गेल्या दीड वर्षांत किती नवीन वसतिगृहांचे काम सुरु झाले आहे ते आम्हाला दिसत नाही. आम्ही 44 आयआयटी सुरु केल्या होत्या, त्यामध्ये आणखी वाढ करण्याची आवश्यकता आहे. याकरिता

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नसीम खान ....

सर्वेक्षण करुन जेथे जेथे गरज असेल तेथे लवकरात लवकर नवीन आयटीआय सुरु केली पाहिजेत. अनेक शहर, राज्यांमध्ये त्याकरिता नवीन इमारत बांधण्याची गरज नाही तर जेथे शासनाच्या आयआयटी आहेत, तेथेच दुसऱ्या, तिसऱ्या पाळीमध्ये नवीन आयटीआय सुरु करण्याची गरज आहे. तसेच, आणखी पॉलिटेक्नीक सुरु करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, आज या राज्यामध्ये वक्फ बोर्डाचा महत्त्वपूर्ण विषय आहे. या राज्यात वक्फ बोर्डाची किती जमीन आहे, त्यापैकी किती जमिनीवर अतिक्रमण झालेले आहे ? आमच्या शासनकाळात गेल्या 4 वर्षांमध्ये आम्ही 600 एकरपेक्षा जास्त जमिनीवर कायद्याप्रमाणे कारवाई करुन त्या मुक्त करुन घेतल्या होत्या. आज या राज्यात वक्फ बोर्डाची स्थापना झालेली नाही, तेथे पर्मनंट सीईओ अपॉईंट झालेले नाहीत. ते करण्याची गरज आहे असे मला वाटते. मला आपल्या माध्यमातून या शासनाला हे सांगावयाचे आहे की, या शासनाने लवकरात लवकर वक्फ बोर्डाचे गठन करावे, वक्फ बोर्डाच्या अध्यक्षांची नेमणूक करावी व वक्फ बोर्डाच्या सीईओ पदावर पर्मनंट क्लास-1 अधिकाऱ्याची नेमणूक करावी.

अध्यक्ष महोदय, या राज्यामध्ये उर्दू अकॅडमी आहे. या देशात फरुक उर्दू फाऊंडेशन केंद्र शासनाच्या अधीन आहे. 15 दिवसांपूर्वीच त्याचा मुंबई शहरात कार्यक्रम झाला. उर्दू भाषेला प्रोत्साहित करण्यासाठी आपल्या राज्यामध्ये उर्दू अकॅडमी आहे. गेल्यावेळेस त्याकरिता 1 कोटी रुपयांचे बजेट होते. यावर्षी त्याकरिता तरतूद दिसत नाही. उर्दू भाषेला प्रोत्साहित करण्यासाठी हे शासन किती गंभीर आहे ? या करिता किती तरतूद केलेली आहे हे आम्हाला दिसून आलेले नाही. या उर्दू अकॅडमीसाठी तरतूद करण्याची गरज आहे. उर्दू भाषेला प्रोत्साहन देण्यासाठी उर्दू अकॅडमीच्या माध्यमातून वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करण्यासाठी उर्दू अकॅडमीला कमीत कमी 5 कोटी रुपयांचा निधी देण्याची आवश्यकता आहे. आपल्या माध्यमातून मला या शासनाला हे सांगावयाचे आहे की, या शासनाने ताबडतोब उर्दू अकॅडमीला मदत करण्यासाठी आणि उर्दू भाषेला प्रोत्साहन देण्यासाठी निधी वाढविला पाहिजे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नसीम खान ....

अध्यक्ष महोदय, या राज्यामध्ये आपण मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केली होती. या राज्यातील अल्पसंख्याक समाजातील बेरोजगार तरुणांना मदत करण्यासाठी या महामंडळाच्या माध्यमातून आपण त्यांना कमी व्याज दराने कर्ज देणार आहोत. या राज्यामध्ये आम्ही सत्तेवर असताना आम्ही या महामंडळाकरिता 500 कोटी रुपयांपर्यंत भागभांडवलाची तरतूद केली. आज ते वाढविण्याची गरज आहे. या राज्यातील अनेक शिक्षित तरुणांना छोटेमोठे व्यवसाय सुरु करावयाचे आहेत, परंतु त्यांच्याकडे पैसे नाहीत. दुर्बल घटकातील अशा तरुणांना मदत करण्यासाठी मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे भागभांडवल जे 500 कोटी रुपयांचे आहे, ते कमीत कमी 1 हजार कोटी रुपये इतके करण्याची आवश्यकता आहे. शासनाने याकडे लक्ष द्यावे व मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे 500 कोटी रुपयांचे शेअर कॅपिटल वाढवून 1 हजार कोटी रुपयांचे करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, आज या राज्यामध्ये अल्पसंख्याक शाळा आहेत त्यांना पायाभूत सुविधांसाठी 2 लाख रुपये प्रायमरी, सेकंडरी आणि ज्युनिअर कॉलेजसाठी देण्यास सुरुवात केली होती. त्यांनाही कमी पैसे मिळत आहेत. यासाठी जेवढे अर्ज येतात त्या सर्व अर्जदारांना पैसे मिळत नाहीत. याबाबत अनेक तक्रारी आमच्याकडे येत आहेत, अनेक लोक मंत्रालयाच्या चकरा मारीत आहेत. परंतु, तरतूद नसल्याने विभागाच्या माध्यमातून त्यांना पैसे मिळत नाहीत. या पायाभूत सुविधांसाठीही जास्तीत जास्त तरतूद करण्याची गरज आहे.

X-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नसिम खान.....

तसेच पायाभूत सुविधेच्या नावाखाली असलेल्या योजनेस बळकट करण्यासाठी आणखी काही निधीची तरतूद करण्याची आवश्यकता आहे. अल्पसंख्यांक महिलांना मदत करण्यासाठी आपण अल्पसंख्यांक महिला बचत गट योजना सुरु केली होती. महामंडळाच्या माध्यमातून बचतगट स्थापन करण्यासाठी आणि ट्रेनिंग देण्यासाठी आणि त्यानंतर त्यांना लोन देऊन, मदत करुन त्यांना स्वबळावर उभे करण्यासाठी ती योजना सुरु करण्यात आलेली आहे. परंतु गेल्या दीड वर्षापासून एकाही बचत गटाची स्थापना राज्यामध्ये झालेली नाही. त्यांच्या योजनेला प्रभावीपणे लागू करण्यास शासन सक्षम नसेल तर महिलांची अवस्था बिकट होणार आहे. अल्पसंख्यांक महिलांचा बचत गट योजनेस निधी देण्याची गरज आहे. सदरहू निधी देण्यात यावा, अशी मी मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, युपीएससी योजना बंद पडलेली आहे. मुस्लीम समाजाची, अल्पसंख्यांक समाजाची पोलीस भरती योजना, आपण प्रत्येक जिल्ह्यामध्ये पोलीस कॉन्स्टेबलची प्री ट्रेनिंग योजना सुरु केली होती. त्या ठिकाणी 100 ते 200 मुलांना जिल्हानिहाय ट्रेनिंग देण्यात येणार होते. परंतु ती योजना बंद पडलेली आहे. असे झाल्यास या समाजाचा कसा विकास होणार आहे, त्या लोकांना कसा दिलासा दिला जाणार आहे. ही योजना देखील प्रभावीपणे सुरु करण्याची गरज आहे. प्रत्येक जिल्ह्यामध्ये ही योजना सुरु करण्याची आवश्यकता आहे. याकडे देखील शासनाने लक्ष द्यावे.

अध्यक्ष महोदय, आपण युपीएससी व एमपीएस योजना सुरु केली होती. यावर देखील भर देण्याची गरज आहे. अल्पसंख्यांक विकास विभागाच्या माध्यमातून ज्या योजना सुरु केलेल्या आहे, त्या सर्व योजनांचा आढावा घेऊन त्या प्रभावीपणे लागू करण्यासाठी जास्तीत जास्त निधी देण्याची गरज आहे. मी पूर्वी सांगितले की, कमीतकमी पॉप्युलेशनच्या आधारावर 10 टक्के निधी देण्याची गरज आहे. हा निधी शासनाने दिला पाहीजे. सभागृहामध्ये अल्पसंख्यांक विकास मंत्री उपस्थित नाही. परंतु त्यांची अल्पसंख्यांकांचे मीत्र म्हणून ओळख आहे. त्यांना मंत्री झाल्यावर काय झाले, हे मला कळत नाही. राज्यमंत्री सभागृहामध्ये आहेत. माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेब सभागृहामध्ये नाहीत. ते उत्तर देण्याकरिता येतील अशी मला अपेक्षा आहे. विरोधी पक्षनेते असताना त्यांनी या विभागासंदर्भात अनेक मुद्दे मांडले होते. ते नेहमी प्रश्न विचारत होते की, आपण मुस्लीम समाजासाठी, अल्पसंख्यांक समाजासाठी काय करीत आहात, आपले सरकार काय करीत आहे,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नसिम खान.....

अशी योजना सुरु केली पाहीजे, अशा प्रकारे ते मागणी करीत होते. आज त्यांच्याकडे दहा विभाग आहेत. परंतु गेल्या दीड वर्षामध्ये या विभागाचा आढावा देखील व्यवस्थित घेण्यात आलेला नाही, अशी माझ्याकडे माहिती आहे. देशाचा 15 कलमी कार्यक्रम अल्पसंख्यांक समाजासाठी लागू करण्याची योजना आहे. ती योजना आपण राज्यामध्ये लागू केलेली आहे. याचे चेअरमन माननीय मुख्यमत्री आहेत. परंतु याबाबतची गेल्या दीड वर्षापासून एकही बैठक माननीय मुख्यमंत्री किंवा माननीय अल्पसंख्यांक विकास मंत्र्यांकडे झालेली नाही. केद्रांच्या किंवा राज्याच्या सर्वच समित्यांचे गठन करण्याची आवश्यकता आहे. या सर्व योजनांचा पाठपुरावा करण्यासाठी त्यावर निगरानी करण्यासाठी सजेशन, ऑब्जेक्शन घेण्यासाठी आपण जिल्हानिहाय समितीची स्थापना केली होती. यासंदर्भात प्रत्येक महिन्याला जिल्हाधिकारी यांच्यामार्फत समितीची बैठक झाली पाहीजे, अशी अट होती. सहा, सहा महिने होऊन देखील कोणत्याही जिल्ह्यामध्ये एकही बैठक होत नाही. यासंदर्भात आपण माहिती घ्यावी. या दीड वर्षामध्ये जिल्हाधिकारी यांच्याकडे एकही बैठक झालेली नाही. यासंदर्भात मला संबंधित मंत्री महोदयांना विनंती करायची आहे आणि माझी मागणी देखील आहे. ज्या जिल्ह्यामध्ये ही समिती नसेल त्या जिल्ह्यामध्ये या समितीची तातडीने स्थापना करण्यात यावी. या समित्यांची बैठक जिल्हाधिकारी यांच्यामार्फत दर महिन्याला होईल, अशी सूचना राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांना देण्यात यावी.

अध्यक्ष महोदय, केंद्र शासनाने एमएसडीपी योजना सुरु केलेली आहे. आमच्या युपीए सरकारच्या काळात तत्कालीन माननीय पंतप्रधानांनी 15 कलमी कार्यक्रमाची योजना संपूर्ण देशात लागू केली होती. आमच्या काळामध्ये हा नवीन 15 कलमी कार्यक्रम राज्यामध्ये सुरु करण्याचा निर्णय घेतला होता. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. परंतु या समितीची गेल्या दीड वर्षामध्ये एकही बैठक झाली नाही. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली या समितीची बैठक तातडीने झाली पाहीजे. तसेच माननीय पंतप्रधानांच्या अंतर्गत असलेल्या सर्व योजनांचा आढावा घेऊन संबंधित योजना प्रभावीपणे लागू करण्यासाठी संबंधित मंत्री महोदयांना निदेश देण्याची गरज आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नसिम खान.....

अध्यक्ष महोदय, आज आपण अनेक विषयाबाबत चर्चा करीत असतो. "सब का साथ, सब का विकास" या संदर्भात मी पूर्वी सांगितले. आपल्याला केवळ घोषणाच द्यायच्या आहेत काय. या राज्यातील गोरगरीब, दुर्लक्षित अल्पसंख्यांक समाजाला, मागासलेल्या समाजाला आपण मदत करण्याची आवश्यकता असून याचा विचार करण्याची गरज आहे. लातूरमध्ये काय झाले. अल्पसंख्यांक पोलीस अधिकारी पोलिसांच्या युनिफॉर्ममध्ये होता. त्याला मारहाण करण्यात आली, अपशब्द वापरण्यात आले, वेगवेगळ्या घोषणांसाठी वाद घालण्यात आला. या राज्यामध्ये काय चालले आहे. अल्पसंख्यांक समाजाला सुरक्षा मिळणार आहे की, नाही. या समाजाला मदत केली जाणार आहे की, नाही. हे सरकार अल्पसंख्यांक समाजाला मदत करुन सुरक्षा प्रदान करणार आहे की, नाही यासंदर्भात विचार करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, या सदनामध्ये घोषणेच्या नावाने, भारत मातेच्या नावाने, वेगवेगळ्या प्रकारच्या घोषणेच्या नावाखाली आपण चर्चा करतो. यासंदर्भात सर्वांची एकच भावना आहे. या देशामध्ये हिंदु असो, मुस्लीम असो, शिख असो की, इसाई असो, प्रत्येक धर्माच्या व प्रत्येक समाजाच्या मनामध्ये भारत मातेविषयी आदर व मानसन्मानाचीच भावना आहे. कोणी काय म्हणत असेल, कोणी कोणता नारा देत असेल, तर त्यावर सभागृहामध्ये दोन ते तीन दिवस वेळ वाया जातो. या राज्यातील ज्या मातेच्या पोटामध्ये अन्न नाही, तिच्यासंदर्भात येथे एकही प्रश्न उपस्थित होत नाही. त्याकरिता शासन गंभीर नसून हा विचार करण्याची गरज आहे. मी आपल्या मार्फत या शासनाला सांगू इच्छितो की, आपण ज्या घोषणा केलेल्या आहेत, त्या घोषणा बाजूला ठेवा. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील लोकशाही आघाडी सरकारने अल्पसंख्यांक समाजाच्या विकासासाठी ज्या योजना राज्यामध्ये सुरु केल्या, त्या योजना इमानदारीने राज्यामध्ये लागू कराव्यात, जेणे करुन अल्पसंख्यांक समाजाला मुख्य प्रवाहामध्ये आणण्यास मोठी मदत होईल.

अध्यक्ष महोदय, या राज्यातील अनेक समित्यांनी अल्पसंख्यांकाकरिता शिफारस केली होती. सच्चर समितीने शिफारस केली होती. याकरिता डॉ. महेमूद ऊर रहेमान समितीचे गठन करण्यात आले होते. या समितीचा अहवाल 2013-2014 मध्ये सादर करण्यात आला होता. या राज्यामध्ये मुस्लीम समाजातील मागासलेल्या समाजाला मुख्य प्रवाहात आणायचे असेल तर त्याला आरक्षण दिले पाहीजे, असे या अहवालामध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते. तेव्हा आमच्या सरकारने या राज्यातील मुस्लीम समाजाला 5 टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला होता. ...Y/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नसीम शेख.....

शैक्षणिक क्षेत्रात व शासकीय नोकरी या दोन भागात आरक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता व आरक्षण लागू करण्यात आले होते. याप्रकरणी काही लोकांनी माननीय उच्च न्यायालयामध्ये दावा दाखल केला होता. सदरहू प्रकरणी निर्णय देऊन माननीय उच्च न्यायालयाने मुस्लीम आरक्षणाला दुजोरा दिला आहे. मुस्लीम समाजातील मागास प्रवर्गास मुख्य प्रवाहामध्ये आणावयाचे असेल तर त्यांना आरक्षण दिले पाहिजे. मुस्लीम समाजाला देण्यात आलेले आरक्षण बरोबर आहे व ते राज्यामध्ये सुरु ठेवले पाहिजे. शासनाने सदहू आरक्षण सुरु ठेवल्यानंतर देखील 4 महिन्यांतर "सब का साथ सब का विकास" अशी घोषणाबाजी करुन हे शासन सत्तेत आले. त्यावेळी आम्हाला विश्वास होता की पूर्वीच्या शासनाने जो निर्णय घेतला होता तो पुढे चालू ठेवण्यात येईल, लागू करण्यात येईल. हे शासन जातीभेद करीत आहे, असा माझा या शासनावर स्पष्ट आरोप आहे. जातीच्या आधारावर मुस्लीम समाजाला आरक्षण दिले होते. त्यास माननीय मुंबई उच्च न्यायालयाने दुजोरा दिला होता. परंतु त्यामध्ये तांत्रिक अडचण दाखवून त्याबाबतचे विधेयक सरकारकडून विधिमंडळामध्ये आणण्यात आले नाही व मिळालेल्या आरक्षणास रोख लावण्यात आला.

अध्यक्ष महोदय, आरक्षणासंदर्भात राज्यातील जनतेमध्ये कशा प्रकारचा असंतोष निर्माण झाला, हे आपण काल पाहिले आहे. काल विधिमंडळाच्या गॅलरीमध्ये एका समाजाचे काही लोक आले होते. कारण एका समाजाला सत्ता आल्यानंतर पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये आरक्षण देण्याचा निर्णय घेऊन शिफारस करण्यात येईल, असे सत्तेत येण्यापूर्वी या सरकारने आश्वसन दिले होते. हे सरकार सत्तेत येऊन जवळपास 100 ते 150 मंत्रिमंडळ बैठका झाल्या आहेत. अद्यापपर्यंत धनगर समाजाला आरक्षण देण्याची चर्चा देखील करण्यात आली नाही. अशा प्रकारची आश्वासने या सरकारने दिलेली असल्यामुळे लोकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण होत आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुढील काळामध्ये निर्माण होणार आहे.

अध्यक्ष महोदय, शासनाने मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय घेतला होता. माझी पुन्हा मागणी आहे की, मुस्लीम समाजाला देण्यात आलेल्या 5 टक्के आरक्षणाला माननीय मुंबई उच्च न्यायालयाने दुजोरा दिला आहे. त्यासंदर्भात ताबडतोब शासनाने मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नसीम शेख.....

घेऊन त्याबाबतचे ऑर्डिनन्स काढावे. त्यानंतर सदर आरक्षणाबाबतचे विधेयक सभागृहात मांडण्यात यावे, त्यास आम्ही सर्व संमतीने मान्य करु व मुस्लीम समजाला आरक्षण मिळवून देऊ. या कायद्यामुळे मागासलेल्या मुस्लीम समाजाला मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी मदत होईल व तो राज्याच्या विकासास हातभार लावेल.

अध्यक्ष महोदय, मी सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. मला आपल्या माध्यमातून बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो व जाता जाता एक शेर सांगतो की,

"शाख से टूट जाए वो पत्ते नहीं है हम,
उनसे जाकर कह दो कि वो अपनी औकात में रहे"

अध्यक्ष महोदय, सत्ता मिळाली म्हणून सत्तेच्या नशेत वागण्याची गरज नाही. या राज्याचा इतिहास आहे की, सर्व जाती, जमाती, समाज यासर्वांना सोबत घेऊन जाणारे हे राज्य आहे. ही परंपरा संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाल्यापासून सुरु आहे. या परंपरेला कायम राखण्याचे काम या शासनाने केले पाहिजे, असे मला सभागृहाच्या माध्यमातून आवाहन करावयाचे आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद !

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.उन्मेष पाटील (चाळीसगाव) : अध्यक्ष महोदय, सन 2016-17 च्या अनुदानाच्या मागण्यावर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्यापूर्वी सन्माननीय सदस्यांनी अल्प संख्यांक समाजाच्या धोरणावर आपले विचार मांडत असताना राज्यातील अल्पसंख्याक समाजाच्या मनातील एक शेर सांगितला आहे. त्यामुळे मलाही एक शेर आठवतो की,

"हमें तो अपनों ने लूटा, गैरों में कहाँ दम था,
हमारी कश्ती वहाँ डूबी जहाँ पानी कम था"

अध्यक्ष महोदय, स्वातंत्र्याच्या 60 वर्षानंतर माझ्या अल्प संख्यांक समाजातील तरुणाच्या हातामध्ये लॅपटॉप असायला हवा होता, लहान मुलाच्या हातामध्ये टॅब हवा होता परंतु अद्यापही त्याच्या हातात भंगार आहे, यास जबाबदार कोण ?

अध्यक्ष महोदय, अनुदानाच्या मागण्यावर चर्चा करीत असताना मला लक्षात आणून द्यावयाचे आहे की, अल्प संख्यांक समजाच्या बाबतीत धोरण तयार करीत असताना या शासनाने त्यांच्याकरिता शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालये सुरु केली. वसतिगृहे सुरु केली आहेत. याबद्दल मला आनंद वाटतो. सदरहू धोरणे जुनी असली तरी त्यांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे व त्यांची अंमलबजावणी माझ्या सरकारने केली, याचा मला सार्थ अभिमान आहे. याबाबत मी सदनाच्या माध्यमातून मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, अल्प संख्यांक समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी मौलाना आझाद महामंडळ सुरु करण्यात आले आहे. या महामंडळाच्या माध्यमातून अल्प संख्यांक समाजातील मुस्लीम तरुणापर्यंत योजना पोहोचत नाहीत. आर्थिक स्वावलंबन आणण्याकरिता स्वयंरोजगारावर आधारित योजना आणण्यात आल्या पहिजेत, अशी माझी विनंती आहे. ठराविक समाजातील लोकांना योजना न देता त्या तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत. त्याकरिता मोठ्या प्रमाणात तरतूद करण्यात यावी, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, मला आनंद वाटतो की, अल्प संख्यांक समाजाच्यावतीने जळगाव, धुळे या ठिकाणी महोत्सव घेण्यात आले. यामाध्यमातून बचत गटांना चांगला प्लॅटफॉर्म उपलब्ध करुन देऊन कोट्यावधी रुपयांची उलढाल करुन खऱ्या अर्थाने आर्थिक स्वावलंबनासाठी प्रयत्न करण्यात आला.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.उन्मेष पाटील....

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदार संघामध्ये पीर मुसा कादरी बाबा हे हिंदु मुस्लीम एकतेचे चांगले श्रध्दास्थान आहे. या ठिकणी राज्यातून व देशातून लाखो भाविक येतात. या श्रध्दास्थनाकरिता पर्यटनाच्या दृष्टीने अल्प संख्याक विभागाच्या बजेटमधून काही करता येणे शक्य आहे काय, वेगळे धोरण तयार करता येईल काय ? यादृष्टीकोनातून एक चांगले धोरण तयार केले तर एक चांगला प्रयत्न होईल. त्याकरिता मी सदनाच्या माध्यमातून मंत्री महोदयांना विनंती करतो की, जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्यात असलेल्या पीर मुसा कादरी बाबा या 60 वर्षे जुने असलेल्या अध्यात्माच्या ठिकाणाचा पर्यटनाच्या दृष्टीने विकास करण्यात यावा.

अध्यक्ष महोदय, या सरकारने अल्प संख्याक समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकरिता मायनॉरिटी इन्स्टीट्यूट्स डिक्लियर केले, ही अतिशय चांगली बाब आहे. परंतु दुर्दैव आहे की, सदरहू ठिकाणी अल्प संख्याक विद्यार्थ्यांच्या जागा रिक्त दाखवून तेथे खुल्या समाजातील विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी देण्यात येत आहे. एका बाजूला अल्प संख्याक समाजातील खूप मोठा वर्ग शिक्षणापासून वंचित आहे व दुसऱ्या बाजूला त्यांच्यासाठीच्या जागेवर खुल्या संवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. यासंदर्भात काळजी घेतली तर खऱ्या अर्थाने अल्प संख्यांक समाजाला न्याय दिल्याचे धोरण अवलंबिले जाईल.

अध्यक्ष महोदय, इचलकरंजी, मालेगाव, धुळे या सारख्या ठिकाणी टेक्स्टाईलचे खूप मोठे क्लस्टर तयार झाले आहेत. अल्प संख्याक विभागाच्यावतीने या ठिकाणी प्रशिक्षण सेंटर सुरु करण्याची आवश्यकता आहे. विणकर कामगार, विडी कामगार, तंबाखू उद्योगासाठी पॅकेजिंगचे काम करणारा कामगार, यांच्याकरिता ट्रेनिंग सेंटर उभारुन त्यांना संरक्षण दिले पाहिजे. ज्याप्रमाणे ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या नावाने असंघटीत कामगारांचे मंडळ स्थापन करण्यात आले आहे. त्याप्रमाणे या असंघटीत कामगारांसाठी अल्प संख्यांक विभागामार्फत एखादे मंडळ स्थापन करुन त्यांना आश्वस्त केले तर खऱ्या अर्थाने अल्प संख्याक समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न होईल.

....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.उन्मेष पाटील.....

अध्यक्ष महोदय, मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्यावर बोलणार आहे. मला आनंद वाटतो की, माझा मतदार संघात, जिल्ह्यात किंवा राज्यात पहिल्याच वेळेस राज्यात सेंट्रल लोड फंड माध्यमातून निधी उपलब्ध करुन दिला आहे. यामाध्यमातून राज्यातील दुरावस्था झालेल्या रस्त्यांची दुरुस्ती करण्याचे धोरण तयार करण्यात आले. औरंगाबद व जळगाव जिल्ह्याला जोडणारा नॅशनल हायवे क्रमांक 211 वरील ऑट्रम घाट हा देशातील 60 महानगरांना जोडणारा रस्ता आहे. हिवाळी अधिवेशनामध्ये मागच्या वर्षी यासंदर्भात मंत्री महोदयंनी आश्वासन दिले होते की, संबंधित विभागासमवेत बैठक घेऊन भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल व नॅशनल हायवेच्या कामास गती देण्यात येईल. परंतु दुर्दैवाने याप्रकरणी 15 महिने झाले तरी बैठक घेण्यात आली नाही. या हायवेवर महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील सर्वात मोठा टनेल तयार करण्यासंदर्भातील आराखडा तयार करण्यात येत आहे, याचा मला आनंद आहे.

यानंतर Z-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. उन्मेश पाटील.....

पण आनंद व्यक्त करीत असताना मला एक खंत वाटते की, आज त्या घाटाची दुरावस्था झालेली आहे आणि म्हणून तात्काळ त्या ठिकाणी बजेटमध्ये प्रोव्हीजन करुन त्या घाटाला दिशा देऊन 7 महानगरांना जोडून मध्यप्रदेश, महाराष्ट्र आणि आंध्रप्रदेश या दोन तीन राज्यांना जोडणारा हा नॅशनल हायवे 211 आहे.

अध्यक्ष महोदय, गुणवत्ता नियंत्रणाच्या बाबतीत क्वॉलिटी कंट्रोलच्या समस्या आहेत. आपल्या विभागाच्या अंतर्गत तपासणी करुन जर गुणवत्ता तपासणी केली जात असेल तर आणि अहवाल येत असेल तर राज्यातील जनतेच्या निधीचा योग्य वापर होतो की नाही अशी शंका सर्व सामान्यांच्या मनामध्ये येते. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, यासंबंधी रिटायर्ड सी.ई. आणि एस.ई. यांच्यामार्फत क्रॉस व्हेरीफीकेशन करुन ते अहवाल ऑनलाईन अपलोड करण्यात यावेत. जेणेकरुन त्या ठिकाणी सेम-डेला ॲक्शन घेतली जाईल आणि त्याला कुठे तरी गुणवत्तापूर्ण अशी दिशा देता येईल.

अध्यक्ष महोदय, आज राज्यात 3 लाख किलोमिटर्स रस्त्यांपैकी 2 लाख किलोमिटर्स रस्ते हे ग्रामीण रस्ते आहेत. राज्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांची अवस्था अतिशय वाईट आहे. एका बाजूला केंद्र शासनाकडून नॅशनल हाय-वेकरिता खूप चांगला निधी उपलब्ध करुन दिला आहे. खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याच्या 65 वर्षामध्ये कधी नव्हे एवढा निधी आमच्या खान्देशामध्ये नॅशनल हाय-वेसाठी उपलब्ध करुन दिला आहे. ही एक अतिशय अभिमानाची बाब आहे. परंतु दुसऱ्या बाजूला विचार केला तर सार्वजनिक बांधकाम विभागाला 90 हजार किलोमिटर्स रस्त्यांची डागडूजी करावयाची जबाबदारी आहे. ग्रामीण विकास विभागाकडे बघितले तर 2 लाख 10 हजार रस्त्यांची देखभाल त्यांच्याकडे आहे. विषय ग्रामीण विकास विभागाचा नसला तरी एवढा मोठा भार त्या ठिकाणी असताना त्या ठिकाणी टेक्निकल एक्सपर्ट आहेत काय, बॅक एन्डला त्या ठिकाणी पुरेशी टीम आहे काय, आणि म्हणून या सर्व दुरावस्थेसंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने जर पुढाकार घेतला आणि या 3 लाख किलोमिटर्सपैकी 2 लाख किलोमिटर्स रस्त्यांच्या संदर्भात एक फोरम

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. उन्मेश पाटील.....

आखून ज्या पध्दतीने मध्यप्रदेश राज्याने एक ऍन्यूईटीचा प्रोजेक्ट आणून या सर्व दुरावस्था दूर केल्या. येणाऱ्या 20 वर्षात होणारे रोड पाच वर्षात पूर्ण करुन ऍन्यूईटीचे धोरण आपल्याला स्वीकरता येईल काय, वेगळ्या पध्दतीने आपल्या राज्यातील रस्त्यांना दिशा देऊन खऱ्या अर्थाने सक्षम महाराष्ट्र करता येईल काय, ही अपेक्षा सर्वसामान्य जनतेला आहे आणि मला खात्री आहे की, मंत्री महोदय या पध्दतीने धोरण आणतील आणि या राज्यातील रस्त्यांची दुरावस्था दूर करतील.

अध्यक्ष महोदय, या सभागृहातील सर्व ज्येष्ठ सदस्य सांगतात की, महाराष्ट्र कर्जामध्ये डुबला आहे. कर्जाचा भार राज्यावर आहे. मला असे वाटते की, आऊट ऑफ वे जाऊन एक डायनॅमिक निर्णय घेण्याची वेळ आलेली आहे. आज बांद्रा कॉलनीमध्ये शासनाचा जो 80 एकरचा भूखंड आहे त्याचा आपण पुनर्विकास करुन घेतला तर 1 लाख कोटी रुपयांचा निधी आपण उभारु शकतो. कर्ज कर्ज करुन केवळ चालणार नाही तर अशा स्वरुपाची डॅशींग निर्णय आपल्याला घ्यावे लागतील. आपल्याला एका बाजूला निधी जनरेट करुन दुसऱ्या बाजूला चांगल्या योजना राबवाव्या लागतील. ही धाडसी निर्णय घेण्याची वेळ आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीच्या तालुक्यापासून जिल्ह्यापासून ते महानगरापर्यंत बघितले तर अतिशय चांगल्या आणि मौल्यवान जागा आहेत. मला आनंद वाटतो की, मंत्री महोदयांनी सांगितले की, ते लॅन्ड बॅन्कचा कन्सेप्ट राबवून महाराष्ट्रातील जागा विकसित करण्यासंदर्भात धोरण राबविल.

अध्यक्ष महोदय, विषय जरी राज्याचा असला तरी मी माझ्या मतदार संघाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, आज ज्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने मते मागितली आहेत त्या शिवाजी महाराजांचे पुतळे बांधण्यासंबंधी पीडब्ल्यूडीचे 50 हजार चौ.फू.चे अतिशय चांगले स्पॉट आहेत. मंत्री महोदयांनी आदेश दिले. परंतु त्या ठिकाणी पीडब्ल्यूडीचे आज कार्यालय नाही. ती जागा विकसित केली गेली तर त्या ठिकाणी निधी जनरेट होऊन छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यास न्याय दिला जाऊ शकतो. म्हणून मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, आपण या संदर्भात या अधिवेशानात जर आदेश दिला तर खऱ्या अर्थाने आम्हाला न्याय मिळेल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. उन्मेश पाटील.....

अध्यक्ष महोदय, शेवटचे दोन मिनिटे काही मुद्दे मांडतो की, या सर्व योजना किंवा धोरणे राबवित असताना पीडब्ल्यूडी विभागाने सीएमजीएसवाय ही अतिशय चांगली योजना सुरू केली आहे. या योजनेला गेल्या दोन अडीच वर्षापासून निधी नाही. परंतु या योजनेच्या माध्यमातून आम्ही ग्रामीण भागातील जनतेला आम्ही दिलासा देत आहोत. परंतु त्याबाबत बजेटमध्ये निधीची थोडी अधिक तरतूद झाली पाहिजे, जेणेकरुन ग्रामीण भागातील रस्त्यांना दिशा देता येईल. एवढीच विनंती आपल्या माध्यमातून करतो. धन्यवाद.

4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील (इस्लामपूर) : अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभाग, अल्पसंख्याक विभाग, मराठी भाषा विभाग या तिन्ही विभागाच्या मागण्यांच्या चर्चेवर बोलण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

महाराष्ट्रामध्ये पूर्वी आपल्याला टोल संस्कृती कधी माहिती नव्हती. पण 1995 च्या काळात युतीचे सरकार आले आणि त्या सरकारवर काही ना काही करुन दाखविण्याची भयंकर मोठा दबाव होता आणि मग निधी कोठून उभा करावयाचा, त्यावेळी या टोल संस्कृतीचा उगम, सुरूवात ही युती शासनाच्या काळात झाली. अलीकडच्या काळामध्ये आपल्या नेत्यांनी व्यक्तव्य केलेले आहे की, ज्या कामाची मी सुरूवात केली ते काम संपविणे, ये मै जानता हू, वगैरे वगैरे असे गडकरी साहेब बोलले आहेत, भाषणातून म्हणाले आहेत. आमचे सन्माननीय सदस्य श्री. प्रशांत ठाकूर यांनी त्या नादात पक्ष बदलला. पनवेलला जे टोल लावण्याचे काम त्याला त्यांचा विरोध होता आणि ज्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाणसाहेब हे मुख्यमंत्री होते त्यावेळी अतिशय आग्रहाने सांगितले की, मला हा टोल रद्द करुन पाहिजे. आपल्या नेत्यांनी त्यांना आश्वासन दिले. त्यांनी इकडून तिकडे उडी मारली. आपण तो टोल रद्द करण्याचा निर्णय घेतला. काही टोल रद्द केले आणि काही टोल अजूनही शिल्लक आहेत. रद्द केलेल्या टोलची संख्या कमी आहे आणि जे रद्द करावयाचे आहेत त्यांची संख्या फार आहे. मुंबई शहरातील येणाऱ्या नागरिकाला टोल भरावा लागू नये म्हणून तो रद्द करण्याची घोषणा आपणच केली आहे. त्यानंतर मुंबईत शिरणाऱ्या सर्व रस्त्यांवरील टोलचा अभ्यास करणारी एक समिती आपण नेमली होती. या समितीच्या बैठका किती झाल्या याबद्दल मी थोडीशी माहिती घेतली असता आनंद कुलकर्णी नावाचे जे सचिव होते त्यांच्या काळात फक्त दोन वेळा बैठका झाल्या. त्या बैठकीमध्ये या क्षेत्रातील तज्ज्ञ घ्यावयाचे सोडून एमएसआरडीसीमधील दोन तीन अधिकारी आणि पीडब्ल्यूडीमधील दोन तीन अधिकारी घेऊन समिती केली. आता मुंबईकर आपल्याकडे अपेक्षेने पाहत आहेत की, आपण जसा धाडसाने कोल्हापूर शहराचा टोल माफ करुन दिला. तो टोल माफ करीत असताना बजेटमधून अजून काहीच गेले नाही, अशी माझी माहिती आहे. आपण कोल्हापूरच्या प्रशासकीय यंत्रणांना सांगितले आहे की, आपल्या जागा विका आणि आपण थोडे पैसे भरा आणि आम्ही थोडे पैसे भरतो. त्या कंत्राटदाराला द्यावयाच्या ज्या काही 500 किंवा 600 कोटी रकमेचा हिशेब नक्की झाला असेल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील.....

पण कोल्हापूर शहराचा टोल गेला काय तर गेला. त्याचे उत्तर पॉझिटिव्ह आहे. त्याबद्दल मी काही नकारात्मक बोलत नाही. बारामतीसारख्या शहराला देखील टोल आहे. अमरावतीसारख्या शहरामध्ये देखील आपण अशाच पध्दतीने रस्ते विकासाची योजना पूर्वी केलेली आहे. त्यामुळे ज्या ज्या ठिकाणी असे टोल लावलेले आहेत त्या सर्वांना समान वागणूक देणे आवश्यक आहे. नशीबाने कोल्हापूरला सुरूवात झाली. ती सुरूवात आता दुसऱ्या शहरांमध्ये सन्माननीय मंत्री श्री. चंद्रकांत दादा पाटीलसाहेब केल्याशिवाय राहणार नाही आणि त्या सर्वांचा समारोप मुंबईचा टोल काढून आमचे मंत्री महोदय करतील असे मला खात्री वाटते. सरकारमधील त्यांचे वजन बघितले तर माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेही त्यांना नाही म्हणत नाहीत अशी बाहेर वंदता आहे. त्यामुळे मला खात्री आहे की, मुंबई शहराचा टोल रद्द करुन येथील जनतेला दिलासा द्यावा. ज्याप्रमाणे माननीय मुख्यमंत्री म्हणाले की, मी विदर्भाचा असलो तरी मुंबईचा विकास केल्याचे पुढील तीन वर्षामध्ये दाखवून देईन. तसे आमच्या चंद्रकांत दादा पाटीलसाहेबांनी देखील अशी घोषणा केली पाहिजे की, मी कोल्हापूरचा असलो तरी मुंबईचा टोल घालवून माझे मुंबईकडे लक्ष आहे हे सिध्द करण्याचा प्रयत्न करीन.

अध्यक्ष महोदय, आपल्या अर्थसंकल्पात मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाला अर्थमंत्र्यांनी फारसा न्याय दिलेला दिसत नाही. आपण एका बाजूला टोल रद्द केला. रस्त्यांचे कार्पेट क्षेत्र जास्त असल्यामुळे त्यांच्या देखभाल व दुरुस्तीची जास्त जबाबदारी आपल्याकडे आली आहे. दुसरे म्हणजे या मेंटेनन्ससाठी सुध्दा पुरू शकणार नाहीत एवढ्या कमी रकमेचा निधी आपल्या विभागाला मिळाला आहे. खरे म्हणजे आपण अर्थमंत्र्यांकडून भांडून जिद्दीने सांगितले पाहिजे की, जेवढी रक्कम आपल्याला बजेटमध्ये दिलेली आहे त्यातून महाराष्ट्राच्या विधानसभेच्या सदस्यांचे समाधान करण्याची ताकद देखील त्या रकमेमध्ये नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील.....

अजून किमान दोन अडीच कोटी रुपये आपल्या खात्याला मिळायला पाहिजे होते याचा आग्रह आम्ही यासाठी करीत आहोत. कारण काल आम्ही दोन पुरवणी मागण्यांवर उत्तरे ऐकली. माननीय आरोग्य मंत्री आणि माननीय पाणी पुरवठा मंत्र्यांनी सांगितले की, आम्ही पुरवणी मागण्यांवर अधिकचे पैसे वाढवून मागाणार आहोत आणि आम्हाला हे पैसे नक्की मिळतील. जे सरकार बजेट मांडताना साडेतीन कोटी रुपयांच्या डेफीसीटमध्ये आहे. मी दाखवून दिलेल्या ज्या दोन चुका आहेत त्याचीच आकडेवारी 5 हजार कोटी रुपयांची जाते. आठ साडेआठ हजार कोटी रुपयांचे डेफीसीट आता कुठे गेलेले नाही. काल या दोघांनी दीड-दीड हजार कोटी रुपयांची मागणी केली आणि त्यापैकी 500 कोटी रुपये जरी माननीय वित्त मंत्री महोदयांनी दिले तरी, पण हे बजेट डेफीसीटमध्ये जाणार आहे. यासाठी समंजसपणाची भूमिका घेऊ नका. कोणत्याही परिस्थितीमध्ये सरकारकडून अडीच हजार कोटी रुपये मिळाल्याशिवाय सभागृहातील सन्माननीय सदस्यांना न्याय देण्याची ताकद तुमच्यात निर्माण होणार नाही. म्हणून या अर्थसंकल्पात मिळालेली रक्कम तोकडी आहे यासाठी याविषयाच्या डिमांडला विरोध करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, नवी संकल्पना अर्थसंकल्पाच्या भाषणात आम्ही ऐकली. हायब्रीड ॲन्युईटी जी काही संकल्पना आहे ही सभागृहाला कळले पाहिजे. माननीय अर्थमंत्र्यांनी त्यादिवशी खाली बसून सांगितले त्याचे उत्तर आपल्या भाषणात यावे. हायब्रीड ॲन्युईटीची त्यांनी सांगितलेली संकल्पना अशी आहे की, सरकारने 50 टक्के द्यायचे आणि 50 टक्के ॲन्युईटी करायची. पारदर्शीपणाला यामुळे तडा जाण्याची शक्यता आहे. पारदर्शीपणावरच आपले सरकार उभे आहे. त्यामुळे पारदर्शीपणाला तडा न जाता ही हायब्रीड ॲन्युईटी कशी करता येईल याचाही विचार करण्याची गरज आहे. समजा एखाद्या प्रोजेक्टची व्हॅल्यू 800 कोटी रुपये असेल आणि त्याचे रेट ऑफ रिटर्न 11 टक्के 11 टक्के असेल, 16, 17 टक्के असेल तर हायब्रीड ॲन्युईटीमध्ये आपण किती कॉन्ट्रीब्युशन देणार आहात याचा फिक्स फॉर्म्युला जर केला तर मला खात्री आहे की, पारदर्शीपणा दाखविला असे आम्हाला पुढच्या अधिवेशनात सांगता येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय मंत्री श्री.चंद्रकांत पाटील फारसे काही बोलत नाहीत. अधिकाऱ्यांवरही फारसा जरब बसवत नाहीत, त्यांचा स्वभाव गोड आहे. त्यामुळे ते कधी कुणाला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील.....

दुखवत नाहीत. परंतु "दिव्याखाली अंधार" ही जी म्हण आहे. तसे माननीय मंत्र्यांच्या खात्यामध्ये झालेले दिसते. 13 व्या वित्त आयोगाने भारत सरकारकडून राज्यातील दुर्गम क्षेत्रातील रस्त्यांसाठी 200 कोटी रुपये येणार होते. पण फक्त 150 कोटी रुपये आले. आपले प्रशासन दिल्लीमध्ये जाऊन हे पैसे आणण्यामध्ये कमी पडले याची नोंद आपण घेतली असलेच याची मला खात्री आहे. अनुदान आणण्यासाठी पाठपुरावा का केला नाही. सार्वजनिक बांधकाम विभाग नक्की काय करते. आपल्याला सहकार खात्यातून वेळ कमी मिळत असेल हे मी समजू शकतो. परंतु सार्वजनिक बांधकाम विभागात काय चालले आहे याची जर थोडी माहिती घेतली तर आपल्या लक्षात येईल. सार्वजनिक बांधकाम विभागात सहजगत्या बदल्या करण्याचा प्रघात निर्माण झालेला आहे. तुम्हाला थोडीशी माहिती दिल्यानंतर कळेल की तुम्ही दिलेल्या पत्रांच्या बदल्या झालेल्या नाहीत. पण कुणाकुणाच्या बदल्या झाल्या याची माहिती घेतली तर आपल्या लक्षात येईल.

अध्यक्ष महोदय, तुम्ही सांगितले, विनंती केली की लगेच त्याची बदली दोन तीन महिन्यात होते. अशी व्यवस्था मागच्या दीड वर्षात बघितली. दर तीन महिन्याला अधिकाऱ्यांची बदली केल्याची उदाहरणे माझ्याकडे आहेत. एका अधिकाऱ्याला एका ठिकाणी जाऊन काम करु द्यायचे नाही. दर दोन तीन महिन्यांनी बदली करायचे काम हे आपल्या सरकारमध्ये चाललेले आहे. मी आपल्याला सहज असे सांगत नाही. आपल्या माहितीसाठी सांगतो. सचिव, श्री.प्र.द.ममदापूरे यांची एप्रिल ते ऑगस्टमध्ये सचिव एमएमआरडीए नंतर सचिव एमएसआरडीसी अशा दोन वेळा बदल्या झाल्या. श्री.उ.प्र.देबडवार, मुख्य अभियंता यांची एप्रिल ते जून या कालावधीत मुख्य अभियंता एमआरडीसी, मुख्य अभियंता व सह सचिव मंत्रालय, मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम मुंबई अशी तीनवेळा बदली झाली. तीन महिन्यामध्ये मुख्य अभियंता आणि सचिव यांच्यासारख्या अधिकाऱ्यांच्या तीन वेळा बदल्या करायला लागलो तर प्रशासकीय अधिकाऱ्यांनी कोणाकडे बघायचे. सदर बदल्या आनंद कुलकर्णी यांनी केल्या असे म्हणणे अवघड आहे. कारण या सर्व बदल्या मुख्यमंत्री महोदयांनी सह्या केल्यानंतर होऊ शकतात. श्री.पी.बी.भोसले, अधिक्षक अभियंता जून ते नोव्हेंबर या दरम्यान 5 वेळा बदल्या झाल्या. राहूरी येथे अधिक्षक अभियंता, धुळे अधिक्षक अभियंता, उप सचिव मंत्रालय, अधिक्षक अभियंता दक्षता व गुन्हे नियंत्रण मंडळ नाशिक आणि अधिक्षक अभियंता अहमदनगर येथे बदल्या करण्यात आल्या. म्हणजे या अभियंत्याच्या सहा महिन्यात पाच

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

06-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) AA-3

SSK/ ST/ AKN/ 14:20

श्री.जयंत पाटील.....

वेळा बदल्या करण्यात आल्या. पण माननीय मंत्र्यांची सही झाल्याशिवाय कागद पुढे जाऊ शकत नाही.

अध्यक्ष महोदय, श्री.सी.डी.वाघ अधिक्षक अभियंता यांची जून, जुलै, ऑगस्ट या तीन महिन्यात बिचाऱ्या वाघांची शेळी करुन टाकली. आपण वाघाबद्दलच बोलले पाहिजे, दुसऱ्या कुणाबद्दल बोलायचे नाही. मी खऱ्या वाघाबद्दल बोलतो आहे खोट्या वाघाबद्दल बोलून आपला आणि माझा वेळ वाया घालवणार नाही. श्री.सी.डी.वाघ यांची अधिक्षक अभियंता, एमएसआरडीसी, उप सचिव, मंत्रालय, अधिक्षक अभियंता, धुळे अशी तीन वेळा बदली करण्यात आली. श्री.सी.व्ही.तुंगे यांच्या जून ते नोव्हेंबर दोन वेळा बदल्या करण्यात आल्या. श्री.आर.टी.पाटील, अधिक्षक अभियंता जून ते नोव्हेंबर यांच्या तीन बदल्या करण्यात आल्या. सदाशिव एस, जून ते नोव्हेंबर यांच्या दोन बदल्या करण्यात आल्या. श्री.अ.पा.नागरगोजे, अधिक्षक अभियंता यांच्या जून ते नोव्हेंबर दोन बदल्या करण्यात आल्या. श्री.निगोट, अधिक्षक अभियंता यांच्या जून ते नोव्हेंबर दोन बदल्या करण्यात आल्या. श्री.खैरे यांच्या जून ते नोव्हेंबरमध्ये दोन बदल्या करण्यात आल्या. श्रीमती प्रज्ञा वाळके, कार्यकारी अभियंता यांच्या एप्रिल ते नोव्हेंबर तीन बदल्या करण्यात आल्या. श्री.प्रदीप खवले, अधिक्षक अभियंता यांच्या तीन बदल्या करण्यात आल्या. श्री.खवले, उप सचिव मंत्रालयामध्ये असताना अधिक्षक अभियंता, एमएसआरडीसी, त्यानंतर अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम, गडचिरोली येथे बदली करण्यात आली. म्हणजे विश्वासाने आपण बदल्या केल्या असतील तर माझा पाठिंबा आहे. तीन चार महिन्यात एका माणसाच्या चार बदल्या करण्यात आल्या. श्री.विवेक साळवे, अधिक्षक अभियंता यांच्या अधिक्षक अभियंता द.व.गुणनियंत्रण, नाशिक आणि लगेच तेथून त्यांची बदली नागपूर येथे करण्यात आली. म्हणजे दोन महिन्यात दोन बदल्या करण्यात आल्या.

अध्यक्ष महोदय मला याठिकाणी सांगायचे आहे की, एवढ्या मोठ्या प्रमाणात सरकार बदल्या करायला लागले. एका बाजूला पैसे नाहीत, दुष्काळ आला आणि दोन, तीन महिन्यामध्ये एवढ्या बदल्या करुन प्रशासकीय खर्च वाढविण्यात आला. माझ्यासारख्याला वाटते की, आनंद कुलकर्णी यांनी हा सर्व कारभार केलेला आहे. मंत्री महोदय प्रशासनाला एवढे घाबरायला लागलेले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील .....

सचिवांनी म्हटल्याशिवाय मी सहया करीत नाही. पण त्यांनी काहीही म्हटले तरी मी सहया करायला तयार आहे. अशी आता पध्दत सुरु झाल्यामुळे दादा बिचारे अगदी सरळ मार्गी आहेत. दादांनी लगेच सही केली. माननीय मुख्यमंत्र्यांकडे आलेली फाईल दोन मिनिटात, दोन दिवसात सही करुन लगेच बाहेर येते. त्यामुळे त्यांना सहया कराव्याच लागतात. कारण त्यांचे रेप्युटेशन टिकवायला आलेली फाईल लगेच घालवणे, या रेप्युटेशनमुळे फाईलवर काय आहे हे पहायचे बहुतेक त्यांनी सोडून दिलेले दिसते. त्यामुळे ज्या माणसाची बदली मागच्या महिन्यात झाली. तीच फाईल पुन्हा त्याच नावाने आली तर आपल्या लक्षात राहते की, काल परवाच या माणसाचे नाव पाहिले होते. याची कशी काय बदली झाली ? म्हणून या प्रश्नाची चौकशी झाली पाहिजे की, श्री.आनंद कुलकर्णी सचिव असताना अशा बेमुरवतखोरपणाणे कोणत्याही मर्यादा न ठेवता या सगळया अधिका-यांच्या बदल्या का होत होत्या याचा अभ्यास करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, या बदल्या करीत असताना मी म्हणणार नाही की, आर्थिक गैरव्यवहार झाले. माझ्याकडे काही प्रुफ नाहीत. उगाच असे आरोप करणे बरोबर नाही. कोणी पैसे घेतले असतील. जोपर्यंत प्रुफ मिळत नाही. त्यामुळे त्यांनी तुमच्याकडून अशा बदल्या का प्रस्तावित केल्या त्याची माहिती आपल्याकडे नाही. त्याच्या पलिकडे जाऊन श्री.आनंद कुलकर्णींनी पदोन्नत्या केल्या, प्रमोशन्स् केले. प्रमोशन केल्यावर जागा रिक्त झाल्यावर खालचा इंजिनिअर वर पाठवायचा श्री.आनंदरावनी जागा उपलब्ध नसताना कार्यकारी अभियंता यांचे डायरेक्ट प्रमोशन्स अधिक्षक अभियंता पदावर केले. जागा व पदे नसल्यामुळे ही मंडळी मोकळी फिरत होती. परंतु प्रमोशनची ऑर्डर त्यांच्याकडे होती. प्रमोशन झालेल्या कोणत्याही कर्मचा-याला, अधिका-याला काम करण्याची संधी मिळाली नाही. सार्वजनिक बांधकाम विभागात उपलब्ध पदापेक्षा जास्त कार्यकारी अभियंत्यांना अधिक्षक अभियंता पदी पदोन्नती दिली. त्यामुळे फेब्रुवारी 2016 अखेर पर्यंत श्री.किशोर माळी, श्री.सी.पी.जावळे, श्री.अहिरे, श्रीमती छाया पुजारी, श्री.गिरीष जोशी आणि श्री.संतोष शेलार

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील .....

हे सहा अधिक्षक अभियंता पदस्थापनेच्या शिवाय आणि कोणतेही काम न करता पगार घेत फिरत होतो. हे मंत्री महोदय खरे आहे. तपासले तरी हेच आढळेल. आपल्याच प्रशासनातून या घटनांमुळे नाराजी निर्माण झाली आहे. त्यामुळे याचा शोध घेण्याची आवश्यकता आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, तुम्ही हे केले असे मी अजूनही म्हणत नाही. पण ज्यांनी केले त्याच्याबद्दल काही तरी केले पाहिजे. काळ सोकावता कामा नये, नवीन सेक्रेटरीला वाटेल की, असे केले तरी चालते इकडे. नवीन सेक्रेटरी आले असतील तर तेही असेच वागायला लागतील. म्हणून मला खात्री आहे की, या सर्व गोष्टींवर निश्चितपणाने आळा घालू शकला.

अध्यक्ष महोदय, आपल्या राज्यात पद नसताना पदोन्नती झाली असे मी कधी ऐकले नाही. त्या प्रमोशनच्या फाईलवर कोणाची सही आहे याचाही अभ्यास करावा. मुख्यमंत्री महोदयांच्या सही शिवाय अशा पदांची प्रमोशन्स् होऊ शकत नाहीत. त्यांच्या सामान्य प्रशासन विभागामध्ये फाईल्स् जायच्या. सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगतो की, हया फाईल्स् ज्यावेळी सामान्य प्रशासन विभागात जायच्या तेव्हा सेक्रेटरी तिकडे पाठवायचे आणि सेक्रेटरी परत सामान्य प्रशासन विभागात माहितीच्या अधिकाराखाली पत्र द्यायचे आणि विचारायचे अमुक अमुक फाईल आलेली आहे ती किती दिवस थांबली आहे, त्या फाईलवर काय संस्कार केले ? म्हणजे सामान्य प्रशासन विभागाला ब्लॅकमेलिंग करण्याचे काम हे दुस-या विभागाच्या सचिवांनी मागच्या वर्षभरामध्ये केले आहे. शंका असेल तर सामान्य प्रशासन विभागात माहितीच्या अधिकारात श्री.आनंद कुलकर्णी नावाने आलेल्या अर्जांची संख्या पहावी. एका विभागाचा दुस-या प्रशासनावर विश्वास नाही. एवढा गोंधळ होऊ नये एवढीच माफक अपेक्षा आहे. जर अशा पध्दतीने एक सेक्रेटरी दुस-या विभागाच्या सेक्रेटरींकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करत असेल आणि माहितीच्या अधिकारात अर्ज केल्यानंतर माहिती घेऊन समोरील सामान्य प्रशासन विभागात दबाव निर्माण करत असेल, याचा अर्थ माननीय श्री.चंद्रकांत दादांनी माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्यावर दबाव टाकणे आहे. याचा अर्थ बांधकाम खात्याने सामान्य प्रशासनावर दबाव टाकण्याचा अर्थ आहे. राज्याच्या बांधकाम विभागाच्या सचिवाने सामान्य प्रशासन विभागाच्या सचिवावर दबाव टाकण्यासारखे आहे. या सर्वांच्या खोलात जायला पाहिजे. या खोलामध्ये जाऊन आपण थोडीशी माहिती घ्यावी. हे का असे होत होते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील .....

अध्यक्ष महोदय, तुम्हीच सर्वांनी या विषयावर सहया केल्या म्हणजे मंत्री महोदयांची जबाबदारी आहे की, जरी सचिव काहीही सांगत असेल तर निर्णय आपण घेतला पाहिजे. सचिव हे ॲडव्हायजर आहेत. सचिव नेहमी ॲडव्हायजरी रोल मध्ये असतात. ते आपल्याला काहीही सांगतील, येथून उडी मार, उडी मारायची की नाही हे आपण ठरवायचे आहे. त्यामुळे अशा प्रकारचे सल्ले आपल्याकडे आले. आपला विश्वास अथांग महासागरासारखा आहे. आपण त्या फाईल्स्वर सहया केल्या असतील. म्हणून मी या सर्वांचा दोष दादा तुम्हाला अजूनही देत नाही. म्हणून माननीय मुख्यमंत्री महोदयांना आपल्याला सही करण्यासाठी काय प्रेरणा मिळाली याची फक्त सभागृहाला माहिती दिली तर आम्हाला निश्चित माहिती मिळाल्या शिवाय राहणार नाही.

अध्यक्ष महोदय, आर्थिक व्यवहार काय झाले त्याची माहिती माझ्याकडे आहे. परंतु सभागृहामध्ये अनेक सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे असल्यामुळे मी अधिक खोलात जाणार नाही. विभागाचे काम कसे चालू आहे याची माहिती देतो. एखादा अधिकारी आपल्याबरोबर चांगला नाही वागला तर त्या अभियंत्याची अनियमततेच्या बाबतीत चौकशी सुरु करायची. चौकशा सुरु करायच्या आणि कोणतेही सबळ कारण न देता चौकशा चालू करुन त्याला सस्पेंड करायचे. परत थोडया दिवसांनी खालून एक पत्र घ्यायचे परत सस्पेन्शन रद्द करायचे याचे एक उदाहरण सांगतो. म्हणजे अधिका-यांना किती त्रास आणि जाच मागच्या दिड वर्षाच्या काळात झाला. श्री. के.पी.पाटील, तत्कालीन कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई सार्वजनिक बांधकाम विभाग, अंधेरी, मुंबई यांच्या विरोधी शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्याचे योजले आहे. ज्या आर्थी आता शासन श्री. के.पी.पाटील यांना तात्काळ निलंबित करत आहे. दिनांक 1 सप्टेंबर, 2015 अशी ऑर्डरवर तारीख आहे. 15 ऑक्टोबरला म्हणजे दीड महिने त्याने श्री.आनंद कुलकर्णी यांचे उंबरे घासून झिझवल्याशिवाय होणार नाही. पण अचानक 15 ऑक्टोबरला श्री.के.पी. पाटलांसंबंधी एक आदेश निघतो. आपल्याला अमुक अमुक सेवेतून निलंबित करण्यात आलेल्या दिनांक 1.9.2015 पासून ज्याअर्थी श्री.के.पी.पाटील, कार्यकारी अभियंता यांचा या प्रकरणी संबंध येत नसल्याचे मुख्य

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील .....

अभियंता, मुंबई सार्वजनिक बांधकाम प्राधिकरण, मुंबई यांनी त्यांच्या संदर्भ क्रमांक 2 येथील पत्रान्वये शासनाच्या निदर्शनास आणून दिल्याने त्यांचे निलंबन मागे घेण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. असा निर्णय एखादा असेल तर मला काही अडचण नाही, असे चुकून होऊ शकते, हे मी समजू शकतो. आपल्या श्री.आनंद कुलकर्णी यांनी श्री.ए.एस.पोळ यांची देखील तशीच ऑर्डर काढलेली आहे. शिस्तभंग कार्यवाही करण्याचे योजलेले आहे. मी सभागृहाचा जास्त वेळ घेत नाही. परंतु तो ड्राफ्ट तसाच आहे. ज्याअर्थी श्री.ए.एस.पोळ, उप कार्यकारी अभियंता यांचा याप्रकरणी चौकशीचा संबंध येत नसल्याचे मुख्य अभियंता यांनी कळविलेले असल्यामुळे आता त्यांचे निलंबन मागे घेण्यात येत आहे. श्री.एस.एम. शेट्ये, तत्कालीन प्रकल्प आवेक्षक यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याचे योजलेले आहे. शासनातून निलंबित केलेले ज्याअर्थी श्री.शेट्ये यांचे निलंबन मागे घेण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. श्री.व्ही.पी.जोशी यांच्याबाबतीत सेम स्टोरी, सेम पध्दतीने त्यांना निलंबित केले होते. त्यानंतर थोडया दिवसांनी त्यांना तो बरा वाटायला लागला. लगेच श्री.व्ही.पी.जोशी यांचे निलंबन मागे घेण्याची नोटीस दिली. श्री.एस.जी. पवार सेम स्टोरी, त्यांना घरी घालवले आणि परत घेतले. श्री.मळेकर यांना घरी घालवले परत घेण्याची ऑर्डर आली असेल, मी यासाठी सांगतो आहे की, तुम्ही मोठमोठया अधिका-यांना काढायला लागला आहात, डायरेक्ट निलंबित करीत आहात, थोडया दिवसांनी तुम्हाला वाटायला लागते की, हा अधिकारी चांगला आहे. हा जो मधला गॅप आहे त्या महिना दोन महिन्याच्या कालावधीत असे काय घडले की, तो तुम्हाला आवडायला लागला, दादा मी तुमच्याबद्दल बोलत नाही. श्री.कुलकर्णी साहेबांना तो अधिकारी का आवडायला लागला. त्यानेच निलंब मागे घ्यायचे, त्यानेच काढायचे, प्रशासनात हे काय चालले आहे, सरकारी कर्मचा-यांना तुमचे सरकार त्याज वागणूक द्यायला लागले तर सरकारी अधिकारी आणि कर्मचा-यांनी कोणाकडे पहायचे ?

CC-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील .....

महाराष्ट्रातील सरकारी कर्मचाऱ्यांचा प्रशासनात एक वेगळा असा दबदबा होता. जबाबदारीने काम करणारे अधिकारी होते. कोणी तरी एक सचिव येतो आणि त्याने सर्वांवर वरवंटा फिरविण्याचा कार्यक्रम हातामध्ये घेतला असेल तर हे अतिशय गंभीर आहे. अशा पध्दतीने पदोन्नत्या देणे, बदल्या करणे याबाबत मी मघाशी सांगितले आहे. पण आता राज्य सरकारमध्ये जे चालले आहे ते बरोबर नाही. त्यामुळे सरकारने या तपशीलात जाण्याची गरज आहे. सरकार कसे चाललेले आहे ? अशा पध्दतीने तुमचे सरकार चालले तर सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये तुम्ही कितीही मोठया वल्गना केल्या तरी आज हे खाते व्यवस्थित चालले आहे असे म्हणणे धाडसाचे होईल. माझी विनंती आहे की, या सर्व परिस्थितीची आपण चौकशी करावी. नियमबाहय बदल्या, नियमबाहय पदोन्नत्यांमध्ये गोंधळ झालेला आहे. त्यावर तुमचीही सही आहे पण त्यांची चौकशी करावी. मी तुमची चौकशी करावी असे म्हणणार नाही. कारण तुम्ही इनोसंट आहात याची मला चांगली माहिती आहे. जे इनोसंट नाहीत त्यांना हुडकण्यासाठी तुम्ही दिरंगाई केली तर तुमच्या इनोसन्सबाबत शंका घेतली जाऊ शकते. मी ही शंका घेणार नाही कारण मी तुमचा हितचिंतक आहे, पण बाहेर ही शंका घेतली जाईल. याची मला फार मोठी काळजी आहे.

माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, श्री.आनंद कुलकर्णी यांचे अनेक प्रताप आहेत. मी साध्या साध्या गोष्टी सांगतो. ते नागपूर अधिवेशनाला आले होते. बहुतेक सन्माननीय सदस्य आमदार निवासामध्ये राहात असतात याची मला खात्री आहे. कोणाच्या साधेपणाबद्दल मला काही शंका नाही. पण हे कुलकर्णी मात्र लि-मेरीडीयन पंचतारांकित हॉटेलमध्ये राहिले होते. त्यांचा राहण्याचा खर्च कोणी केला ? सरकारी सचिव नागपूरला अधिवेशनाला गेल्यावर पंचतारांकित हॉटेलमध्ये राहिल्यास एखाद्याने पदरचा खर्च केला असेल तर आमचे ऑब्जेक्शन नाही. पण याबाबत मंत्री महोदयांनी चौकशी करावी. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सचिवांना नागपूरमध्ये चांगले व उत्तम निवासस्थान मिळू शकत नाही असे होऊ शकते का ? कारण तेथील निवासाची सर्वच व्यवस्था सार्वजनिक बांधकाम खात्याच्याच हातामध्ये असते. नागपूरला आपण सर्व सदस्य आमदार निवासामध्ये राहतो. पण सचिव उत्तम व्यवस्था नाकारून पंचतारांकित हॉटेलमध्ये राहतात हे सरकारला शोभत आहे असे मला वाटत नाही. रात्री एखादी अर्जंट मिटींग आली तर, मुख्यमंत्री

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील .....

महोदयांकडे रात्री जाण्याची वेळ आली तर नाईट ड्रेसवर कुलकर्णी गेलेले आहेत. याबाबतचे फोटो बाहेर आलेले आहेत. प्रोटोकॉलपासून सर्वांचाच श्री.आनंद कुलकर्णी यांनी मोठा कार्यक्रम केला होता. त्यांना तुमचे सरकार मुख्य सचिव करायला निघाले होते व त्यांना मुदतवाढ देण्याचा प्लॅन होता. आपल्या सरकारवर प्रसार माध्यमांचे उपकार आहेत की, हळूहळू श्री.आनंद कुलकर्णी यांचे प्रताप समोर येत होते, त्याची तुम्हाला माहिती दिली गेली. म्हणून आपण हा कार्यक्रम थोडासा थांबविला. पण ते मर्जीतील अधिकारी असल्यामुळे त्यांना कोणी कंट्रोल केले नाही, हे सांगणे गरजेचे आहे. त्यांनी जाताना श्री.स्वाधीन क्षत्रिय यांच्यावरही हल्ला केला. मी वित्तमंत्री असताना श्री.स्वाधीन क्षत्रिय हे विक्रीकर आयुक्त होते. एकदम फाईन, अतिशय प्रामाणिक आणि शिस्तबध्द अधिकारी ते आहेत.

अध्यक्ष महोदय, सत्ताधारी पक्षातील सदस्यांचे आवाज दाबलेले आहेत, ते याबाबत बोलू शकणार नाहीत. सत्ताधारी पक्षातील सदस्यांना जे बोलता येत नाही ते बोलण्याचे काम आपणास करावे लागेल. सन्माननीय सदस्य श्री.हरिष पिंपळे बोलले तर सार्वजनिक बांधकाम मंत्री त्यांच्या मतदारसंघातील दोन रस्ते कमी करुन टाकतील. बजेटमध्ये टाकलेले रस्ते जातील त्यामुळे सत्ताधारी पक्षातील सदस्य यावर बोलू शकणार नाहीत. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या मंत्र्यांनी मनामध्ये आणलेतर आपल्या मतदारसंघातील दोन रस्ते कमी केले म्हणजे 10-20 हजार मतांचा खड्डा पडतो त्यामुळे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या मंत्री महोदयांना आमच्यापासून सर्वजण नमस्कार करतात. म्हणून सत्ताधारी पक्षाच्या आमदारांनी बोलावे अशी अपेक्षा नाही. पण मी हे मुद्दाम सांगतो की, राज्य सरकारमध्ये अशा प्रकारचा गोंधळ चालणे चुकीचे आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबईच्या टोलसाठी सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी केलेली आहे. त्यांनी दोन बैठका घेतल्या पण पुढे काही काम केलेले नाही. म्हणून मंत्री महोदयांनी याबाबतची चौकशी करावी. सन्माननीय सदस्य डॉ.पंतगराव कदम हे त्यांना सांगून आले की, पेठ-सांगली रस्त्याला काही निधी दिलेला नाही. याबाबत मी सांगू इच्छितो की, त्याकरिता निधी दिलेला आहे, कारण तो कन्टीन्युअस कार्यक्रम आहे. या याकरिता थोडा जास्त निधी मिळण्याची गरज होती कारण मिळालेला निधी अपुरा आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील .....

अध्यक्ष महोदय, मुंब्रा येथे मोठा ब्रीज बायपास बांधला आहे. ब्रीजवरून मुंब्रा बायपास जातो. आता टोल नसल्यामुळे त्याच्या मेंटेनन्सचा प्रश्न आलेला आहे. त्यामुळे तो ब्रीज खिळखिळा व्हायला लागला आहे. त्या ब्रीजवर खूप लोड आहे. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी मुंब्रा येथे जाऊन या ब्रीजला भेट द्यावी किंवा अधिकाऱ्यांना पाठवावे पण तेथील मेंटेनन्स होणे गरजेचे आहे. तो ब्रीज खिळखिळा झाल्यामुळे वाहनांचा वेग कमी झाला आहे. तेथे अगोदरच वाहनांची खूप गर्दी आहे व त्यामध्ये त्या ब्रीजची अवस्था वाईट आहे. या ब्रीजची दुरुस्ती करण्याची मी अपेक्षा बाळगतो.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागास बजेटमध्ये 4 हजार कोटीचा निधी मिळालेला आहे. मी सुरुवातीला व बजेटच्या भाषणातही सांगितले की, भिवंडी, कल्याण, शीळ फाटा हा 21 किलोमीटरचा उन्नत मार्ग बांधण्याचे आपण हायब्रीड ॲन्युटीमार्फत करणार आहात. बांधा वापरा हस्तांतरीत करा या योजनेसाठी 550 कोटीचा नियतव्यय आहे. आपण आता कोणत्याही परिस्थितीत नवा टोल लावणार नाही अशी शपथच घेतलेली आहे त्यामुळे ते नवीन मार्ग आता जवळपास बंद झालेले आहेत. शिल्लक राहिलेले मुंबई बाहेरचे टोल देखील आपण रद्द करावेत.

अध्यक्ष महोदय, माननीय केंद्रीय वाहतूक मंत्री श्री.नितीन गडकरी यांना कधीही भेटलो तर ते म्हणतात की, नॅशनल हायवे आहे का, नॅशनल हायवे असेल तर माझ्याकडे यायचे. त्यांनी महाराष्ट्रातील अनेक राज्य रस्त्यांना नॅशनल हायवे म्हणून डिक्लीयर केले आहे. स्टेट हायवेचे नॅशनल हायवे करण्याचे ठरविलेले आहे. अपग्रेडेशन ऑफ द रोड हा मोठा व चांगला कार्यक्रम त्यांनी हाती घेतलेला आहे. मी दोष देत नाही, टीकाही करीत नाही परंतु माझे असे म्हणणे आहे की, आधीच नॅशनल हायवेला केंद्र सरकारकडून मर्यादित निधी येतो. आता लहान रस्ते आपण आपण नॅशनल हायवे करायला लागलो आहोत. त्याची विड्थ, त्याची स्ट्रेंथ या सर्वच गोष्टी वाढणार आहेत. पण याकरिता केंद्र सरकारकडून येणारा निधी बघितला तर त्यांच्या घोषणेप्रमाणे निधी येताना दिसत नाही. त्यांनी सांगली जिल्हयातील 2-3 रस्त्यांचे नॅशनल हायवे करतो असे म्हटले आहे. माननीय श्री.नितीन गडकरी यांच्या या सर्व घोषणा संकलित कराव्यात व पटलावर ठेवाव्यात की, त्या रस्त्यांची एकंदर व्हॅल्यू किती होते ? माझ्या माहितीप्रमाणे त्यांनी केलेल्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील .....

घोषणांची एकत्रित व्हॅल्यू कदाचित 60-70 हजार कोटीपेक्षा कमी होणार नाही. केंद्रीय वित्तमंत्री यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात माननीय श्री.नितीन गडकरी यांच्या खात्याला देशाकरिता फक्त 55 हजार कोटी रुपये मिळाले आहेत. 55 हजार कोटी रुपये बजेटमध्ये मिळाले, 15 हजार कोटीचे बॉंड काढण्याची परवानगी देतो असे केंद्रीय वित्तमंत्री म्हणाले, ग्रामीण विकास खात्याला 29 हजार कोटी दिलेले आहेत त्याची बेरीज करून माननीय श्री.नितीन गडकरी हे बाहेर सांगतात की, मला 97 हजार कोटी रुपये मिळाले आहेत. ॲक्चुअली मिळालेला निधी हा 55 हजार कोटीच आहे. त्यांना चांगले पैसे मिळावेत अशी प्रार्थना आहे. पण महाराष्ट्रात 60 ते 80 हजार कोटींचे रस्ते करण्याची माननीय श्री.नितीन गडकरी यांची इच्छाशक्ती असेल तर ती टोलशिवाय दुसऱ्या कोणत्याही मार्गाने पूर्ण करता येणार नाही. टोल न लावता महाराष्ट्रातील जे नॅशनल हायवे करण्याची घोषणा माननीय श्री.नितीन गडकरी यांनी केलेली आहे, ती पूर्ण करून घेण्याची जबाबदारी मी महाराष्ट्राचे माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्यावर सोडत आहोत.

आज मुंबईहून कोल्हापूरला जाताना, मुंबईहून नाशिकला जाताना आपण पाहिले तर चौपदरी लेनमध्ये थोडया-थोडया त्रुटी राहिलेल्या आहेत. या त्रुटी दुरुस्त करण्याचे काम आपण कराल असा विश्वास मी बाळगतो. मुंबई नागपूर एक्सप्रेस हायवे, ठाणे घोडबंदर रस्त्यावर उन्नत मार्ग, ठाणे खाडीवर तिसऱ्या पुलाचे काम, ठाणे बोरीवली भुयारी मार्ग, भिवंडी कल्याण रस्त्यावर उन्नत मार्ग या सर्वांना तुम्ही दिनांक 30 नोव्हेंबर 2015 रोजी तुमच्या पायाभूत सुविधा समितीमध्ये मंजुरी दिलेली आहे.

यानंतर DD-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील.....

या 08 प्रकल्पांना त्वरित मान्यता दिल्यानंतर या प्रकल्पाला लागणा-या निधची बेरीज 43,045 कोटी रुपये इतकी होते. या शासनाने टोल धोरण त्याज्य केलेले आहे. टोल न घेता एवढे प्रकल्प 4,000 कोटी रुपयांच्या बजेटमध्ये माननीय मंत्री कसे पूर्ण करणार आहेत. राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागावर व मंत्री महोदयांवर त्यांना केवळ 4000 कोटी रुपये देऊन अन्याय करणारे असे कोण राज्याच्या मंत्रिमंडळात आहेत, याचा शोध घेणे आवश्यक आहे. माननीय अर्थमंत्री असे करु शकत नाहीत, असेच मला वाटते. माननीय मुख्यमंत्री यांना तर जास्तीत जास्त कामाचा सपाटा दाखवायचा आहे. 43,000 कोटी रुपयांच्या 08 प्रकल्पांना एका दिवसामध्ये मंजूरी देऊन त्यांची कामे या वर्षीच्या 4000 कोटी रुपयांच्या बजेटमध्ये कशी केली जाणार आहेत ? टोल घ्यायचा नाही, अशी शपथ या शासनाने घेतलेली आहे. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर खंडाळा, खोपोली सोमाटणा फाटा आणि अमृतांजन ब्रिज येथे मोठ्या प्रमाणावर ट्रॅफिक जाम व अपघाताचे प्रमाण आहे. या चार लोकेशन्सवर गेल्या 11 महिन्यांमध्ये 1767 अपघाती मृत्यू झालेले आहेत. टोलनाक्यावर आमदारांना कशा प्रकारची वागणूक दिली जाते, याबाबत या सभागृहातील 25-30 आमदार त्यांना आलेले अनुभव पत्राद्वारे सांगू शकतील. टोल नाक्यावर आमदारांना उध्दटपणाची वागणूक दिली जाते. कार्डवरुनही त्यांना ओळखले जाते. टोलनाक्यावर टोल भरण्याकरिता आमदारांना त्याज्य व उध्दट वागणूक देऊन त्यांच्याकडे फुकटे या नजेरेने पाहिले जाते. कार्ड पाहून देखील गाडीमध्ये आमदार आहेत की नाहीत, याची चौकशी केली जाते. टोल नाक्यावर आमदारांना कशी वागणूक द्यावी, याबाबत सूचना देणे आवश्यक आहे. आमदारांना टोल माफ करण्याची या सरकारची इच्छाच नसेल तर तसे सांगावे. परंतु टोल नाक्यावर आमदारांना चांगली वागणूक मिळणे अत्यावश्यक आहे. याकडे

अध्यक्ष महोदय, अमरावती-सूरत या 480कि.मी.राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाकरिता 90 टक्के जागेचे भूसंपादन झालेले आहे. याकरिता केंद्र शासनाकडून 8000 कोटी रुपयांचा पहिला हप्ता मंजूर झालेला आहे. अजूनही याचे काम सुरु झालेले नाही. या शासनाकडे आता कमी दिवस राहिलेले आहेत. 2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील.....

या शासनाकडे ही कामे करण्याकरिता आता केवळ 2.5 वर्षांचा कालावधी राहिलेला आहे. शेवटचे सहा महिने ही जनता आपल्याकडे लक्ष देत नाही. या प्रकल्पांकरिता निधी देण्याकरिता शासनाकडे केवळ 2 बजेट उरलेले आहेत. हे या शासनाचे तिसरे बजेट आहे. या खात्याकरिता केवळ 4000 कोटी रुपये देऊन माननीय सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्री यांना व्यक्तिश: रॉंग बॉक्समध्ये टाकण्याचे षडयंत्र माननीय मुख्यमंत्री व माननीय अर्थमंत्री रचत आहेत, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. या खात्याकरिता केवळ 4000 रुपयांचा निधी देणे हा या खात्यावर व व्यक्तिश: माननीय मंत्री यांच्यावर अन्याय आहे.

अध्यक्ष महोदय, लोकशाही आघाडीच्या काळामध्ये मुंब्रा येथे इस्लाम कल्चरल सेंटर मान्य करण्यात आले होते. परंतु गेल्या 17-18 महिन्याच्या काळात त्या कामामध्ये कोणत्याही प्रकारची प्रगती झालेली नाही. या सेंटरच्या कामात शासनाने लक्ष घालून ते लवकरात लवकर मार्गी लावावे. माननीय राज्यमंत्री श्री.दिलीप कांबळे याकरिता उत्तर देणार आहेत. माननीय मंत्री नेहमी त्वेषाने उत्तर देण्याचा प्रयत्न करीत असतात. त्वेषाने उत्तर देत असताना केवळ फॅक्ट्स सांगावेत. कारण सरकार बदलणे ही एक कंटिन्यूयस प्रक्रिया आहे. बाजू कधीही पलटू शकते. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभुराज देसाई (पाटण): अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पीय मागण्यांवर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या मागण्यांवर विचार मांडून मी एका महत्त्वाच्या गोष्टीकडे सार्वजनिक बांधकाम खात्याचे लक्ष वेधणार आहे.

अध्यक्ष महोदय, ग्रामीण भागातील व डोंगरी भागातील आमदार सातत्याने रस्त्यांकरिता निधीची मागणी करीत असतो. राज्याच्या एकूण बजेटमधून विशेषत: सार्वजनिक बांधकाम विभागातील रस्त्यांकरिता जेवढा निधी मिळतो, तो प्राधान्याने स्टेट हाय वे व एमडीआर याकरिता देण्यात येतो. स्टेट हाय वे व एमडीआर यांचाही दर्जा चांगला असला पाहिजे, याबद्दल आमचे दुमत नाही. ग्रामीण भागातील स्टेट हाय वे व एमडीआर रस्त्यांची टक्केवारी ही केवळ 20 टक्के एवढीच असते. ओडीआर व व्हीआर यांची टक्केवारी मात्र ग्रामीण भागामध्ये 80 टक्के इतकी असते. ग्रामीण भागातील ओडीआर व व्हीआर यांच्याकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याकडे निधीची मागणी केली असता, सदस्यांना नियम दाखविला जातो. तो नियम असा आहे की, बजेटमधील पैसे स्टेट हाय वे आणि एमडीआरला दिले जातात. व्हीआर आणि ओडीआर करिता बजेटमधून पैसे मिळत नाहीत.

अध्यक्ष महोदय, मागील शासनाने विशेष बाब म्हणून सन 2012-2013 व 2013-2014 च्या बजेटमध्ये ओडीआर व व्हीआर याकरिता मोठया प्रमाणात पैसे दिले होते. व्हीआर आणि ओडीआरकरिता जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून पैसे दिले जातात, याचा अर्थ असा होत नाही की, राज्याच्या बजेटमधून या रस्त्यांकरिता पैसेच दिले जाऊ नयेत. मागील सरकार जर खास बाब म्हणून व्हीआर आणि ओडीआरकरिता राज्याच्या बजेटमधून निधी देऊ शकते तर या शासनानेही ते देणे गरजेचे आहे. एमडीआर आणि स्टेट हाय वे च्या रस्त्यांच्या आराखडयाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केले जाते. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून व्हीआर आणि ओडीआर करिता किती निधी मिळतो आणि त्यात ते रस्ते पूर्ण होऊ शकतात का, याची सर्वांनाच कल्पना आहे. एमडीआर आणि स्टेट हायवेकरिता दरवर्षी बजेटमधून पैसे दिले जातात. तसेच, पुरवणी अर्थसंकल्पातूनही त्याकरिता तरतूद होत असते. यामध्ये त्या रस्त्यांवर केवळ दोन-दोन फुट वाईडनिंग आणि आरसीसी गटार करण्याचे कामे केली जातात.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभुराज देसाई.....

याबद्दल आमचे दुमत नाही. खेडयांना जोडणारे रस्ते, डोंगराळ भागातील वाडया- वस्त्यांना जोडणारे रस्ते, छोटया गावांना जोडणारे रस्ते जिल्हापरिषदेकडे आहेत म्हणून सार्वजनिक बांधकाम खाते याकडे दुर्लक्ष करणार आहे का ? या संदर्भातील धोरणात्मक निर्णय माननीय मंत्री महोदयांनी करणे गरजेचे आहे. हा प्रश्न मी गेल्या तीन अधिवेशनापासून मांडत आहे, याकरिता उत्तर देत असताना ठराविक साच्यामध्ये उत्तर येते. बजेटमधील पैसे केवळ स्टेट हायवे आणि एमडीआरकरिता दिले जातात. व्हीआर आणि ओडीआरकरिता जिल्हा नियोजन समितीकडून निधी दिला जातो. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यामातून व्हीआर आणि ओडीआर करिता किती निधी मिळतो त्यात ते पूर्ण होतील का याची सर्वांना कल्पना आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याला रस्त्याकरिता 4000 कोटी रुपयांचा निधी मिळालेला आहे, त्यातून ग्रामीण भागातील रस्त्यांकरिता निधी देण्याबाबत शासनाने विचार करावा. ग्रामीण भागात स्टेट हाय वे किती आहेत ?

ईई-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शंभुराज देसाई.....

MDR, VR आणि ODR मधील रस्त्यांच्या टक्केवारीच्या प्रमाणात निधीचे वाटप होणे गरजेचे आहे. माझ्या मतदारसंघातील काटण्याच्या पूलासाठी सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर 2 कोटी रुपयांची अर्थसंकल्पात तरतूद केलेली आहे. सद्य:स्थितीत या पुलाचे काम पूर्ण करण्यासाठी आणखी 6 ते 7 कोटी रुपये लागणार आहेत. काटण्याच्या पूलासाठी अर्थसंकल्पात 2 कोटी रुपयांची तरतूद केलेली असून, ती वाढविण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, गेल्या वर्षीच्या बजेटमध्ये मंत्री महोदयांनी अमळ्याच्या पूलाच्या कामासाठी बजेटमध्ये तरतूद केली जाईल असे आश्वासन दिले होत. यंदाच्या अर्थसंकल्पात अमळ्याच्या पूलाच्या कामासाठी बजेटमध्ये तरतूद केलेली नाही. सद्य:स्थितीत हा पूल पूर्णपणे पडलेला आहे. परिणामी दोन्ही बाजूची वाहतुक पूर्णपणे बंद झालेली आहे. तेथील लोकांना 12 ते 14 कि.मी. एवढा विळखा घालून पलिकडच्या गावांमध्ये जावे लागत आहे. अशी परिस्थिती गेल्या 4 वर्षापासून आहे. या पूलाच्या कामासाठी बजेटमध्ये तरतूद करावी म्हणून मी मंत्री महोदयांना दोन ते तीन पत्रे दिलेली आहेत. मंत्री महोदयांनी सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पात अमळ्याच्या पूलाच्या कामासाठी तरतूद करावी, अशी विनंती करीत आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील नेरके, गारवडे, मोरगिरी, मेंढेघर हायवेला अपग्रेड करुन स्टेट हायवे केलेला आहे. पूर्वी तो एमडीआरचा रस्ता होता. मी सन 2004 ते 2009 या कालावधीमध्ये मी आमदार असताना नेरके, गारवडे, मोरगिरी, मेंढेघर हायवेला एमडीआरमधून पैसे दिले होते. त्यावेळी त्या रस्त्याची तात्पुरती दुरुस्ती केली होती. आता त्या रस्त्याला स्टेट हायवे केलेला असून, या आर्थिक वर्षात त्या कामासाठी निधी उपलब्ध होणार आहे. नेरके, गारवडे, मोरगिरी, मेंढेघर हायवेला अपग्रेड करुन स्टेट हायवे केलेला आहे. त्यामुळे त्या रस्त्याच्या दुरुस्तीकरिता आवश्यक तो निधी देण्यात यावा अशी माझी मंत्री महोदयांकडे विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या भागातील मोरणा नदीवरील एका पूलाच्या कामास मंजुरी मिळालेली आहे. त्या पुलाचे काम झालेले आहे. पुलाच्या पूर्वेस अक्विजिशनचे थोडेसे काम बाकी आहे.

.....2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शंभुराज देसाई.....

बजेटमधून त्या कामासाठी पैसे दिलेले आहेत. परंतु, संबंधित शेतकऱ्याला पैसे न मिळाल्यामुळे तो पुलाच्या पूर्वेकडील काम करु देत नाही. याकामाच्या संदर्भात मंत्री महोदयांनी मुख्य अभियंतांना योग्य त्या सूचना देण्याची गरज आहे. पुलाच्या पूर्वेकडील फक्त 15 दिवसाचे काम बाकी राहिलेले आहे. बजेटमधून अक्विजिशनच्या कामासाठी पैसे मिळाले असून, ते संबंधित शेतकऱ्याला दिले तर त्याची त्या ठिकाणी कोणतीही काम करण्यास हरकत असणार नाही. तेथील काम पूर्ण करण्यासाठी भराव घालण्याची आवश्यकता आहे. परिणामी दोन्ही बाजूची वाहतुक सुरु होण्यास मदत होणार आहे. सदरहू काम पावसाळ्यापूर्वी करावे अशी मी मंत्री महोदयांकडे विनंती करीत आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी एका मुद्याच्या संदर्भात सभागृहाचे लक्ष वेधले होते. माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांनी रस्त्यांच्या कामाच्या संदर्भात खूप घोषणा केलेल्या आहेत. कराड चिपळूणमधील स्टेट हायवे सीआरएफमधून करण्याबाबत माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांना मी विनंती केली असता, त्या कामासाठी त्यांनी मंजुरी दिलेली होती. परंतु, कराड-चिपळूण स्टेट हायवेचे काम 20 कोटी रुपयांमधून पूर्ण होऊ शकत नाही. परिणामी तो स्टेट हायवे निम्म्यापेक्षा जास्त अर्धवट राहणार आहे. याबाबतीत आम्ही केंद्रीय मंत्री महोदयांकडे विनंती केलेली आहे. कराड-चिपळूण स्टेट हायवेसाठी सीआरएफमधून निधी मिळालेला आहे. पश्चिमेकडील अपूर्ण काम पूर्ण करण्यासाठी निधीमध्ये आणखी वाढ करावी, अशी मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंत्री महोदयांकडे विनंती करीत आहे.

अध्यक्ष महोदय, ग्रामीण भागामध्ये विशेष रस्ते दुरुस्तीचा कार्यक्रम घेणे ही काळाची गरज होऊन बसलेली आहे. ग्रामीण आणि डोंगरी भागातील रस्ते चांगले नसल्यामुळे दळवळणाअभावी कोणत्याही सुविधा मिळत नाही. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून साकव मंजूर केले जातात. परंतु, सन 2015-2016 मध्ये जिल्हा नियोजन समितीमध्ये एकही साकव मंजूर झालेला नाही. संबंधित अधिकारी 1992 रोजीचा शासन निर्णय दाखवून अडीच मिटरचा साकव करावा असे

.....3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शंभुराज देसाई.....

सांगत आहेत. ही तांत्रिक बाब आहे. बांधकाम विभागाने आमच्या भागातील 4 मिटरपर्यंत साकव करण्यासाठी जिल्हाधिकारी यांना पत्र देण्याची गरज आहे. असे केले तर 35 लाखांमध्ये ते काम पूर्ण होणार आहे. साकवसाठी मंजुर असलेला निधी 31 मार्चनंतर परत गेलेला आहे. यावर्षी तरी आमच्या भागातील साकव पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याची गरज आहे. मी गेल्या वर्षी अर्थसंकल्पीय भाषणाच्या वेळी साकव कामाचा उल्लेख केलेला होता. मंत्री महोदयांनी 4 मिटरपर्यंत साकव करण्यासाठी बांधकाम विभागाला आदेश दिला तरच ते काम पूर्ण होण्यास मदत होणार आहे.

अध्यक्ष महोदय, मी मुख्यमंत्री महोदयांकडे पाटण तालुक्यात अनेक शासकीय इमारती एकत्रित असाव्यात या उद्देशाने प्रशासकीय भवन उभे करण्याची मागणी केलेली आहे. मुख्यमंत्री महोदयांनी यासंदर्भातील सविस्तर प्रस्ताव सादर करण्याबाबत विभागाला सूचना केलेली आहे. प्रशासकीय भवन उभे करण्यासाठी महसूल विभागाची जागा उपलब्ध आहे. सन 2016-2017 आणि सन 2017-2018 अशा दोन टप्प्यांमध्ये प्रशासकीय भवनाच्या इमारतीसाठी आवश्यक तेवढा निधी दिला तर त्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालये एकत्रित येण्यास मदत होणार आहे.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी VR आणि ODR मधील रस्ता विशेष बाब म्हणून घेण्यासाठी निर्णय करावा अशी विनंती करीत आहे. या रस्त्यासाठी जिल्हा परिषद आणि जिल्हा नियोजन समितीमधून कोणताही निधी मिळत नाही. एका बाजुला बांधकाम विभागाला 4 ते 5 हजार कोटी रुपयांचा निधी मिळत आहे. परंतु, हा निधी डोंगरी, ग्रामीण, दुर्गम, वाडी आणि खेड्यातील रस्ते जोडण्यासाठी उपयोगी पडणार नसेल तर त्याचा सर्वसामान्य माणसाला फायदा होणार नाही. मंत्री महोदयांनी ग्रामीण भागातील रस्त्यांच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घ्यावा अशी विनंती करीत आहे.

अध्यक्ष महोदय, आजच्या कार्यक्रमपत्रिकेवर दर्शविण्यात आलेल्या सर्व विभागांच्या मागण्यांना पाठिंबा देतो आणि माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील सार्वजनिक बांधकाम, अल्पसंख्याक विकास विभाग आणि मराठी भाषा विभागातील अनुदानाच्या मागण्यांना विरोध करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, अल्पसंख्यक विकास विभाग के बारे में कहना चाहता हूं कि पिछले पांच साल से जब भी मैंने बजट पर भाषण किया, इतिहास है, आप रेकॉर्ड देख लीजिए. मैंने हर बार यह मांग की है कि अल्पसंख्यक विकास विभाग का बजट एक हजार करोड़ रुपये होना चाहिए. अफसोस की बात है कि जब हम सरकार में थे तब मैं अपनी बात नहीं मनवा पाया. वित्त मंत्री और अल्पसंख्यक विभाग के मंत्री को मैंने एक पत्र लिखा था कि मायनॉरिटी विभाग को एक हजार करोड़ रुपये का बजट देना चाहिए. इस बार भी सरकार ने अक्लियतों पर ध्यान नहीं दिया. सन 2014 में यह सरकार बन गई थी. सम्माननीय श्री देवेंद्र फडणवीस जी का नाम ऐलान किया गया कि वे मुख्यमंत्री बनेंगे. मुझे एक बात का भरोसा था कि अल्पसंख्यक विकास विभाग श्री एकनाथराव खडसे जी के पास रहेगा. पांच साल पहले जब भी मैं अल्पसंख्यक विकास विभाग के बारे में बात करता था, तो श्री खडसे साहब खड़े होकर कहते थे कि श्री अमिन पटेल जो मांग करते है उसको मेरा समर्थन है, उनको उतना पैसा मिलना चाहिए. मौलाना आजाद आर्थिक विकास महामंडल या छात्रवृत्ति की बात हो, श्री खडसे साहब तुरंत करते थे कि श्री अमिन पटेल की मांग सही है. यह बात रेकॉर्ड पर है. आप उसके मिनिट्स देख सकते है. वे कहते थे कि उनको पैसा मिलना चाहिए. बड़े अफसोस की बात है कि दो बजट हो जाने के बाद भी जो पैसा इस विभाग को मिलना चाहिए वह नहीं मिला. सब का साथ, सब का विकास का नारा देश में देने के बाद भी बड़े अफसोस के साथ कहना पड़ता है कि पीयूसी बैंक का लैंडींग है, पब्लिक सेक्टर बैंक का लैंडींग है...पिछले दिनों आरटीआई के माध्यम से पता चला कि जो 16 प्रतिशत मायनॉरिटीज है, बैंक का 15 प्रतिशत का प्रोविजन है. लेकिन केवल दो प्रतिशत पैसा अक्लियातों को कारोबार के लिए पीयूसी बैंकों ने दिया है. इस बारे में कई समितियों का गठन हुआ. ऐसा निर्णय हुआ कि अक्लियामों को मुख्यधारा में लाना है. सच्चर समिति की रिपोर्ट, रंगनाथ मिश्रा समिति की रिपोर्ट, मेहमुद्दीन रहेमान समिति की रिपोर्ट है. एक महीना पहले टाईम्स ऑफ इंडिया

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

06-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) EE-5

SGS/ ST/ AKN 15:00

श्री अमिन पटेल.....

से जानकारी लेकर एक आरटीआई एक्टिविस्ट ने एक आर्टीकल लिखा कि केवल दो प्रतिशत फाईनान्स मायनॉरिटी को दिया जा रहा है. दो साथी कहते है कि मौलाना आजाद आर्थिक विकास महामंडल का पैसा हमारे इलाके में भी मिलना चाहिए. यहाँ श्री कांबले साहब बैठे है. बड़े अफसोस के साथ् कहना पड़ता है, यह महाराष्ट्र का इतिहास है मायनॉरिटी विभाग श्री खडसे साहब और श्री कांबले साहब के पास रखा है. जब से ये सरकार आयी है, मैं ईमानदारी के साथ कहना चाहता हूं कि मौलाना आजाद आर्थिक विकास महामंडल से एज्युकेशन लोन छोड़कर एक रुपये का भी लोन पास नहीं हुआ. आज डेढ़ साल हो गया. मौलाना आजाद आर्थिक विकास महामंडल से लोन मिलना बंद है. आप जवाब में क्या कहेंगे यह मैं जानता हूं. आप कहेंगे कि हमने इतने करोड़ रुपये दिए है. जो लोन मंजूर हुए है वे 2014 के पहले के है. 2014 के बाद मौलाना आजाद आर्थिक विकास महामंडल...आपने इस बोर्ड का चेअरमन भी नियुक्त नहीं किया है. उस बोर्ड के एम.डी. ने एज्युकेशन लोन छोड़कर, एक रुपये का लोन मंजूर नहीं हुआ है. इस बात को मैं दावे के साथ कहना चाहता हूं. मैं सात साल तक चेअरमन था. आज भी मैं फोन पर जानकारी लेता हूं कि कितना रुपया डिस्बर्समें हुआ. डिस्बर्समेंट हुआ है, वह पैसा डिस्बर्समेंट हुआ है जो हमारे समय में लोन मंजूर हुआ था उस पैसे का डिस्बर्समेंट हुआ है. नया लोन मंजूर नहीं हुआ है.

अध्यक्ष महोदय, मायनॉरिटीज के स्कॉलरशीप की बात है. 25 हजार रुपये स्कॉलरशीप दी जाती है. मेरी बार बार यह मांग है कि स्कॉलरशीप की रकम बढ़ाकर 50 हजार रुपये की जानी चाहिए. लेकिन अफसोस की बात है. बच्चे पढ़ना चाहते है. इंजीनियर और डॉक्टर बनना चाहते है. सच्चर समिति और मेहमुद्दीन समिति की रिपोर्ट में कहा गया है कि आज दलितों से भी ज्यादा हाल किसी का है तो वह मायनॉरिटीज के बच्चों का है. उनके बच्चे् पढ़ना चाहते है, लेकिन स्कॉलरशीप नहीं दी जा रही है. पैसा है, बजट है, तो स्कॉलरशीप की रकम क्यों नहीं बढ़ायी जा रही है ? ब्यूरोक्रेसी किस तरह से काम करती है ? माननीय श्री अशोक चव्हाण जब मुख्यमंत्री थे, मैंने स्कॉलरशीप दी थी. एससी, एसटी, ओबीसी के बच्चे् विदेश में पढ़ने के लिए जाना चाहते है तो उनको पूरी स्कॉलरशीप दी जाती है. पायलट बनने के लिए 18 लाख रुपये का खर्चा है तो

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

06-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) EE-6

SGS/ ST/ AKN 15:00

श्री अमिन पटेल.....

उनको 18 लाख रुपये की स्कॉलरशीप दी जाती है. मैंने मांग की थी कि केवल 50 बच्चों को 10 लाख रुपये स्कॉलरशीप दी जाए, वे फॉरेन जाकर, पढ़कर वापस आ सकते है. श्री अशोक चव्हाण साहब ने मेरे उसी लेटर पर लिखकर दे दिया कि यह स्कीम बहुत अच्छी है, इस पर अमल करना चाहिए. आज ब्यूरोक्रेसी के चक्कर में, कभी फायनान्स डिपार्टमेंट के चक्कर में, कभी मायनॉरिटी डिपार्टमेंट के चक्कर में वह फाईल रद्दी में पड़ी है. 50 बच्चों को स्कॉलरशीप के लिए पैसा नहीं दिया जा रहा है. उस वक्त वित्त विभाग से यह बात सामने आयी कि मौलाना आजाद आर्थिक विकास महामंडल का स्कॉलरशीप देने का काम नहीं है. मैंने चेअरमन की हैसियत से लेटर लिखा कि हम यह स्कीम नहीं चलाते सरकार यह स्कीम चलानी चाहिए. हम दूसरे बच्चों को सैंकड़ों की तादाद में भेजते है. मायनॉरिटीज के 50 बच्चों को भी स्कॉलरशीप देकर फॉरेन में पढ़ाई के लिए भेजना चाहिए. सम्माननीय सदस्य श्री इम्तियाज जलिल क्या करेंगे यह मैं जानता हूं. वे कहेंगे कि जब आपकी सरकार थी तो आपने क्या किया ? आपका हक है आपने बोलना चाहिए. आपको तकरीर करने से पहले मेरी पांच साल की भाषण की रेकॉर्डींग सुननी चाहिए. मैंने अपनी सरकार के खिलाफ जाकर कहा था कि मायनॉरिटीज को जो हक मिलना चाहिए वह सरकार नहीं दे पा रही है.

अध्यक्ष महोदय, पांच प्रतिशत आरक्षण मुस्लिमों को नहीं दिया गया था. मुसलमानोां को आरक्षण दिया गया था यह गलत बात है. मैं बहुत जिम्मेदारी के साथ कहना चाहता हूं. एसबीसी "ए" कॅटेगरी जो मायनॉरिटी के अंदर सोशली इकॉनॉमिकल बैकवर्ड है, 50 जमात है, उनको रिजर्वेशन दिया था. बार बार यह बात गुमराह की जाती है कि मायनॉरिटीज को जात के आधार पर रिजर्वेशन नहीं दिया जा सकता. मुसलमानों को कभी भी रिजर्वेशन नहीं दिया गया था. रिजर्वेशन उन्हीं लोगों को दिया था जो ईकॉनॉमिकली, सोशली बैकवर्ड है. हाई कोर्ट ने उस बात को माना था कि एज्युकेशन क्षेत्र में मुसलमानों को आरक्षण देना चाहिए. मराठा को आरक्षण दिया गया इसका हम स्वागत करते है. धनगर समाज को आरक्षण देना चाहिए इसका भी हम स्वागत करते है. लेकिन उच्च न्यायालय ने, बॉम्बे हाई कोर्ट ने जिस चीज को स्वीकार कर लिया कि

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

मायनॉरिटी के एसबीसी "ए" कॅटेगरी के 50 जमातों को आरक्षण देना चाहिए. सरकार डेढ़ साल से क्यों टालमटोल कर रही है ? या तो स्पष्ट कह दें कि हमें रिजर्वेशन नहीं देना है. हम नहीं

.....7.

06-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) EE-7

SGS/ ST/ AKN 15:00

श्री अमिन पटेल.....

मांगेंगे. सरकार अपनी भूमिका स्पष्ट करे. हम अपना हक मांग रहे है, भीख नहीं मांग रहे है, खैरात नहीं मांग रहे है. उन जमातों के लिए मांग रहे है जो ईकॉनॉमिकली, सोशली बैकवर्ड है. लेकिन इस बारे में कोई बात नहीं की जा रही है.

अध्यक्ष महोदय, नागरी दलित वस्ती फंड हर एमएलए को मिलता है. हर साल करोड़ों रुपया मिलता है. इस सरकार से मेरी मांग है कि उसी आधार पर जिस तरह सोशल जस्टिस मिनिस्ट्री नागरी दलित वस्ती को फंड देती है,जहां पर दलितों की संख्या ज्यादा है, उसी तरह जहां पर मॉयनॉरिटी की संख्या ज्यादा है उनको भी फंड देना चाहिए. इसका जवाब क्या आएगा यह मैं जानता हूं. कहेंगे कि 10 लाख रुपये हम नगरपालिका को देते है. मैं 10-20 लाख रुपये के फंड की बात नहीं करता हूं. जिस तरह से जनसंख्या के आधार पर नागरी दलित वस्ती सुधार का फंड मिलता है उसी जनसंख्या के आधार पर जहां मायनॉरिटीज के संख्या ज्यादा है उसको भी फंड मिलना चाहिए, ऐसी मेरी सरकार से मांग है.

अध्यक्ष महोदय, मौलाना अब्दुल कलाम आजाद की एक चेअर मुंबई युनिवर्सिटी में स्थापना करने की बात हुई थी. आज तक यह मुद्दा पेंडिंग पड़ा है. सम्माननीय श्री कांबले साहब मेरी आपसे विनती है कि मौलाना अब्दुल कलाम आजाद के नाम की एक चेअर मुंबई युनिवर्सिटी में स्थापन करने की जरूरत. इस ओर ध्यान दिया जाए. आज यदि किसी को बल, ताकत देना है, महिलाओं को आगे लाना होगा. घर की महिला यदि ताकतवर होगी तो ही घर और समाज की तरक्की होगी. मेरी मांग है महिलाओं के लिए जो आरक्षण है, जो कोटा है, उसमें से दस प्रतिशत आरक्षण मायनॉरिटी की महिलाओं को दिया जाना चाहिए.

अध्यक्ष महोदय, उर्दू अकादमी का फंड बहुत कम है. इस फंड को बढ़ाने की जरूरत है. वक्फ बोर्ड का मसला है. वक्फ बोर्ड को सक्षम करने की जरूरत है. वक्फ बोर्ड के संबंध में डायरेक्टोरेट करने की जरूरत है. यदि कुछ काम होता है तो औरंगाबाद जाना पड़ता है. हर जिले में वक्फ बोर्ड का कार्यालय होना जरूरी है. कलिना में उर्दू भवन बनाने का निर्णय हुआ था.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आज जो उर्दू का लिटरेचर कलिना युनिवर्सिटी में है, उतना पूरे हिंदुस्थान में कहीं पर भी नहीं है. 10 करोड़ रुपये की जरुरत थी. कुछ पैसा दिया गया. बाकी का पैसा देने की जरूरत है. वह पैसा जल्द से जल्द दिया जाना चाहिए. ....8.

06-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) EE-8

SGS/ ST/ AKN 15:00

श्री अमिन पटेल.....

अध्यक्ष महोदय, इस्माईल युसूफ कॉलेज का इश्यू कई सालों से पेंडिंग पड़ा है. वहां पर एक इंटरनेशनल कॉम्पलेक्स बन सकता है. मैं यह नहीं कहता हूं कि केवल मुसलमानों के लिए होना चाहिए. मुंबई और महाराष्ट्र में रहने वाले सभी लोगों के लिए वह कॉम्पलेक्स होना चाहिए. मायनॉरिटी कॉम्पलेक्स होना चाहिए. इस्माईल युसूफ कॉलेज के बारे में सरकार ने जल्द से जल्द फैसला करना चाहिए.

अध्यक्ष महोदय, आईटीआई का पहला कॉलेज, मायनॉरिटी कॉलेज का काम मेरे मतदार क्षेत्र में हो रहा है. आपके विभाग से इसका काम हो रहा है. 6 सालों से एक इमारत तैयार नहीं हो पा रही है. फंड है लेकिन इमारत तैयार नहीं हो पा रही है. मेरी विनती है कि इस बारे में आप एक बैठकी लीजिए. जून महीने में यह काम शुरु होना चाहिए, ऐसी मेरी विनती है. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं, धन्यवाद.

.....इसके बाद श्री भोंबे

FF-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) : अध्यक्ष महाराज, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील सार्वजनिक बांधकाम विभाग, अल्पसंख्याक विकास विभाग आणि मराठी भाषा विभागाच्या अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

अध्यक्ष महाराज, आपली मातृभाषा मराठी भाषा संवर्धनासाठी आपले सरकार जे प्रयत्न करीत आहे, त्या चांगल्या प्रयत्नांसाठी मी या शासनाचे अभिनंदन करते. भाषा संवर्धनासाठी आपल्या सरकारने सर्वप्रथम मागील वर्षापासून प्रथमच भाषा संवर्धन पुरस्कार सुरु केला आहे. त्यामध्ये पहिला अशोक केळकर भाषा पुरस्कार आणि दुसरा मंगेश पाडगावकर भाषा संवर्धन पुरस्कार आहे. हे दोन्ही पुरस्कार यावर्षी पासून सुरु झाले त्यामुळे मी शासनाचे मनापासून अभिनंदन करते.

यानंतर GG-1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(अध्यक्षस्थानी तालिका सभाध्यक्ष श्री. राहूल बोंद्रे)

प्रा. मेधा कुलकर्णी ...

विशेष म्हणजे मंगेश पाडगावकर भाषा संवर्धन पुरस्कार भाजी विक्रेत्या असलेल्या व लायब्ररी चालविणाऱ्या गायकवाडताईंना देण्यात आला आहे. अशाप्रकारच्या उत्कृष्ट पुरस्कारांमुळे नक्कीच भाषेचे संवर्धन होण्यास मदत होईल.

मराठी भाषा विकास विभागाकडून प्रकाशित झालेली सर्वप्रकारची पुस्तके सर्वसामान्य वाचकांना, नागरिकांना अल्पदरात व सहजरित्या उपलब्ध व्हावीत यासाठीही शासनाने पुढाकार घेतला आहे. ही पुस्तके 40 टक्के सवलतीच्या दरात उपलब्ध करण्याचा निर्णय घेतला आहे.

हरकतीचा मुद्दा

श्री. शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत. याबाबत मागेही विधिमंडळात चर्चा झाली होती. 2-3 कोटी रुपयांच्या विभागाच्या मागण्या मंजूर होताना मागेही आपण असेच सांगितले होते. सरकार गंभीर असेल तर सभागृहात निदान एक तरी कॅबिनेट मंत्री उपस्थित असले पाहिजे होते. परंतु, सभागृहात एकही कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत. अशा परिस्थितीत आपल्याला सभागृहाचे कामकाज चालविता येणार नाही.

तालिका सभाध्यक्ष (श्री. राहूल बोंद्रे) : कॅबिनेट मंत्री महोदयांना सभागृहात बोलावून घेण्यात यावे. सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे आज गिलोटीन असल्याने आपल्याला ही चर्चा लवकर संपवायची आहे. अनेक सन्माननीय सदस्यांना आपल्या भावना व्यक्त करावयाच्या आहेत.

श्री. विजय देशमुख : अध्यक्ष महोदय, माननीय श्री. चंद्रकांत पाटील हे आताच 5 मिनिटांसाठी बाहेर गेले आहेत. ते येणार आहेत.

अनेक सन्माननीय सदस्य : अध्यक्ष महोदय, ...

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. मंत्री महोदय 5 मिनिटांत सभागृहात येत आहेत. सन्माननीय सदस्या प्रा. मेधा कुलकर्णी आपण आपले भाषण सुरु करावे.

प्रा. मेधा कुलकर्णी : सन्माननीय सदस्या प्रा. वर्षा गायकवाड कृपया माझे भाषण पूर्ण होऊ द्या, व्यत्यय आल्यास भाषणात खंड पडतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्या प्रा. मेधा कुलकर्णी चांगले मार्गदर्शन करीत आहेत, चांगले विचार मांडत आहेत, त्यांचे काही महत्त्वाचे मुद्दे आहेत. माझीही इच्छा आहे की, मंत्री महोदयांनी त्यांचे मुद्दे ऐकावेत, यासाठी आम्ही भांडत आहोत. आमचीही इच्छा हीच आहे की, ज्या प्रथा, परंपरा आहेत त्या सुरु राहिल्या पाहिजेत. आपण चुकीचे नियम व परंपरा सुरु करीत असू तर ते दुर्दैवाचे ठरणार आहे. याकरिता आमची विनंती आहे.

तालिका सभाध्यक्ष : मंत्री महोदयांना सभागृहात लवकर येण्यास सांगावे.

(मंत्री महोदय सभागृहात येतात.)

मंत्री महोदय सभागृहात आलेले आहेत. सरकारने जरा गांभीर्याने घ्यावे.

आता सन्माननीय सदस्या प्रा. मेधा कुलकर्णी आपण आपले भाषण सुरु करावे.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: अनुदानाकरिता मागण्या

मु.शी.: सन 2016-2017 च्या अनुदानाकरिता मागण्या:
(1) सार्वजनिक बांधकाम विभाग
(2) अल्पसंख्याक विकास विभाग
(3) मराठी भाषा विभाग

(चर्चा पुढे सुरु .....

प्रा. मेधा कुलकर्णी : अध्यक्ष महोदय, मी या विभागाचे यासाठी अभिनंदन करते की, शासकीय नियम, अधिनियम जनतेला मराठीतून उपलब्ध होण्याच्या दृष्टिकोनातून या नियमांचा अनुवाद केला गेला. यामध्ये राज्य शासनाचे 586 आणि केंद्र सरकारचे 166 अधिनियम अनुवादित करुन शासनाच्या मुख्य संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेले आहेत.

मराठी विश्वकोशाचे खंड विकिपिडियावर उपलब्ध करुन देण्याचा निर्णय किंवा विश्वकोश अद्ययावत करण्याच्या संदर्भात ज्ञानमंडळ स्थापन करण्याचा निर्णय हे सर्व निर्णय नक्कीच अभिनंदनास पात्र आहेत. आपल्या सरकारने, आपल्या खात्याने, आपल्या मंत्री महोदयांनी आणखी एक विशेष गोष्ट केली आहे की, इस्त्राएल मधील मराठी भाषिकांच्या मराठी बोलण्याला प्रोत्साहन देण्यासाठी मुंबई विद्यापीठ, राज्य मराठी विकास संस्था आणि तेल अवीव युनिर्व्हसिटी या तिघांच्या माध्यमातून एक एमओयु केला गेला. मराठी भाषा जास्तीत जास्त नागरिकांकडून कशी बोलली जाईल यासाठी हेतुपुरस्सर पाठपुरावा केला जात आहे ही अतिशय अभिनंदनाची गोष्ट आहे.

अध्यक्ष महोदय, सर्वात विशेष गोष्ट म्हणजे आपण जेव्हा संगणकावर मराठी भाषेचा उपयोग करतो तेव्हा अनेक चिन्हे आपल्याला सापडत नाहीत. ही चिन्हे नसल्याने आपल्याला मराठी भाषेतून संगणकाचा वापर करताना खूप अडचणी येतात, यासाठी विशेष करुन आपले शासन प्रयत्नशील आहे. युनिकोड कन्सोर्शिअमचे सदस्यत्व घेण्यासंदर्भात आपण प्रयत्न केलेले आहेत. या माध्यमातून प्रयत्न केल्यानंतर आता जी चिन्हे संगणकावर नाहीत, ती नक्कीच उपलब्ध होतील व जास्तीत जास्त चांगल्या पध्दतीने मराठीचा वापर आपण संगणकाच्या माध्यमातून करु शकू.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. मेधा कुलकर्णी ...

अध्यक्ष महोदय, ज्यावेळेस आपण असे म्हणतो की, संगणकाच्या माध्यमातून मराठीचा वापर करायचा आहे तेव्हा आधी या मूळ भाषेचे प्रमाणीकरण करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे जी लिखित भाषा आहे ती शुद्ध प्रमाणीकरण करता येणार नाही. बोली भाषेमध्ये व्हरायटी असू शकते. वेगवेगळ्या खेडोपाडी, तसेच राज्य व जिल्ह्यांमध्ये वेगवेगळ्या पद्धतीने बोलल्या जाणाऱ्या बोली भाषेचे गोडवे वेगळे असू शकतात. त्यामध्ये विविधता असू शकते, त्याला कोणाची काही हरकत असण्याचे कारण नाही. परंतु, जी लिखित भाषा आहे ती मात्र प्रमाणित असण्यासाठी आपल्याला विशेष भर द्यावा लागेल. आज अशी स्थिती आहे की, प्रमाणित भाषा कोठेही लिहिली किंवा वाचली जात नाही, त्यामुळे तिच्यामध्ये मोठ्या प्रमाणात अशुध्दता आलेली आहे. मुळात आज इंग्रजी माध्यमाच्या अनेक शाळांमध्ये मराठी भाषेला पर्याय दिला गेलेला आहे.

(तालिका सभाध्यक्ष वेळ संपल्याबाबतची बेल वाजवितात.)

अध्यक्ष महोदय, मराठी भाषेवर कोणीच बोललेले नाही. हा महत्त्वाचा विषय आहे, महाराष्ट्राच्या मातृभाषेचा विषय आहे आपण मला कृपया बोलू द्यावे.

इंग्रजी माध्यमांच्या अनेक शाळांमधून मराठी भाषेला आय.टी. सारख्या विषयाचे ऑप्शन दिले गेले आहेत. महाराष्ट्रात तरी अशाप्रकारची परवानगी या शाळांना दिली जाऊ नये. महाराष्ट्रामध्ये ज्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत, त्यांच्यामध्ये मराठीला दुय्यम स्थान दिले जात आहे, यावर काही तरी उपाय केला गेला पाहिजे. आज त्याचा परिणाम असा होत आहे की, इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मुलांना प्रवेश देण्याबाबत कल होत असताना मराठीकडे पूर्ण दुर्लक्ष झालेले आहे त्यामुळे जेव्हा प्रौढ नागरिक मराठी भाषेचा वापर करतात तेव्हा त्यांना ते अभिमानाने सांगतात की, मला मराठी येत नाही मी इंग्रजी बोलतो, लिहितो. अशापध्दतीने मराठी येत नाही हे अभिमानाने सांगणारे नागरिक जर महाराष्ट्रात असतील तर यासाठी कुठे तरी प्रयत्न करण्याची आज आवश्यकता आहे, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, आज वृत्तपत्र किंवा मीडियाच्या माध्यमातूनसुध्दा जी मराठी भाषा, लिहिली, बोलली किंवा कॅप्शनमध्ये जाते किंवा उच्चारामध्ये आहे त्यामध्ये कुठे तरी तफावत असल्याचे मला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. मेधा कुलकर्णी .....

दिसते. मातृभाषेची मोडतोड कोठेही सहन केली जाता कामा नये असे मला वाटते. हे सर्व जर टाळायचे असेल तर मराठी भाषा शालेयस्तरावर चांगली शिकविली गेली पाहिजे. आज मराठी भाषा शुध्द लिहिणारे व बोलणारे शिक्षकसुध्दा शाळांमध्ये उपलब्ध नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. भाषेची समृद्धी करीत असताना कारण भाषेतून केवळ संवाद घडतो असे नाही तर, संस्कृतीची, मनाची, व्यक्तिमत्वाची जडणघडण होत असते आणि यातूनच वाङ्मयप्रेम वाढणार आहे वाचनसंस्कृती वाढणार आहे आणि वाचन वाढले तरच जडणघडण होणार आहे.

अध्यक्ष महोदय, मराठी भाषा विभागाला 14.71 कोटी रुपये एवढाच निधी दिलेला आहे. मला असे वाटते की, अतिशय मोठे व्यापक काम करण्याची आवश्यकता असताना एवढ्या कमी निधीतून खूप कामे करणे शक्य नाही. त्यामुळे हे काम चांगल्या पद्धतीने करावयाचे असेल तर या निधीमध्ये वृद्धी करण्यात यावी, ही माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, मराठीचे स्वतंत्र विद्यापीठ असावे, अशाप्रकारची मागणी अनेक वर्षे होत असताना व याबाबतचा आराखडा तयार असतानाही याचे काम बंद का पडले आहे ? मराठीचे विद्यापीठ व्हावे याकरिता अधिक पाठपुरावा करुन ते लवकरात लवकर करण्याची आवश्यकता आहे.

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्या आपण शेवटची सूचना करावी.

प्रा. मेधा कुलकर्णी : अध्यक्ष महोदय, या सर्व गोष्टींची शालेयस्तरावर जास्तीत जास्त प्रमाणात अंमलबजावणी करण्यासाठी शालेय शिक्षणात मराठीचा जास्तीत जास्त अंतर्भाव करावा, एवढीच विनंती करते व माझे दोन शब्द पूर्ण करते.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पॉईंट ऑफ इन्फर्मेशन

श्री. हर्षवर्धन सपकाळ : अध्यक्ष महोदय, मी एक महत्त्वपूर्ण पॉईंट ऑफ इन्फर्मेशन देऊ इच्छितो की, बुलढाणा जिल्ह्यातील अंढेरा फाट्यावर 500 गावकरी कॅनॉलचे पाणी मिळण्याकरिता उपोषणाकरिता बसलेले आहेत. यापूर्वी सदरचे शिष्टमंडळ माननीय जलसंधारण मंत्र्यांना भेटले, त्यांनी त्या संदर्भात सकारात्मक प्रतिसादही दिलेला आहे. मात्र सदरहू उपोषणकर्त्यांना भेटण्याकरिता 3 दिवसांपासून कोणीही गेलेले नाही. हे 500 गावकरी आमरण उपोषणास बसलेले आहेत. शासनाने याची दखल घ्यावी, अशी या पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून आपल्याला विनंती आहे.

तालिका सभाध्यक्ष : शासनाने याची दखल घ्यावी.

श्री. हर्षवर्धन सपकाळ : अध्यक्ष महोदय, मेहकर तालुक्यातील अंधरूड गावामध्ये शासनाच्या दुर्लक्षामुळे विहिरीचे काम बंद पडले होते. गावकरी स्वयंप्रेरणेने विहीर स्वच्छ करण्याकरिता गेले असता, त्या विहिरीमध्ये पिण्याच्या पाण्यात पडून 5 लोकांचा मृत्यू झालेला आहे. त्यांनाही शासनाची मदत मिळाली पाहिजे, अशी या पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून आपल्याला विनंती आहे.

तालिका सभाध्यक्ष : शासनाने याची दखल घ्यावी.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुभाष साबणे : अध्यक्ष महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेवर सत्ताधारी पक्षाचा म.वि.स. नियम 293 चा प्रस्ताव शेवटी दाखविण्यात आलेला आहे. मराठवाड्यामध्ये अत्यंत भीषण परिस्थिती निर्माण झालेली आहे. पाण्याच्या टँकरसाठी, पाण्याच्या हौदासाठी, मराठवाड्यातील दोन जिल्ह्यामध्ये 144 कलम लागू करण्यात आले आहे. सत्ताधारी पक्षाचा प्रस्तावामधील चर्चेचा विषय मराठवाड्या-संदर्भातीलच आहे. सद्या सदनामध्ये मराठवाड्यातील आमदार उपस्थित नसल्यामुळे ही चर्चा उद्या प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर घेण्यात यावी, अशी मी विनंती आहे.

तालिका अध्यक्ष : ठीक आहे.

श्री. शशिकांत खेडेकर : अध्यक्ष महोदय, मी काल जलसंपदा मंत्री आदरणीय श्री. गिरीष महाजन यांची सभागृहामध्ये भेट घेतली होती. मी त्यांना खडकपूर्णा प्रकल्प, ता.देऊळगाव राजा, जि.बुलडाणा या प्रकल्पामध्ये लाभक्षेत्रातून वंचित राहिलेल्या गावांपैकी डावा कालव्यासाठी लोकांनी अंढेरा फाटा येथे उपोषण सुरु केले असल्याची माहिती दिली. दिनांक 3 फेब्रुवारी 2016 रोजी माननीय जलसंपदा मंत्र्यांनी बैठक घेतली होती व पुन्हा एका महिन्यांनी बैठक बोलविण्यात येईल, असे त्यांनी आश्वासन दिले होते. सदरहू बैठक अजूनपर्यंत घेण्यात आलेली नाही, त्यामुळे संबंधितांमध्ये नाराजी भावना निर्माण झालेली आहे.

तालिका अध्यक्ष : मी यासंदर्भात शासनाला दखल घेण्याच्या सूचना केलेल्या आहेत.

---*---

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: अनुदानाकरिता मागण्या

मु.शी.: सन 2016-2017 च्या अनुदानाकरिता मागण्या:
(4) सार्वजनिक बांधकाम विभाग
(5) अल्पसंख्याक विकास विभाग
(6) मराठी भाषा विभाग

(चर्चा पुढे सुरु.....

श्री. शशिकांत शिंदे (कोरेगांव) : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील सार्वजनिक बांधकाम विभाग, अल्पसंख्यांक विकास विभाग व मराठी भाषा विभागाच्या मागण्यांना विरोध करण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी मराठी भाषा या विषयावरील आपले मुद्दे मांडलेले आहेत. माननीय मंत्री श्री. विनोद तावडे यांच्याकडे पाहिल्यानंतर मराठी भाषेचा प्रसार चांगल्या पद्धतीने होईल असे वाटते आणि महाराष्ट्रामध्ये मराठी भाषा सर्वांनीच वापरली पाहीजे, अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करतो. हिंदी आणि मराठी, हिंदु आणि मराठा अशा प्रकारचे समिकरण त्यांच्या डोक्यात असेल, मित्र पक्षाच्या असेल तर कळत नाही. माझी विनंती एवढीच आहे की, मराठी भाषेला प्राधान्य देण्यात यावे. मराठी शाळेतील गळती पासून मराठी शाळेत होत असलेला अन्याय लक्षात घेता आपण या महाराष्ट्राच्या मातीतील मराठी भाषेला केवळ संमेलन, अधिवेशन या पुरतेच मर्यादीत ठेवू नये. हे सोपस्कार झाले. त्यामुळे मराठी भाषेचा प्रसार होईल, असे मला वाटत नाही. परंतु मराठी भाषा कायद्याने प्रत्येकानेच वापरली पाहीजे, यासंदर्भात इतर राज्याने त्यांच्या भाषेसंदर्भात जसे कायदे केले आहेत, तसा कायदा करण्याचे धाडस आपण दाखविणार आहात काय, ही काळाची गरज आहे. मराठीची सक्ती सर्वच क्षेत्रात आली पाहीजे. असा निर्णय घेतला तरच या विषयाला आपण गांभीर्याने पाहीले, असे म्हणता येईल.

अध्यक्ष महोदय, सातारा जिल्ह्यामध्ये स्व. बा.सी.मर्डेकर यांचे स्मारक त्यांच्या मर्डे गावामध्ये आहे. त्याचे काम पूर्ण झालेले आहे. एकदा आपण त्या स्मारकाला भेट द्यावी. स्व. बा.सी. मर्डेकर यांच्या स्मारकाच्या माध्यमातून पुणे-बंगलोर हायवेला जाता-येता, या ठिकाणी मराठीच्या विचारवंतांची मांदीयाळी होईल, असेच ते ठिकाण आहे. त्यासंदर्भात आपण निर्णय घेतल्यास मराठीचा चांगला प्रसार होऊ शकतो. असा आपण निर्णय घ्यावा, ही विनंती करतो. ...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शशिकांत शिंदे.....

अध्यक्ष महोदय, मी अल्पसंख्याक विभागावर थोडे बोलणार आहे. बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, अनेक दिवसांपासून यास चेअरमन नाही. कामकाज थांबलेले आहे. आपल्याकडून लोकांच्या अपेक्षा वाढाव्या, हे सरकार आपले आहे, असे अल्पसंख्याक व्यक्तीला वाटत असेल तर यावरील चेअरमनची तातडीने नियुक्ती करण्याची गरज आहे. सच्चर समितीची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे. वक्फ बोर्ड व मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाला आर्थिक दृष्टीने सक्षम करण्यासाठी लोकाभिमूक काम करणे गरजेचे आहे. मी सर्व सन्माननीय सदस्यांच्या माध्यमातून एक मुद्दा मांडू इच्छितो. अल्पसंख्याक यांना दिला जाणारा निधी हा तालुका, जिल्हा स्तरावर त्या, त्या गावात व तालुक्यात अल्पसंख्याकांची जेवढी लोकसंख्या असेल त्यानुसार प्राधान्याने क्रमावारीने दिला जातो, हा कोर्टाचा आदेश आहे. परंतु हा निधी देखील दीड, दोन वर्षापासून मिळालेला नाही. यासंदर्भात ज्या मागण्या येतील त्याबाबतीतील निर्णय घ्यावा, ही मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्यांवर थोडे बोलणार असून यासंदर्भात बऱ्याच जणांच्या अपेक्षा आहे. माननीय मुख्यमंत्री वेगवेगळी आश्वासने देत आहेत. मिठी नदीतून जलवाहतूक करण्यात येईल, असे त्यांनी सांगितल्याचे मी परवा वर्तमानपत्रात वाचले. मीठी नदी पाहिल्यावर असा प्रश्न पडतो की, या नदीतून जलवाहतूक कशी केली जाईल. परंतु काही अशक्य नाही, मुख्यमंत्री महोदयांनी मनात आणल्यावर ते काहीही करु शकतात, हे सांगता येत नाही. राज्यातील प्रमुख वाहतूक म्हणजे राज्यमार्ग, राष्ट्रीय मार्ग, जिल्हा मार्ग, नगर विभागातील मार्ग आहे. याला विकसित करण्याचे काम वेगवेगळ्या खात्यातूनच नव्हेतर एमएमआरडीतून देखील होते. मी यावर जास्त वेळ घेणार नाही. आपल्या वाहतूक विस्तृत करण्याची गरज आहे. दिवसेंदिवस वाहतूक व्यवस्था वाढत आहे. यामुळे मोठी अडचण होत आहे. आपण केवळ रस्त्यावरच लक्ष केंद्रीत करीत असून आपण कोश्टल रोड, जल वाहतुकीचा विषय घेतला. यासंदर्भातील उल्लेख अर्थसंकल्पात नसल्यामुळे या अर्थसंकल्पामध्ये खरे गांभीर्याने पहाण्याची गरज आहे. एवढेच नव्हेतर शिवडी ते नाव्हाशेवा पुलाच्या बाबतीतील निर्णय घेणे गरजेचे आहे. रस्त्यांच्या बाबतीत योग्य निर्णय घेणे गरजेचे आहे. मागण्या किती आहे व तरतूद किती झाली याची आपल्याला कल्पना आहे. आम्हाला वाटले होते की, आपले दिल्लीमध्ये मोठे वजन आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शशिकांत शिंदे.....

या राज्याचा समन्वय साधण्याचा अधिकार किंवा निर्णय घेण्याची क्षमता माननीय मंत्री श्री. चंद्रकांतदादा पाटील यांच्याकडे आहे. म्हणून या महाराष्ट्रामध्ये सर्वात जास्त निधी आणण्याचा प्रयत्न कराल अशी आम्हाला अपेक्षा होती...(अडथळा)...आपण त्याची यादी द्यावी.

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, मला महाडच्या संपाबाबत बोलणी करण्यासाठी सभागृहाच्या बाहेर जायचे आहे. सभागृहामध्ये माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री उपस्थित आहेत. मी 15 मीनीटांमध्ये परत येणार असून त्याकरिता परवानगी देण्यात यावी, ही विनंती.

तालिका अध्यक्ष : ठीक आहे.

श्री. शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितीनजी गडकरी यांनी जे सांगितले त्याचा उल्लेख करण्यात आला. 50 हजार कोटी रुपये मिळाले. बाकी सर्व विस्तृतपणे केलेले आहे. आपले म्हणणे एवढेच आहे की, आपण राज्य मार्गाचे राष्ट्रीय मार्ग किती केले. हे करीत असताना ज्या मागण्या प्रत्येक लोकप्रतिनिधींनी केल्या असतील त्याचे निकष कसे ठरविणार आहात. पहिल्या वर्षी किती, दुसऱ्या वर्षी किती अशा प्रकारचे नियोजन सांगावे लागेल. राष्ट्रीय मार्ग कुठून केला आहे, त्याची देखील कल्पना द्यावी लागेल. हे करीत असताना आपला भार हलका झाला, त्यामुळे आपण काय करणार आहात याचा देखील खुलासा करण्यात यावा. मंत्री महोदयांनी मागील वेळेस सभागृहामध्ये आश्वासन दिले होते. आपण ई-टेंडरिंगच्या बाबतीत सांगितले होते. आपण यासंदर्भातील आढावा घ्यावा. आम्ही बोलतो म्हणून घेऊ नका, परंतु आपणच सांगितले होते की, जिल्ह्यातील लोकांना ई-टेंडरिंग दिले जाईल. आमचे सन्माननीय गुलाबराव म्हणायचे की, कुठला कोण, कुठला टेंडर भरतो, तो कुठे असतो, याबाबत काहीच कळत नाही. आपण एकदा आढावा घ्यावा. 35 टक्के बिलोने टेंडर घेऊन सर्व रस्त्यांचे नव्हेतर टेंडरचे देखील वाटोळे करण्याचे धोरण असेल तर हे राज्य सरकारने बदलले पाहीजे, अशी आमची प्रामाणिकपणे विनंती आहे. टेंडर घेऊन तीन-तीन महिने झाले. टेंडर सप्टेंबर महिन्याच्या अगोदर निघाले होते. दोन महिने टेंडर करिता जातात. आता मार्च संपला आहे. जून महिन्याच्या आत पाऊस सुरु होईल. जर टेंडर निघाले नाही किंवा कामे सुरु झाली नाही किंवा पावसाळ्यात कामे सुरु झाल्यास पूर्ण रस्त्यांची चाळण होईल आणि आपले पैसे पाण्यात जातील. ही प्रक्रिया लांबत आहे. यातून मार्ग काढावा. कागदावरील आकडेवारी अडचणीत जाईल. याबाबतीत मुख्यमंत्री

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शशिकांत शिंदे.....

महोदयांचा काय हट्ट असेल तो असू द्या. कुठे भ्रष्टाचार, कुठे परसेंटेजवर कमी जास्त होत असेल, तर त्यास आमचा विरोध आहे. परंतु यासंदर्भात निर्णय घ्यावा. यामध्ये हट्ट किती आहे. तीन लाखाच्या वर याबाबतीत ई-टेंडरिंगचा प्रस्ताव दिलेला आहे. ई-टेंडरिंगमधून 10 लाखपर्यंत सूट द्यावी, अशी आमची प्रामाणिकपणे मागणी आहे. काय निर्णय घ्यायचा तो घ्यावा, त्यात आम्हाला अधिकार देऊ नये. तुमच्याकडेच सर्व अधिकार ठेवावे. परंतु अशी सूट दिली नाही तर कामे होणार नाही. आपण यासंदर्भातील माहिती घ्यावी. आपण दोन बजेट मंजूर केले आहेत. आज त्यातील किती कामे सुरु झालेली आहेत. त्यातील 20 टक्के कामे देखील सुरु झालेली नाहीत, हे दुर्दैव आहे. आपला पैसा खर्च झाला नाही तर तो लॅप्स होतो आणि याचे आपण गांभीर्याने घेतले नाही तर आपले उत्तर खरच चुकीचे म्हणून आम्हाला आपल्या विरुद्ध हक्कभंग टाकावा लागेल.

...II/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत शिंदे.....

मंत्री महोदयांनी दिलेले आश्वासन पूर्ण होत नसेल तर ती अडचणीची बाब आहे. जिल्ह्यातील काही रस्त्यांचा समावेश राज्य रस्त्यामध्ये करावयाचा आहे. जिल्हा परिषदेकडील काही रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत केले आहेत. त्यामधील जिल्हा परिषदेकडील काही रस्ते हस्तांतरीत करण्याबाबतचे प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आले आहेत, त्यास अद्याप मंजूरी देण्यात आली नाही. जिल्हा परिषदेकडील पूर्वीच्या रस्त्यांना निधी मिळत नाही म्हणून ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आले. परंतु त्यासंदर्भात अद्याप कार्यवाही झालेली नाही. जुने प्रस्ताव प्रलंबित असल्याने नवीन प्रस्ताव कसे देणार ? यासंदर्भात मंत्री महोदयांनी सदनास खुलासा करावा.

अध्यक्ष महोदय, राज्यातील रेल्वे मार्गावरील 60 ते 80 पूलांना केंद्र शासनाने मंजूरी दिलेली असून त्यासाठी 50 टक्के निधी मंजूर केला आहे. परंतु याप्रकरणी राज्य शासनाने उर्वरित 50 टक्के तरतूद केलेली नसल्याने या पुलांचे काम सुरु होत नाही. सदरहू 50 टक्के रक्कम शासनास भरावयाची आहे. सदर पूल तयार झाल्यानंतर रेल्वे फाटकावरील अपघात होणे बंद होणार आहे. याप्रकरणी शासनाने गांभीर्याने निर्णय घेणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सभागृहात यापूर्वी सांगितले की, तीन मिनिटांच्या कालावधीत टोलनाक्याच्या ठिकाणाहून एक वाहन निघून गेले पाहिजे. अशा प्रकारचे किती टोलनाके आहेत ? वेळेचे बंधन असल्याने लोक शीघ्रगतीने वाहन चालवितात व पुढे टोलनाक्यावर त्यांना 15 मिनिटे थांबावे लागते. यामध्ये सुधारणा करण्यासाठी शासन काही करणार आहे काय ? टोल फ्री संदर्भात मंत्री महोदयांनी आश्वासन दिले आहे, हे आश्वासन कोल्हापूर जिल्ह्यापुरते मर्यादित राहू नये. राज्यातील सर्व मार्ग टोल फ्री करावेत.

अध्यक्ष महोदय, राष्ट्रीय महामार्गावर दररोज अनेक अपघात होत असतात. परवा पुणे-बँगलोर महामार्गावर साताऱ्याजवळ एका डॉक्टरचा अपघात होऊन त्याचा जाग्यावर मृत्यू झाला. हा अपघात त्याचे वाहन रस्त्याच्या बाजूला टाकलेल्या खडीला धडकल्याने झाला. यामध्ये त्याचा दोष काय ? रस्त्यांची कामे किती वेळेमध्ये झाली पाहिजेत याबाबत धोरण ठरविण्याची आवश्यकता आहे. रस्त्यांची कामे वेळेवर न होणे ही फार मोठी अडचण आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत शिंदे.....

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांचा कंत्राटदारावर वचर असणे आवश्यक आहे. मंत्री महोदयांचा अधिकाऱ्यांवर किती वचक आहे याचा खुला सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी केला आहे. आता श्री.कुलकर्णींना ठेवायचे की कोणाला ठेवायचे, हा तुमचा प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संदर्भात मागण्या पुष्कळ आहेत परंतु या विभागासाठी अर्थसंकल्पात करण्यात आलेली तरतूद अतिशय कमी आहे. ई-टेंडरींगच्या संदर्भात निर्णय घेण्यात येईल काय ? होणार नसेल आम्ही काही बोलणार नाही परंतु काम किती महिन्यामध्ये झाले पाहिजे यावर बंधन टाकण्यात यावे. टेंडर झाल्यानंतर ई-टेंडरींगसाठी 2 महिने प्रक्रिया होत असेल व त्यानंतर टेंडरचे काम जर मे मध्ये सुरु झाले व जूनमध्ये पाऊस पडला तर संपूर्ण काम खराब होऊ शकते. मी मांडलेल्या तीन-चार मुद्यांचे उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे, अशी विनंती करुन मी माझे भाषण थांबवितो. धन्यवाद !

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. वाहकांची अपहार प्रकरणे तडजोड करुन निकाली काढण्याबाबत तथा कुटुंब सुरक्षा योजना कार्यान्वीत करण्याबाबत.

मु.शी.: वाहकांची अपहार प्रकरणे तडजोड करुन निकाली काढण्याबाबत तथा कुटुंब सुरक्षा योजना कार्यान्वीत करण्यासंबंधी माननीय परिवहन मंत्र्यांचे निवेदन.

श्री.दिवाकर रावते (परिवहन मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते : अध्यक्ष महोदय, वाहकांची अपहार प्रकरणे तडजोड करुन निकाली काढण्याबाबत तथा कुटुंब सुरक्षा योजना कार्यान्वीत करण्यासंबंधातील निर्णय निवेदनाच्या माध्यमातून घेण्यात आला आहे. बऱ्याच वेळा अनेक लोकप्रनिधी अपहार प्रकरणी चौकशी सुरु असलेल्या कर्मचाऱ्यासमवेत मंत्री महोदयांकडे येत होती. त्यामुळे सदरहू प्रकरणी हा निर्णय घेण्यात आला आहे. सर्व लोकप्रतिधिंच्या आग्रहाखातर हा एक वेगळ्या प्रकारचा निर्णय घेण्यात आला आहे. महामंडळातील सदरहू कर्मचारी कामावर नसतात, त्यांना नोकरी नसते, त्यांच्या कुटुंबातील मुले व पत्नी यांचा विचार करुन हा निर्णय घेतला आहे. म्हणून या योजनेस "कुटुंब सुरक्षा योजना" असे म्हटले आहे. सदरील कर्मचाऱ्यांना केवळ एक वेळा ही संधी देण्यात येत आहे. माझी लोकप्रतिनिधींना विनंती आहे की, यापुढे अशा प्रकारच्या प्रकरणातील कर्मचाऱ्यांना संधी देण्याची शिफारस करु नये.

श्री.भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, वाहकांच्या संदर्भात त्यांच्या कुटुंबियांचा विचार करुन मंत्री महोदयांनी ऐतिहासिक, महत्वपूर्ण व चांगला निर्णय घेतला त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. सदरहू निर्णय 11,984 वाहकांच्या संदर्भात घेण्यात आला आहे. अशा पध्दतीच्या लहान लहान चुका चालकांकडून होत असतात, त्यासंदर्भात देखील अशा प्रकारचा निर्णय घेण्यात येईल का ?

यानंतर JJ-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

06-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) JJ-1

PPD/ ST/ ST/ AKN/ AKN/ 15:50

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महोदय, 4 हजार चालकांना पुन्हा एकदा कामावर घेण्याचा निर्णय झालेला आहे. आता 11 हजार उध्वस्त झालेल्या कुटुंबांना सावरण्याकरिता हा एक निर्णय झाला आहे. यासंबंधातील निवेदन यापूर्वीच झालेले आहे.

2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाद्वारे वेतन सुधारणा समितीने केलेल्या शिफारशीनुसार आगामी कामगार कराराची प्रक्रिया सुरू करणे.

मु.शी. : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाद्वारे वेतन सुधारणा समितीने केलेल्या शिफारशीनुसार आगामी कामगार कराराची प्रक्रिया सुरू करणे, यासंबंधी माननीय परिवहन मंत्र्यांचे निवेदन.

श्री. दिवाकर रावते (परिवहन मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभाध्यक्ष : आज साडेपाच वाजता चर्चारोध आहे आणि त्याच्या आधी उत्तर असे जर आपण विचारात घेतले तर उत्तरासाठी पाऊण तास ठेवला तर फार वेळ आता आपल्याकडे नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी आपले विचार थोडक्यात मांडावेत आणि त्यांच्या सूचना थोडक्यात मांडाव्यात.

श्री. संग्राम थोपटे : अध्यक्ष महोदय, माझा पॉईन्ट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. पुणे शहरामध्ये आणि पिंपरी चिंचवड शहरामध्ये आपण परमिट इश्यू करण्याचा निर्णय व्हावा अशी माझी परिवहन मंत्र्यांना विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्यांनी मला निवेदन दिलेले आहे. मला आपला प्रश्न समजलेला आहे. 154 ते 200 लोकांसंबंधीचा विषय आहे. त्यासंबंधी निर्णय घेण्यात येत आहे. या संदर्भात धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा आहे आणि तो निर्णय सकारात्मक घेण्यात येईल एवढेच मी या ठिकाणी सांगतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री चंद्रदिप नरके (करवीर) : अध्यक्ष महोदय, सन 2016-17 च्या अर्थसंकल्पिय अनुदानाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग, अल्पसंख्याक विभाग आणि मराठी भाषा विभाग या विभागाच्या मागण्यांना पाठिंबा व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. पहिल्यांदा या राज्याचे मुख्यमंत्री आणि त्याचबरोबर माननीय श्री. उध्दव ठाकरे साहेब, श्री. एकनाथ शिंदे साहेब आणि माननीय चंद्रकांत दादा पाटील साहेबांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. कोल्हापूर शहरातील टोल रद्द करण्याचे जे आश्वासन दिले होते ते युती सरकारने पाळले आणि त्याचबरोबर राज्यातील 12 टोलनाके पूर्णपणे आणि 52 टोलनाके अंशत: बंद करण्याचे काम या युती सरकारकडून झालेले आहे, त्याबद्दल मी या सर्व मंत्र्यांचे विशेष अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्यांवर बोलत असताना राज्याच्या 3.37 लाख किलोमिटर्स रस्त्यांच्या लांबीचे उद्दिष्ट 2021 पर्यंत ठेवलेले आहे. त्यामध्ये 2 लाख 99 हजार किलोमिटर्स रस्त्याची लांबी या वर्षी दृष्टिक्षेपात येते. मला सार्वजनिक बांधकाम मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणावयाचे आहे की, या 2,99,368 किलोमिटर्स पैकी राष्ट्रीय महामार्ग 4,666 किलोमिटर्सचे आहेत. प्रमुख राज्य महामार्ग 6,163 किलोमिटर्सचे आहेत. राज्य महामार्ग 33,806 किलोमिटर्सचे आहेत. प्रमुख जिल्हा मार्ग हे 50,585 किलोमिटर्सचे आहेत आणि इतर जिल्हा मार्ग हे 58,115 किलोमिटर्सचे आहेत आणि राज्यातील ग्रामीण रस्ते हे 1,45,779 किलोमिटर्सचे आहेत. मला याद्वारे निश्चितपणे सांगावयाचे आहे की, या 2 लाख 99 हजार किलोमिटर्सपैकी या राज्यातील इतर जिल्हा मार्ग आणि ग्रामीण मार्गांची लांबी 2 लाख किलोमिटर्सच्या वर आहे. खऱ्या अर्थाने जवळ जवळ सर्वच आमदारांची मागणी अशी आहे की, ज्यावेळी आपण बजेट मंजूर करतो त्यावेळी इतर जिल्हा मार्गाला आणि ग्रामीण मार्गाला बजेट हे राज्य सरकारकडून येत नाही.

अध्यक्ष महोदय, आपण पंतप्रधान सडक योजनेचा त्यासाठी वापर करीत होतो. परंतु अलिकडच्या दोन अडीच वर्षामध्ये केंद्र सरकारकडून राज्य शासनाला पंतप्रधान सडक योजनेमधून कोणत्याही प्रकारचा निधी आलेला नाही. राज्यामध्ये जे एकूण उद्दिष्ट होते त्याच्या तुलनेत लोकवस्त्या जोडण्याचे शंभरटक्के काम आणि रस्ते सुधारण्याचे पंचाहत्तर टक्के काम पूर्ण केले आहे. आपल्या राज्याला केंद्र शासनाने दोन पंतप्रधान सडक योजना मंजूर केल्या आहेत आणि

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रदिप नरके.....

त्यामध्ये हा उल्लेख केलेला आहे की, हे केवळ रस्त्यांचा दर्जा सुधारण्यासाठी कामे घेता येतात. त्यामुळे पंतप्रधान सडक योजनेमध्ये नवीन कामे येण्याचा मार्ग बंद झाला आहे. म्हणून महाराष्ट्रामध्ये मुख्यमंत्री ग्राम सडक योजना सुरू केली आणि ती अंमलात आणली आहे. पण मला वाटते की, त्याची लांबी अतिशय कमी आहे. त्यामधून माझ्या कोल्हापूर जिल्ह्यामध्ये फक्त 37 किलोमिटर्सची लांबी आली आहे. आपल्याला खऱ्या अर्थाने इजिमा आणि ग्रामा आपल्याला करावयाचे असतील तर मला मंत्री महोदयांना सूचना करावयाची आहे की, नाबार्डचा निधी प्रमुख जिल्हा मार्गासाठी येतो तो त्यांनी इतर जिल्हा मार्गासाठी देण्याकरिता नाबार्डच्या वतीने निर्णय घ्यावा. कारण शेतकऱ्याच्या शेतातील शेतमाल हा ग्रामा रस्त्यावरुन इतर जिल्हा मार्गावरुन आणि प्रमुख जिल्हा मार्गाला यावा अशा पध्दतीची उद्दिष्टे ही नाबार्डमध्ये आहेत आणि त्यामुळे हा माल येण्यासाठी येत्या दोन-चार वर्षामध्ये पूर्ण करावे. नाबार्डच्या योजना प्रमुख जिल्हा मार्गासाठी मिळतात तर इतर जिल्हा मार्गासाठी मिळत नाहीत. पूर्वी इतर जिल्हा मार्गासाठी नाबार्डचा निधी मिळत होता. इतर जिल्हा मार्ग नाबार्डमध्ये घेतला आणि मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेमध्ये घेतला तर प्रमुख जिल्हा मार्गाला राज्य शासन बजेटमध्ये तरतूद करील आणि यामधून निधी मिळाला तर निश्चितपणे रस्त्यांची कामे पूर्ण होतील. 13 व्या वित्त आयोगाच्या कनेक्टेड व्हीलेजेस कार्यक्रमातून होत होता. तो कार्यक्रम बंद झाला आहे. मला वाटते वाड्या-वस्त्या जोडण्यासाठी डीपीसीतून निधी मिळाला तर धनगरवाड्या जोडावयाच्या असतील त्यांची लांबी 5-5 किलोमिटर्स आहे. जिल्हा परिषदेमधून आपण 2-2 कोटी रुपयांचे प्रस्ताव करु शकत नाही. त्यामुळे मला असे वाटते की, या वाड्या-वस्त्या जोडण्यासाठी राज्य सरकारने एक वेगळा कार्यक्रम घ्यावा. उदाहरणादाखल कोल्हापूर जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय महामार्ग आज फक्त 110 किलोमिटर्सचा आहे. प्रमुख राज्य मार्ग 34 मिलोमिटर्सचे आहेत. राज्य मार्ग 1106 किलोमिटर्सचे आहेत. प्रमुख जिल्हा मार्ग 1500 किलोमिटर्सचे आहेत. इतर जिल्हा मार्ग 2075 किलोमिटर्सचे आहेत. इतर ग्रामीण मार्गाची लांबी 4467 किलोमिटर्स इतकी आहे. त्यामुळे कितीही समाधान झाले तरी ग्रामीण भागातून निवडून आलेल्या विधानसभेच्या लोकप्रतिनिधींच्या मागण्या राज्य सरकार पूर्ण करु शकत नाही आणि ज्या 3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रदिप नरके.....

लाख लोकसंख्येमधून आपण निवडून येतो त्यांच्या अपेक्षा पूर्ण होणे महत्वाचे असते. रस्त्याचे काम झाल्याशिवाय आपल्याला नागरिक स्वस्त बसू देत नाहीत. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी 13 व्या वित्त आयोगाचा कार्यक्रम निश्चितपणे पूर्ण करावा.

अध्यक्ष महोदय, गुणवत्ता टिकविण्यासाठी आपण स्काडा सिस्टीम वापरतो. 4 कोटी रुपये कामाच्या वरील कामांसाठी बॅचमिक्स प्लॅन्ट देण्याची मर्यादा आहे. मला वाटते यामध्ये बदल करुन 1 कोटी रुपयांच्या कामांसाठी बॅचमिक्स प्लॅन्ट घेण्यासाठी निर्णय केला तर कामा दर्जा निश्चितपणे चांगला होईल.

KK-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रदीप नरके.....

कोल्हापूर गगनबावडा हा कोकणाला जोडणारा सर्वात जवळचा रस्ता आहे. कोकण आणि गोव्याला जोडणारा हा रस्ता आहे.

(सभागृहाच्या प्रेक्षक गॅलरीतून एक व्यक्ती फोटो काढण्याचा प्रयत्न करीत असते.)

श्री.धैर्शशील पाटील : अध्यक्ष महोदय, या सदनाला पावित्र्य आहे. या सभागृहाचा कारभार कशा पध्दतीने चालतो हे जनतेला दिसावे याकरिता वेगवेगळ्या आदरणीय मंडळी आणि नागरिक यांना याठिकाणी येण्याची परवानगी आहे. परंतु त्यांनी या सभागृहाचे पावित्र्य जपले पाहिजे. अशा पध्दतीने जर सभागृहाचे पावित्र्य जपले जात नसेल तर तशाप्रकारच्या सूचना देण्यात याव्यात. याची दखल घेतलेली नाही. अध्यक्ष म्हणून मी तुम्हाला याठिकाणी विनंती करतो.

तालिका सभाध्यक्ष (श्री.राहूल बोंद्रे) : याची दखल घेऊन सूचना देण्यात येतील.

श्री.चंद्रदीप नरके : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, कोल्हापूर-गगणबावडा या चारपदरी रस्त्यासाठी बजेट देण्यात यावे. 279 कोटी रुपयांचा जो प्रस्ताव गेलेला आहे तो याठिकाणी मंजूर करावा. त्याचबरोबर कडे पोलीस स्टेशनच्या इमारतीसाठी निधी मंजूर करावा. तसेच करवी तहसील कार्यालय आणि करवी पंचायत समिती यांचे कार्यालय एकत्र आहे. या कार्यालयाच्या इमारतीसाठी जो प्रस्ताव आलेला आहे तोही मंजूर करण्यात यावा. याठिकाणी 4200 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. ही तरतूद अधिकाधिक करुन घेण्यासाठी निश्चितपणे आपण प्रयत्न करावेत. सीआरएफचा मिळणारा सर्व निधी हा विदर्भ, मराठवाड्याला जास्त गेलेला आहे. पश्चिम महाराष्ट्राला कमी आला आहे. पश्चिम महाराष्ट्राला जास्त येण्यासाठी माननीय मंत्र्यांनी प्रयत्न करावेत अशी मी त्यांना विनंती करतो. धन्यवाद.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष पाटील (अलिबाग) : अध्यक्ष महोदय, आज बांधकाम खात्याला 4 हजार कोटी रुपयांचा निधी आहे. या बांधकाम खात्यामध्ये आमच्या कोकणातील धूप प्रतिबंधक बंधाऱ्यांचाही त्यामध्ये समावेश केलेला आहे. परंतु आज त्याला 20 कोटी रुपयांची तरतूद आहे. कोकणामध्ये 720 किलोमीटरचा समुद्र किनारा आहे, 44 खाड्या आहेत. त्यामुळे हा निधी अपुरा पडणार आहे. बंधारे विकासासाठी 70 कोटी रुपयांचा निधी दिलेला आहे. तो सुध्दा अपूर्ण आहे, त्यामध्ये वाढ व्हायला पाहिजे. कोकणामध्ये जाणारी रेल्वे आमच्या रायगड जिल्ह्यातून जाते. रोहा तालुक्याला जोडणाऱ्या गावाजवळ लोकांना 15 ते 20 मिनिटे थांबावे लागते. ते दोन्ही ब्रीज रेल्वेच्या कार्यक्रमातून घेण्यात यावेत. माझ्या मतदारसंघात वर्सोली ब्रीज बांधून आज 10 वर्षे झालेली आहेत. त्याचे जोडरस्ते झालेले नाहीत. मानकुळे हा ब्रीज बांधून पूर्ण झालेला आहे. त्याठिकाणी जोडरस्ते न झाल्यामुळे "जनतेला ना फायदा आणि सरकारचा कर्जा" अशी अवस्था झालेली आहे. आज मराठवाड्यामध्ये दुष्काळ आहे. दुष्काळाच्या निमित्ताने आज बरीच लोक मराठवाड्याला भेटी देत असतात. मराठवाड्यामध्ये लातूर आणि नांदेड याठिकाणी पंचतारांकित निवासस्थाने आहेत, पण निधी नाही. म्हणून माझी यानिमित्ताने विनंती आहे की, अधिकाऱ्यांना हॉटेलमध्ये राहावे लागते तर लो ऑब्जेक्शन घ्यायला लागली. म्हणून या निवासस्थानांची दुरुस्ती करायला पाहिजे. आज कोकणामध्ये 20 हजार किलोमीटर रस्ते आहेत, पण त्याला निधी मिळत नाही. मी माननीय मंत्र्यांना धन्यवाद देईल की त्यांच्या खात्याला बऱ्याव वर्षानंतर 4 हजार कोटी रुपयांचा निधी मिळाला. त्यांनी सर्व सन्माननीय सदस्यांना निधीचे वाटप केलेले आहे.

अध्यक्ष महोदय, अल्पसंख्यांक म्हणजे केवळ मुस्लीम नव्हे तर त्यामध्ये जैन, बौध्द, ख्रिच्चन आहेत. रायगड आणि संपूर्ण कोकणामध्ये 7 ते 8 लाख लोकवस्ती असताना देखील या विभागामार्फत एकही वसतीगृह नाही. आज शहरामध्ये विकासासाठी 10 लाख रुपयांची तरतूद करण्याचे ब आणि क नगरपालिकांना मर्यादा आहे ती वाढविली पाहिजे. रायगड जिल्ह्यामध्ये जवळपास 3 लाखाच्या वर मुस्लीम आहेत. महिलांसाठी वसतीगृहे करण्यात यावीत ही मागणी करतो आणि थांबतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव) : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पीय मागण्यांवर बोलण्यासाठी भाग घेत असताना माननीय मंत्री श्री.चंद्रकांतदादा पाटील आपण माझ्या चांदूर रेल्वेचा 62 कोटी रुपयांचा पूल मंजूर करुन अर्थसंकल्पात समावेश केलेला आहे त्याबद्दल आपल्याला सर्वप्रथम धन्यवाद देतो. त्याच्या भूमीपूजनाची तारीख आजच सभागृहाचे जाहीर करा म्हणजे मला कार्यक्रम घ्यायला सोयीचे होईल. या उड्डाणपूलाच्या कामाला अत्यंत कमी तरतूद आहे. 31 कोटी रुपये राज्य सरकारला द्यायचे आहेत आणि 31 कोटी रुपये केंद्र सरकारण देणार आहे. अशा परिस्थितीमध्ये याचे काम जर रखडले तर लोकांची फार मोठ्या प्रमाणावर गैरसोय होणार आहे. म्हणून याची तरतूद वाढवून द्यावी अशी अपेक्षा व्यक्त करतो. नांदेडची मंडळी ई-टेंडरींगची कामे अमरावती येथे करीत आहेत. 42 टक्के बीले जाऊन काम करीत आहेत. 6-6 रिमांईडर देऊन सुध्दा 10 टक्के काम भरल्यानंतर जास्तीची सुरक्षा रक्कम भरायला लावतो ती 6-6 महिने भरत नाहीत. त्यामुळे आमदार निधीची कामे सुध्दा मोठ्या प्रमाणावर रखडलेली आहेत. अशा परिस्थितीमध्ये ई-टेंडरींगची 3 लाखाची अट रद्द कमीत कमी 10 लाखाची केली पाहिजे. आदरणीय श्री.पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री असताना 25 लाख करण्याची मागणी आम्ही त्यांच्याकडे केली होती. परंतु त्यांनी ती 10 लाखाची ठेवली. म्हणून आपल्याला विनंती आहे की, आमदारांचे कॉन्ट्रॅक्टर भूमीपूजनाला एखादा पेंडॉल सुध्दा त्याठिकाणी टाकत नाहीत. तेथे पत्रिका छापत नाही. अत्यंत बेबंदशाही सुरु झालेली आहे. म्हणून आपल्याला विनंती आहे की, दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची मागणी आहे हा निधी कमीत कमी 10 लाख करण्यात यावा. इतर विभागाची करीत नसाल, निदान आमदार निधीची तरी करा. जेणकरुन त्या गावात आमदार निधीमधून टाकलेल्या कामाच्या भूमीपूजनाचे बोर्ड त्या आमदार निधीमधून लावता येईल.

अध्यक्ष महोदय, दुसरे असे की, माझ्या मतदारसंघामध्ये मोठमोठ्या नद्या आहेत. अतिभार रेतीच्या वाहतुकीमुळे मोठ्या प्रमाणात ट्रक जास्त असल्याने त्यामध्ये रस्ते खराब होत आहेत. म्हणून माझी विनंती आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाने वारंवार आटीओला, पोलीस, महसूल प्रशासनाला कळवून सुध्दा अधिभार रेती वाहतूकीवर कारवाई होत नाही. ट्रकवाल्यावर कारवाई होत नाही. सन्माननीय सदस्य डॉ.सुनिल केदार यांनी कलेक्टरमध्ये बैठक लावली होती की, रेतीचे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.विरेंद्र जगताप.....

ट्रक भरुन देतानाच 2 बरासच्या वर कॉन्ट्रॅक्टदाराने भरुन देऊ नयेत. परंतु त्यावर सुध्दा अद्याप अंमलबजावणी झालेली नाही. रस्त्यांची चाळणी झालेली आहे. म्हणून यासंदर्भात महसूल, पोलीस यांना कळविण्यात आलेले आहे. सावर्जनिक बांधकाम खात्याचे रस्ते खराब होत आहेत आणि महसूल अत्यंत कमी आहे. 7-8 कोटी रुपयांचा निधी जिल्ह्याला मिळतो आणि रस्ते 100 कोटी रुपयांचे खराब होतात हे अत्यंत चुकीचे आहे. म्हणून याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे. विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणावर रस्त्यांचा अनुशेष आहे. यासंदर्भात अखिल भारतीय रोड कॉंग्रेसन आपला अहवाल प्रसिध्द केला. त्याठिकाणी प्रत्येक जिल्ह्याच्या क्षेत्रफळाप्रमाणे त्या जिल्ह्याच्या रस्त्यांची लांबी असली पाहिजे. असे असताना सुध्दा विदर्भामध्ये जवळपास 13 हजार किलोमीटर, 18 हजार 455 किलोमीटर अनुशेषाची लांबी अखिल भारतीय रोड कॉंग्रेसच्या अनुशेषाप्रमाणे निघते. म्हणून उर्वरित महाराष्ट्रामध्ये 78 टक्के रस्ते झालेले आहेत. मराठवाड्यामध्ये 91 टक्के रस्ते झालेले आहेत आणि विदर्भामध्ये फक्त 70 टक्के रस्ते तयार झालेले आहेत. त्यामुळे जवळपास 18 हजार किलोमीटरचा अनुशेष विदर्भाचा आहे. त्याचा उल्लेख सुध्दा आदरणीय वित्त मंत्र्यांच्या बजेटच्या भाषणामध्ये झालेला नाही. म्हणून आपण आपल्या भाषणामध्ये रस्त्यांचा अनुशेष आणि 2 हजार रस्ते डांबरीकरणाने जोडण्याच्या संदर्भात अनुशेष केव्हा भरुन काढणार याचा उल्लेख उत्तराच्या भाषणामध्ये करावा. अल्पसंख्यांक विकास विभागाचे मंत्री महोदय सध्या सभागृहामध्ये नाहीत. याची नोंद कोण घेत आहे. अल्पसंख्यांक विकास विभागाची यादी नागरी क्षेत्र आणि ग्रामीण क्षेत्र याची यादी माझ्याजवळ आहे. या यादीमध्ये भारतीय जनता पक्षांच्या आमदारांचीच कामे झालेली आहेत.

LL-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.विरेंद्र जगताप.....

माझ्या मतदार संघामध्ये मुस्लीम बहुल, बौध्द बहुल, बागायत अल्पसंख्यांक विकास विभागाची नगरपरिषदेला 10 लाख रुपयांचा निधी, ग्रामपंचायतीला 10 लाखा रुपयांचा निधी देतो. आता 31 मार्चचे शासन आदेश आहेत. या बाजूच्या आमदारांनी सूचविलेली कामे एकही आले नाही वस्तुस्थिती आहे. म्हणून उत्तराच्या भाषणामध्ये माननीय अल्पसंख्यांक विकास मंत्री ग्रामीण आणि नागरी क्षेत्रामधील रस्त्यांच्या ग्रामीण मधील कामे आम्ही सूचवितो, नागरी क्षेत्रातील कामे नगरपंचायती सूचवितात. त्या अल्पसंख्यांक विकास विभागाच्या कामाचा समावेश करावा. असे आश्वासन मंत्री महोदयांनी द्यावे अशी अपेक्षा व्यक्त करतो. धन्यवाद.

.....

.....2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. संगीता ठोंबरे (केज) : अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभाग, अल्पसंख्यांक विभाग या विभागांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभी आहे. तसेच अध्यक्ष महोदयांनी मला भाषणाची संधी दिली त्याबद्दल त्यांना मनापासून धन्यवाद देते.

या ठिकाणी ब-याच विषयांवर चर्चा झालेली आहे. दोन तीन महत्वाचे मुद्दे मला आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांच्या लक्षात आणून द्यायचे आहेत. तेवढेच फक्त या ठिकाणी मांडते. खरे म्हणजे गेल्या चार वर्षापासून सातत्याने दुष्काळाची परिस्थिती आमच्या भागात असताना देखील त्या ठिकाणी या वर्षीच्या बजेटमध्ये तरतुदी केलेल्या आहेत. त्या अनुषंगाने आमच्या भागामध्ये म्हणावी तशी प्रगती झालेली नाही. गेल्या चार वर्षापासून आमच्या ग्रामीण रस्त्यांच्या विकासाच्या अंतर्गत कुठलीही भरीव मोठी तरतूद झालेली नाही. मी आदरस्थान आदरणीय श्री.चंद्रकांत दादा यांना या माध्यमातून विनंती करते की, ग्रामीण विकास म्हणजे सी.एम. जे.एस.वाय.जे. नवीन उपक्रम या ठिकाणी सुरु केलेले आहे. त्याच्या अंतर्गत प्रत्येक भागातल्या रस्त्याला मान्यता मिळवून दिलेली आहे ग्रामीण विकासाच्या मार्फत. पण आमची अशी विनंती आहे की, या ठिकाणी याच्या आधी सुध्दा मांडण्यात आले व्ही.आर. आणि ओ.डी.आर. हे रस्ते बजेटमधून घेता आले आमचे ग्रामीण भागातील रस्ते आहेत. त्याच्यामध्ये जास्त भरीव तरतूद करुन जर सुधारणा करण्यात आली तर नक्की आमचा ग्रामीण भागाचा विकास होईल आणि श्री.चंद्रकांत दादा जातीने लक्ष घालतील अशी खात्री वाटते. त्याच बरोबर टेंडरचा विषय आधीच मांडलेला आहे. टेंडर पध्दतीमध्ये सुध्दा सुधारणा करण्यात यावी. एवढीच या प्रसगी विनंती करते.

अध्यक्ष महोदय, अल्पसंख्यांक विकास विभागासाठी फक्त एवढीच सूचना करते की, आमच्या मतदार संघामध्ये अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत भरपूर बॅकलॉग या ठिकाणी राहिलेला आहे. येणाऱ्या कालावधीत अल्पसंख्यांक विकास विभागाच्या मार्फत जास्तीत जास्त निधी मराठवाडा आणि त्यातल्या त्यात बीड जिल्हयाला मिळवून द्यावा, एवढीच या प्रसंगी विनंती करते आणि माझे दोन शब्द संपविते. धन्यवाद.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती सुमन पाटील (तासगाव) : अध्यक्ष महोदय, मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी उभी आहे. या खात्यासंबंधी दोन ते तीन महत्वाच्या सूचना करीत आहे. मिरज ते पंढरपूर हा महत्वाचा मार्ग आहे. हया रस्त्यावरील वाहनांची वाढती संख्या लक्षात घेता महामार्गावरचे चौपदरीकरणाचे काम तातडीने सुरु करावे. हया मार्गावरील रत्नागिरी, सिंधुदुर्ग, बेळगांव, कोल्हापूर या जिल्हयातील वारकरी मोठया प्रमाणात दिंडी, पालकी घेऊन आषाढी कार्तिकीला वारीसाठी जात असतात. शासनाने जेजुरी, फलटण, पंढरपूर ही पालकी मार्ग जाण्यापूर्वी केले आहे. त्याच धर्तीवर मिरज पंढरपूर या मार्गाचे रूंदीकरण करण्यात यावे. दुसरी महत्वाची सूचना करीत आहे की, कराड, पलुस मार्गे तासगावं तसेच सातारा, कोरेगांव, पुशीसावळी, कडेगांव मार्गे सांगली हे दोन रस्ते अत्यंत महत्वाचे आहेत. हया रस्त्यांचे चौपदरीकरणाचे काम तातडीने करण्याबाबत शासनाने विचार करावा.

मतदार संघातून तासगाव तालुक्यात तसेच कवठे महांकाळ तालुक्यात येथील रस्ते खूप खराब झालेले आहेत. ते दुरुस्त करण्यात यावेत. आणखीन एक महत्वाची सूचना करीत आहे अनेक वर्षापासून राज्यातील न्यायालयाचे कामकाज मराठीतून करण्याची जनतेची मागणी आहे. त्यासाठी स्वतंत्र कक्ष निर्माण करुन कामाला गती द्यावी यासाठी व्यवस्था करावी, ही विनंती.

.....

.....4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) : अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अर्थसंकल्पिय मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभी आहे. वांद्रे (पूर्व) शासकीय वसाहत 50 ते 60 वर्षे जुनी असून वसाहतीमधील इमारती हया अत्यंत जीर्ण व नादुरुस्त अवस्थेत आहेत. सदर इमारतीतील अनेक सदनिकांमध्ये वारंवार स्लॅब कोसळण्याच्या घटना घडत असतात. त्यामुळे संबंधित स्थानिक रहिवाश्यांमध्ये भितीचे वातावरण असून ते आपला जीव मुठीत घेऊन तिथे राहत आहेत. शासनाकडून अनेक वेळा वसाहतीच्या दुरुस्ती करीता निधी दिला जातो पण दुरुस्तीची कामे होत नाहीत. जर कामे झालीच लोअर क्वॉलिटीची होतात. मग हा निधी जातो कुठे ? रहिवाशी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रार घेऊन गेले तर अधिकारी त्यांच्याशी सरळ बोलत नाहीत. मुळात अधिकारी जागेवरच नसतात. याची शासनाने नोंद घ्यावी. शासन वसाहतीचा पुर्नविकास करणार आहे. केव्हा करणार आहे ? तसेच या पुनर्विकासाअंतर्गत शासकीय कर्मचाऱ्यांची गेली अनेक वर्षाची मागणी आहे की, त्यांना वांद्रे येथेच माफक दरात मालकी हक्काची घरे हवी आहेत. या मागणीचा शासन विचार करणार आहे की नाही या संदर्भात मंत्री महोदयांनी निवेदन करावे.

अध्यक्ष महोदय, मी आपल्याला विनंती करते आपण जास्तीत जास्त निधी वसाहतीकरिता द्यावा. अशी मी मागणी करीत आहे. वांदे (पूर्व) येथे पश्चिम द्रुतगती महामार्ग आहे. तेथे शाळा, महाविद्यालय, शासकीय आस्थापना व स्मशानभूमी असून तेथील स्थानिक रहिवाशांना रस्ता ओलांडण्याकरीता भुयारी मार्गाचा वापर करावा लागतो. सदर भुयारी मार्ग हा दयनिय अवस्थेत असून पावसाळयात पाणी साचते, त्यामुळे ये-जा करणाऱ्या वृध्द महिला विद्यार्थ्यांना खूप त्रास सहन करावा लागतो. तरी शिक्षक वसाहतीत एक पादचारी पूल बांधून देण्यात यावा. जेणेकरुन स्थानिकांना त्याचा फायदा होईल.

अध्यक्ष महोदय, शासकीय सेवेतील निवृत्त होणा-या कर्मचारी/अधिकाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर शासकीय निवासस्थानात 3 महिन्या ऐवजी 1 वर्षापर्यंत राहण्याची सवलत द्यावी, संबंधित कर्मचारी अधिकारी यांच्या मुलांच्या शिक्षणाच्या दृष्टीकोणातून विचार करावा अशी रास्त मागणी आहे. आपण मला अर्थसंकल्पिय मागण्यांवर चर्चा करण्याकरिता संधी दिल्याबद्दल धन्यवाद देते.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) : अध्यक्ष महोदय, सन 2016-17 च्या पुरवणी मागणीवर बोलण्यासाठी आपण दिलेल्या संधीमुळे मी उभा आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री आदरणीय श्री.चंद्रकांत दादा या ठिकाणी उपस्थित आहेत. अनेक आमदारांची या दिड वर्षामध्ये प्रामुख्याने एक मागणी आहे. या मागणीमध्ये सातत्याने टेंडरचा विषय येतो. आमदार काम करतात ही भावना लोकांमध्ये जायची असेल तर 15 लक्ष रुपयांची किमन ऑन लाईन प्रक्रियेतून आमदारांना संधी द्यावी जेणेकरुन त्याला 15 लाख रुपयांचा निधी वाटता आला पाहिजे. ही प्रामुख्याने मागणी सभागृहाच्या वतीने आहे. त्याचप्रमाणे माझा जो मतदार संघ आहे. किल्ले शिवनेरी जुन्नर या मतदार संघामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची जी जन्म भूमी, अष्ट विनायकचे दोन गणपती, रस्त्याची अतिशय चाळ झालेली आहे. पर्यटनाच्या दृष्टीने या रस्त्यांच्या बाबतीत मी वारंवार दिड वर्षामध्ये अनेक भाषणांमध्ये विनंती करुन सांगितली आहे की, या संपूर्ण रस्त्यांच्या बाबतीतमध्ये अधिकचा निधी या माझ्या मतदार संघामध्ये आला पाहिजे. ग्रामा मार्ग आणि जिल्हा मार्ग यांच्या बाबतीत एक गोष्ट निश्चित आहे.

अध्यक्ष महोदय, आतापर्यंतच्या 60 वर्षाच्या कार्यकालामध्ये 7 किलोमीटरच्या रस्त्यामध्ये दोन किलोमीटरच्या रस्त्यामध्ये खड्डा पडतो. दोन कि.मी. चा रस्ता पूर्ण झाल्यानंतर तेथूनपुढचा रस्ता तो तसाच खराब असतो दोन वर्षानंतर विचार करायला गेले तर आधीचा चांगला दोन किलो मीटरचा रस्ता उडून जातो. अशी एकंदर परिस्थिती आज ग्रामीण भागामध्ये रस्त्यांची आहे. मला आपल्या मार्फत निवेदन करायचे आहे. सुरुवात केल्यानंतर त्या रस्त्याच्या शेवटच्या टोकापर्यंतचा रस्ता पूर्ण करण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम खात्याचे निश्चित केली पाहिजे. इतक्या वर्षापासून पाहतो आहे. आंबे गांव आणि जुन्नर तालुक्याच्या दरम्यान एक मीना नदी आहे. तेथे खोडदगांव आहे. त्या खोडदगावाला आणि तालुक्याला एकत्र करण्यासाठी ग्रामीण भागामध्ये पुलाची मागणी आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद सोनवणे .....

वळज व पारुंडे हे खंडोबाचे मोठे तीर्थक्षेत्र आहेत. येथे मिना नदीवर पूल झाला पाहिजे. आमच्याकडे श्री विघ्नहार सहकारी साखर कारखाना आहे. शिरोली खुर्द व शिरोली बुद्रूक या गावामध्ये उसाचे पीक जास्त आहे. तेथील उस पीक व दळणवळण लक्षात घेतले तर तेथील पुलावर सातत्याने अपघात होतात. तेथे नवीन पुलाचे बांधकाम करावे. आर्वी पिंपळगाव व वानेवाडी, गुंजाळवाडी या मिना नदीवर पुलाचे बांधकाम व्हावे. भिमाशंकर वाडागुडा रोड बाबत केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरी यांचे अभिनंदन केले पाहिजे. त्यांनी या नॅशनल हायवेला परवानगी दिली आहे. येथील भिमाशंकर ते वाडागुडा ते बनकर फाटयापर्यंतचा हायवे माझ्या मतदारसंघात येतो. या नॅशनल हायवेलगत दोन अष्टविनायक मंदीरे आहेत. या 20-25 किलोमीटरचा यामध्ये अंतर्भाव करुन अधिकची मंजूरी मिळवून द्यावी अशी मी सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, अल्पसंख्याक विभागाच्या बाबतीत मी सांगतो की, या खात्याचे राज्यमंत्री श्री.दिलीप कांबळे हे आमचे अतिशय जवळचे सहकारी व मित्र आहेत. त्यांचे काम अतिशय चांगले आहे. त्यांना विनंती करावयाची आहे की, अल्पसंख्याकाचा बॅकलॉग पाहता, या विभागाकरिता जास्तीत जास्त निधी मिळवून द्यावा. जेणेकरुन महाराष्ट्रातील अल्पसंख्याकाच्या मनामध्ये सरकारबाबत विश्वास निर्माण होईल अशी विनंती करतो. धन्यवाद.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमित देशमुख (लातूर शहर) : अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभाग, अल्पसंख्याक विकास विभाग व मराठी भाषा विभागांवर सूचना करण्यासाठी मी उपस्थित आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकरिता भरीव तरतूद माननीय मंत्री श्री.चंद्रकांत पाटील यांनी देऊ केलेली आहे. ही भरीव तरतूद करुनसुध्दा महाराष्ट्रातील रस्त्यांचा जो दर्जा आपणास अनुभवास मिळतो, त्यात अतिशय निकृष्ट दर्जाचे रस्ते आपणास पहावयास मिळतात. शेकडो ते हजारो लोकांचा अपघातात मृत्यू या रस्त्यांवर झाल्याचे आपणास अनुभव येतात. या रस्त्यांच्या कामांच्या दर्जाबाबत कोणत्या उपाययोजना राज्य सरकारकडून होणार आहेत हे मंत्री महोदयांनी उत्तरात सांगावे अशी विनंती करतो. एक्सप्रेस वे सह कोणत्याही रस्त्यावर आता ट्रॅफिक जॅम व्हायला लागले आहे. पुणे मुंबई व नाशिक मुंबई एक्सप्रेस वे वर ट्रॅफिक जाम होत आहे. औरंगाबाद, बीड, लातूर, परभणी, हिंगोली या जिल्हयाच्या ठिकाणी जायचे असेल तर तेथील रस्त्याची अवस्था अतिशय दयनीय आहे. या जिल्हयाच्या रस्त्यांकरिताही अधिक तरतूद राज्य सरकारकडून व्हायला हवी अशी मागणी करतो. उदा. लातूरवरुन सोलापूरला निघाला तर अशा कोणत्याही रस्त्यावर राज्य सरकारच्या वतीने सुलभ शौचालयाची व्यवस्था किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने आपणास पहावयास मिळत नाही. तसेच रस्त्याच्या कडेला हॉस्पीटल, क्लिनीक, इमर्जन्सी सेंटर उपलब्ध असल्याचे पहावयास मिळत नाही. अर्थसंकल्पात या विषयी काही तरतूद त्यांनी केली पाहिजे अशी मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, सरकारने विधानसभा निवडणुकीत घोषणा केली होती की, महाराष्ट्र टोलमुक्त करण्यात येईल. काही रस्ते सोडले तर बऱ्याच रस्त्यावर टोल चालू आहे. मुंबई एंट्री पॉईंटला युती सरकारच्या काळात टोल सुरु करण्यात आला. अजूनही हा टोल सुरु आहे. सामान्य माणूसही मुंबईमध्ये येताना व जाताना टोल भरतो. पण खऱ्या अर्थाने मुंबईमध्ये जे उड्डाणपूल विकसीत करण्यात आले तो पैसा वसूल करण्यासाठी हा टोल लावण्यात आला होता. मुंबईमध्ये युतीच्या काळात उड्डाणपूल बांधले होते त्याला आता 20 वर्षे होत आलेली आहेत तरी हा टोल सुरु आहे. आरटीआयचे अनेक कार्यकर्ते आता हायकोर्टात गेलेले आहेत. त्यांनी राज्य सरकारला विनंती केलेली आहे की, हा टोल बंद केला पाहिजे. मुंबई एंट्री पॉईटबाबत मंत्री महोदयांनी आम्हाला हे देखील सांगितले पाहिजे की, तेथे जमा होणारे टोलचे पैसे नेमके कोठे खर्च होतात. कोणत्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

06-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) MM-3

PNG/ AKN/ ST/ 16:20

श्री.अमित देशमुख .....

कामावर हे पैसे खर्च होतात ? हे रस्ते पाच वर्षे देखभाल दुरुस्तीसाठी दिले जातात. एकदा काम झाल्यावर कंत्राटदाराने पाच वर्षे त्याची देखभाल दुरुस्ती करावयाची आहे. या देखभाल व दुरुस्तीवर किती खर्च झाला याचे आकडे आपणासमोर कधीही आलेले नाहीत. एखादा रस्ता करण्यास 10 कोटी रुपये खर्च झाले तर पुढील पाच वर्ष देखभाल दुरुस्तीसाठी किती खर्च येतो ? उदा.औरंगाबाद, जालना जिल्हयामध्ये तसेच विदर्भामध्ये रस्त्यांच्या देखभाल दुरुस्तीवर किती रुपये खर्च होतात हे या सभागृहासमोर कधीही आलेले नाही. यावर मंत्री महोदयांनी त्यांच्या भाषणात प्रकाश टाकावा. लातूरमधील अनेक रस्ते म्हणजे लातूर रिंग रोड, स्टेट हायवे, नॅशनल हायवे हे लँड ॲक्वीझीशनअभावी रखडलेले आहेत. लातूर जिल्हयामध्येही अनेक कामे झाली, प्रत्येक जिल्हयातील जे विकासक आहेत, ज्यांनी रस्त्याची कामे केली आहेत. त्यांचे पैसेसुध्दा वेळेवर दिले जात नाहीत. महाराष्ट्रातील सर्व विभागांचा रस्त्याचा बॅकलॉग मंत्री महोदयांनी दूर करावा ही आग्रहाची विनंती मी करतो. तसेच लातूर, बार्शी, येडशी, टेंभूर्णी, पुणे या रस्त्याचा त्यामध्ये समावेश करावा अशी मी मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, अल्पसंख्याक विभागाच्या मागण्याबाबत मी थोडक्यात विचार व्यक्त करतो. या विभागाकरिता केंद्र सरकारकडून अनेक उपाययोजना राज्यांकरिता देऊ केलेल्या आहेत. मल्टी सेक्टरल डेव्हलपमेंट प्रोगाम, एम.एस.टी.पी., स्कॉलरशीप स्कीम, फ्री कोचींग, अलाईड स्कीम, कॉम्प्युटरायझेशन ऑफ वक्फ स्पोर्ट रेकॉर्ड, को-फंड फॉर मौलाना आझाद एज्युकेशन फाऊंडेशन, ग्रँट इन एड स्कीम, मायनॉरीटी विकासाच्या संदर्भात रिसर्च स्टडीज, नई रोशनी, सिखो और कमाओ, जिओ पारशी पढो परदेश या सर्व योजना केंद्र व राज्य सरकारच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या आहेत. अर्थसंकल्पात यावर कसलेही भाष्य व तरतूद याकरिता झालेली दिसत नाही. माननीय केंद्रीय मंत्री श्रीमती नजमा हेपतुल्ला यांनी अल्पसंख्याक विभागाची बैठक दिल्ली येथे बोलावली होती. पण दुर्दैवाने महाराष्ट्राचा प्रतिनिधी या बैठकीस उपस्थित राहू शकला नाही ही शोकांतिका आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमित देशमुख .....

अध्यक्ष महोदय, माननीय राज्यपालांनी आपल्या पहिल्या अभिभाषणात मराठी भाषेला अभिजात दर्जा देऊ असे जाहीर केले होते. पण अजूनही केंद्राकडून महाराष्ट्र सरकारकडून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आलेला नाही. हा दर्जा दिला तर दरवर्षी आपणास केंद्राकडून 500 कोटी रुपये मराठी भाषा विकासासाठी उपलब्ध होतील. यासाठी मंत्री महोदयांनी केंद्राकडे पाठपुरावा करावा व मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून द्यावा अशी विनंती करतो. धन्यवाद.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

06-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) MM-5

PNG/ AKN/ ST/ 16:20

श्री.चरण वाघमारे (तुमसर) : अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभाग, अल्पसंख्याक विकास विभाग व मराठी भाषा विभागाच्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर सूचना करण्यासाठी व पाठींबा देण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रस्ते बांधकामासाठी सरकारने 4050 कोटीची तरतूद करुन राज्याला दिलासा दिलेला आहे. रस्ते सुधारण्यासाठी अशा प्रकारची तरतूद अर्थसंकल्पात केलेली आहे. राज्य सरकारकडून स्टेट हायवेवर 400 सुलभ शौचालये बांधकामासाठी महत्वाचा निर्णय सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी घेतला आहे. आपण रस्ते बांधकामासाठी निविदेनुसार जो करार करतो, अनेक ठिकाणी पाहतो की, मजुरांचा अपघात झालेला आहे. मजुरांचा इन्शुरन्स केव्हा काढला जातो ? बील सादर केल्यानंतर त्यांचा इन्शुरन्स काढला जातो. त्यामुळे कोणताही क्लेम घेण्यासाठी तो पात्र ठरत नाही.

यानंतर एनएन-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चरण वाघमारे.....

आणि म्हणून माझी विनंती आहे की, कायद्यामध्ये इतकी चांगली तरतूद असेल तर मजूराचा विमा कामाच्या सुरुवातीलाच निघाला पाहिजे, जेणेकरुन त्याचा अपघात जरी झाला तरी मजूराला विम्याचा फायदा होईल. प्रत्येक साहित्यातून जी रॉयल्टी कापली जाते, ती ऑलरेडी बिलातून कापली जाते. बिलातून रॉयल्टी कापली जात असतानाही अवैध गौण खनिजाच्या नावाखाली अवैध वसूली केली जाते, ती थांबविण्यासाठी महसूल विभागासमवेत समन्वय साधून सार्वजनिक बांधकाम खात्याने काहीतरी मार्ग काढला पाहिजे. ई-निविदेसंदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी आपापल्या भावना व्यक्त केल्या. दहा लाखापर्यंतची कामे विना निविदा देण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला तर सर्व भागामध्ये समतोल विकास साधण्याकरिता त्याचा निश्चितपणे उपयोग होईल.

अध्यक्ष महोदय, व्हीआर आणि ओडीआर रस्त्यांची कामे पीडब्ल्यूडी करु शकत नाही. व्हीआर आणि ओडीआरचा अनुशेष दूर करण्यासाठी सन 2021 चा रस्ते विकास आराखडा तयार करण्यात आलेला आहे. यामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. कारण जिल्हापरिषदेकडे जे ओडीआर आणि व्हीआर दिलेले आहेत, त्याचा विचार केला तर व्हीआर म्हणजे ग्रामीण रस्त्यावर छोटे पूल व छोटे रस्ते बनविण्याकरिता 3054 अंतर्गत निधी दिला जातो. इतर जिल्हा मार्गाकरिता मोठे पूल आणि मोठे रस्ता बनविण्याकरिता निधी दिला जातो. पण या निधीचे छोटया छोटया कामांमध्ये तुकडे केले जातात. खड्डे बुजविण्याकरिता अर्धा कि.मी.रस्त्याचे काम .100 मीटर रस्त्याचे काम, 200 मीटर रस्त्याची कामे या 3054 आणि 5054 हेडअंतर्गत मिळणा-या निधीमध्ये होणार असतील तर राज्यातील ओडीआर आणि व्हीआरचा सातत्याने अनुशेष वाढत जाईल. ओडीआर रस्ते हे अपग्रेड करण्याचा कार्यक्रम शासनाने नव्याने सुरु करावा. ओडीआरचे एमडीआरमध्ये स्थांतर झाले तर बजेटमधून मोठया प्रमाणात त्याकरिता निधी मिळेल. त्यामुळे ओडीआरचा अनुशेष दूर करणे शक्य होईल.

अध्यक्ष महोदय, मी गेल्या दीड वर्षापासून सतत मागणी करीत आहे. माझ्या विधानसभा क्षेत्रामध्ये तुमसर शहरातून एक बायपास रस्ता प्रस्तावित आहे. या वर्षी अर्थसंकल्पामध्ये त्या रस्त्यावर कोणत्याही प्रकारच्या निधीची तरतूद केलेली नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चरण वाघमारे.....

त्या बायपास रस्त्याच्या कामाकरिता जमीन संपादनासाठी मागील वेळी 70 लक्ष रुपयंची तरतूद केली होती. नवीन भूसंपादन कायद्यानुसार अधिकची मागणी लक्षात घेता यावर्षी शून्य तरतूद आहे. बायपास रस्त्याकरिता तरतूद करावी. मोहाडी नगरपंचायतीतून जाणारा बायपास रस्त्याची मागणी केली होती पण ती मागणी या अर्थसंकल्पामध्ये दिसत नाही.

अध्यक्ष महोदय, तुमसर आणि मोहाडी तालुक्याच्या प्रशासकीय इमारतीचे प्रस्ताव 2012 पासून शासनाकडे सादर केलेले आहेत. या प्रशासकीय इमारतींची मागणी अद्यापहि पूर्ण झालेली नाही. भूसंपादन कायद्यानुसार तुमसर - पिपरा रस्त्यावर गेल्या दहा वर्षापूर्वी पूलिया बनविण्यात आला हेाता. याकरिता ज्या शेतक-याची जमींन संपादित केली त्याला मोबदला मिळाला नाही. धुसाळ-घोरपड हा रस्ता दहा वर्षापूर्वी बांधला होता. या रस्त्याकरिता ज्या शेतक-यांची जमीन गेली त्यांना अजूनही मोबदला मिळालेला नाही. प्रतीवर्षी एमडीआर आणि स्टेट हाय वे वरील खड्डे भरण्यासाठी मान्सूनपूर्व पूर्व कार्यक्रम येतो. त्या कार्यक्रमाची 100 टक्के अंमलबजावणी होताना दिसत नाही. माझ्या मतदारसंघामध्ये या वर्षी मान्सूनपूर्व खड्डेभरणीचा कार्यक्रम एकाही रस्त्यावर करण्यात आला नाही. असे असताना याकरिता असलेले पैसे कुठे गेले याबाबतही माहिती मिळालेली नाही. याची चौकशी झाली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, मंत्रालयात अनेक कामांच्या संदर्भात चौकशा आणि समित्या नेमल्या. त्या चौकशी समित्यांचे अहवाल सादर झालेले आहेत. आता त्यावर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. ज्या बांधकामाची चौकशी समितीचे अहवाल आपल्याकडे सादर झाले असतील तर कुठेही कोणाची गय करु नका. अन्यायाचा प्रतिकार करण्याकरिता युती सरकार स्थापन झालेले आहे. ज्या ज्या चौकशा आपल्याकडे प्रलंबित असतील त्या चौकशांचे गंभीर्य लक्षात घेऊन त्या सर्वप्रथम निकाली काढा. त्यामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर): अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पीय मागण्यांवर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे..

अध्यक्ष महोदय, माझ्या इंदापूर तालुक्यामध्ये प्रशासकीय इमारतीकरिता शासनाने 16 कोटी रुपये मंजूर केले होते. त्यातील केवळ 5 कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाल्यामुळे ती प्रशासकीय इमारत अर्धवट अवस्थेत पडून आहे. निधीअभावी या इमारतीचे काम अपूर्णावस्थेत असून केवळ इमारतीचे सांगाडे त्या जागी उभे राहिलेले आहेत. तालुका स्तरावरील सगळीच कार्यालये एकत्रित आणण्याच्या दृष्टीने या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम सुरु केले होते. जुनी इमारत मोडकळीस आल्यामुळे जनतेला त्रास होत होता. इंदापूर येथील प्रशासकीय इमारतीकरिता शासनाने लवकरात लवकर पूर्ण निधी उपलब्ध करुन द्यावा.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये अल्पसंख्याक लोकसंख्या जास्त प्रमाणात आहे तरीही त्यांच्या विकासाकरिता एक रुपयांचेही वाटप माझ्या मतदारसंघामध्ये झालेले नाही. राज्यमंत्री महोदय हे आमच्या जिल्हयातील असल्यामुळे त्यांनी अल्पसंख्याक निधी आमच्या तालुक्याकरिता उपलब्ध करुन द्यावा, अशी मी विनंती करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.शशिकांत खेडेकर(सिंदखेडराजा): अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसकल्पीय मागण्यांवर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, बुलढाणा जिल्हयातील स्टेट हाय वे यांचे नॅशनल हाय वे मध्ये रूपांतर करण्याकरिता अधिक निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे माननीय केंद्रीय दळणवळणमंत्री श्री.नितीन गडकरी यांनी सांगितलेले आहे. माझ्या मतदारसंघातून जाणारा नागपूर व्हाया मेहकर-सुल्तानपूर-जालना-औरंगाबाद-पुणे हा राजमार्ग आहे. या रस्त्यावर खूप वाहतूक असते. या रस्त्यावर दररोज दीडशे ते दोनशे ट्रॉलर्स ये-जा करीत असतात. या राजमार्गावर अनेक खड्डे पडलेले असतात. यामुळे या रस्त्यावर अनेक अपघात होतात. अनेक बळी या रस्त्यावर गेलेले आहेत. कोणत्याही प्रकारचा निधी या रस्त्यावर दुरूस्तीसाठी प्राप्त झालेला नाही. सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पामध्ये सामान्यत: या रस्त्यावर निधी प्राप्त झालेला नाही. माझी विनंती आहे की, या रस्त्यावर होणारे अपघात टाळण्यासाठी या रस्त्याच्या दुरस्त्ीकरिता निधी उपलब्ध करून द्यावा. या रस्त्यावरील अपघात टाळण्याचे पुण्य माननीय मंत्री महोदयांच्या पदरात पडेल.

अध्यक्ष महोदय, माझा मतदारसंघ हा भौगोलिकदृष्टया मोठा मतदारसंघ आहे, माझ्या मतदारसंघातील रस्त्यांच्या किलोमीटर्सची लांबी मोठी आहे. अनेक वर्षापूसन एमडीआर ओडीआर व्हीआर हे रस्ते खराब झालेले आहेत. सिंदखेडा मतदारसंघातील लांबीने मोठया रस्त्यांकरिता शासनाने अतिरिक्त निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मी विनंती करीत आहे. सिंदखेडराजा आणि देऊळगाव राजा या दोन्ही तालुक्याच्या ठिकाणी शासकीय इमारती जुन्या आहेत. अनेक इमारती भाडयाच्या जागेवर आहेत. दोन्ही तालुक्याच्या ठिकाणी प्रशस्त प्रशासकीय भवन उभारण्याकरिता निधी उपलब्ध करून देण्यात यावा, एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री इम्तियाज जलिल (औरंगाबाद मध्य) : अध्यक्ष महोदय, आज यहाँ पर सम्माननीय श्री देवेंद्र फडणवीस साहब और वक्फ विभाग के माननीय मंत्री सदन में मौजूद रहते तो मैं उनके लिए यह कहना चाहता कि,

"शोहरत मिली जरासी तो शोहरत में खो गए,
सत्ता में आते ही तुम आराम से सो गए,
पहले सच तो तुम बहुत बोलते थे,
आज कुर्सी क्या मिली खामोश हो गए."

अध्यक्ष महोदय, मैं यह क्यों कहना चाह रहा हूं, जब वे विपक्ष में बैठते थे तो वे क्या कहते थे...दिनांक 2 अगस्त, 2013...भाजप के आमदार माननीय श्री देवेंद्र फडणवीस साहब क्या कह रहे है वक्फ बोर्डात मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. या घोटाळयामध्ये मंत्री महोदयांनी आणि आमदारांनी कशा प्रकारे जमिनी लाटल्या आहेत, हे आम्ही पुराव्यासह दिलेले आहे म्हणून आमची मागणी आहे की, या प्रकरणाची चौकशी सीबीआयकडे सुपूर्द करण्यात यावी. तत्कालीन मुख्यमंत्री सन्माननीय सदस्य श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी यावर उत्तर दिले होते की, या अहवालाचा अभ्यास सुरु असताना मंत्रालय इमारतीला आग लागली आणि हा अहवाल नष्ट झालेला आहे. या अहवालाचा संपूर्ण अभ्यास झाल्याबरोबर लगेच सीबीआरकडे तपास देण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. इम्तियाज जलिल.....

अध्यक्ष महोदय, यह 2013 की बात है. दिनांक 2 अगस्त, 2013...उसी डिबेट में हिस्सा लेते हुए सम्माननीय श्री एकनाथराव गणपतराव खडसे-पाटील साहब क्या कहते है वह सुनिए. सीबीआय चौकशीची मागणी का मान्य करण्यात येत नाही. वक्फ बोर्डात कोट्यावधी रुपयांचा घोटाळा झालेला आहे. या समाजाच्या अनेक जमिनी हडप केल्या गेल्या आहेत. मग सीबीआय चौकशीस अजून का टाळाटाळ करीत आहात, आपण कोणाला संरक्षण देत आहात. ये वक्फ बोर्ड के बारे में कहा गया है. जब उन्होंने सवाल किया तो इन्होंने जवाब दिया. ऐसा जब कि जब बच्चे खेलते है तो अक्सर खेल में ऐसा होता है कि तुम मुझे मारे जैसा करना और मै रोए जैसा करुंगा. इन्होंने सवाल किया और उन्होंने जवाब दे दिया. बात वहीं पर खत्म हो गई. हम आपसे कह कहना चाहते है कि क्या वजह है कि हर साल अल्पसंख्यकों को खैरात की तरह कभी 300 करोड़, कभी 400 करोड़ रुपये दिए जाते है. हमने पहले भी कहा है. आज भी यही बात दोहरा रहे है. एक पैस मत दीजिए. 300-400 करोड़ रुपये देकर आप अल्पसंख्यक समाज को खुश मत कीजिए. केवल एक फैसला कर लीजिए कि अल्पसंख्यक समाज की जितनी भी वक्फ बोर्ड की जितनी जमीन है, वह बहुत सारे लोगों ने हड़प कर ली है. वह जमीन वक्फ बोर्ड को दुबारा वापस कर दीजिए. लेकिन आप ऐसा नहीं करेंगे. आप ऐसा नहीं करना चाहते. आप क्या करेंगे ? अक्सर ऐसा होता है कि यदि नीयत में खोट हो तो इन्साफ की उम्मीद बेमाईने हो जाती है. आप करेंगे क्या ? आँख में धुल झोंकने के लिए एक कमिशन बनाएंगे. बहुत सारे कमिशन बनाए थे. रंगनाथ मिश्रा कमिशन, सच्चर कमिशन, मेहमुद्दीन रहेमान कमिशन. जब करोड़ों रुपये का घोटाला सामने आया तो ए.टी. शेख कमिशन बनाया गया. उन्होंने इतना बड़ा रिपोर्ट दिया कि कौन कौनसे लोग इस भ्रष्टाचार में शामिल है. आप रिपोर्ट पढ़िये. आपके और हमारे आमदार, खासदार, बहुत सारे नेता आपको उसमें मिलेंगे. उस रिपोर्ट का क्या हुआ ? वह रिपोर्ट आपने ठंडे बस्ते में डाल दिया. मैं आपको यह दिखाना चाहता हूं. महाराष्ट्र वक्फ मंडळ कथित गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या न्यायमूर्ती श्री. ए.टी.शेख यांच्या चौकशी अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने शासनाने केलेल्या कार्यवाहीचा कृती अहवाल. इस कृति अहवाल के संबंध

.....2.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री इम्तियाज जलिल....

में कुछ भी नहीं किया गया. कोई भी गिरफ्तार नहीं हुआ. एक एकड़ जमीन भी आपने वापस नहीं ली है. लोगों की आँखों में धुल झोंकने का काम कर रहे है. उस वक्त के काँग्रेस के मंत्री श्री आरिफ नसीम खान यहाँ पर भाषण कर रहे थे, उन्होंने कहा कि मुसलमानों को, मायनॉरिटीज को एक हजार करोड़ रुपये का बजट देना चाहिए. मेरा सवाल है कि आपकी क्या मजबूरी थी ? आप 15 साल सत्ता में थे. एक हजार करोड़ तो छोड़ दीजिए, 500 करोड़ रुपये भी नहीं लेकर आए. आप किस मुंह से मांग रहे है कि एक हजार करोड़ रुपये देना चाहिए.

अध्यक्ष महोदय, उनके बहुत सारे नेता यह कह रहे है कि वक्फ बोर्ड में इस तरह का घोटाला हो रहा है. सम्माननीय श्री आरिफ नसीम खान साहब कह रहे है, सब लोग कह रहे है. यदि वक्फ बोर्ड की इतनी ही चिंता है...आप और आपकी पार्टी, कल के कल मुख्यमंत्री जी को, सरकार को एक पत्र दीजिए कि वक्फ बोर्ड के घोटाले की सीबीआई से इन्क्वायरी करवाईए, दूध का दूध और पानी का पानी हो जाएगा. समझ में आ जाएगा कि आप लोग दूध के कितने धुले है.

अध्यक्ष महोदय, मायनॉरिटी के बजट की बात होती है. इस बारे में अक्सर ऐसा होता है कि आप जिस तरह से एससी, एसटी, ओबीसी के लिए डायरेक्टर ऑफ सोशल वेलफेअर कायम किया है, जितनी भी योजनाएं है, जितना भी पैसा आता है, वह डायरेक्टर ऑफ सोशल वेलफेअर के माध्यम से होता है. हमारी मांग है कि इसी तर्ज पर एक ही छत के नीचे डायरेक्टर ऑफ सोशल वेलफेअर बना दिए तो हो सकता है कि मायनॉरिटीज की जो अलग अलग योजना है वह एक ही छत के नीचे रहेगी, एक ही विभाग के अंडर रहेगी.

अध्यक्ष महोदय, आप महाराष्ट्र में देखिए कि पान वाला कौन है ? मुसलमान. रिक्षा चलाने वाले कौन है ? मुसलमान. ट्रक चलाने वाले कौन है ? मुसलमान. चाय की टपरी मुसलमान चलाता है. हम आपसे यही अपील करना चाहते है कि मुसलमानों को पढ़ने दीजिए. उनके लिए स्कूल और कॉलेज खोलने चाहिए. हम खड़े होकर यह कहते है कि सरकार के पैसों से कोई स्मारक नहीं बनना चाहिए, कोई पुतला नहीं बनना चाहिए. हम यह मानकर चलते है, यह कहने के लि बहुत हिम्मत लगती है कि आप इस बारे में सरकार का पैसा खर्च मत कीजिए. उसी तरह हम यह भी कह रहे है कि सरकार का पैसा, करोड़ों रुपया जो हज की सब्सिडी के तौर पर देते

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री इम्तियाज जलिल.....

है वह बंद कर दीजिए. किसी भी जात और धर्म के लिए सरकार ने पैसा देना ही नहीं चाहिए. उस पैसों के मुसलमान बच्चों के लिए स्कूल खोलिए, कॉलेज खोलिए, स्कॉलरशीप दीजिए, नौकरियां दीजिए. आप स्कॉलरशीप देते है. लेकिन कोई बैंक अकाऊंट्स खोलने के लिए तैयार नहीं है. इस ओर ध्यान दिया जाना चाहिए. समय के अभाव में इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं, धन्यवाद.

.....4.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. राहुल कुल (दौंड) : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील सार्वजनिक बांधकाम, अल्पसंख्याक विकास विभाग आणि मराठी भाषा विभागातील अनुदानाच्या मागण्यांसबंधी मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल माननीय अध्यक्षांचे आभार व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, मी फक्त सूचना करणार आहेत. मी दोन गोष्टींबद्दल मुख्यमंत्री महोदयांचे अभिनंदन करणार आहे. केंद्रीय मार्ग निधीच्या माध्यमातून राज्यासाठी निधी आणल्याबद्दल मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंत्री महोदयांनी अष्टविनायाक मार्गाची घोषणा केल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. अष्टविनायक मार्गाचे काम लवकरात लवकर सुरु करावे, अशी माझी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंत्री महोदयांकडे विनंती आहे. त्यामुळे देशातील सर्व भाविकांना त्याचा फायदा होणार आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातून रेल्वे जात असून, त्याच्या दोन्ही बाजूला माझा मतदारसंघ व्यापलेला आहे. मध्यंतरी सदर रेल्वेपूल करण्यासाठी यादी तयार करण्याचे काम सुरु असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंत्री महोदयांनी आम्हाला सांगितले होते. सदरहू रेल्वेपूल लवकरात लवकर पूर्ण करावा अशी माझी विनंती आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून 50 टक्के निधी उपलब्ध करुन देऊन सदर रेल्वेपूलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, ज्या भागात काळी माती आणि नियमित माती आहे, अशा भागातील रस्त्यांसाठी समान निधी दिला जातो. यामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. ज्या भागातील रस्ते काळ्या मातीमधून जात आहेत, अशा ठिकाणी जास्तीचा निधी देण्यासाठी शासनाने धोरण निश्चित करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंत्री महोदयांनी ओडीआर आणि एमडीआरचे सर्व प्रश्न समजून घेतले आहेत. परंतु, ग्रामीण भागातील रस्त्यांचा महत्वाचा प्रश्न आहे. अशा रस्त्यांचा समावेश बांधकाम विभागाच्या यादीमध्ये करावा अशा प्रकारची मागणी करीत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. राहुल कुल.....

अध्यक्ष महोदय, पुणे शहरातील वाहतुकीची समस्या लक्षात घेता पुणे चक्राकार मार्गाचे नियोजन 20 ते 25 वर्षापूर्वी केलेले आहे. मागील शासनाने त्याची अंमलबजावणी केलेली नाही. युती शासनाने पुणे चक्राकार मार्गाबाबत योग्य ती कार्यवाही करावी आणि पुण्यातील वाहतुकीच्या समस्येच्या संदर्भात दिलासा देण्यासाठी प्रयत्न करावा अशी मागणी करुन मी माझे भाषण संपवितो.

.....6.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील सार्वजनिक बांधकाम, अल्पसंख्याक विकास विभाग आणि मराठी भाषा विभागातील अनुदानाच्या फक्त तीन मागण्यांसंबंधी मी मागणी करणार आहे.

अध्यक्ष महोदय, अल्पसंख्याक विभागामध्ये ख्रिश्चन समाजाची वर्षानुवर्षे एक मागणी प्रलंबित आहे. जेरूसलेमला जाण्यासाठी आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या ख्रिश्चन समाजाला प्रवासाची सबसिडी देण्याची अनेक वर्षापासूनची मागणी प्रलंबित असून, त्याबाबत शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील दौलतनगर भागात अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी वसतीगृहासाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर ख्रिश्चन व मुस्लिम मुलींसाठी वसतीगृहाचा प्रस्ताव प्रलंबित आहे. यासंदर्भातील घोषणा मंत्री महोदयांनी आजच्या उत्तराच्या भाषणातून करावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मौलाना आर्थिक विकास महामंडळाचे ऑडिट गेली अनेक वर्षे झालेले नाही. याबाबत शासनाने भूमिका स्पष्ट करावी. धन्यवाद.

....7.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गोपालदास अग्रवाल (गोंदीया) : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील सार्वजनिक बांधकाम, अल्पसंख्याक विकास विभाग आणि मराठी भाषा विभागातील अनुदानाच्या मागण्यांसंबंधी बोलण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, गोंदिया जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विभाजनासाठी मंत्री महोदयांनी जे सहकार्य दिले आहे, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. कामाचा दर्जा वाढविलाच पाहिजे, या दृष्टीकोनातून मी गेली अनेक वर्षे प्रयत्न करीत आहे.

अध्यक्ष महोदय, गोंदिया जिल्ह्यामध्ये दोन डिव्हिजन झाले पाहिजे. यासंदर्भात मागील डिसेंबरच्या अधिवेशनात क्रातीकारी निर्णय घेतलेला होता, याबद्दल मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करीत आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील अडचणी सोडविण्यासाठी मंत्री महोदयांनी न्याय दिलेला आहे, याबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करतो. गोंदिया जिल्ह्यातील बायपासच्या कामासाठी 60 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. पण युटिलिटीसाठी शिफ्टिंगचे पैसे खूप कमी दिलेले आहेत. या रस्त्याच्या आवाक्यानुसार निधी देण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, गोंदिया जिल्ह्यात एक आगळी वेगळी ॲडमिनिस्ट्रेटिव्ह इमारत उभी केली जात आहे. या इमारतीचे काम अंतिम टप्प्यात आहे. या इमारतीसाठी 10 कोटी रुपये दिले तर 15 ऑगस्ट, 2016 पासून सदर इमारतीमध्ये काम सुरु करण्यास मदत होणार आहे. या इमारतीचे काम पूर्ण होण्यासाठी मंत्री महोदयांनी लक्ष द्यावे, अशी विनंती करीत आहे.

अध्यक्ष महोदय, गोंदिया पश्चिम बायपासचा नॅशलन हायवेमध्ये समावेश केलेला आहे. या कामासाठी सीआरएफमध्ये अर्थसंकल्पात 42 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. सीआरएफमध्ये या कामाऐवजी एक उड्डाणपुल मराटटोली रेल्वे क्रॉसिंगवर प्रस्तावित करावा अशी मागणी करीत आहे.

अध्यक्ष महोदय, गोंदिया बालाघाट रोड हा आंतरराज्यीय रस्ता आहे. या रस्त्याची अवस्था अतिशय वाईट झालेली आहे. त्यामुळे सदर रस्त्याच्या कामासाठी विशेष लक्ष द्यावे आणि "फ" गटात कमीत कमी 15 कि.मी.पर्यंतचे काम करावे, अशी विनंती करीत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गोपालदास अग्रवाल....

नाबार्ड अंतर्गत दोन कामे मंजूर केली होती. आपण अतिरिक्त दोन कामे घेण्याचे आदेश दिले, परंतु ते पुस्तकात छापून आले नाही. पुढील कालावधीत पुरवणी मागण्यांमध्ये दोन कोटी रुपयांच्या कामाचा समावेश करावा, एवढे बोलून मी माझे दोन शब्द येथेच संपवितो.

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) : अध्यक्ष महाराज, सार्वजनिक बांधकाम विभागाचे माननीय मंत्री श्री.चंद्रकांत पाटील यांचे मी आभार मानतो. त्यांनी रस्त्याच्या कामासाठी पैसे दिले. उमरगा येथे प्रशासकीय इमारत मंजूर असून त्यासाठी लागणारा निधी उपलब्ध करून द्यावा. माझ्या उमरगा मतदारसंघात सार्वजनिक बांधकाम विभागाची बारांबंगला ही जुनी इमारत विकसित करण्यासाठी बीओटी तत्वावर मागणी केलेली आहे, त्यास मान्यता द्यावी. माझा तालुका कर्नाटक राज्याच्या सिमेवर असल्यामुळे त्या सीमावर्ती भागातील रस्ते अतिशय सुस्थिती आहेत, परंतु महाराष्ट्रातील कर्नाटक राज्याच्या सिमावर्ती भागातील रस्त्यांची अत्यंत वाईट अवस्था झालेली आहे. या सीमावर्ती भागातील सर्व रस्त्यांची दुरुस्ती करावी.

अध्यक्ष महाराज, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत रस्ते मंजूर झाले, परंतु त्यासाठी भरीव तरतूद करावी. पीएमजेएसवाय अंतर्गत जसे रोड होतात त्याच धर्तीवर सीएमजेएसवायचे रोड झाले पाहिजेत. माझ्या मतदारसंघात लोहारा तालुक्यात शासकीय विश्रांतीगृहाची सोय नाही, त्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा. ग्रामीण भागातील रस्त्यांच्या कडेला खूप मोठ्या प्रमाणात काटेरी झुडपे वाढली आहेत. वळणाच्या ठिकाणी समोरचा रस्ता दिसत नसल्यामुळे त्या ठिकाणी मोठे अपघात होतात. पूर्वी या रस्त्यांवरील काटेरी झुडपे मजूी तोडत असत, परंतु आता मजुरांची संख्या कमी झाल्यामुळे ती झुडपे तोडली जात नाहीत. राज्य शासनाने 30:54 अंतर्गत एक वेगळे बजेट करून ती झाडे झुडपे काढण्याचे काम करावे. अध्यक्ष महाराज, आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी मनापासून आपले ऋण व्यक्त करून माझे दोन शब्द पुरे करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भास्कर जाधव (गुहागर): अध्यक्ष महाराज, टोल नाक्यावर जो गोंधळ होतो त्याकरिता श्री.तपन काने या मुलाने एक सॉफ्टवेअर तयार केले असून त्याचे प्रेन्झेटेशन एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालकांना दिलेले आहे. 500 मिटर अंतरावर वाहन आल्यानंतर तो ॲप ओपन केल्यावर तेथिल टोल नाक्यावर कळेल की, त्याने पैसे भरले किंवा नाही भरले. ते सॉफ्टवेअर आपण घेणार का? मी आपल्याला लेखी देतो ते सॉफ्टवेअर आपण विकत घ्यावे. दुसरी बाब अशी की पनवेल ते इंदापूर रस्त्याच्या संदर्भात आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये खुलासा करावा. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पुरे करतो.

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप कांबळे (अल्पसंख्यांक विकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, अल्पसंख्याक विभागाच्या मागण्यांवर बोलत असताना जवळपास पंधरा, सोळा सन्माननीय सदस्यांनी आपली मते या ठिकाणी मांडलेली आहेत. यामध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री नसीम खान, जयंत पाटील, अमिन पटेल, उन्मेश पाटील, सन्माननीय सदस्या श्रीमती मेधा कुलकर्णी, सर्वश्री शशिकांत शिंदे, चंद्रदीप नरके,शरद सोनावणे, श्रीमती तृप्ती सावंत, सर्वश्री अमित देशमुख, चरण वाघमारे, दत्ता भरणे, डॉ.शशिकांत खेडकर, सर्वश्री जैनुद्दनजी आणि आमचे सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार एवढ्या सन्माननीय सदस्यांनी या अल्पसंख्याक विभागावर बोलताना आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. बऱ्याच वक्त्यांनी येथे सांगितले की, वक्फ् बोर्डाच्या जमिनीच्या संदर्भात सर्व चौकशी करुन ज्या ठिकाणी गडबड झालेली आहे, वेगवेगळ्या व्यक्तिनी वक्फ् बोर्डाच्या जमिनी हडप केलेल्या आहेत. पंधरा वर्षाच्या कालावधीत वक्फ बोर्डाच्या जमिनी ज्या ज्या व्यक्तिनी बळकावल्या आहेत, जो भ्रष्टाचार झाला, त्याची चौकशी करावी, अशा प्रकारच्या भावना अनेक सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केल्या आहेत.

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महाराज, मॉर्डच्या संपाबाबत बोलणी सुरु होती म्हणून मी तेथे होतो. आपली परवानगी असेल तर माझे दोनच मुद्दे आहेत ते मांडून मी चर्चेला जाऊ इच्छितो.

अध्यक्ष : मंत्री महोदय बोलत आहेत, त्यांचे बोलणे आपल्याला अर्धवट सोडता येणार नाही. मंत्री महोदयांचे बोलणे संपले की, आपल्याला बोलायला संधी देतो.

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महाराज, जे.जे. हॉस्पिटलचे अधिष्ठाता डॉ.तात्याराव लहाने आणि मॉर्डचा विषय आपण काढला होता.

श्री.दिलीप कांबळे : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, वक्फ बोर्डाच्या जेवढ्या जमिनी आहेत, त्या सर्व जमिनींची चौकशी करुन त्या सर्व जमिनी वक्फ बोर्डाच्या ताब्यात लवकरात लवकरत घेण्यात येतील. गरज पडली तर सीबीआय चौकशी देखील केली जाईल. त्याचबरोबर अल्पसंख्याक समाजाचा निधी वाढवून मिळावा अशीही मागणी करण्यात आलेली आहे. 405 कोटी रुपये या अर्थसंकल्पात आम्हाला मिळालेले आहेत. याशिवाय पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून या ठिकाणी निधी देण्यात येईल.

अध्यक्ष महाराज, मौलाना आझाद महामंडळासाठी कोठेही निधी कमी पडू दिला जाणार

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप कांबळे...

नाही. ज्या प्रशिक्षण योजना आहेत, त्या अल्पसंख्याक समाजासाठी लागू केल्या जातील. ज्याप्रमाणे दलित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळते, दलित समाजाच्या योजनेसाठी संचालक आहेत, त्याच धर्तीवर लवकरच संचालक स्थापन करण्याचा आम्ही प्रयत्न करू. राज्यातील अल्पसंख्याक समूदायाच्या विकासासाठी सामाजिक न्याय विभागाच्या धर्तीवर संचालनालयाची व्यवस्था करता येईल. सन्माननीय सदस्य ॲड.शेलार यांनी हज यात्रेसाठी जाणाऱ्या मुस्लीम समूहाच्या बांधवाना निधी दिला जातो, त्याच धर्तीवर ख्रिश्चन समाजाला जेरूसलेमला जाण्यासाठी निधी देण्यात यावा, अशी मागणी केली आहे. याचाही राज्य सरकार विचार करेल. यासंदर्भात केंद्र सरकारला विचारणा करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, माझ्या मतदारसंघात अल्पसंख्याक समाजातील मुला/मुलींसाठी वसतिगृह असावे. त्या ठिकाणी जागा उपलब्ध असेल तर वसतिगृहला याच वर्षी मान्यता देऊ.

सन्माननीय सदस्य श्री.इम्तियाज जलील यांनी हज यात्रेकरूना निधी देण्याऐवजी मुस्लीम समूहाचे जे विद्यार्थी आहेत, त्यांना निधी द्यावा, अशी मागणी केली आहे. मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, हज यात्रेकरूना निधी दिला जाईल, त्याचप्रमाणे 50 हजार रूपयांची शिष्यवृत्ती कमी आहे ती वाढवून मिळावी असा मुद्दा त्यांनी उपस्थित केलेला आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, ज्या धर्तीवर दलित समाजातील मुलांना शिष्यवृत्ती दिली जाते. मोठ्या प्रमाणावर इंजिनिअरिंगसाठी, परदेशात शिकण्यासाठी, पी.एच.डी. करण्यासाठी सरकार सकारात्मक विचार निश्चित करेल. सन्माननीय सदस्य श्री.अमिन पटेल यांनी

दोन तीन मुद्दे उपस्थित केले आहेत, त्या मुद्यांचा सकारात्मक विचार करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन म्हणाले ते खरे आहे की, मोठा आवाज करून काही मंडळी बोलत असता. परंतु आपण सत्य सांगितले की, आमचे सरकार असताना सुध्दा अल्पसंख्याक समूहासाठी त्यांना न्याय देण्याची भूमिका मांडलेली नाही, त्यांचे मी स्वागत करतो. आपली मंडळी जे बोलत आहेत की, एक हजार कोटी रूपये अल्पसंख्याक विभागासाठी दिले पाहिजेत. मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, पुढील काळात लोकसंख्येच्या प्रमाणात शासन मुस्लीम समूहाला निधी उपलब्ध करून

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप कांबळे...

देईल. सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पीय योजनेत्तर आणि योजनेतंर्गत रुपये 404 कोटी 55 लाख रुपयांच्या मागण्यांना या सभागृहाने मंजूर कराव्यात, अशी मी विनंती करतो.

यानंतर..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनोद तावडे (मराठी भाषा मंत्री) : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या मराठी भाषा विभागाच्या अर्थसंकल्पीय मागण्यांवर बोलताना सन्माननीय सदस्य सर्वश्री अमित देशमुख, शशिकांत शिंदे व प्रा. मेधा कुलकणी यांनी मराठी भाषेच्या विषयावर मुद्दे मांडलेले आहेत. त्यातील बरेचसे मुद्दे हे शालेय शिक्षण, तंत्रशिक्षण या संदर्भातील होते. मराठी भाषा शालेयस्तरावर चांगल्याप्रकारे शिकविली गेली पाहिजे, निधी वाढवून दिला पाहिजे, मराठी भाषेचे विद्यापीठ सुरु केले पाहिजे, अशाप्रकारच्या मागण्या या चर्चेत केल्या गेल्या. या अनुषंगाने मी हे सांगू इच्छितो की, या विषयाबाबत आपण त्या त्या पध्दतीने प्रयत्न करीत आहोत. तसा अहवालही आहे.

मराठी विषयाला माहिती व तंत्रज्ञान या विषयाचा पर्याय ठेवू नये असेही सांगितले गेले. हा विषय शालेय शिक्षणचा आहे तरीही मी सांगू इच्छितो की, आपण डिजीटल इंडियाकडे जात असताना इयत्ता 11 व 12 वीला आय.टी. हा विषय दिलेला आहे. इयत्ता 10 वी पर्यंत जे बेसिक मराठी आले पाहिजे ते त्या विद्यार्थ्यांना येते. पुढे मराठीमध्ये अधिक शिकायचे असेल तर तो आर्टसला जाऊन मराठी विषय घेऊन शिकू शकतो. त्यामुळे आय.टी.कडे सायन्सच्या विद्यार्थ्यांनी हळूहळू जाणे या अर्थाने तो विषय केला आहे.

सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे यांनी मराठी भाषेचा कायद्याने वापर करण्याबाबत निर्णय घेतला पाहिजे असे मत व्यक्त केले आहे. आपण 64 नुसार मराठी ही राज्याची राजभाषा असेल अशी स्पष्ट तरतूद अधिनियमात केली आहे. सन्माननीय सदस्य श्री. अमीत देशमुख यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबतच्या पाठपुराव्याचा विषय मांडला आहे. सर्व पाठपुरावा करुन केंद्रीय कॅबिनेट समोर गेल्यानंतर याबाबत केंद्रीय कॅबिनेट सचिवांनी कळविले आहे की, अभिजात भाषेच्या मुद्यावर मद्रास उच्च न्यायालयात जनहित याचिका न्यायप्रविष्ट आहे. त्याचा निकाल लागला की, या विषयावरील कार्यवाही कॅबिनेटकडून केली जाईल.

अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने मराठी भाषा विभागासाठी योजनेतर 15 कोटी, 67 लाख, 13 हजार व योजनांतर्गत 10 कोटी, 67 लाख, 31 हजार अशा एकूण 26 कोटी, 34 लाख, 44 हजार इतक्या रक्कमेच्या सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पीय मागण्या सभागृहाच्या मंजुरीसाठी ठेवीत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे (अल्पसंख्याक विकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, वेळ कमी असल्याने व गिलोटीन असल्यामुळे मी अल्पसंख्याक विभागाबाबतचे माझे भाषण पटलावर ठेवणार आहे.

अध्यक्ष महोदय, मुलींची 36 व मुलांची 4 वसतीगृह उघडण्यास सरकारने मान्यता दिलेली आहे. टप्प्या-टप्प्याने औरंगाबाद, परभणी, शेलू, नांदेड, हिंगोली, जळगाव, भंडारा, अमरावती, अकोला, मुंबई, पुणे, सांगली, लातूर, चंद्रपूर, कळमनुरी, हिंगोली, कोल्हापूर, रायगड, जालना, वाशिम, रत्नागिरी, यवतमाळ, नागपूर, बुलढाणा आणि बीड या ठिकाणी ही वसतिगृहे उघडण्याचे ठरविलेले आहे.

अध्यक्ष महोदय, 6 ठिकाणी औद्योगिक प्रशिक्षण संस्था उघडण्याचा निर्णय झालेला आहे. त्या बरोबरच पॉलिटेक्नीक कॉलेजेस जळगाव, परभणी या दोन ठिकाणी उघडण्याचा आता निर्णय झालेला आहे. उर्दू घरांची निर्मिती करणे आणि उर्दूला चालना देणे यासाठी नांदेड, सोलापूर आणि मालेगाव या ठिकाणी उर्दू घर उघडण्यास आता मान्यता दिलेली आहे. मालेगावला एक उर्दू घर सुरु आहे.

अध्यक्ष महोदय, मघाशी सांगितले गेले की, वक्फ बोर्डाचा घोटाळा आहे. या घोटाळ्याच्या संदर्भात मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, पूर्ण चौकशी करणार आहोत. प्रामुख्याने वक्फ बोर्डाची प्रॉपर्टी यापुढे कोणालाही हस्तांतरित करता येणार नाही, यासाठी महसूल विभागाच्या माध्यमातून आणि राज्य सरकारच्या आदेशाने आता या प्रॉपर्टीवर प्रतिबंधिक सत्ता प्रकार असाच शिक्का असेल. त्यामुळे कोणालाही आता याच्या खरेदीविक्रीचे व्यवहार करता येणार नाहीत, अशा स्वरूपाची एक दुरुस्ती आपण करीत आहोत. वक्फच्या मालमत्तेच्या पाहणीसाठी पथक तयार करून त्याचा प्रस्तावही मंत्रिमंडळाकडे आलेला आहे. वक्फची मालमत्ता किती आहे, याची तपासणी करण्याकरिता सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहेत, त्याप्रमाणे नोंदी करण्याच्या संदर्भातील सूचना दिलेल्या आहेत. वक्फ मालमत्तेचा पुर्नसर्व्हे करण्याच्याही सूचना आहेत. ए.टी.ए. शेख यांच्या चौकशी समितीच्या संदर्भात म्हटलेले आहे, तो अहवाल राज्य सरकारला प्राप्त झालेला आहे. त्या अहवालामध्ये अनेक राजकीय नेते, काही अधिकाऱ्यांची नावे आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने डॉ. राजेंद्र शिंगणे, श्री. एस.एम. अजिज, श्री. तारिक अन्वर हे केंद्रिय मंत्री होते, श्री. ए.यु.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे ....

पठाण, श्री. असिफ पटेल व आणखीही काही राजकीय नेत्यांची व अधिकाऱ्यांची नावे यामध्ये आहेत की, ज्यांनी वक्फ बोर्डामध्ये घोटाळा केला, भ्रष्टाचार केला अशाप्रकारचा रिपोर्ट आहे. या सर्वांची चौकशी करण्यासाठी आवश्यकता भासल्यास पोलिसांच्या माध्यमातून ही चौकशी करुन फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या संदर्भातसुध्दा शासन कारवाई करील.

अध्यक्ष महोदय, जैन, शिख, बौध्द, पारसी या समाजाच्याबाबतीत त्या त्या ठिकाणी त्यांच्या लोकसंख्येनुसार किंवा आवश्यकतेनुसार हे सर्व निर्णय लागू करण्याचा राज्य सरकारचा विचार आहे. अल्पसंख्याकांना संरक्षण देणे, त्यांच्यासाठीच्या व्यवस्था निर्माण करणे, यासाठी एक वेगळा निधी राज्य सरकारच्या माध्यमातून वेगळया माध्यमातून करण्याचा प्रयत्न आहे.

अध्यक्ष महोदय, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ असेल तेथे कर्जाच्या संबधात यामधून जवळपास 100 कोटी रुपये केंद्र सरकारच्या माध्यमातून देण्याचे माननीय श्रीमती नजमा हेपतुल्ला मॅडमनी मान्य केलेले आहे. राज्याची गॅरंटी मिळाल्यानंतर, अशा स्वरुपाची प्रक्रियाय पूर्ण झाल्यानंतर ती रक्कम कर्जासाठी उपलब्ध होईल. शिष्यवृत्तीची रक्कम वाढविण्याबाबत सांगितल्याप्रमाणे ही शिष्यवृत्तीची रक्कम वाढविण्यासंदर्भातील निर्णय सरकार निधीच्या उपलब्धतेनुसार घेईल.

अध्यक्ष महोदय, असे अनेक निर्णय घेतले आहेत परंतु वेळ कमी असल्याने मी त्याबाबत बोलणार नाही. मुस्लीम आरक्षणाच्या संदर्भात सरकार निश्चितपणे विचार करीत आहे. मधल्या कालखंडामध्ये ऑर्डिनन्स लॅप्स झाला व अन्य कारणे आहेत तरी विधी व न्याय विभागाकडे याची तपासणी आपण केलेली आहे. दुसऱ्या आरक्षणाच्या संदर्भात घाईघाईत निर्णय घेतल्यामुळे सुप्रीम कोर्टाने व हाय कोर्टाने या संदर्भातील निर्णयांना स्टे दिला. असे होऊ नये याकरिता या संदर्भातील काळजीपूर्वक निर्णय राज्य सरकार घेईल.

अध्यक्ष महोदय, या विभागाच्या मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात, अशी मी विनंती करतो.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रकांत पाटील (सार्वजनिक बांधकाम मंत्री) : अध्यक्ष महोदय, आज 3 विभागांच्या मागण्या चर्चेकरिता होत्या तरीही अधिक सन्माननीय सदस्य सार्वजनिक बांधकाम विभागावर बोलले, त्या प्रत्येकाची एक वेगळी चिठ्ठी करुन मी माझ्याकडे ठेवली आहे. सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या मतदारसंघामध्ये काही कामे अपूर्ण आहेत, त्याबाबत जे मुद्दे मांडले आहेत, त्यांचा उल्लेख केला तर खूप वेळ जाईल. मी सर्वांना आश्वस्त करतो. सन्माननीय सदस्य सर्वश्री गोपालदास अग्रवाल, अमित देशमुख यांनीही विचार मांडले आहेत. या सर्व सन्माननीय सदस्यांच्या मतदारसंघाशी संबंधित जे विषय आहेत, त्याबाबत त्यांच्याशी व्यक्तिशः बोलून मी ते सर्व पूर्ण करतो.

अध्यक्ष महोदय, धोरण म्हणून चर्चेमध्ये ज्या काही गोष्टी उपस्थित करण्यात आल्या, त्या मांडण्यास मी जास्त प्राधान्य देतो. एक तर गेल्या दोन्ही वर्षांमध्ये या आधीचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे बजेट वाढवून देण्याचा प्रयत्न करण्यामध्ये व वाढवून मिळविण्यामध्ये आपण यशस्वी झालो. 4050 कोटी रुपयांचे बजेट सार्वजनिक बांधकाम विभागाला मिळाले. हे नवीन सरकार ज्यावेळेस आले त्यावेळेस 2900 कोटी रुपयांचे बजेट होते, गेल्यावर्षी ते 3800 कोटी रुपयांचे झाले आणि आता ते 4050 कोटी रुपये झाले आहे. या वाढत जाणाऱ्या बजेटमधून आपण काही प्राधान्यक्रम ठरवित आहोत. या प्राधान्यक्रमामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्रातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आणि एमएसआरडीसीच्या रस्त्यावर एकही खड्डा राहणार नाही, अशाप्रकारची काळजी आपण घेत आहोत. आपण असे घोषित केलेले आहे की, 31 मे पर्यंत महाराष्ट्रातील सार्वजनिक बांधकाम विभाग व एमएसआरडीसीच्या एकाही रस्त्यावर खड्डा नसेल. त्या अर्थाने महाराष्ट्र खड्डेमुक्त होईल.

अध्यक्ष महोदय, जिल्हापरिषदेकडे असलेल्या रस्त्यांबाबतचा विषय वारंवार उपस्थित करण्यात येतो. राज्यामध्ये एकूण प्रमुख राज्यमार्ग हे 6337 कि.मी. आहेत, राज्य मार्ग 33963 कि.मी. आहेत, एमडीआर 50232 कि.मी. आहेत व राष्ट्रीय महामार्ग आतापर्यंत 5858 कि.मी. होते ते आता 22 हजार कि.मी. पर्यंत जातील. असे 90532 कि.मी. लांबीचे रस्ते सार्वजनिक बांधकाम विभाग व एमएसआरडीसीकडे आहे. यावर आम्ही आता सभागृहाला असा शब्द देऊ शकतो की, 31 मे पर्यंत या रस्त्यांवर एकही खड्डा राहणार नाही याची संपूर्ण काळजी सार्वजनिक बांधकाम विभाग घेईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रकांत पाटील ....

अध्यक्ष महोदय, इतर जिल्हा मार्ग 52761 कि.मी. तर ग्रामीण मार्ग जवळजवळ 114557 कि.मी. आहेत. असे 167318 कि.मी. च्या रस्त्यांसाठी प्रामुख्याने आता मुख्यमंत्री सडक योजना आपण आणत आहोत. त्यात निधी कमी आहे, मला मान्य आहे परंतु, याचीसुध्दा एक योजना ज्यातून 30 हजार कि.मी. पर्यंतचे ग्रामीण रस्ते आपल्याला नीट करता येतील अशी योजना ग्रामीण विकास खाते करीत आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे ज्या लांबीचे रस्ते आहेत, त्यामध्ये आपण 2-3 टप्पे ठरविलेले आहेत. त्यामध्ये एक तर खड्डेमुक्त महाराष्ट्र म्हटलेले आहे. दुसरे म्हणजे मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्रामध्ये जे प्रमुख रस्ते आहेत जे प्रमुख हायवे आहेत, त्याबाबत वारंवार अशी मागणी करण्यात येते की, महिलांसाठी स्वच्छतागृहे असली पहिजेत. यावर्षीच्या बजेटमध्ये आपण तशी तरतूद केली आहे आणि 400 ठिकाणी अशाप्रकारची स्वच्छतागृहे केवळ महिलांसाठी नाही तर महिला व पुरुष अशा दोघांसाठी स्वच्छतागृहे, तेथे महिला बचत गटासाठी एखादा स्टॉल, छोटा अपघात झाला तर, लगेच औषधोपचाराची काही व्यवस्था असे एक चांगले डिझाईन आपण डेव्हलप केले असून ते आता फायनलही केले आहे. त्याप्रकारच्या 400 जागा संपूर्ण महाराष्ट्रातील वेगवेगळ्या प्रमुख रस्त्यांवर आपण आयडेंटिफाय केलेल्या आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रकांत पाटील.....

या 400 ठिकाणी एक छोटे स्ट्रक्चर करावयाचे आहे. त्या स्ट्रक्चरमध्ये महिला स्वच्छता गृह व पुरुष स्वच्छता गृह यांची व्यवस्था असेल. तसेच तेथे महिला बचत गटाचाछोटा स्टॉल रहाणार आहे. आपण यास प्राधान्य देत आहोत. तसेच राज्यामध्ये आपापल्या मतदार संघापुरता अनेक सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला. ज्याठिकाणी मोठ्या प्रमाणावर रेल्वे ट्रॅक आहेत, त्या ठिकाणी असलेल्या रस्त्यावर फाटक लावलेले असल्यामुळे रेल्वे येत असताना ते बंद करावे लागते. त्यामुळे ट्रॅकच्या दोन्हीही बाजूला जाणाऱ्या व्यक्तींचा किंवा वाहनांचा खूप वेळ जातो, तसेच तेथे अपघातही होतात. यासंदर्भात केंद्राची व राज्याची एक बैठक झाली. महाराष्ट्रातील सर्व रेल्वे फाटक असलेल्या ठिकाणी रेल्वे ब्रीज करण्याची आवश्यकता आहे. म्हणजेच आरओबी करण्याची आवश्यकता आहे. केंद्र सरकारने त्याबाबत यादी मागविलेली होती. आपण ती यादी अंदाजपत्रकासह सादर केलेली आहे. या आरओबीकरिता 50 टक्के निधी केंद्र सरकार तर 50 टक्के निधी राज्याने द्यायचा असतो. परंतु 50 टक्के निधी रेल्वे विभागाकडून दिला जाईल व 50 टक्के निधी केंद्रीय रस्ते वाहतूक मार्ग विभागाकडून देण्यात येणार असल्याचे केंद्राने मान्य केलेले आहे. यामध्ये निधी कमी पडल्यास तो राज्य सरकारने टाकायचा आहे. येत्या तीन वर्षामध्ये हे करण्यात येणार आहे. यासंदर्भातील सर्व्हे करुन डिझाईनसह सर्व रिपोर्ट रेल्वे विभागाला सादर करायचा आहे. याकरिता तीन वर्षाचा कालावधी सांगितलेला आहे. त्यानंतर रेल्वे विभागाकडून परवानगी दिली जाते. त्यामुळे येत्या तीन वर्षामध्ये महाराष्ट्रातील सर्वच रेल्वे फाटकाच्या ठिकाणी आरओबी असणार आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भातील मुद्दा मांडला. मी सर्वांना असा शब्द देतो की, येत्या तीन वर्षामध्ये महाराष्ट्रातील सर्व रेल्वे ट्रॅकच्या ठिकाणची फाटक पद्धत बंद होईल व त्या ठिकाणी आरओबी असतील.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रातील सीमेवरील आपले रस्ते हळूहळू चांगले होत आहेत. परराज्यातील कोणीही व्यक्ती सीमा ओलांडून महाराष्ट्रात येताना म्हणतो की, आता महाराष्ट्र सुरु झाला आहे. म्हणजे आपले रस्ते मोठ्या प्रमाणात खराब असल्यामुळे त्यांच्याकडून तसे म्हटले जाते. त्यामुळे राज्याच्या सर्व सीमांकडून 100 किलोमीटर आतपर्यंतचे सर्व रस्ते या वर्षीच्या बजेटमध्ये घेतलेले असून ते रस्ते अतिशय चांगले करण्याला आम्ही प्राधान्य दिलेले आहे. रस्त्याचे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रकांत पाटील.....

केंद्रीय मानांकन असते. त्या मानांकनाप्रमाणे प्रत्येक विभागामध्ये म्हणजेच महाराष्ट्रात एकूण 7 विभाग असून प्रत्येक विभागामध्ये किमान एक रस्ता करण्याचा प्रयत्न या वर्षीच्या बजेटमध्ये करणार आहोत. अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, आपण अनेक बाबी मांडतो परंतु त्याला मिळणारे बजेट तुटपुंजे असते. याकरिता आपण 4 हजार कोटी रुपयांची ॲन्युईटी देत आहोत.

ॲन्युईटी आणि हायब्रीड ॲन्युईटी म्हणजे काय याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी केला. ॲन्युईटी मध्ये सर्व पैसे सार्वजनिक बांधकाम विभाग देईल, ते पैसे दहा वर्षाच्या हप्त्यामध्ये देण्यात येईल आणि त्याला टोल नसेल. हायब्रीड ॲन्युईटीमध्ये त्याला 40 टक्के पैसे सार्वजनिक बांधकाम विभाग देईल आणि त्याने 60 टक्के पैसे टोलमधून वसूल करायचे आहे. परंतु त्यात छोट्या वाहनांना टोल नाही. त्या ठिकाणी केवळ मोठ्या वाहनांना टोल असेल. हायब्रीड ॲन्युईटीमध्ये 40 टक्के पैसे सरकार देईल व 60 टक्के पैसे काळाच्या ओघामध्ये टोलमधून गोळा करायचे आहेत. त्यामध्ये पारदर्शकता असावी, याकरिता डीजीटल कॅमेऱ्याच्या माध्यमातून वाहने मोजणे, ती मोजून त्यांना तेवढ्या वर्षाचा कालावधी देणे, ही बाब आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे आजपर्यंतच्या टोल धोरणामध्ये बाय बॅकची प्रोव्हीजन नव्हती, तसेच शेअरींगची प्रोव्हीजन नव्हती. परंतु नवीन टोल धोरणामध्ये या दोन्ही बाबी आपण आणत आहोत. आपल्याला ज्या क्षणाला वाटेल की, याचे पैसे परत देऊन हा टोल बायबॅक करायचा, त्यावेळी तो बायबॅक करता आला पाहीजे. तसेच ज्या दिवशी त्याने घातलेले पैसे, त्याचे 12 टक्के व्याज आणि 15 टक्के प्रॉफीट अशी रक्कम निघेल त्यानंतर कलेक्ट होणाऱ्या प्रत्येक टोलचे 90 पैसे सरकारचे आणि 10 पैसे विकासकाचे अशी शेअरिंगची देखील नवीन टोल धोरणामध्ये व्यवस्था केली जाणार आहे. त्यामुळे एकूण 21 हजार किलोमीटरचे रस्ते आगामी काळामध्ये ॲन्युईटीच्या माध्यमातून करण्यासाठी एक पूर्ण योजना तयार आहे. 21 हजार किलोमीटरमधील 4 हजार किलोमीटरचे 8 हजार कोटी रुपयांचे रस्ते येत्या महिन्याभरात ॲन्युईटीच्या माध्यमातून घोषित करीत आहोत. मी मघाशी चुकून 4 हजार कोटी रुपये असे म्हटले होते, परंतु ते 4 हजार किलोमीटरचे रस्ते असे समजावे. ही कामे पाच वर्षामध्ये म्हणजेच अजून साडेतीन वर्षे संपता संपता 21 हजार किलोमीटरचे रस्ते पूर्ण

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रकांत पाटील.....

होतील. एकूण लांबी 90 हजार किलोमीटर आहे. यातील 22 हजार किलोमीटरची लांबी नॅशनल हायवेमध्ये कनव्हर्ट होत आहे. 21 हजार किलोमीटरचे रस्ते आपण ॲन्युईटीतून केले तर जवळजवळ महाराष्ट्रामधील पीडब्ल्युडी, एमएसआरडीसीची लांबी बऱ्यापैकी पूर्ण करु शकू असे मला वाटते. अशा काही बाबी आपण प्राधान्याने करणार आहोत.

अध्यक्ष महोदय, व्यक्तीशः अनेक मतदार संघातील विषय मांडण्यात आले. सन्माननीय सदस्य श्री. चंद्रदीप नरके यांनी कोल्हापूर-गगनबावडा हा रस्ता चार पदरी व्हावा, असा मुद्दा मांडला. असे सर्वच विषय त्या, त्या आमदारांच्या नावाने लिहून घेतलेले आहेत. या सर्व बाबी पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी हॅब्रीड ॲन्युईटीची स्पष्टता मागितली होती, ती मी दिलेली आहे. परंतु एखादी खोटी बाब रेटून कशी बोलावी याबाबत त्यांनी बदल्यांच्या विषयामध्ये श्री. आनंद कुलकर्णी यांचे नाव घेऊन जी मांडणी केली, त्यामधून मी त्यांना अतिशय चांगले बक्षीस देईल. एखादी खोटी गोष्ट कशी निट मांडायची की, ती ऐकता ऐकता समोरच्या मानसाला खरी वाटली पाहीजे. त्यामुळे मी त्याबाबतचे स्पष्टीकरण करु इच्छितो. ज्यावेळी एखाद्या फाईलवर स्वाक्षरी करायची असेल, तेव्हा माननीय मुख्यमंत्री व मी सदरहू फाईल समजून घेऊनच स्वाक्षरी करीत असतो. गेल्या 15 वर्षामध्ये प्रमोशन झाले नव्हते. सार्वजनिक बांधकाम विभागाची एकूण 1100 परमोशन्सची कामे झाली. एकूण 1500 बदल्या झाल्या. यामध्ये आपण तीन, चार बाबींचा उल्लेख केला. एवढ्या मोठ्या बदल्या झाल्या आणि एवढ्या मोठ्या बदल्यांमध्ये व्हायला हरकत नाही, परंतु तेही झालेले नाही. आपण श्री. देबडवार यांचा उल्लेख केला. यात मोठ्या प्रमाणावर त्यांच्या, त्यांच्या पोझीशन्स बदलल्या. श्री. देबडवार हे मुंबईमध्ये एसई होते. त्यावेळी त्यांच्याकडे ॲडीशनली मंत्रालयाचा चार्ज होता. ते नंतर सीई झाले, तेव्हा ते मुंबईचे सीई झाले. आता त्यांना नागपूर महानगरपालिकेतील काम दिले. आपण श्री. तुंगे यांचा उल्लेख केला. ते एसई होते, नंतर प्रमोट होऊन सीई झाले व त्यामुळे ते अमरावती विभागामध्ये गेले. त्यामुळे अशा प्रत्येक गोष्टीचे व्यवस्थित लॉजीक त्या, त्या वेळी मांडले गेले आणि या सर्व बढत्या, बदल्या लॉजिकनेच झाल्या आहेत. यात श्री. आनंद कुलकर्णी यांनी कुठेही काही केलेले नाही. प्रत्येक बाब नीट तपासूनच माननीय मुख्यमंत्री आणि मी स्वाक्षऱ्या केलेल्या आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रकांत पाटील.....

परंतु एखादी गोष्ट कशी रंगवावी, कशी मांडावी आणि ती खरी कशी आहे, असे सर्व मांडावे, असा अतिशय उत्तम प्रयत्न सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी केला. त्यांनी ससपेन्शन आणि कन्टीन्युएशन बाबतीत मांडले. ते इतके वर्षे मंत्री होते, त्यांना माहिती आहे की, एखादी घटना घडल्यानंतर प्रथम ससपेंड करावे लागते. त्यानंतर विभागीय समिती नेमली जाते. त्या समितीच्या अहवालामध्ये दीड, दोन महिन्यांनी ज्यावेळी असे समोर येते की, त्या 22 पैकी संबंधित एकजण निर्दोश आहे. त्यामुळे त्याला पुन्हा कन्टीन्युएशन केले जाते. त्यामध्ये कोणता स्कॅम झाला. आधी सस्पेन्ड का केले व नंतर कन्टीन्युएशन का केले. मला वाटते की, त्याही विषयामध्ये जे झाले ते सर्व रितसर झालेले आहे. आपण 15 वर्षांचा सर्व बॅकलॉग काढलेला आहे. आपण या विभागाला एकूणच शिस्त लावण्याचा प्रयत्न केला आहे. मला असे वाटते की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून येत्या साडेतीन वर्षामध्ये महाराष्ट्रामध्ये आणखीही चांगली स्थिती निर्माण करु.

अध्यक्ष महोदय, केंद्रीय मंत्री माननीय श्री. नितीनजी गडकरी हे मोठ्या प्रमाणावर घोषणा करीत असून त्यापूर्ण होणार आहेत की नाही, यासंदर्भात देखील उल्लेख करण्यात आला. त्या घोषणा पूर्ण होणार आहेत. खूप मोठ्या प्रमाणात त्याची व्यवस्था व रचना केलेली आहे. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये आमच्याकडे निधी आहे. यावर्षी देखील आपण ही स्टेज आणलेली आहे. सर्व सन्माननीय सदस्य मान्य करतील. आपण त्या त्या मतदार संघामध्ये इतका निधी दिलेला आहे. बजेट मधील कामे पूर्ण होत नाहीत. गेल्या वर्षीच्या बजेट मधील एका एका कामाचे टेंडर निघेल, वर्क ऑर्डर निघेल आणि काम लवकर सुरु होईल याचा आपण प्रयत्न केला. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2016-2017 च्या एच-1 ते एच-11 एकूण 11 मागण्या आहेत. या मागण्यांची 10,175.90 कोटी रुपये अशी रक्कम आहे. या पैकी 5005.03 योजनांतर्गत व 5170.70 ही रक्कम योजनेत्तर असून आपल्या अनुमतीने सदर मागण्या पूर्ण करण्याची मी सभागृहाला विनंती करतो.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, मी मघाशी जे बोललो त्याचे पुरावे, म्हणजेच ट्रान्सफर कधी झाल्या, काय झाल्या याबाबतची कागदपत्रे सार्वजनिक बांधकाम मंत्री माननीय श्री. चंद्रकात पाटील यांना सादर करतो. आपल्याला ताबडतोबीने जी माहिती मिळाली त्यावर आपण बोलले,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रकांत पाटील.....

याबद्दल माझे दुमत नाही. परंतु श्री. देबडवार यांच्या तीन बदल्या झाल्या. श्री. ममदापुरेंच्या दोन बदल्या झाल्या. या बदल्या दोन, तीन महिन्यात झाल्या. त्यामुळे माझा आक्षेप त्यासाठीच आहे. एका मानसाची तीन महिन्यात किती वेळा बदली करायची. मी लॉजिकली सर्व एकत्रित केले असे नाही. तर बदल्या, बढत्या आणि त्यासाठी एका अधिकाऱ्याला मुंबई टू नागपूर असे दोन, दोन चार्ज देणे, या सर्वांची माहिती, त्या ऑर्डर्स, आपण दिलेले आदेश, रद्द केलेले आदेश त्या सर्वांचे पुरावे मी आपल्याकडे देतो. आपण ते तपासून पहावेत. या राज्यामध्ये कुलकर्णी यांना न्याय देता, देता शेवटी पाटलांवर अन्याय होऊ नये, याची आपण काळजी घ्यावी, एवढीच माझी विनंती आहे.

श्री. चंद्रकांत पाटील : अध्यक्ष महोदय, पाटलांनी पाटलांना न्याय देण्याचा प्रयत्न केला त्याबद्दल आभार. परंतु आम्ही कुठलाही विचार जातीच्या आधारावर करीत नाही. श्री. कुलकर्णी अतिशय चांगले, कर्तव्यदक्ष अधिकारी होते आणि प्रत्येक गोष्ट तपासूनच निर्णय झालेला आहे. आपण ज्या पुराव्यासंदर्भात सांगितले ते सर्व माझ्या पाठ आहेत. श्री. तुंगे, श्री. देबडवार, श्री. किशोर पाटील यांचा देखील आपण उल्लेख केला, याबाबतीतही मला सर्व पाठ आहे.

.....SS/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, श्री.कुलकर्णी यांना आपण क्लीन चिट देत आहात, त्यांच्या उद्योगाबाबत सभागृहात बोलणे बरोबर होणार नाही. सभागृहामध्ये बोलताना काही मर्यादा राखवयाच्या असतात म्हणून मी त्याबाबत अधिक बोललो नाही. त्यासंदर्भातील माहिती मी मंत्री महोदयांना देतो. परंतु त्यांनी कोणालाही क्लीन चीट देऊ नये, अशी आमची विनंती आहे.

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : आता मी सार्वजनिक बांधकाम विभाग, अल्पसंख्याक विकास विभाग व मराठी भाषा विभाग या विभागांच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक एच-2, एच-3, एच-4,एच-5, एच-6, एच-7, एच-8, एच-9, एच-11, झेडइ-1, झेडइ-2, झेडइ-3, झेडएफ-1, झेडएफ-2, झेडएफ-3, झेडएफ-4, झेडएफ-5 आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचीत दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकतो.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: अनुदानाकरिता मागण्या
मु.शी. : सन 2016-17 च्या अनुदानाकरिता मागण्या
1) संसदीय कार्य विभाग 2) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

अध्यक्ष : आता मी चर्चारोधानंतर असलेल्या विभागांच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक -

(एक) संसदीय कार्य विभाग -पी-1, पी-2, पी-3

(दोन) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय - झेडसी-1, झेडसी-2, झेडसी-3

आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचीत दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकतो.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

(प्रेस : सोबत जोडलेले मागण्यांचे जोडपत्र छापावे.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: प्रसंगावधान दाखवून केलेल्या उल्लेखनिय कागगिरीबाबत

मु.शी.: प्रसंगावधान दाखवून केलेल्या उल्लेखनिय कागगिरीसंबंधी माननीय परिवहन मंत्र्यांचे निवेदन.

श्री.दिवाकर रावते (परिवहन मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना सांगू इच्छितो की, आपण महसूल विभागाचे एक विधेयक आहे त्यावरील कामकाज अगोदर घेऊ या.

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, महसूल विभागाचे मुद्रांकाच्या पुर्णांक व अपूर्णांकीत रकमेसंबंधातील तांत्रिक दुरुस्तीचे एक सुधारणा विधेयक आहे. महसूल विभागाच्या दुसऱ्या विधेयकावरील चर्चेस वेळ लागणार आहे त्यावर या विधेयकानंतर चर्चा करण्यात येईल. सहकार विभागाचे विधेयक अगोदर घेण्याबाबत सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असेल तर ते अगोदर घेऊ त्यानंतर महसूल विभागाचे दुसरे विधेयक मांडण्यात येईल. आता आपण मुद्रांक सुधारणा विधेयकावरीच चर्चा घेऊ या.

...6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी. : मुद्रांक (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. XV OF 2016 (A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STAMP ACT.) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE.

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 15 - मुद्रांक अधिनियम यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

अध्यक्ष महोदय, या विधेयकामध्ये यापूर्वी मुद्रांक शुल्कासंदर्भात दुरुस्ती करण्यात आली होती. त्यामुळे ग्रास प्रणालीच्या माध्यमातून मुद्रांक शुल्काचे पैसे भरतात येतात. सदरहू प्रणालीच्या माध्यमातून देय शुल्क भरताना समजा; 30 पैसे, 49 पैसे अशी रक्कम देय असेल तर सुट्या पैशांची अडचण येते. अशा प्रकारची अडचण येऊ नये म्हणून सदरहू रक्कम राऊंड अप करण्यासंदर्भातील तांत्रिक दुरुस्तीबाबतचे हे विधेयक आहे. अशा प्रकारे रक्कम राऊंड अप केल्यामुळे जेवढी रक्कम देय आहे तेवढी ती नेमकी भरता येणे शक्य होणार आहे. त्यामुळे पुर्णांक व अपूर्णांकात येणारी देय रक्कम टाळता येणार आहे. याकरिता हे सुधारणा विधेयक मांडण्यात येत आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

अध्यक्ष : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा माननीय सदस्य श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांचा प्रस्ताव आहे त्यांनी तो मांडावा.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित.)

अध्यक्ष : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

....7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 15 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

अध्यक्ष : सन 2016 चे वि.स.वि क्रमांक 15 संमत झाले आहे.

यानंतर TT-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : नियम 293 च्या प्रस्तावाची चर्चा लांबत लांबत गेली आहे आणि ती आणखी उद्याच्या दिवस लांबत जाईल. मागच्या दोन आठवड्यामध्ये एकही बिल काढलेले नाही म्हणून आपण काल बिलावर चर्चा करण्यास सुरूवात केली आहे. चर्चा आपणस थांबविली आहे आणि त्यामुळे ती चर्चा आपण उद्या ठेवू.

श्री. एकनाथ खडसे : अध्यक्ष महोदय, चर्चा महत्वाची आहे आणि बिलही महत्वाचे आहे. हे विधेयक पुढे वरच्या सभागृहात जायचे आहे. माझी विनंती आहे की, आपण हे बिल मंजूर करावे. त्यानंतर आपण सहकाराकडे येऊ. हे विधेयक अत्यंत उत्तम आहे. सरसकट वर्ग-2 च्या जमिनी वर्ग-1 मध्ये संरक्षित करण्याच्या संदर्भातील हे विधेयक आहे.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपल्या ऑर्डर ऑफ द डे प्रमाणे आपण नेहमी जातो. माननीय महसूल मंत्र्यांनी विशेष बाब म्हणून ते आपल्याकडे येऊन त्यांनी सांगितले. त्यामुळे आपण त्यांच्या इच्छेला मान देऊन सर्व सभागृहाने 15 क्रमांकाचे विधेयक एकमताने मंजूर केले. या बिलावर चर्चाही केली नाही, एवढी सूट आपण दिली आहे. त्यामुळे आता आपण बिलाला सुरूवात करतो आहे. काल आपण क्रमांक 7 चे विधेयक सुरु केले होते त्या बिलावर चर्चा सुरू करणे आवश्यक आहे. त्या रुटिनने आपण लवकर लवकर कामकाज घेऊ.

अध्यक्ष : दोन्ही पक्षांचे या विधेयकावर एकमत झाले तर घेऊ नाही तर हे विधेयक घेण्यात येणार नाही.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, आपल्याला बिले घ्यायलाच हवीत. पण काल जे बिल आपण सुरू केले आहे. ते सहकाराचे विधेयक घेण्यात यावे.

अध्यक्ष : आपण सहकारावरील बिलाच्या चर्चेला सुरूवात करावी.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, माझा पॉईन्ट ऑफ इन्फोर्मेशन आहे. मला आपल्याकडून एवढीच माहिती पाहिजे की, मुंबई आणि कोकणाचा नियम 293 चा प्रस्ताव चर्चेला घेतलेला आहे. त्यावर आज चर्चा होईल की नाही एवढीच माहिती आम्हाला हवी आहे.

अध्यक्ष : त्या प्रस्तावावर उद्या उत्तर होईल. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील बोलत आहेत. इतर सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

श्री. नसीम खान : अध्यक्ष महोदय, आज आपली चर्चा घेण्याची इच्छा नसेल तर आमची हरकत नाही. पण उद्या ही चर्चा केव्हा घेणार आहात त्याची घोषणा करण्यात यावी. जेणेकरुन सन्माननीय सदस्य तयारी करुन येतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : प्रश्नोत्तरे आणि लक्षवेधी सूचना झाल्यानंतर साधारणपणे आपण घेतो.

श्री. नसीम खान : अध्यक्ष महोदय, उद्या लक्षवेधी सूचनेनंतर या प्रस्तावावरील चर्चेला सुरूवात करण्यात यावी अशी विनंती आहे.

अध्यक्ष : उद्या 293 च्या प्रस्तावावर थोडीशी चर्चा घेऊ आणि त्यावरील उत्तर होईल. आपण उद्या मांडावे. आपण आपल्या पक्षाकडून नाव का पाठविले नाही. आपण पहिल्यांदा त्याप्रमाणे नाव पाठवावयास हवे होते. आज ती चर्चा होणार नाही. उद्या ती चर्चा होईल त्यावेळी आपणास बोलण्याची संधी देण्यात येईल.

श्री. नितेश राणे : अध्यक्ष महोदय, आम्ही सात-सात दिवस तयारी करुन येतो आणि आम्हाला बोलण्याची संधी मिळत नसेल तर हे बरोबर नाही.

अध्यक्ष : हे बिल झाल्यानंतर आपण चर्चा करु. काही हरकत नाही. माझी तयारी आहे. आपण खाली बसावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. सहकारी संस्था अधिनियम, 1960 यात
आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.

L. A. BILL NO. VII OF 2016

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.)

(विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न पुन्हा प्रस्तुत झाला.)

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सहकार कायद्यामध्ये सुधारणा करणाऱ्या बिलावर आपण काल चर्चेला सुरूवात केली आहे. या सुधारणेमध्ये सहकाराचा जो मूळ गाभा आहे तो म्हणजे विश्वासाने एकत्रित येऊन आपल्या सहकारी संस्था चालविण्याचा असून त्या गाभ्याला तडा देण्याचे काम या बिलाच्या माध्यमातून सरकार करु पाहत आहे. काल मी नाशिक जिल्ह्याचे उदाहरण दिले होते. नाशिक जिल्हा असो किंवा अहमदनगर जिल्हा असो, त्या ठिकाणी सहकारी चळवळ ही खासगी कारखानदारीच्या बहरातून लोकांच्या लक्षात आले की, आपण सहकारी चळवळीतून साखर कारखाने उभे केले पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रातील या सहकारी चळवळीने 50, 60 आणि 70 च्या दशकामध्ये त्या भागातील परिसराची जी भरभराट केली, त्याबद्दल कोणी कधी शंका व्यक्त केलेली नाही. मी कालच्या माझ्या भाषणामध्ये सांगितले की, हल्ली काळाच्या ओघामध्ये या चळवळीमध्ये काही शंकेच्या बाबी निर्माण होऊ लागल्या आहेत. सामान्य माणसांना ही चळवळ आपली आहे असे वाटणारा काळ या चळवळीने एकेकाळी पाहिला होता. किंबहूना या चळवळीच्या सामर्थ्यामुळे शहरी, विरोधी ग्रामीण अशा दोन प्रकारच्या विकासाच्या आग्रह करणारे पण पूर्णपणे विकासाची पध्दत वेगळी असणारे वर्ग हळूहळू तयार झाले.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील.....

ग्रमीण भागातील शेतकऱ्यांना आणि ज्यांच्याकडे एक एकराच्या, दोन एकराच्या, चार एकराच्या शेतकऱ्याला एकत्रित येऊन भांडवल निर्माण करण्याचा एकमेव मार्ग सहकाराचा दिसला आणि म्हणून महाराष्ट्रात अनेक ठिकाणी लोक संघटित झाले आणि मागच्या अनेक सरकारने या चळवळीला पाठबळ दिले. आज महाराष्ट्रात कोणत्याही भागात आपण गेला तर काही ठिकाणी चळवळ अत्यंत यशस्वी झालेली आहे. काही ठिकाणी या चळवळीतील दोषामुळे चळवळ आणि संस्था अडचणीत आलेल्या आपण बघितलेल्या आहेत. काही ठिकाणी या चळवळीला सामान्य माणसानेच प्रतिसाद न दिल्यामुळे ही चळवळ कधी मूळच धरु शकली नाही. पण भारतामध्ये 1904 साली ब्रिटीशांनी सहकारी चळवळ कायद्यामध्ये रूपांतरित करुन चालवायला सुरुवात केली. 100 ते 125 जवळपास या चळवळीला होतील. या सहकारी चळवळीने या देशातील सर्वात लहान माणसाला स्वाभीमानाने आणि आर्थिकदृष्ट्या संपन्न अवस्थेत जगण्याची ईर्षा प्राप्त करुन दिली. अध्यक्ष महोदय, काल अहमदनगर जिल्ह्याचे उदाहरण सांगितले. अनेक शेतकरी रुहीया आणि अनेक मोठमोठ्या उद्योगपतींच्या दारात जाऊन आपला ऊस घालायचे आणि जो दर देईल त्याच्यावर अवलंबून राहून आपल्या जीवनाचे गुजराण करायचे. पण तो शेर माणसाला फार मोठा वाटायचा. हळूहळू काळाच्या ओघामध्ये सहकारी चळवळीतून माणसे कारखानदारी उभी करायला लागली. सूत गिरण्या उभ्या राहिल्या. विदर्भामध्ये सूत गिरण्या उभ्या राहिल्या, पश्चिम महाराष्ट्रामध्ये सूत गिरण्या उभ्या राहिल्या. या स्पेर्धेने झाल्या, ईर्षेने झाल्या, कापूस ज्याठिकाणी होत नाही त्याठिकाणी सूत गिरण्या का उभ्या करण्यात आल्या. अशाही चर्चा मागच्या 27-28 वर्षामध्ये सभागृहात ऐकलेल्या आहेत. पण मूळ सर्वांचे सहकारी तत्वाने या गिरण्या उभ्या करण्याचा प्रयत्न केला. पतसंस्था असतील, बँका असतील या सगळ्या संस्था सहकारी चळवळीवर उभ्या राहत असताना या सगळ्यांचा सार आणि गाभा एक होता की, एका विचाराने एकत्रित आलेले लोक आपली संस्था स्थापन करतात आणि आपली संस्था चालविण्याचा, जगण्याचा, एकमेकाला सहाय्य करण्याचा प्रयत्न करतात. मागच्या काही वर्षामध्ये या सहकारी चळवळीमध्ये काही दोषही आलेले आहेत, मी नाकारत नाही. काही भागामध्ये दुष्काळामुळे कारखानदारी अडचणीत आली.

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील.....

त्यानंतर ज्या व्यवसायात होते, सूताच्या असतील, साखरेच्या असतील, कपड्याच्या असतील त्या व्यवसायामध्ये संकट येऊन काही संस्था आजारी पडल्या. पण आतापर्यंत सरकारने या सहकारी संस्थांमध्ये शिरायचा प्रयत्न केला नाही. कारण आपले सूत्र, तत्व हे होते की, त्यांनी त्यांची संस्था चांगली चालवावी, त्यात जर काही दोष असतील तर त्या दोषासाठी आपल्याकडे कायद्यात व्यवस्था आहे. त्यांची चौकशी करायची, त्यांचे बोर्ड बरखास्त करायचे. सरकारला तर पूर्ण अधिकार आहेत. एखादा भ्रष्टाचार पुढे आला तर आपण बोर्ड बरखास्त केलेले आहे. कोणी यापूर्वी भ्रष्टाचाराने वागले असेल तर सहकारी चळवळीतील कोणत्याच संघटना असोसिएशन, फेडरेशन यांनी त्या चुकीच्या गोष्टींचे समर्थन महाराष्ट्रात केलेले नाही. म्हणून या सहकारी चळवळीत जिवंतपणा आहे. या सहकारी चळवळी स्वत:च्या पायावर उभ्या राहण्याचा सामर्थ्याने प्रयत्न केला. पण या सगळ्या गोष्टीत सरकार त्यांच्या मागे होते हे आपल्याला मान्यच करावे लागेल.

अध्यक्ष महोदय, आज खरे म्हणजे सन्माननीय सदस्य श्री.गणपतराव देशमुख बसलेले आहेत. त्यांनी 1980 दरम्यान सूत गिरणी सुरु केली. आज महाराष्ट्रात त्यांची सूत गिरणी उत्तम चाललेली आहे. आज सांगोला तालुक्यात दुष्काळ आहे. पण त्या सूत गिरणीच्या माध्यमातून विकासाचा दिवा लावण्याचे काम सांगोला तालुक्यात सन्माननीय सदस्य श्री.गणपतराव देशमुख यांच्या माध्यमातून सुरु आहे. आज 25 हजाराची सूत गिरणी मला वाटते 75 हजार चात्यापर्यंत पोहचलेली आहे. सहकार चळवळ व्यवस्थित चालू शकते याचे उत्तम उदाहरण आहे. या सभागृहामध्ये आपण अनेक वाईट उदाहरणेही देऊ शकतो. पण सरकारने जे चांगले आहे त्याला प्रोत्साहन देण्याची गरज असते. जे चुकलेले आहे, ज्याच्यात चुकीच्या गोष्टी होतात त्याच्यावर मर्यादा आणण्यासाठी कायद्याने आपण त्यांच्यावर काहीही गोष्टी करु शकते. सहकारी कायद्यात सर्व प्रोव्हीजन आहे. सरकार बील का आणते आहे. सरकारला असे वाटायला लागले आहे की, या सर्व सहकारी संस्थांवर वॉच ठेवण्यासाठी आपला माणूस त्यात गेला पाहिजे. या सहकारी संस्थांवर लक्ष ठेवल्याशिवाय यांना चाप लावल्याशिवाय, मर्यादा आणल्यावर, प्रगतीला खीळ घातल्यावर, भविष्यात अंधार आणल्याशिवाय या सहकारी चळवळीतील कार्यकर्ते थांबणार नाहीत. आपल्या चळवळीत चंचू

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील.....

प्रवेश होणार नाही. हा एक चंचू प्रवेश करण्याचा या सरकारचा प्रयत्न आहे. निवडणूका लढवा, निवडून या, आपल्याला जनता डोक्यावर घेते. अनेक ठिकाणी घेतलेले आहे. आदरणीयस्व. गोपीनाथ मुंडे यांचे कारखाने आहेत त्यांनी सहकारी चळवळीत चालविले. ते सत्तेवर असताना किंवा आम्ही सत्तेवर असताना एकमेकांच्या कारखान्यामध्ये संचालक नेमायचा कार्यक्रम यापूर्वी महाराष्ट्रात या सभागृहात कधी ऐकलेला नव्हता.

अध्यक्ष महोदय, आपल्या कारखान्यामध्ये, आपल्या दूध संस्थेमध्ये आता सन्माननीय मंत्री श्री.चंद्रकांतदादा पाटील त्यांना पाहिजे तो माणूस संस्थेमध्ये संचालक म्हणून नेमू शकता. हे कशात बसते, हा अविश्वासाचाच भाग आहे असे मला वाटते. माननीय राज्यमंत्री श्री.दादासाहेब भुसे याठिकाणी बसलेले आहे. हे विधयेक मंजूर व्हावे म्हणून बिचारे काल संध्याकाळपासून मेहनत करीत आहेत. मी काल संध्याकाळी सांगितले की, त्याचा उपयोग तुम्हाला होणार नाही. त्याचा उपयोग तुमच्या पुढच्या बाकावर होणार आहे. संचालकांच्या नियुक्त्या कधी हे तुम्हाला कळणारही नाही. मला खोलात जायचे नाही की कुठल्या पक्षात जायचे नाही. ही चळवळ निकोप चाललेली आहे. माननीय मंत्री श्री.गिरीष महाजन यांच्या जिल्ह्यामध्ये माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांच्या अनेक सहकारी संस्था आहेत. त्यांनी मनात आणले तर निवडणूकीने एखाद्या दुध संस्थेत किंवा सहकारी संस्थेत त्यांना जाता आले नाही तर ते माननीय मंत्री श्री.चंद्रकातदादा पाटील यांचा वापर करतील आणि आपला माणूस त्यांच्या संस्थेमध्ये घालतील. मागच्या दरवाजाने आत शिरण्याचा प्रयत्न सरकारमधील काही हितचिंतक करायला लागले. सन्माननीय मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांचे उदाहरण घ्या. त्यांचे अनेक हितचिंतक सरकारचे मित्र आहेत. त्यांच्या संस्थेतही कोणीही येऊन बसू शकते. सन्माननीय मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी कितीही आदळआपट केली तरी एकदा संचालक झाल्यावर काही खरे नसते.

अध्यक्ष महोदय, मला काल काही प्रेरणाच मिळत नव्हती. कारण सन्माननीय राज्यमंत्री श्री.दादासाहेब भुसे यांचे आणि आमचे चांगले संबंध आहेत. त्यामुळे त्यांच्याबद्दल काय बोलायचे हा प्रश्न होता. सहकारी चळवळीचे महत्व अधिक कसे वाढेल आणि ती स्ट्राँग होण्यासाठी आपल्या सर्वांचा हातभार लागला पाहिजे. राजकारणात कुठल्या संस्था कोणाच्या ताब्यात आहेत हे महत्वाचे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील.....

नाही. पण त्या संस्थेतून त्या भागाची काही सेवा होते की नाही, हे बघण्याचे काम सरकारने बाहेरून करायचे असते. सरकारने आत शिरून त्या भागाची सेवा होते आहे की नाही हे बघण्यासाठी मनात शंका घेऊन करायला लागले तर मात्र सहकारी चळवळीच्या मुळावर सगळ्या गोष्टी येण्याची शक्यता आहे. मदत करण्यासाठी आपण कधी नाही म्हटलेलेच नाही. सन्माननीय सदस्य श्री.पृथ्वीराज चव्हाण आले आणि कराडच्या एखाद्या साखर कारखान्याबद्दल विनंती केली तर तुम्ही नाही म्हणणारच नाही. पण आपला माणूस आमच्या चहापाण्यासाठी प्रत्येक संचालक मंडळाच्या प्रत्येक बैठकीसाठी पाठविण्याचा आपला हट्टाहास का? सन्माननीय सदस्य डॉ.जयप्रकाश मुंदडा सहकार मंत्री हाते. त्यांना विचारा त्यांनी आम्हाला किती मदत केली. फार चांगल्या पध्दतीने त्यांनी कामे केलेली आहेत. मी त्यांचे किती वेळा कौतुक केले हे त्यांना माहिती आहे. ते सहकार मंत्री असताना असा विचार त्यांनी कधीही केला नाही.

VV-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील .....

ही अशी माणसे कशी आत घुसवली. त्यामुळे दादा हे बिल तुम्ही मागे घेतले पाहिजे. त्यामुळे माननीय श्री.चंद्रकांत दादांना माझी विनंती आहे की, हे बिल मंजूर करुण घेण्याचा त्यांनी आग्रह करु नये. मधल्या काळात सरकारने निर्णय केला. ज्या सहकारी संस्था, बँका बरखास्त झाल्या. त्यांच्या संचालकांना यांनी 10 वर्षे संचालक पदावरुन काढून टाकले. एखाद्याला शिक्षा द्यायची तर एक टर्म द्यायची. चालू एक टर्म आणि पुढचे पाच वर्षे असे सहा वर्षासाठी काढण्याचा प्रघात आहे. परंतु माननीय श्री.चंद्रकांत दादांच्या सल्लागारे असा सल्ला दिलेला आहे की, ज्या बँका बरखास्त केलेल्या आहेत. त्या बरखास्त केलेल्या बँकामध्ये काम करणारे कधीच पुन्हा येता कामा नये याची व्यवस्था करणे गरजेचे आहे. रिझर्व्ह बँकेचे नाव सांगतात की, रिझर्व्ह बँकेनेच आम्हाला सांगितले आहे. ज्या पध्दतीने सहकारी चळवळीमध्ये बँका बरखास्त केल्यावर त्या संचालक मंडळाला पुन्हा 10 वर्षे येता येणार नाही. म्हणजे 15 वर्षे त्याची गेली. मी चुकीचा आहे किंवा नाही मी भ्रष्टाचार केला किंवा नाही ? अजून त्याची चर्चा व्हायची आहे. तो पॉईंट कॉन्टेस्ट व्हायचाच आहे अजून तरी देखील सरकारच्या मनात आले या बँका बरखास्त करायच्या. बँका बरखास्त केल्यावर त्या संचालक मंडळाला 10 वर्षे म्हणजे तीन टर्म, 6 वर्षे म्हणजे दोन टर्म सध्याची टर्म आणि पुढची टर्म त्यामुळे 15 वर्षासाठी एखाद्याला हद्दपार करण्याचा प्रयत्न करणे याचा अर्थ सरकार बायस आहे.

अध्यक्ष महोदय, सरकारला काही ठराविक चेहरे समोर दिसत आहेत. त्या चेहऱ्यांकडे बघून कायदे तयार करण्याचे काम आपण करायला लागलो तर चेह-यांसाठी सर्व सहकारी चळवळीवर अन्याय होऊ लागला आहे. आपल्याकडे ती म्हण आहे सुक्या बरोबर ओल जळते ओल्या बरोबर सुख जळते तसे ज्याला शिक्षा करावयाची आहे. दादा मला कधी तरी बोलवा कोणाला शिक्षा कशी करायची मी तुम्हाला सांगतो. सर्व सहकारी चळवळीचे कायदे करुन आपण सगळी सहकार चळवळ जखडून ठेवण्याची आवश्यकता नाही. आपण थोडेसे लिब्रल रहायला पाहिजे. आपण मनाने आहात, पण कायद्यात देखिल दिसायला पाहिजे. जेवढे आपण धरायला जाऊ तेवढे पळायला लागते, जेवढे मोकळे सोडू तेवढे परत यायला लागते. भारतीय जनता पक्षाला या विषयामध्ये जास्त रस असेल सहकार चळवळीच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील.....

तर तुम्ही या चळवळीला लिब्रलपणाने मदत करायला लागा. माणसांचे हृदय परिवर्तन करणे याला राजकारणात जास्त महत्व आहे. आपण हृदय परिवर्तन न करता प्रदेश पदाक्रांत करत गेलात, त्या हिटलरचे झाले, तो अगदी रशियापर्यंत गेला. हृदयाचे परिवर्तन करण्याऐवजी त्याकडे असणारा अधिकार, ताकद, सैन्याच्या ताकदी प्रमाणे अनेक प्रदेश पदाक्रांत केले. स्वतःच्या घरात अंडरग्राऊंड जाऊन त्याने आत्महत्या केली. जगाच्या पाठीवर आपला कायम कंट्रोल राहील, असा संभ्रम मनात कधी नसला तर तो कंट्रोल जास्त काळ टिकतो. माझी आपल्याला विनंती आहे की, कायद्याचे स्वरूप मोकळेपणाचे असले पाहिजे, कोणातही पक्ष असो चुकला तर त्याच्यावर बोट ठेवलेच पाहिजे. कोणी भ्रष्टाचार केला तर त्याला दडवून ठेवा, त्याला मदत करा, अशी आम्ही शिफारस कधी करणार. तो जो पर्यंत भ्रष्टाचारी आहे हे सिध्द होईपर्यंत दादा त्याच्याबद्दलचा दृष्टीकोन स्ट्रेट फॉर्वड असणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, सहकारी चळवळीच्या बद्दल मागच्या काही काळामध्ये 97 वी घटना दुरुस्त झाली. 97 वी घटना दुरुस्ती करताना संचालक मंडळ लहान झाले. पूर्वी 25 ते 26 संख्येचे संचालक मंडळ मोठया संस्थेत असायचे. राज्य बँकेचे संचालक मंडळाला बसायला मोठा हॉल आहे. 54 जणांचे संचालक मंडळ आहे. त्यामुळे त्यांची संख्या कमी झाली. माझे मत सहकार चळवळीचा मुळ गाभा, सर्वांना बरोबर घेऊन काम करणे. 10 संचालकापेक्षा 20 बरे, 20 पेक्षा 40 बरे, 40 पेक्षा 50 बरे यामध्ये निर्णय घेण्याच्या ऐवजी ती सभा होते. म्हणून थोडेसे बदल झाले. या संचालक मंडळामध्ये बँकांच्या बाबतीत जी कारवाही करतो, सहकारी चळवळीच्या अनेक बँकाच्या बाबतीत आमचे सरकार होते, त्यावेळी जिल्हा मध्यवर्ती बँका अडचणीत आल्या. काही मध्यवर्ती बँका नांदेड सारख्या आहेत. बरेच पुढारी त्या संस्थेचे संचालक होते. आमच्या सरकारने त्यांचा मुलाहीजा ठेवला नाही. जे चुकीचे आहे ते चुकीचे अशी आमची त्यावेळपासून भूमिका होती. त्याचा परिणाम नांदेड जिल्हयातील सामान्य कर्ज उचलणा-या शेतक-यावर झाला नाही पाहिजे. म्हणून ती माणसे बाजूला जात असतील तर त्यांना बाजूला काढले पाहिजे. नव्याने लोकांना संचालक म्हणून काम करुन त्या बँकांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण असताना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील.....

तीन चार बँकांना मदत करण्याचा प्रयत्न केला. यात आम्ही आमचा इंट्रेस्ट त्या सामान्य माणसाला मदत करण्याच्या पलिकडे ठेवला. जे कायद्याच्या कचाटयात सापडले, ते त्यांची फळे भोगतील जर त्यांनी चुका केल्या असतील. चुका केल्या नसतील तर ते त्यातून बाहेर येतील. हा नॅचरल दृष्टीकोन दादा आपण ठेवला तर दहा-दहा वर्षे माणसाना संचालक पदावर निवडून येण्यासाठी मज्जाव करणे, आपला दृष्टीकोन या चळवळीतल्या काही प्रमुखांकडे बघताना थोडासा वेगळा आहे. म्हणून अनेकांनी मत व्यक्त केलेले आहे की, दुसरी बाजू ही देखिल या सगळया कामासाठी आहे. सहकारावर मार्गदर्शन करा असे माननीय श्री.दादा भुसे यांनी सांगितले.

अध्यक्ष महोदय, माझी सरकारला विनंती आहे की, सहकार सम्राटांना चाफ, प्रशासक नियुक्त बँकाचे संचालक अपात्र, सहकार क्षेत्राला भूकंपाचे हादरे अशा बातम्या आहेत. मी जाता जाता एवढेच सांगेन ज्यांनी ज्यांनी सहकारी चळवळीला धक्का देण्याचा प्रयत्न यापूर्वी केला. भाजपच्या सरकारने नाही, काँग्रेसच्या सरकारातील काही लोकांनी या चळवळीच्या विरोधी भूमिका घेतली, ती लोक समाजामध्ये अप्रिय झाली. कारण ती चळवळ सामान्य लोकांची आहे. एखाद्या प्रमुखाने चुक केली असेल, ती प्रमुखाने केलेली चूक ही त्याला भोगावी लागेल. त्याचा परिणाम सहकारी संस्थेवर होऊ नये, त्या संस्थेमध्ये दोन संचालक देतो आहोत. ते देत असताना कायद्यामध्ये प्रोव्हिजन केलेली आहे. त्यामध्ये 11 संचालक असलेल्या संस्थेमध्ये एक प्रतिनिधी, 17 सदस्यीय संचालक मंडळात दोन कर्मचारी 25 किंवा त्यापेक्षा जास्त कर्मचारी वेतनावर कार्यरत असतील त्यातील संस्थेकडून कर्मचारी घ्यायचा अशी प्रोव्हीजन आहे.

अध्यक्ष महोदय, काल आम्ही निदर्शनास आणून दिले की, घटनेची काय पायमल्ली आहे. पण 73 AA मध्ये प्रोव्हीजन आहे. जो आपण नेमणारा सदस्य आहे त्याला संख्येमध्ये काऊंट करु नये त्या संख्येमध्ये.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभाध्यक्ष : सभागृहाची वेळ कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.नसीम खान : अध्यक्ष महोदय, मी विचारु इच्छितो की, कोकण व मुंबईची चर्चा अर्धवट राहिलेली आहे. यानंतर आपण ती चर्चा घेणार आहात की नाही ?

तालिका सभाध्यक्ष : याबाबत माननीय अध्यक्ष यांचेशी बोलून मी सांगतो.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सहकारी कायद्यात शासनाने जी दुरुस्ती आणलेली आहे त्यातून सरकारच्या वतीने दोन संचालक नेमणार असल्याचे सांगितले. मध्यंतरी मार्केट कमिटीमध्ये संचालक नेमण्याबाबत सरकारने एक विधेयक आणले होते. त्यावेळी धडाधड आमच्या मार्केट कमिटयांमध्ये संचालकही आले. जे लोकांमधून निवडून आले नव्हते ते आमच्या शेजारी येऊन बसायला लागले. माननीय मंत्री श्री.चंद्रकांत पाटील यांनी मला फोन करुन सांगितले असते तर मी माझ्या पॅनलमध्ये त्या लोकांना घेतले असते. आमचा काही प्रॉब्लेमच नाही. ते सर्व माझे मित्रच आहेत. पण लोकांच्यामधून निवडून न येता त्यांना संचालक मंडळामध्ये बसण्याचा अधिकार आपण दिलेला आहे. आम्ही म्हटले की कायदा आहे, कायद्यापुढे आपण काय करु शकतो. पण थोडयाच दिवसात हा कायदा विथड्रॉ करण्यात आला. आम्हाला वाटले की, आमचे ते दोन मित्र गेले की काय. सरकारने सांगितले की, त्यावेळी कायदा अस्तित्वात होता म्हणून केलेल्या नेमणूका कायम राहतील. आता आम्ही कायदा विथड्रॉ करीत आहोत, येथून पुढे काही करणार नाही. अशी नामुष्की सरकारवर या विधेयकामुळे येऊ नये. पण आता त्या नेमणूका थांबल्या आहेत. माझ्या माहितीप्रमाणे तुम्ही मार्केट कमिटीवरील या नेमणूका आता बंद केलेल्या आहेत. तसेच या विधेयकाच्या बाबतीत ज्या दोन नेमणूका करण्याचे आपण प्रयोजन केलेले आहे. त्यातील एक जण कर्मचाऱ्यांमधून निवडून येणारा संचालक आहे. पूर्वी आपण संचालक मंडळातून असा संचालक घेतच होतो.

श्री.चंद्रकांत पाटील : अध्यक्ष महोदय, हा नागरी सहकारी बँकांसाठी कर्मचारी प्रतिनिधीचा विषय आहे. जेथे शेअर कॅपीटल फॉर्ममध्ये सरकारची मदत आहे, तेथे घेण्यात येणाऱ्या दोन संचालकांपैकी एक तज्ञ व एक सहकार विभागाचा अधिकारी घेण्यात येणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील हे 11 व 17 संचालक असे म्हणत आहात. जे नागरी सहकारी बँकामध्ये कर्मचारी प्रतिनिधी म्हणून असायचे, ते आपल्या कायद्यातील बदलानंतरही होते. फक्त त्यांची संख्या 2 वरुन 1 झाली होती. त्यामुळे एकाच कायद्याच्या बदलामध्ये दोन वेगळे विषय आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभाध्यक्ष : मंत्री महोदयांनी ही बाब अगोदर सांगितली असती तर सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी अर्धेच भाषण केले असते.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय सहकार मंत्री श्री.दादाजी भुसे यांनी काल यावर मार्गदर्शन केले असते तर मी एवढा वेळ बोलून तुम्हाला त्रास दिला नसता. पण आता ही नवीन माहिती समोर आलेली आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.निलेश राणे यांना नियम 293 अन्वये प्रस्तावावर भाषण करायचे आहे म्हणून मी जास्त वेळ बोलणार नाही. कारण कोकणाचा प्रश्नही आम्हाला तेवढाच महत्वाचा आहे.

अध्यक्ष महोदय, ज्या संस्थांनी आपले भागभांडवल परत केलेले आहे त्या संस्थांमधे आपण ही तरतूद लागू करणार नाही. पण आपण ही तरतूद कशाकरिता आणलेली आहे, त्यामुळे आपला कोणता महत्वाचा उद्देश सफल होतो आहे हे आपण उत्तराच्या भाषणात सांगावे. आपण एखाद्या सरकारी अधिकाऱ्याला आमच्या संस्थेमध्ये नेमणार आहात की ज्याला आमच्या संस्थेचे ऑडीट करण्याचा अधिकार आहे. आम्हाला काही माहिती मिळाली तर आम्ही पळत जाऊन त्याला माहिती देतो. तो संचालक मंडळात बसून तो किती ठिकाणी जाणार आहे, आपण कोणत्या कॅटेगिरीचा माणूस कोणत्या संस्थेवर नेमणार आहात ? असे अधिकारी आले तर आम्ही स्वागतच करु त्याबाबत काही दुमत नाही. परंतु मंत्री महोदय हा हट्ट का करीत आहात. सन्माननीय सदस्य श्री.हसन मुश्रीफ यांनी काही केले असेल तर त्याबाबत आपण दोघे तिकडे बसून चर्चा करु पण त्यांची शिक्षा सर्व महाराष्ट्राला करणे बरोबर नाही. सन्माननीय सदस्य श्री.हसन मुश्रीफ यांनी फार काही बिघडवले आहे असे काही नाही. मी व्यक्तीगत बाबींमध्ये जात नाही. पण सरकार आता आपल्या सहकारी संस्थांमध्ये संचालक नेमणार आहेत. ते सरकारी कर्मचारी असतील तर To certain extend काही अडचण नाही. ते कोणत्या तरी राजकीय पक्षाचे सदस्य असतील म्हणून ते तेथे येत असतील तर आक्षेपार्ह होईल. पण तसे तुमच्या मनामध्ये दिसत नाही. या संचालकांच्या नेमणूका करण्यासाठी आपण आग्रहाने हे विधेयक आणण्याचे कारण काय आहे, हे अजूनही आमच्या लक्षात आलेले नाही. त्या संस्थेवर लक्ष ठेवण्यासाठी, त्या संस्थेच्या चुकीच्या गोष्टी होत असतील तर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील .....

ताबडतोब तुम्हाला कळण्यासाठी, त्या संस्थेच्या सर्व कारभाराची चौकशी करण्यासाठी तो तेथे जायला लागला तर त्याला अधिक माहिती मिळेल व तुम्हाला त्याची माहिती मिळून चुकीच्या गोष्टी टाळता येतील. तो त्या क्षेत्रातील आमच्यापेक्षा म्हणजे त्या संचालक मंडळापेक्षा फार तज्ञ आहे, म्हणून त्याला संचालक पद दिलेले आहे. आपण त्यांची नेमणूक करताना कोणती फुटपट्टी लावणार आहात हे सभागृहाला कळणे आवश्यक आहे. ज्या निकषाच्या आधारे तुम्ही त्यांना आमच्याकडे पाठविणार आहात, त्यालाही सन्मानाने वागविण्याची आम्हाला इच्छा कधी प्राप्त होईल जर त्याचे निकष चांगले असतील तर प्राप्त होईल. तो आम्हाला खरेच चांगला सल्ला देत असेल, संस्थेच्या संवर्धनासाठी त्याची मदत होत असेल तर आम्ही नक्की त्याचे स्वागत करणार आहोत. अजूनही माझी ही धारणा आहे की, अशा प्रकारचे विधेयक आणून सहकारी संस्थांवर आपला वॉच ठेवण्याचा प्रयत्न आहे. माननीय सहकार मंत्री यांचा अधिकार फार मोठा आहे. सहकार कायदा वाचला तर लक्षात येईल की, शेवटी 29 वे कलम आहे. या कलमामध्ये वर जे काही लिहिले आहे, त्यापेक्षा सहकार मंत्री यांच्या मनामध्ये जे काही येईल ते करण्याचा या कायद्यान्वये करण्याचा त्यांना अधिकार आहे. त्यामुळे आपले हे एकमेव खाते आहे की, सहकार खात्याचे पूर्ण अधिकार मंत्री महोदयांना आहेत, तुम्ही काहीही करु शकता. ते करण्याचा अधिकार असताना हा एक एक माणूस एक एका संस्थेमध्ये पाठवून त्याच्या हातामध्ये अधिकार देणे योग्य वाटत नाही. त्याने काम केले नाही व त्याच्या जबाबदारीतून फेल झाला तर मात्र आपणास संस्थेलाही जबाबदार धरता येणार नाही. त्यामुळे अशा Vicious Cycle मध्ये न अडकता मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, आपण उदार मनाने आणलेले विधेयक उदार मनाने मागे घ्यावे. या विधेयकामध्ये महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीचे हित सामावलेले नाही.

अध्यक्ष महोदय, आम्हाला खूप आनंद झाला की, कोल्हापूरचा माणूस सहकार चळवळीचा प्रमुख झालेला आहे. तुम्हाला कोल्हापूरातून माहिती आहे की, सहकार चळवळ काय आहे व काय नाही. गोकूळ सहकारी संस्थांपासून सर्वच संस्था आपणास चांगल्या माहिती आहेत. आपल्या कोल्हापूरमध्ये किती आदर्श सहकारी संस्था चालतात हे आपणास माहिती आहे. कोल्हापूर हे सहकारी चळवळीचे माहेर आहे. या कोल्हापूर जिल्हयातील मंत्री महोदयांना सहकार खाते

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील .....

मिळालेले असल्यामुळे आम्ही आतापर्यंत निर्धास्त आहोत. आमचे प्रश्न समजून घेणारा व्यक्ती या खात्याचा मंत्री झालेला आहे. या विधेयकामुळे 10 वर्षे एकदम लोकांना घरी घालविण्यामुळे आपल्याबद्दल समाजामध्ये संदेह निर्माण होणे हे आम्हाला कदापि मान्य होणार नाही. तुम्ही त्यांना दोष देऊ शकत नाही अशी व्यवस्था कायम राहिली पाहिजे असा आमच्या सर्वांचा आग्रह आहे. बाहेर असे बोलले जाते की, मंत्रिमंडळ जे निर्णय घेते, त्यातील निर्णय घेणारे लोक बाहेर बसलेली आहेत. ब्रेन वेगळाच असतो. ते अभ्यास करुन यांची कशी वाट लावायची याची सिस्टीम तयार करतात व तुम्हाला सांगतात की, हे इम्प्लीमेंट करा. मग ते कायद्याच्या स्वरुपात सभागृहात येते. आपल्या मागच्या ब्रेनचा मी उल्लेख करीत नाही. त्यांनी कितीही सांगितले तरी महाराष्ट्रातील सहकारी चळवळीला तडा जाणार नाही. तुमच्या काळात ही सहकार चळवळ कशी वाढेल हे पाहण्याचे आपण काम करावे. खरे म्हणजे कोकणच्या विकासाच्या प्रश्नावर चर्चा होण्याची तेवढीच गरज आहे. मी हा प्रश्न जास्त न लांबविता या विधेयकाचा पुनर्विचार मंत्री महोदयांनी करावा असे सांगू इच्छितो. मी बरेच मुद्दे काढले होते पण फार वेळ झालेला आहे. यानंतर कोकणच्या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य श्री.नितेश राणे यांचे मार्गदर्शन आपणास ऐकायचे आहे. या प्रस्तावावर फार सदस्य बोलणार असतील तर मीच कंटीन्यू करतो. जास्त सदस्य बोलणार असतील तर मी माझे मुद्दे का सोडू. कारण त्यांचे मुद्दे कमी होतील. त्यांना बोलण्याचा फार त्रास होणार नाही. पण विनोदाचा भाग सोडला तर माझे येथील तरुण सहकारीसुध्दा मंत्री महोदयांना हेच सांगतील असा विश्वास व्यक्त करतो. माझ्या सांगण्यावर नव्हे तर सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश आबिटकर, श्री.शंभुराज देसाई व श्री.चंद्रदीप नरके यांच्या सांगण्यावर विश्वास ठेऊन व प्रेरीत होऊन आपण हे विधेयक तासाभरात मागे घ्याल अशी अपेक्षा व्यक्त करतो व माझे दोन शब्द संपवितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.उन्मेष पाटील (चाळीसगाव): अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र सहकारी सुधारणा विधेयकाला समर्थन देण्याकरिता मी उभा आहे. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.जयंत पाटील यांनी महाराष्ट्रातील सहकाराच्या चळवळीबाबत चांगल्या रितीने ऊहापोह केलेला आहे. आमच्या सारख्या नवीन सदस्यांच्या मनामध्ये ख-या अर्थाने सहकारक्षेत्राबद्दल " विना सहकार नाही उध्दार " असेच ब्रीदवाक्य कोरले गेलेले आहे. एका बाजूने राज्यात सहकार वाढविण्यात आला. दुस-या बाजूने राज्यात सहकारातून स्वाहाकार वाढत आहे की काय अशी शंका सर्वसामान्यांच्या मनामध्ये येऊ लागली. शासनाने हे जे विधेयक आणलेले आहे, त्याचे मी स्वागत करीत आहे. शासनाच्या भागभांडवलातून सहकारी संस्था उभारल्या गेलेल्या आहेत. ज्या सहकारी संस्था शासनाच्या आर्थिक मदतीतून उभारल्या गेलेल्या आहेत. त्यातून ख-या अर्थाने समाजातील वंचित,दलित सर्वसामान्य घटकांना न्याय देऊन सहकाराला नव्याने ऊर्जितावस्था आणता येईल का? असे वाटले होते. यासंदर्भात मला आशिया खंडातील पहिला सहकारी कारखाना म्हणजे प्रवरा सहकारी कारखान्याचे नाव घेता येईल. हा सहकार माननीय श्री.गाडगीळ, स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या संकल्पनेतील आहे. आशिया खंडातील पहिला प्रवरा सहकारी कारखाना माननीय श्री.विखे पाटील यांच्या हातून साकारला गेलेला आहे. मला बोलताना खेद वाटत आहे की, गेल्या वर्षी यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्ष सहकार वर्ष म्हणून साजरे केले गेले. एका बाजूला सहकाराचा उदो उदो करीत असताना दुस-या बाजूला मला वाईट वाटते की, सहकार विकला गेला आणि राज्यातील लाखो करोडो सभासदांच्या भावनांशी खेळ केला गेलेला आहे. ज्या सहकारी संस्थांमध्ये शासनाचे भागभांडवल व योगदान असेल त्यावर निश्चितपणे शासनाचे नियंत्रण असलेच पाहिजे, हीच सर्वसामान्य जनतेची व लोकप्रतिनिधींची भावना आहे. एनसीडीसीच्या माध्यमातून, महाराष्ट्र शासनाच्या सहकार विभागाच्या माध्यमातून वेगवेगळया योजनांच्या माध्यमातून सहकाराला आर्थिक तंदुरुस्ती देऊन सहकाराला जिवंत ठेवून शेतक-यांच्या जीवनामध्ये हसू आणण्याचा प्रामाणिक हेतू यामागे होता.

अध्यक्ष महोदय, माझ्या खानदेशातील मतदारसंघाच्या बाजूला असलेला कन्नड येथील कारखाना, नांदगावच्या शेजारील मालेगाव येथील कारखाना यांची उदाहरणे देता येतील.

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.उन्मेष पाटील

या भागामध्ये आमच्या वाडवडिलांनी पोटाला चिमटे देऊन जमा केलेल्या भाग भांडवलाच्या माध्यमातून हे कारखाने उभारले गेले होते. ते कारखाने विकले गेल्यानंतर भागभांडवलदारांना कोणत्याही प्रकारचा मोबदला मिळाला नाही. त्या संस्थेचे कर्मचारी मुलाचे शिक्षण व मुलीचे लग्न या जबाबदा-यांमुळे मनोरुग्ण झालेले आहेत. या अशा घटनांमुळे कर्मचा-यांची कुटुंबे उध्द्वस्त काम झालेले आहे. ज्या सहकारी संस्थांना शासकीय भागभांडवल दिले गेले असेल आणि त्यांनी ते परत केले नसेल तर त्याची चौकशी करुन विकलेला सहकार पुनरु ज्जीवित करता येत असेल तर चांगली गोष्ट आहे. शासकीय नियंत्रणामुळे ज्या सर्वसामान्य माणसांनी सहकारी कारखान्यामध्ये आपले भागभांडवल व योगदान दिले असेल तर त्यांना त्याबद्दलचा मोबदला परत मिळवून देता येईल.

अध्यक्ष महोदय, माननीय राज्यमंत्री यांचे मी अभिनंदन करीत आहे की, त्यांनी अतिशय चांगले विधेयक आणलेले आहे. यावर कार्यलक्षी संचालक नेमण्याची संकल्पना या विधेयकामध्ये आहे. कार्यलक्षी या शब्दाचा अर्थ संचालक मंडळाच्या कार्यावर लक्ष देऊन सहकार टिकविता येईल का? मला अशी सूचना करावीशी वाटते की, या विधेयकामध्ये म्हटलेले आहे की, या कार्यलक्षी संचालकाला मतदानाचा अधिकार नाही. मतदानाचा अधिकार नसलेला संचालक केवळ जाऊन बसत असेल तर त्याला भत्त्याकरिता आलेला आहे, असे म्हणतील. कार्यलक्षी संचालकाला मतदानाचा अधिकार दिला आणि प्रोसिडींगचा पार्ट होऊ दिला तर ख-या अर्थाने सहकाराचे संरक्षण होऊ शकते. मतदानाचा हक्क नसलेला कार्यलक्षी संचालक म्हणजे बिनादाताचा वाघ होय.

अध्यक्ष महोदय, या विधेयकाचे समर्थन करीत असताना या संदर्भात संचालकांचा क्वालिफाईंग क्रायटेरिया शासनाने जाहीर केलेला आहे का ? विधेयकामध्ये म्हटलेले आहे की, मान्यताप्राप्त कर्मचारी संघाचे प्रतिनिधीत्व करणारा कार्यलक्षी संचालक म्हणून नेमण्यात येईल. मान्यता प्राप्त कर्मचारी संघ नसेल तर निवडणूक घेऊन देण्यात येईल. प्रक्रिया उद्योग, पणन या सहकाराच्या विविध विभागातील उद्योगासंदर्भात क्वालिफाईंग क्रायटेरिया डिसाईड करणे आवश्यक आहे. 3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.उन्मेष पाटील.....

प्रक्रिया उद्योग असेल तर त्यासंबंधी काहीतरी ज्ञान कार्यकारी संचालकाकडे असणे आवश्यक आहे. कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या संदर्भात तेथे वकील आणि सी.ए.असेल अशी शासनाने यामधून भूमिका घेतलेली आहे. यामुळे निश्चितच आर्थिक फायदा व कायद्याच्या संदर्भात न्याय देण्याचा प्रयत्न होईल. कार्यकारी संचालकाला क्वालिफाईंग क्रायटेरिया दिला तर संस्थेला उर्जितावस्था देण्याचा प्रामाणिक प्रयत्न तो करु शकतो. अन्यथा क्वालिफाईंग क्रायटेरिया नसलेला मतदानाचा अधिकार नसलेला कार्यकारी संचालक संचालक मंडळामध्ये हा कार्यलक्षी संचालक आपली भूमिका मांडत असताना सहकाराला न्याय देताना कमतरता त्यामध्ये येऊ शकते. अर्बन आणि डीसीसी बँकेमध्ये कर्मचा-यांचे प्रतिनिधी म्हणून संचालक पाठविले जातात. आणि मग त्या माध्यमातून काय कंट्रोल झाला किंवा काय न्याय मिळाला, याचा अनुभव पाहिला तर कुठेही न्याय मिळालेला नाही. या विधेयकाच्या माध्यमातून क्वालिफाईंग क्रायटेरिया देता आला सहकारावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रयत्न चांगल्या त-हेने होईल.

अध्यक्ष महोदय, या कार्यकारी संचालकाला लायेबिलिटी, अधिकार व जबाबदारी नाही. त्या संचालकाला कार्यकारी संचालक म्हणून नेमणूक करीत असताना अधिकार देऊन लायेबिलिटी, जबाबदारी दिली तर तोही प्रोसिडींगचा पार्ट होईल. तरच त्याच्या अधिकाराला अर्थ प्राप्त होईल. एका बाजूला सहकारातून प्रगती झालेली आहे. दुस-या बाजूला आमच्या स्व.यशवंतराव चव्हाणांच्या वारसदारांनी हा सहकार पोखरला आहे की काय अशी शंका व्यक्त केली. सर्वसामान्यांच्या मनामध्येही सहकार विकला गेला की काय अशी शंका येत आहे असे असताना कारखान्यांच्या कर्मचा-यांना त्याबद्दल एक रुपयाचाही मोबदला मिळालेला नाही. 60 महिने काम केलेल्या कामगाराला एक रुपयाचाही मोबदला मिळालेला नाही.या विधेयकाच्या निमित्ताने सरकारला मी आव्हान करेल आणि विनंतीही करेल की, सहकार विकत असताना निकष, तरतुदी लायेबिलिटी आहेत त्याप्रमाणे कर्मचारी अतिशय महत्त्वाचा घटक आहे,असे मानून चालावे. या सहकारी संस्थेवर कर्मचा-यांचा प्रतिनिधी निवडून गेला तर रोजीरोटीचा प्रश्न असल्यामुळे तो सहकारातील प्रक्रियेवर लक्ष ठेवेल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

06-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) XX-4

JN/ AKN/ ST/ 18:10

श्री.उन्मेष पाटील.....

सहकार टिकविण्याकरिता प्रयत्न करुन सभासदांना न्याय मिळेल. यामुळे सहकार उद्योग कार्यान्वित राहील. मी केलेल्या सूचनांचा सकारात्मक दृष्टया विचार करण्यात येईल, एवढे बोलून व विधेयकाचे स्वागत करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमित देशमुख (लातूर शहर) : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र सहकार सुधारणा विधेयकावर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, या विधेयकाच्या माध्यमातून सहकार कायद्यामध्ये सुधारणा करण्याचा मानस शासनाचा आहे. महाराष्ट्रात कृषी उद्योग बाजार समित्यांच्या निवडणुका झाल्यानंतर निवडून आलेल्या संचालक मंडळावर शासनाने जे संचालक नेमले. उदाहरणार्थ लातूर कृषी उद्योग बाजार समितीच्या संचालक मंडळावर चार संचालक राज्य शासनाने नेमलेले आहेत. ते चारही संचालक राजकीय पार्श्वभूमी असलेले आहेत. या माध्यमातून शासन कायद्यामध्ये सुधारणा करीत आहे की बिघाड करीत आहे, हेच मला समजत नाही. महाराष्ट्रातील सहकाराला मोठी परंपरा आहे. महाराष्ट्रात अनेक दशकांपूर्वी सहकार रूजला. या संदर्भात मी आता कोणाचे नाव घेऊ ? स्व.यशवंतराव चव्हाण.....

वायवाय-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमित देशमुख.....

वसंतदादा पाटील, शंकरराव मोहिते पाटील, राजाराम बापू पाटील, वसंतराव नाईक, गोपीनाथराव मुंडे, विलासराव देशमुख, विखे-पाटील आणि आदरणीय श्री. शरद पवार, सन्माननीय सदस्य श्री. बाळासाहेब थोरात अशा मान्यवरांनी सहकारामध्ये उत्तम आणि मोलाचे योगदान दिलेले आहे.

अध्यक्ष महोदय, सहकार क्षेत्राने ग्रामीण भागाला स्वतःच्या पायावर उभे करण्याचे काम केलेले आहे. ग्रामीण भागात टाटा, बिर्ला आणि अंबानी काम करण्यासाठी गेले नाहीत. मागील काळात ग्रामीण भागातील लोकांनी सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण भागाला न्याय देण्याचे काम केलेले आहे.

अध्यक्ष महोदय, सहकार कायद्यात सुधारणा झाली पाहिजे. सहकारातीला भ्रष्टाचार मोडून काढला पाहिजे. यासाठी आम्ही सरकारला समर्थन देऊ इच्छितो. संचालक नेमले जाणार असल्यामुळे त्यांचे स्वागत केले जात आहे. ते पॉलिटीकल एक्सपोज असू नयेत. आपण संचालक पाठवित आहात की इन्सपेक्टर पाठवित आहात याचा विचार मंत्री महोदयांनी करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, भविष्यात कार्यलक्षी संचालक नेमले जाणार असल्यामुळे आम्ही त्याचे स्वागत करीत आहे. कर्मचाऱ्यांचा प्रतिनिधी संचालक मंडळावर असला पाहिजे. सहकार क्षेत्रातील कारखाने, सूतगिरण्या, पतसंस्था आणि बॅकांनी चांगले काम केलेले आहे. परंतु, बोटावर मोजण्याइतपत लोकांनी आक्षेपार्ह काम केले असेल तर सर्वांना एकाच रांगेत उभे करणे हे सुध्दा अन्यायकारक आहे. संचालक नेमतो तेव्हा निवडणुकांमध्ये विश्वास आहे की, नाही यावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. मग निवडणुका कशाला घेतल्या जातात असा माझा प्रश्न आहे. माननीय श्री. चंद्रकांत पाटील यांच्या कामाबद्दल सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी माहिती दिलेली आहे. आमच्याकडून कोणतीही चुक होता कामा नये असा दबदबा माननीय श्री. चंद्रकांत पाटील यांनी निर्माण करण्याची आवश्यकता आहे. त्यांचा आमच्यावर दबदबा आहे. आपल्याला इन्सपेक्टर पाठविण्याची आवश्यकता नाही. हे पुन्हा या ठिकाणी मला नमूद करावेसे वाटत आहे. सरकारने सदबुध्दीने वागले पाहिजे. परंतु, अलिकडच्या काळात सरकार सुडबुध्दीने वागत आहे. माननीय श्री. चंद्रकांत पाटील यांना सदबुध्दीने काम करोव त्यांनी सुडबुध्दीने वागू नये अशी माझी त्यांना विनंती आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमित देशमुख.....

अध्यक्ष महोदय, जे संचालक नेमले जाणार आहेत, अशा संचालकांची गुणवत्ता काय आहे ? त्यांची गुणवत्ता कोण ठरविणार असा माझा प्रश्न आहे. यासंदर्भात मंत्री महोदयांनी गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, सदरहू विधेयकामध्ये ज्या सुधारणा उचित आहेत, त्याचे मी समर्थन करतो. पण ज्या अनावश्यक सुधारणा आहेत, अशा अनावश्यक सुधारणा मंत्री महोदयांकडून वगळल्या जातील अशी अपेक्षा व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, सदर विधेयकात मंत्री महोदयांनी मांडलेल्या सुधारणेच्या संदर्भात मी खंत व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द थांबवितो.

.....3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शंभुराज देसाई (पाटण) : अध्यक्ष महोदय, सन 2016 चे विधानसभा विधेयक क्रमांक 14-महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, 2016 यासंबंधी काही मुद्यांच्या संदर्भात माननीय सहकार मंत्र्याकडून स्पष्टीकरण मिळावे याकरिता मी बोलण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सदर विधेयकातील उद्देश व कारणे यामध्ये असे म्हटले आहे की, भाग भांडवलाच्या स्वरूपात शासनाचा हिस्सा असलेल्या सस्थांच्या बाबतीत शासनाच्या तसेच अशा संस्थांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने शासनाच्या अधिकाराखेरीज अशा संस्थाच्या कार्यसंबंधीचा अनुभव असणाऱ्या एक व्यक्तीचे नामनिर्देशन करण्याची गरज आहे. याचा अर्थ ज्या संस्थामध्ये आजच्या तारखेस राज्य सरकारने स्वत:चे भांडवल गुंतविलेले असून, ते काही अंशी परत दिलेले आहे आणि काही अंशी दिलेले नाही. कार्यलक्षी संचालक नेमला जाणार इथपर्यंत ठीक आहे. परंतु, सदर विधेयक येण्याच्या अगोदर ज्या संस्थांनी पूर्ण भागभांडवल व्याजासहित परत केलेले आहे. अशा संस्थांचा समावेश सदर विधेयकात केला जाणार आहे की नाही, याचा मंत्री महोदयांनी खुलास करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, संस्थांमध्ये संचालक नियुक्त केला जाणार आहे. अशा संस्थांच्या पोटनियमामध्ये काही बाबींची पूर्तता संचालक होताना करण्याची आवश्यकता आहे. अशा पोटनियमातील तरतूदी संस्थेच्या वार्षिक सर्वधारण सभेमध्ये सर्वानुमते मंजूर करून शासनाने पोटनियमाला मान्यता दिलेली आहे. हे मी माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देणार आहे. सहकारी साखर कारखान्याच्या बाबतीत मागील 5 वर्षाचा कालावधी पाहिला असता त्याने सलग तीन वर्षे ऊस पुरवठा केला असला पाहिजे, तो कोणत्याही संस्थेचा थकबाकीदार नसला पाहिजे, संस्थेच्या हिताला बाधा येईल असे कोणतेही कृत्य त्याने केलेले नसले पाहिजे, वगैरे बाबी संस्थेच्या पोटनियमामध्ये वार्षिक सभेच्या मान्यतेने समाविष्ट केलेल्या असून, त्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. याही बाबींचा विचार शासनाचा प्रतिनिधी नेमत असताना केला जाणार काय ? या प्रश्नाचे उत्तर मंत्री महोदयांनी आम्हाला दिले पाहिजे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शंभुराज देसाई.....

अध्यक्ष महोदय, माननीय सहकार मंत्र्यांनी कामगारांचा प्रतिनिधी नेमण्याच्या संदर्भात 17 पेक्षा कमी अशा संस्थेच्या समित्यांवर कामगारांना पुरेसे प्रतिनिधीत्व नसल्यामुळे कामगार नेमण्याची बिलामध्ये तरतूद केलेली आहे. बहुमतामधील रजिस्टर कामगार संघटना त्यांच्या मिटिंगमध्ये चर्चा करुन त्यांची नावे कळवित असतात. ही पध्दत आजही सुरु आहे. त्यामुळे या व्यतिरिक्त दुसऱ्या कामगार गटाचा प्रतिनिधी देण्यासंदर्भातील खुलासा मंत्री महोदयांनी आम्हाला दिला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रात सहकारी संस्था उभ्या राहिलेल्या आहेत. अशा संस्थांमध्ये गैरकारभार झाले, सहकारी संस्था बुडाल्या, कामगारांची देणी दिली नाही, या गोष्टींचा उल्लेख अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणातून केलेला आहे. पण एकाच दृष्टीकोनातून सर्व सहकारी संस्थांकडे बघणे हे देखील मानवतेच्या दृष्टीकोनातून उचित होणार नाही. संस्थेत गैरकारभार झालेला असेल तर अशा संस्थांची जरुर चौकशी करण्याची गरज आहे. यामध्ये संबंधित दोषी लोकांना शिक्षा देण्याबाबत आमचे कोणतेही दुमत असणार नाही. महाराष्ट्र राज्यात अनेक संस्था या प्रतिकूल परिस्थितीत आजही चांगले काम करीत आहेत. मग या संस्था डोंगरी, दुर्गम, पाण्याची कमी उपलब्धता असणाऱ्या भागातील, हलक्या प्रतीच्या जमिनी ज्या भागात आहेत, त्या भागातील लहान संस्था आहेत.

अध्यक्ष महादय, मी स्वत: एका सहकारी साखर कारखान्याचे प्रतिनिधीत्व करीत आहे. हा साखर कारखाना पाटण तालुक्यातील डोंगरी भागात आहे. साखर कारखाना 1250 कॅपेसिटीचा आहे. सदर कारखान्यामध्ये 43 वर्षे जुनी मशिनरी असताना देखील 147 टक्के कॅपेसिटी युटिलायजेशन 43व्या गळीत हंगामामध्ये घेत आहोत. शासनाच्या नियमाप्रमाणे एफआरपीपेक्षा अधिक रक्कम इन्सेटिव्हच्या माध्यमातून देता आली तर आम्ही ऊसाला, बियाणाला आणि खताला अनुदान स्वरुपात शेतकऱ्यांना देत असतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभूराज देसाई...

सर्वांना आपण एका चेष्म्यातून पाहू नये. सर्व सहकारी संस्था चालविणारे किंवा साखर कारखाने चालविणारी मंडळी कोणीतरी दोषी आहेत, असा आपला दृष्टीकोन असू नये. जे चांगले काम करीत आहेत, त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप टाकली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.अमित देशमुख यांनी मघाशी काही नेत्यांचा उल्लेख केला, त्यामध्ये कदाचित स्व.बाळासाहेब देसाई यांचे नाव घेणे राहून गेले. पश्चिम महाराष्ट्रात स्व.बाळासाहेब देसाई यांनी जो बाळासाहेब साखर कारखाना उभा केला, तो एक चॅलेंज म्हणून उभा केला. ज्या माळरानावर कुसळे पिकत नव्हती, मोकळे उजाड माळरान होते, आज त्या ठिकाणी आपण पाहिले तर हिरवेगार झालेले आहे. आम्ही सहकारी तत्वावर कोयना नदीतील पाणी 9 किलो मीटरवर उचलून नेऊन डोंगराच्या पायथ्याशी इरिगेशनच्या योजना करुन शेतकऱ्यांच्या बांधावर पाणी नेले. इरिगेशनसाठी काढलेले ते कर्ज सुध्दा सुदैवाने आम्ही 100 टक्के फेडले. इरिगेशन योजना आज आमची बोनसमध्ये आहे. जे चांगले काम करीत आहेत, त्याना आपण प्रोत्साहन दिले पाहिजे. मला मंत्री महोदयांकडून दोन, तीन गोष्टींचे स्पष्टीकरण हवे आहे. ज्या संचालकांची आपण निवड करणार आहात तो वार्षिक सभेच्या पोटनियमामध्ये ज्या गोष्टी समाविष्ट आहेत, त्या गोष्टींचे पालन करणारा असावा, या दोनच गोष्टींचा आपल्याकडून मला खुलासा हवा आहे. एवढेच माझे मत मला या ठिकाणी व्यक्त करायचे होते. या विधेयकाला मी पाठिंबा व्यक्त करतो आणि माझे बोलणे संपवितो.

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद सोनावणे (जुन्नर) : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सहकार मंत्री श्री.चंद्रकांत पाटील आणि मंत्री महोदय श्री.दादाजी भुसे यांनी सहकार खात्याचे विधेयक आपल्या समोर चर्चेसाठी ठेवलेले आहे. सर्वप्रथम मी असे सांगेन की, या विधेयकाला पाठिंबा देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. माझ्या चार पिढ्या या सहकारामध्ये गेलेल्या आहेत. कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या माध्यमातून आमची सर्वांची वाटचाल झालेली आहे. मला असे म्हणावे लागेल की, सहकार नसता तर आमचे कुटुंब, आमची व्यवस्था उभी राहिली नसती. सन 1904 मध्ये सहाकाराची निर्मिती झाली. सन्माननीय सदस्य श्री.अमित देशमुख यांनी काही नावे या महाराष्ट्राच्या व्यासपिठावर घेतली. साखर कारखाने, बाजार समित्या, दुग्धविकास सोसायट्या या माध्यमातून काही भागाचा चांगला विकास झालेला आहे. मराठी भाषेत अशी म्हण आहे की, "विना सहकार नाही उध्दार" या म्हणीप्रमाणे सहकार हा विभाग अतिशय महत्वाचा आहे. सहकार खात्याचे जे विधेयक चर्चेला आणले आहे त्यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री.शंभूराज देसाई यांनी जीसाधार भीती व्यक्त केली आहे, ती भीती आणि तो संभ्रम दूर झाला पाहिजे. संचालक निवडतांना सर्वसामान्य व्यवस्थेमध्ये तुम्हा आम्हाला तसेच सर्वसामान्य माणसाला सहकार्य करणारा असला पाहिजे. संभ्रम निर्माण झाला की त्यामध्ये भ्रष्टाचाराची व्याप्ती वाढते. आपले सरकार हे परिवर्तनाचे सरकार म्हणून संबोधित केले जाते. भ्रष्टाचार कोणाला नकोच आहे. सहकारामुळे भीतची व्याप्ती आज आपण पाहतो आहे. भ्रष्टाचाराच्या पालिकडचा आपला जो मानस आहे, तो कौतुक करण्यासारखा आहे. सन्माननीय सदस्य श्री.उन्मेश पाटील म्हणाले ते बरोबर आहे. संचालकांची नियुक्ती करताना त्यांचे शिक्षण, त्यांचा दर्जा, त्यांचा अभ्यास हा आपल्या दृष्टीने फार महत्वाचा आहे.

अध्यक्ष महाराज, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये 21 सदस्यांचे संचालक मंडळ आहे. त्यामध्ये 16 प्रतिनिधी हे शेतकऱ्यांमधून निवडून आलेले आहेत. परंतु ते शेतकऱ्यांचे नसून केवळ राजकीय पक्षाचे आहेत. मुंबईच्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये पाच सदस्य हे वेगवेगळे ट्रेडवाईज आलेले आहेत. हे प्रतिनिधी कोणी फळ, पालेभाजी, कांदे, मसाले, धान्याचे व्यापारी असतील. मंत्री महोदय मला आपल्याला आवर्जून सांगायचे आहे की, ही 16 लोक शैतकऱ्यांचे संरक्षणकर्ते मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीला मिळायला पाहिजे होती, दुर्दैवाने ती मिळालेली नाही. म्हणून मला संपूर्ण महाराष्ट्राच्या या खुल्या व्यासपिठावर सांगण्याची वेळ आलेली आहे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद सोनावणे.....

की, कायदा व सुव्यवस्था करीत असताना सहकार टिकला पाहिजे. या संपूर्ण कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मुंबईची बाजार समिती ही विभागीय बाजार समिती केलीच पाहिजे. काल आपण शेतकऱ्यांच्या आणि कामगाराच्या हिताचा संप पहिला, उद्यासाठी आपण आम्हाला बैठकीला बोलाविले आहे. त्या बैठकीत निर्णय घेताना अधिकारी काय सांगतात यापेक्षा आपला निर्णय महत्वाचा आहे. आमचे दोन संचालक आपण निवडणार आहात. ते संचालक किती कार्यतत्पर आहेत, ते कशा पध्दतीने निर्णय घेणार आहेत, हे महत्वाचे आहे. सहकार वाढण्यासाठी मागील पिढीने जे प्रयत्न केले आहेत. ज्या लोकांची नांवे घेतली, त्या सर्व नावामध्ये 1980 ते 1990 पर्यंत सर्व सहकार हा सर्वसामान्य माणसाला मानवणारा सहकार होता, परंतु 1990 नंतरचा सहकार प्रतिष्ठेसाठी, राजकारणासाठी आला. आपला दृष्टीक्षेप अतिशय योग्य आहे. आपण खरेतर ही नियुक्ती केलीच पाहिजे. त्या नियुक्तीमध्ये आपण पारदर्शकता आणली पाहिजे. हा भ्रष्टाचार संपविला पाहिजे. सहकारातून या भ्रष्टाचाराची मुक्ती केली पाहिजे. माणसाच्या मनामध्ये भ्रष्टाचाराच्या बाबतीत ज्या अनेक गोष्टी घर करुन बसलेल्या आहेत, त्यातून मुक्त व्हावयास पाहिजे. अधिकाऱ्यांच्या बाबतीत मी एवढेच सांगेन की, अधिकाऱ्यांनी या सहकाराची वाट लावलेली आहे. या सहकाराचे वाटोळे करुन टाकलेले आहे. राजकारणी आणि अधिकारी यांची युती झालेली आहे. आपल्याला दुसऱ्या डोळ्यांनी ती युती बरखास्त करावी लागणार आहे.

अध्यक्ष महाराज, मी एक शेतक-याचा मुलगा आहे. शेतकऱ्याची असलेली भूमिका मला या व्यासपिठाच्या माध्यमातून सभागृहासमोर मांडावयाची आहे. म्हणून कामगार प्रतिनिधी हा कामगारांमधून निवडून गेला पाहिजे. ज्याला स्वतःचे अस्तित्व आहे, यामध्ये कोणी बाहेरचा माणूस चालणार नाही, एवढेच नाही तर महाराष्ट्र ते स्वीकारणारही नाही. हे विधेयक आणत असताना कामगारांचा मुलगा, कष्टकरी शेतकऱ्यांचा मुलगा हा धोरणात्मक निर्णय घेणारा असला पाहिजे. आज याचे भांडवल होत आहे. दोन्ही बाजूने लोक बोलत आहेत. मी गेल्या दीड वर्षापासून आपले काम पाहतो आहे. मी आपला आदर करतो. आज अतिशय चांगल्या दर्जाचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच सहकार विभागाचे सुरु आहे. आपण आपला महत्वाचा वेळ वाशी मार्केटला दिला. माझ्या तमाम कामगार आणि व्यापाऱ्याच्या माध्यमातून मी सहर्ष स्वागत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद सोनावणे..

करेन, मी आपले अभिनंदन करीन. केंद्र सरकारचा सहकारासंबंधीचा जो कायदा येणार आहे, त्यामध्ये आपण विलक्षण पध्दतीने बदल करणार आहात. मुंबईचे अर्थकारण असलेली ही एपएमसी कमिटी आहे. शेतकऱ्यांच्या मालाचे संरक्षण करण्यासाठी आपण आपल्या मंत्री पदाचा चांगल्या प्रकारे उपयोग करणार आहात. सन्माननीय श्री.शरद पवार साहेब आले, त्या ठिकाणी आपण अतिशय उत्कृष्ठ भाषण केले. सन्माननीय पालकमंत्री श्री.एकनाथ शिंदे तेथे उपस्थित होते. कोणाच्या सांगण्यावरून संचालक पदावर कोणाची नियुक्ती आपण होऊ देणार नाही, अशी मला खात्री आहे. कामगाराचा मुलगा कामगाराच्या धोरणामधून पुढे येईल, अशी भूमिका मी या निमित्ताने व्यक्त करतो. या चांगल्या असलेल्या आदर्शवत असलेल्या सहकाराच्या विधेयकाला मी पाठिंबा व्यक्त करतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

यानंतर 3A-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अनेक सन्माननीय सदस्य : अध्यक्ष महोदय, ...

तालिका सभाध्यक्ष (श्री. योगेश सागर) : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सर्व सन्माननीय सदस्यांना बिलावर जेवढा वेळ बोलायचे असेल तेवढा वेळ बोलण्याकरिता संधी मिळेल. बिलावर अनेक सन्माननीय सदस्य बोललेले आहेत व याही पुढे अनेक सन्माननीय सदस्य बोलणार आहेत. सर्व सन्माननीय सदस्यांना हे माहीत आहे की, बिलावर बोलताना विधेयकाचे तत्व स्पष्ट करण्यासाठी जेवढी आवश्यकता असेल त्यापेक्षा अधिक विधेयकातील तरतुदीवर सविस्तर चर्चा करता येणार नाही. सन्माननीय सदस्यांनी विधेयकाचा गाभा पाहून चर्चा करावी, एवढीच विनंती आहे.

डॉ. अनिल बोंडे (मोर्शी) : अध्यक्ष महोदय, या सहकाराच्या विधेयकाचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, खरे म्हणजे महाराष्ट्र राज्याला सहकाराची अतिशय उज्वल परंपरा आहे. परंतु, सहकार महाराष्ट्रामध्ये केव्हा स्वाहाकार झाला ते कळायला बरेच दिवस लागले. पश्चिम महाराष्ट्रामध्ये, उर्वरित महाराष्ट्रामध्ये सहकारामध्ये सूत गिरण्या, साखर कारखाने निर्माण झाले आणि प्रत्येक शेतकरी त्याचा भागधारक झाला. प्रत्येक शेतकऱ्याला मालक झाल्यासारखे वाटले. परंतु, गेल्या 10 वर्षांच्या काळामध्ये जर आपण पाहिले तर, अनेक साखर कारखाने अवसानात निघाले. अनेक साखर कारखाने विक्रीमध्ये निघाले. विक्रीमध्ये निघालेले साखर कारखाने ज्या लोकांनी घेतले ते खरे म्हणजे स्वतःच मालक झाले. जे त्या सहकारात होते त्यांनी स्वतःची खाजगी कंपनी निर्माण करुन ते साखर कारखाने लिलावात कमी पैशांत विकत घेतले. कारण तोपर्यंत त्या साखर कारखान्यांच्या जमिनीची किंमत वाढलेली होती. तो साखर कारखाना खाजगीमध्ये उभारला गेला असता तर, त्यापेक्षा 5 पट किंमत त्याला लागली असती आणि म्हणून सहकार क्षेत्र स्वतःकडे कसे वळवून घ्यायचे, स्वतःच्या खाजगीकरणाकडे कसे वळवायचे, स्वतःच्या कुटुंबाकडे कसे वळवायचे हे गेल्या 10 वर्षांमध्ये प्रकर्षाने दिसून आले. मग जेव्हा ही पध्दत सुरु झाली त्यावेळेस सर्वात मोठा असा परिणाम झाला की, जे 1-2 एकरवाले लहान-लहान शेतकरी भागधारक होते, त्यांचा मालकीहक्क संपुष्टात आला. त्या भागधारक शेतकऱ्यांचा त्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. अनिल बोंडे ....

सहकार क्षेत्रात, साखर कारखान्यामध्ये असलेला भाग संपुष्टात आला आणि तो खाजगी साखर कारखान्याचा फक्त एक पुरवठादार बनला. त्याचे कारणच असे झाले की, या सहकार क्षेत्रातील संचालकांमध्ये एका घराण्याचे किंवा एका विशिष्ट समुदायाचे वर्चस्व होते. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, यावर कोणताही अंकुश नव्हता. जे डीडीआर किंवा साखर संचालक असतील, त्यांचा असलेला अंकुशही मॅनेज केला गेला होता. त्यामध्ये शासकीय भागभांडवल होते, शेतकरी सहभागी होते, वेळोवेळी शासनाने दिलेले अनुदान होते. परंतु, या सर्व गोष्टींचा विचार न करता हे साखर कारखाने लिलावात निघाले आणि ते खाजगी लोकांनी घेतले. त्यामुळे आजचे हे सहकाराचे जे विधेयक आहे ते अतिशय महत्त्वपूर्ण आहे की, एक थर्ड पार्टी अंकुश असला पाहिजे.

सहकारामधून स्वाहाकाराकडे किंवा स्वतःच्या खाजगीकरणाकडे जाण्याची जी प्रक्रिया होती ती प्रक्रिया थांबविणे अतिशय आवश्यक आहे. यामध्ये नुकसान कोणाचे झाले तर जसे शेतकऱ्याचे नुकसान झाले, त्याप्रमाणे कारखान्यामध्ये जे कर्मचारी नोकरीला लागले होते त्यांचेही नुकसान झाले. विदर्भामध्ये जे साखर कारखाने अवसानात निघाले, तेथे जी मुले नोकरीला लागली होती, त्यांचे लग्न झाले, त्यांना मुले झाली. मात्र कारखाने अवसानात निघाल्याने हे लोक बेरोजगार झाले. त्यांचे आयुष्य आपण पाहिले तर, ते खरोखर मातीमोल झाल्यासारखे झाले. याकरिता अतिशय योग्यवेळी हे विधेयक आणलेले आहे. जे कर्मचारी सहकारी संस्थांमध्ये नोकरीला लागतात, ते स्वतःची मालमत्ता, स्वतःच्या रोजीरोटीचे साधन ज्याला समजतात ते अवसानात निघाल्यानंतर त्यांच्या व्यवसायावर कुऱ्हाड कोसळते आणि त्यांचे जीवन उद्ध्वस्त होते. त्यामुळे तेथे कर्मचाऱ्यांचा प्रतिनिधी निश्चित असला पाहिजे. त्यासोबतच एक न्युट्रल ऑब्झर्व्हर किंवा त्या सहकाराचे जे गलिच्छ राजकारण झाले असेल त्यामध्ये सहभागी न होणारा, मॅनेज न होणारा असा एक प्रतिनिधी शासनाच्यावतीने पाठविला पाहिजे की, जो शासन व सहकार क्षेत्रामध्ये दुवा राहील. असा प्रतिनिधी पाठविणे आवश्यक आहे. परंतु, त्याला आपण काय अधिकार देतो? उलट आपण त्याला मतदानाचा अधिकार देत नाही. संचालक म्हटले तरी, त्याला मतदानाचा अधिकार देत नाही. मग सगळे जे निर्णय होतील त्यामध्ये हा नेमलेला प्रतिनिधी मूक ऑब्झर्व्हर राहील काय, हा फक्त

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. अनिल बोंडे ....

डोळे उघडे ठेवून पाहत आहे, कान आहे पण ऐकायला येत नाही असा हा ऑब्झर्व्हर राहील काय, याला डिसेंट नोंदविण्याचा अधिकार राहणार आहे काय, ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. समजा एखादा घोटाळा त्याला दिसत आहे, तो संचालक मंडळात मंजूर केला जात आहे मग हा त्या सभेस उपस्थित असल्यानंतर त्याचे मत प्रदर्शित करु शकणार आहे की नाही, ही देखील महत्त्वाची गोष्ट आहे. कारण त्याला निर्णय घेण्याचा, विरोध करण्याचा अधिकार नाही. मग तो एक मूक ऑब्झर्व्हर राहणार आहे काय ? मतदानाचा अधिकार नसला तरी त्याला स्वत:चे मत नोंदविता येणार आहे काय ? त्याचे स्वत:चे मत नोंदविले गेले पाहिजे, ते मिनिट्समध्ये रेकॉर्ड झाले पाहिजे. समजा एखाद्या ठरावाच्या विरोधात त्याचे मत असेल आणि पुन्हा जेव्हा कधी चौकशी होणार असेल तेव्हा सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याच्या मताला प्राधान्य दिले पाहिजे. कारण he will not be the part of the decision. त्यामुळे त्याच्या मताला प्राधान्य देणे हे आपण या विधेयकात करत असू तर खरोखर सहकार क्षेत्रामध्ये होणाऱ्या स्वाहाकारावर किंवा भ्रष्टाचारावर आपल्याला निश्चितपणे अंकूश ठेवता येणार आहे. त्यामुळे नुसता एक मेणाचा पुतळा आपण बसवित आहोत, असे व्हायला नको एवढीच माझी सूचना मंत्री महोदयांना आहे. त्याने नोंदविलेले मत हे शासनापर्यंत पोहोचले पाहिजे. त्याने जर विरुध्द मत नोंदविलेले असेल तर त्यावर कार्यवाही किंवा त्याबाबत चौकशीसुध्दा झाली पाहिजे, एवढी सूचना करुन मी माझ्या शब्दांना विराम देतो. जय हिंद.

.....

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. बाळासाहेब थोरात (संगमनेर) : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 यात काही सुधारणा करण्याच्यादृष्टीने हे विधेयक मांडण्यात आलेले आहे.

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्यांनी केवळ सूचना मांडाव्यात.

अध्यक्ष महोदय, बिलावर बोलताना सन्माननीय सदस्यांचे काही अधिकार असतात आणि ते जपण्याची जबाबदारी अध्यक्ष महोदयांची आहे.

अध्यक्ष महोदय, मी या बिलाला विरोध करण्यासाठी उभा आहे. महाराष्ट्राच्या संपूर्ण वाटचालीत महाराष्ट्राची प्रगती पाहिली, महाराष्ट्र हे प्रगतीशील राज्य झाले याचा कारणांचा अभ्यास केला तर आपल्या सर्वांच्या हे लक्षात येईल की, सहकाराचा अत्यंत मोठा वाटा यामध्ये राहिलेला आहे. सहकाराची सुरुवात 1904 मध्ये झाली. आज 111 वर्षांहून अधिक मोठी परंपरा महाराष्ट्रातील सहकाराची आहे.

अध्यक्ष महोदय, यशवंतराव चव्हाण साहेब मुख्यमंत्री असताना महाराष्ट्राच्या विकासाकरिता, महाराष्ट्र प्रगतीशील झाला पाहिजे म्हणून त्यांनी जे काही स्वप्न पाहिले होते, त्यामध्ये सर्वसामान्य शेतकरी सुखी करावयाचा असेल तर कृषी-औद्योगिक क्रांती झाली पाहिजे हे त्यांचे स्वप्न होते. कृषी औद्योगिक क्रांती करायची याचा अर्थ शेतकऱ्यांनी एकत्र यावे, एकत्र कारखानदारी करावी त्यातून देशाचा, राष्ट्राचा विकास करावा व त्या माध्यमातून कुटुंबाच्या जीवनातही आनंद निर्माण व्हावा, हे सूत्र त्यामध्ये मांडले गेले. आज आपण पाहिले तर सहकारामध्ये खूप मोठे काम संपूर्ण महाराष्ट्रामध्ये झालेले आपल्याला दिसते.

सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी उल्लेख केला ती वस्तुस्थिती आहे की, पूर्वी खाजगी साखर कारखानदारी होती. सोमय्यांची कारखानदारी नगर जिल्ह्यामध्ये होती. तेव्हा शेतकरी ऊस पिकवायचा व तो ऊस कारखान्यांना घालण्याकरिता काही किलोमीटर पायी किंवा सायकलने जायचा. तेथे त्याला ऊस घेऊन जाण्याकरिता नंबर लावून बसायला लागायचे. ते चिठ्ठी घेऊन यायचे व त्या मास्तरला चिठ्ठी दिल्यानंतर ऊस तोडला जायचा. त्यानंतर तो पुन्हा भाकरी बांधून घरातून निघायचा, त्या कारखानदारीवर जायचा आणि माझे पेमेंट द्या असे सांगत बसायचा.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. बाळासाहेब थोरात ....

त्याला जे काही पेमेंट मिळायचे ते घ्यायचा आणि पुन्हा यायचा, अशी अवस्था सहकारी कारखानदारी येण्यापूर्वी या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची होती, ही वस्तुस्थिती आहे हे नाकारता येणार नाही. आज सहकारी कारखानदारीने केवढा मोठा बदल केला ? आज सहकारी कारखानदारी आहे आणि चांगली चाललेली आहे. तिला कुठे तरी एक नेतृत्व मिळाले, त्यांनी ती साखर कारखानदारी उभी केली, सभासदांना बरोबर घेतले त्या कारखानदारीच्या माध्यमातून त्या सर्व विभागाचे अमुलाग्र परिवर्तन झाल्याचे आपल्याला दिसते. हे परिवर्तन आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा सर्व अर्थांनी झाल्याचे दिसते. याला कारण ही सहकारी कारखानदारी आहे. हृदयाने जसे काम करून संपूर्ण शरिराला रक्त पुरवठा करावा, त्याप्रमाणे एका साखर कारखानदारीने त्या संपूर्ण विभागाला आर्थिक ताकद देण्याचे काम झाल्याचे आपल्याला दिसते. आज सर्व विभागात ही ओअसिस तयार झाली, बेटे तयार झाली हे आपल्याला मान्य करावे लागेल. परंतु, जेथे नेतृत्व मिळाले, सभासदांनी विश्वास टाकला, ते एकत्र आले, चांगल्या पध्दतीने कारखाने चालविले तेथे बदल झाला हे कोणालाही नाकारता येणार नाही.

3B-1/-...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. बाळासाहेब थोरात.....

अध्यक्ष महोदय, आपण दुधाच्या बाबतीतील उदाहरण घेतले पाहीजे. 60, 65 वर्षापूर्वी दुधाच्या संदर्भात बिकट परिस्थिती होती. त्यावेळी आरेचे दूध होते. त्याची एक बाटली असायची, त्या बाटलीचा रतीब मिळण्याकरिता मंत्र्यांची चिठ्ठी घ्यावी लागत होती. त्यावेळी दूध मिळत होते. आज सहकाराच्या माध्यमातून संघ निर्माण झाले, दूध सोसायट्या निर्माण झाल्या, सभासद निर्माण झाले, इन्फ्रास्ट्रक्चर निर्माण झाले. दुधाचा महापूर करण्याचे काम सहकारी तत्वाने केलेले आहे. काही कारखानदार खाजगी दूध उत्पादक आहेत. परंतु दूध निर्माण करण्याचे काम सहकाराने केले, हे कोणालाही विसरता येणार नाही. ही वस्तुस्थिती मान्य केली पाहीजे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी सूतगिरणी संदर्भातील उदाहरण दिले. ज्या ठिकाणी चांगले नेतृत्व मिळाले, लोकांनी चांगली साथ दिली, तेथे परिवर्तन झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्रामध्ये सहकारातून मोठा रोजगार निर्माण झालेला आहे. त्यामुळे आपल्या जीवनातून सहकार वजा करता येणार नाही. आज आपण कोल्हापूरमध्ये पहातो, मंत्री महोदय कोल्हापूर जिल्ह्यातील आहेत. आम्ही सहकारी कार्यकर्ते म्हणून काम करीत होतो. तेव्हा आम्ही आमच्या कार्यकर्त्यांच्या सहली काढत होतो. त्या सहलीमध्ये आम्ही आंबाबाईचे दर्शन घेऊन तुमचा शेतकीसंघ पहात होतो, साखर कारखाने पहात होतो, गोकूळ प्रकल्प पहात होतो आणि आपल्या भागात असे काम करायचे आहे, असे म्हणत होतो. त्यावेळी कोल्हापूर जिल्ह्याने असा आदर्श निर्माण केला होता. सांगली, सातारा, पुणे या सर्व भागातून परिवर्तन झाले. जिल्ह्यांची संख्या वाढल्यावर नगर जिल्हा देखील त्यामध्ये आला. परंतु जे परिवर्तन आज दुष्काळी पट्टयामध्ये दिसते, रेन शॅडोचा एरिया आहे, प्रजन्य शायेचा भाग आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या भागामध्ये 147 मीलीमीटर पाऊस झालेला भाग आहे. परंतु ज्या गावामध्ये पिण्याच्या पाण्याचे टँकर जातात, तेथून दुधाचे टँकर देखील भरुन येतात. ही किमया सर्व दूध उत्पादकांनी, शेतकऱ्यांनी सहकाराच्या माध्यमातून केली. त्यामुळे सहकार हा आपला जीव की प्राण आहे, हे विसरता येणार नाही. जेथे सहकार आहे, तेथे प्रगती दिसत आहे. या निमित्ताने मी एकच सूत्र सांगणार आहे. स्व. यशवंतराव चव्हाण साहेबानंतर झालेल्या नेत्यांनी सहकाराला ताकद देण्याचा काम केले आहे. सरकार हे सहकाराच्या मागे पालकाप्रमाणे उभे राहिले पाहीजे,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. बाळासाहेब थोरात.....

मदतीला उभे राहीले पाहीजे, पालक त्याच्या पाल्यावर रागवतो, चुकले तर त्याला एखादा धपाटा मारतो. तसा धपाटा टाकण्याची सुद्धा तयारी ठेवली पाहीजे. परंतु पालक जसा पाल्याला वाढवितो, त्याप्रकारे सरकारने देखील सहकार वाढविण्याचे काम केले पाहीजे. आपण मारक न होता, तारक झाले पाहीजे, दुर्दैवाने या बिलामध्ये असे दिसते की, आपण सहकाराचे तारक नाही, तर मारक होणार आहे काय, अशी भीती कदाचीत दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना वाटते. त्या बाजूच्या सन्माननीय सदस्यांना वाटत असेल की, आपला माणूस आहे, आपण धकवून घेऊ, काही अडचण नाही. परंतु सत्ता कायम रहात नसते. आपण बील पास कराल. परंतु नंतर दुसरे सरकार येईल. जनरल मीटींगमध्ये जो दारु पिऊन येतो, गोंधळ घालतो, तो तुमच्या बॉडीमध्ये येऊन बसला, म्हणजे तुम्ही तेथे दुखणे आणून ठेवले, असा त्याचा अर्थ होईल. तुम्ही सहकार वाढविण्याकरिता, संस्था वाढविण्याकरिता नव्हेतर संस्था मोडण्याकरिता करीत आहे की काय अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. ही वस्तुस्थिती आहे.

अध्यक्ष महोदय, सर्वात मोठे संकट माननीय सहकार मंत्र्यांनाच आहे. कोल्हापूर मधील संस्थांमध्ये तुम्ही कोणाचे नाव घेणार याची यादी करावी. एकाचे नाव घेतले तर दुसरे दहा जण आपल्यावर नाराज होतील, ही वस्तुस्थिती असून ती आपल्याला टाळता येणार नाही. आपले वाक्य असते की, सहकाराच्या मंदीरात येतानी राजकारणाचे जोडे बाहेर ठेवा. परंतु आता हे राजकारणाचे जोडे घेऊन या सहकाराच्या मंदीरात आपण निघाला आहात, आपण तसे जाऊ नये, एवढेच या निमित्ताने सांगतो आणि माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

---*---

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयप्रकाश मुंदडा (वसमत) : अध्यक्ष महोदय, सहकार मंत्री माननीय श्री. चंद्रकांत पाटील यांनी आणलेल्या बिलाचे स्वागत करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, "विना सहकार नाही उद्धार" अशी सुरुवातीच्या काळामध्ये म्हण होती. परंतु अलिकडील काळामध्ये काय झाले की, बिना स्वाहाकार नाही सहकार, अशी परिस्थिती सहकारामध्ये निर्माण झालेली आहे. कारखानदार कर्मचाऱ्याला कसे छळतात, यासंदर्भात मी काल, परवाचे छोटे उदाहरण देतो. एका कारखान्यातील कर्मचाऱ्याच्या भावाने सोसायटीच्या निवडणुकीमध्ये फॉर्म भरला. तुझा भाऊ सोसायटीचा फॉर्म काढतो किंवा नाही, काढत नसेल तर तुला कारखान्यातून काढून टाकू तसा त्याला दम देण्यात आला. त्याच्या भावाने फॉर्म काढला नाही. दुसऱ्या दिवशी एमडी यानी त्या कर्मचाऱ्याला ससपेंड केले. कर्मचाऱ्याचा प्रतिनिधी असता तर तो भांडला असता आणि त्या कर्मचाऱ्याला ससपेंड होऊ दिले नसते. त्यामुळे सहकार मंत्री महोदय आपण या बिलाद्वारे कर्मचाऱ्यांच्या हिताचे व चांगले काम करीत आहात.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमित देशमुख यांनी सहकारासंबंधी अनेक नावे घेतली. परंतु मी त्यांना हे विचारु इच्छितो की, आपण जेवढी नावे घेतली, त्यामध्ये त्यांच्या घराण्याव्यवतिरिक्त त्या ठिकाणच्या कारखानदारीमध्ये कोण सहभागी आहेत, कोण चेअरमन आहेत, कोण डायरेक्टर आहेत. आपण एखाद्या गरीब मानसाला चेअरमन केले आहे काय. दादा आपल्या काळामध्ये हे शेतकऱ्याला इतके नडत होते की, शेतकऱ्याला यांच्या मनाप्रमाणे वागावे लागत होते. मी सांगतो तसे कर नाहीतर तुझा ऊस नेणार नाही. ज्यावेळी युतीचे सरकार आले, त्यावेळी आपण झोनबंदी उठविली आणि त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला. अन्यथा पहिल्या काळामध्ये शेतकऱ्याला स्वत:चा ऊस जाळून टाकण्याची वेळ येत होती, परंतु हे लोक शेतकऱ्यांनी ऐकले नाही तर त्यांचा ऊस नेत नव्हते. अशी परिस्थिती होती. या लोकांनी शेतकऱ्यांना छळण्याचे काम केले. सन्माननीय सदस्य सर्वश्री. जयंत पाटील व बाळासाहेब थोरात यांनी सांगितले की, पूर्वीच्या काळामध्ये खाजगी कारखानदाराच्या घरी जाऊन शेतकऱ्याला लाईन लावावी लागत होती. मला सांगावेसे वाटते की, कमीत कमी ते सावकार लाईन लावल्यानंतर चिठ्ठी तरी देत होते. आताची परिस्थिती अशी आहे की, शेतकरी त्या व्यापाऱ्याच्या नाही किंवा खाजगी कारखानदाराच्या नाही, तर चेअरमनच्या घरी खेटा घालत रहातात परंतु त्याला तोड चिठ्ठी मिळत नाही. यासंदर्भातील याच

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयप्रकाश मुंदडा.....

वर्षीची एक छोटे उदाहरण सांगतो. आमच्या भागात एका कारखान्याने स्वतःच्या एरियातील ऊस न आणता म्हणजेच स्वतःच्या एरियातील ऊस वाळवून टाकला आणि एरियाच्या बाहेरील ऊस आणला. त्यामुळे सहकारामध्ये आपण अंकुश ठेवण्याचे काम केले. परंतु एवढे करुन चालणार नाही.

अध्यक्ष महोदय, केवळ भाग भांडवल नाही, तर कारखान्याला किंवा संस्थेला अनुदानापोटी दिला जाणारा पैसा शासनाचाच असतो. ज्या ज्या ठिकाणी शासनाच्या पैशाचा वापर होणार आहे, त्या ठिकाणी हे वापरले पाहीजे. केवळ अनुदान नाही, भागभांडवल नाही, तर दरवर्षी प्रत्येक कारखान्याला प्री सिजनल घेण्यास आपण 400 कोटी रुपयांची गॅरंटी देता. गॅरंटी देखील पैशाचे स्वरुप आहे. ही रक्कम कारखान्याने भरली नाही तर ती भरण्यास सरकार जबाबदार आहे. त्यामुळे ज्या ज्या ठिकाणी गॅरंटी द्यावी लागेल, ज्या ज्या ठिकाणी अनुदान द्यावे लागेल, ज्या ज्या ठिकाणी भागभांडवल द्यावे लागेल अशा प्रत्येक ठिकाणी शासनाचा अंकूष असला पाहीजे.

अध्यक्ष महोदय, मी मागे आमच्या काळामध्ये सांगितले होते की, एमएससी बँकेच्या थ्री टायर सिस्टीमच्या ऐवजी टू टायर सिस्टीम करावी. एमएससी बँकेने डायरेक्ट सोसाटींना पैसे दिले पाहीजे. त्यामुळे शेतकऱ्यांना कमी व्याज लागणार आहे. परंतु त्यावेळी हे सर्व माझ्याकडे येऊन म्हणाले की, टू टायर सिस्टीम आणली तर आमच्या डीसीसी बँकेचे काय होईल. कारण डीसीसी बँकेवर वर्षानुवर्षे चिटकून बसलेले कोण आहेत, तर यांचेच सहकारी आहेत. त्यांचे काय होईल. डीसीसी बँकेवरुन एक माणूस ॲपेक्स बँकेवर येतो. त्याची दर महिन्याला बैठक असते. मग त्याचा प्रवास कसा होईल. त्याची व्यवस्था कशी होईल. त्यामुळे दादा आपण यामध्ये आणखी एक बाब ॲडीशनल करावी. आपण दहा वर्षाचे काढले. मी म्हणतो दहा वर्षाऐवजी पाच वर्षे करा, परंतु पाच वर्षानंतर पुन्हा तो संचालक होणार नाही किंवा होता कामा नये, अशी त्यामध्ये अट ठेवण्यात यावी. म्हणजेच त्या ठिकाणी नवीन संचालक आले पाहीजे. एवढेच नव्हेतर पॅरेंट संस्थेतून ॲपेक्स किंवा शिखर संस्थेवर माणूस पाठविला जातो, आणि जर तो त्यानंतर पॅरेंट्स संस्थेवर निवडून आला नाही, तर शिखर संस्थेवर गेलेले त्याचे सभासदत्व रद्द झाले पाहीजे. हे होत नाही. यातील बरेच जण डीसीसी बँकेतून निवडून ॲपेक्स बँकेवर गेलेले असतील. त्यांना वाटेल की, ठीक आहे पाच वर्षाची बला तर टळली. आपण पाच वर्षे ॲपेक्स बँकेवर रहाणारच आहोत. त्यामुळे पॅरेंट संस्थेवर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयप्रकाश मुंदडा.....

जो निवडून येणार नाही किंवा रहाणार नाही त्याचे ॲपेक्स बँकेवर गेलेले पद रद्द झाले पाहीजे. हे देखील मंत्री महोदयांनी केले पाहीजे. हे करण्याची आवश्यकता आहे. एवढेच नव्हेतर या ठिकाणी प्रोफेशनल मॅनेजमेंट आणावे. कारखान्याचा चेअरमन सांगेल तसेच एमडी करीत असतो. त्याला काही अधिकार नाही, हे आपल्याला देखील माहीत असेल. प्रोफेशनल मॅनेजमेंट आणून एमडीऐवजी आयएएस केडरचे अधिकारी ठेवल्यास यांची ताकद होणार नाही. आज काय परिस्थिती आहे. साखरेचे टेंडर काढायचे असेल तर मुंबईत फाईव्हस्टार हॉटेलमध्ये बसून टेंडर काढले जाते.

.../-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.जयप्रकाश मुंदडा.....

प्रोफेशनल मॅनेजमेंटच्या माध्यमातून आय.एस.एस. अधिकारी नियुक्त केला तर तो यांना अशा प्रकारची कामे करुन देणार नाही. या कारखान्यांचे ओव्हर हेड खर्च येतात कोठून ? प्रोफेशनल मॅनेजमेंट पध्दत आणली तर या सहकारी कारखान्यांवर अंकुश बसेल. शासनाचा एक अधिकारी व व सहकारी संस्थेचा अनुभव असणारा व्यक्ती सहकारी संस्थेच्या समितीवर पाठविण्यात येणार आहे. मार्केट कमिटीवर ज्याप्रमाणे 5 कोटी रुपयांपेक्षा अधिक उलाढाल असेल तर 2 शासकीय व्यक्ती समितीवर पाठविण्यात येतात व त्यापेक्षा अधिक असेल तर 4 पाठविण्यात येतात. त्याप्रमाणे सहकारी कारखान्यांच्या संदर्भात निर्णय घेण्यात यावा. मोठ्या सहकारी संस्थेच्या संदर्भात सदरहू अटीचा विचार 5 कोटी रुपयांच्या ऐवजी 10 कोटी रुपयापासून करण्यात यावा.

अध्यक्ष महोदय, मी युती सरकारच्या काळात सांगत होते ज्याप्रमाणे ग्रामपंचायतीमध्ये रोटेशनने सरपंच करण्यात येतो त्याप्रमाणे रोटेशनल चेअरमन करण्याची सहकारी कारखान्यांची तयारी आहे काय ? सहकारी कारखान्यामध्ये रोटेशनल पध्दतीने चेअरमन करावा व तो मागासवर्गीय, एससी, एसटी, ओबीसी, महिला वर्ग यामधून नियुक्त करण्यात यावा. अशा प्रकारची पध्दत अवलंबिण्यास सन्माननीय सदस्य श्री.शंभूराजे देसाई यांच्याचे सारखे व्यक्ती किंवा शिवसेनेचे तळागाळातून आलेले सन्माननीय सदस्य तयार होतील. परंतु ज्यांना परंपरेने सहकारी कारखान्याचा वारसा मिळाला आहे ते यासाठी कधी तयार होणार नाहीत. सहकार मंत्री महोदयांनी सहकारी कारखान्यामध्ये रोटेशनल चेअरमन पध्दतीचा कायदा करावा, अशी माझी विनंती आहे. यामुळे सहकारी कारखान्यावर एक प्रकारे अंकुश ठेवणे शक्य होईल.

अध्यक्ष महोदय, सहकार मंत्री महोदयांनी आणलेले हे विधेयक चांगले विधेयक आहे. ॲपेक्सवर गेलेला पॅरेन्ट संस्थेचा माणूस असावा व तो पॅरेन्ट संस्थेचा माणूस नसेल तर त्याचे सभासदत्व रद्द केले पाहिजे. तसेच, मी मांडलेल्या प्रोफेशनल मॅनेजमेंटचा मुद्याचाही विचार करावा, मंत्री महोदयांनी करावा.

अध्यक्ष महोदय, सहकारी कारखान्यांचे कॉस्ट ऑडिट करण्यासंदर्भात देखील निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. कॉस्ट ऑडिट केले तर व्यवस्थिपणे सहकारी संस्थेवर अंकुश ठेवणे शक्य होईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.जयप्रकाश मुंदडा.....

अध्यक्ष महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, जे चांगले आहे त्यास चांगलेच म्हटले पाहिजे. युती सरकारच्या काळामध्ये चांगले काम करणाऱ्यांना आम्ही मदत केली आहे. सहकाराला मदत करणे योग्य असले तरी त्याच बरोबर त्यावर अंकुश ठेवणे देखील गरजेचे आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद !

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) : अध्यक्ष महोदय, सन 2016 चे विधानसभा विधेयक क्रमांक 7 सदनामध्ये मांडण्यात आले असून त्यास विरोध करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सदनामधील अनेक सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला आहे की, देशात व विशेषत: राज्यात सहकाराच्या माध्यमातून फार मोठे काम झाले आहे. सन 1904 साली सहकरी चळवळ सुरु झाली होती व त्यास मूळ कारण सावकारी हे होते. सावकारी नष्ट झाली पाहिजे याकरिता सहकारी सेवा सोसायट्यांची निर्मिती झाली. कालांतराने पुढे यामध्ये बदल होत गेला व यामाध्यमातून बँकांची निर्मिती करण्यात आली. तसेच, अलिकडच्या काळामध्ये पत संस्थांचे मोठे जाळे निर्माण झाले आहे.

अध्यक्ष महोदय, खऱ्या अर्थाने संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर कै.यशवंतराव चव्हाण साहेबांनी हा मंगल कलश आणला होता. हा पुरोगामी व आधुनिक महाराष्ट्र पुढे जावा याकरिता कृषी उत्पादनावर प्रक्रिया करणारी कारखानदारी कै.यशवंतराव चव्हाण साहेबांनी राज्यात निर्माण केली. त्यामुळे ज्या भागामध्ये सुताचे उत्पादन होते तेथे सूत गिरण्या निर्माण झाल्या व सहकाराच्या माध्यमातून एक चांगले काम घडले. त्याकाळामध्ये भुईमुगाच्या शेंगावर प्रक्रिया करणारी कारखानदारी सहकाराच्या माध्यमातून उभारण्यात आली होती परंतु कालांतराने ती नष्ट झाली. दुधाच्या संदर्भात राज्यात सहकाराच्या माध्यमातून फार मोठे काम घडलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.बाळासाहेब थोरात साहेबांनी एका बाबीचा उल्लेख केला होता. त्यांनी म्हटलेले खरे आहे की, दुष्काळी परिस्थितीमध्ये सुध्दा लहानसहान शेतकरी किंवा गावामध्ये राहणाऱ्या मजुराला सहकाराच्या माध्यमातून 15 दिवसाला पैसे मिळतात व त्यातून अनेक लोकांचा उदरनिर्वाह मोठ्या प्रमाणात चालतो.

अध्यक्ष महोदय, सहकारी कारखान्यांचा उल्लेख सातत्याने सदनामध्ये करण्यात येतो. प्रवरानगर येथे राज्यातील पहिला साखर कारखाना निर्माण करण्यात आला होता व तो सहकारी तत्वावर उभारण्यात आला होता. त्यापूर्वी खाजगी कारखानदारी मोठ्या प्रमाणात होती. खाजगी कारखानदार त्याला वाटेल त्याप्रमाणे ऊसाची तोड करीत असत. खाजगी कारखान्याकडून बिलाच्या संदर्भात अडचणी येत असत. काही सहाकरी कारखान्यांच्या बाबतीत काही घटना घडल्या असतील परंतु अलिकडच्या काळामध्ये सहकारी कारखान्यांनी आपल्या कामकाजामध्ये बदल केला आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष)

श्री.बाळासाहेब पाटील.....

सहकारी कारखान्यामध्ये अलिकडील काळामध्ये ऊसाची नोंद संगणकाच्या सहाय्याने करण्यात येते. ऊसाची तोड त्या शेतकऱ्याचा नंबर आल्यानंतर करण्यात येते. मी माझ्या कारखान्याचा उल्लेख करणार नाही. पण काही कारखान्यामध्ये 15 तारखेची नोंद आहे तेवढाच डाटा स्लीप बॉयच्या मोबाईलवर जातो व त्याच ऊसाची तोड करण्यात येते. सहकारावर सातत्याने टिका करण्यात येते. सहकाराच्या माध्यमातून ज्या ठिकाणी शाश्वतपणा आहे तेथे सुरुवातीला कारखाने उभे झाले व त्या परिसरामध्ये औद्योगिकरीकरण होत असताना शिक्षणाच्या चांगल्या सुविधा निर्माण झाल्या आहेत. राज्यात ज्या ज्या ठिकाणी सहकारी कारखाने आहेत त्या ठिकाणी इंजिनिअरींग, ॲग्रीकल्चर, मेडिकल कॉलेज निर्माण झालेले असून त्यांच्या माध्यमातून अनेक मुलांनी व मुलींनी शिक्षण घेतले आहे. यामुळे त्या भागातील आर्थिक परिवर्तन फार मोठ्या प्रमाणात झाल्याचे आपणास दिसून येईल. त्याभागातील लोकांच्या राहणीमानामध्ये देखील खूप बदल घडला आहे. परंतु सरकार अलिकडच्या काळात विनाकारण सहकार क्षेत्रात हस्तक्षेप करु इच्छित आहे. काही घटना घडल्या असतील याचा अर्थ असा नाही की, सर्व सहकारी संस्था चुकीचे काम करतात किंवा लोकांची अडवणूक करतात.

अध्यक्ष महोदय, अनेक कारखान्यामध्ये युनियन असतात. या युनियनचे लिडर कारखान्याच्या गेट बाहेर सभा घेत असताना आक्रमक भूमिका मांडतात. शेतकऱ्यांच्या विषयाबाबत ते अतिशय आक्रमक बोलतात. सहकारी कारखानदारी किंवा संस्था टिकल्या पाहिजेत याकरिता अनेक वेळा सामंजस्याची भूमिका घेण्यात येते. ही सामंजस्याची भूमिका घेत असताना त्यामाध्यमातून आपले प्रश्न सोडवण्यात येत असतात.

अध्यक्ष महोदय, मुंबईची ओळख ही सूत गिरण्यांची होती. या गिरण्यांच्या संदर्भात एका वेळी संप झाला व तेव्हा थांबायचे कोठे हे न समजल्यामुळे मुंबईतील सूत गिरण्या उद्ध्वस्त झाल्या. त्यानंतर काही प्रश्न निर्माण झाले. सहकारामध्ये विनाकारण हस्तक्षेप करण्यात येऊ नये. ग्रामपंचायत, नगरपालिका, जिल्हा परिषद, विधानसभा येथे संगनमत होऊ शकते. सहकारी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.बाळासाहेब पाटील.....

संस्थेमध्ये एका विचाराचे संचालक मंडळ असले पाहिजे. लोकशाहीमध्ये उमेदवारांना निवडणुकीसाठी उभे राहण्याचा अधिकार असतो. त्यांना 5 वर्षानंतर पुन्हा मतदान मिळवण्याकरिता मतदारासमोर जावे लागते व त्यांनी उमेदवाराला नाकारले तर त्यांना घरी बसावे लागते. परंतु नवीन होऊ घातलेल्या कायद्यानुसार सहकारी संस्थेमध्ये एखादा संचालक चेअरमन म्हणून निवडून येऊन त्या ठिकाणी अशा प्रकारची शक्ती पुढे आली तर विनाकारण वेगळी चर्चा होईल.

अध्यक्ष महोदय, आमच्या काही सन्माननीय सदस्यांनी चर्चेवर बोलत असताना उल्लेख केला की, थक आम्ही देतो. थक आम्ही देतो याचा अर्थ सरकार फार मोठे उपकार करते असे नाही. त्या परिसरातील कच्च्यामालावर प्रक्रिया झाली पाहिजे व कारखाना चालला पाहिजे याकरिता थक देण्यात येते. ती थक .....

अध्यक्ष : मी सन्माननीय सदस्यांचे बोलणे थांबवणार नाही. परंतु एक बाब सांगू इच्छितो की, हे विधेयक सहकारी संस्थेमध्ये दोन संचालक घेण्यासंबंधातील आहे. सर्व सहकाराच्या विषयाच्या संदर्भातील नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी विधेयकावर बोलताना दोन संचालक असावे किंवा नसावे याबाबत आपले मत मांडावे, ही विनंती आहे.

यानंतर DDD-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. बाळासाहेब पाटील.....

अलिकडच्या काळात एखादा प्रतिनिधी त्या ठिकाणी गेला आणि त्याने सांगितले की, अशी अशी संचालक मंडळाची बैठक सुरू आहे. बाब असते लहान पण त्या ठिकाणी मोठी चर्चा होते. आणि ती चर्चा झाल्यानंतर त्या संस्थेबद्दल गैरसमज निर्माण होतो. एखाद्या संस्थेबद्दल गैरसमज झाला तर आणि समाजातील विश्वासार्हता नष्ट झाली तर ती संस्था अडचणीत येऊ शकते. म्हणून सहकाराच्या माध्यमातून महाराष्ट्राचा जो विकास झाला आहे तो अशाच प्रकारे पुढे नेला पाहिजे. त्यासाठी माझे एकच म्हणणे असेल की, शासनाने यामध्ये हस्तक्षेप करु नये. सहकाराचे चांगल्या प्रकारचे काम चालू आहे. सहकारामध्ये अनेक लोकांनी बोध घेऊन काही चांगल्या सुधारणा निश्चितपणे केलेल्या आहेत आणि म्हणून या बिलाला मी विरोध करतो आणि माझे दोन शब्द संपवितो. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानतो.

2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. संजय सावकारे (भुसावळ) : अध्यक्ष महोदय, सन 2016 चे विधानसभा विधेयक क्रमांक 7 महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) या विधेयकावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, या विधेयकामध्ये 2 तज्ज्ञ संचालकांची नेमणूक करीत असताना कृषी उत्पन्न बाजार समितीला त्याचा काही तरी उपयोग व्हावा, चांगले मार्गदर्शन व्हावे म्हणून या संचालकांची नेमणूक करण्याचे शासनाचे धोरण असावे. परंतु आज कृषी उत्पन्न बाजार समित्यांची अवस्था पाहिली तर मोजक्या कृषी उत्पन्न बाजार समित्या अशा असतील की, ज्या अतिशय व्यवस्थितपणे सुरू आहेत. परंतु बहूतांशी कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे उत्पन्न दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. त्यामध्ये मुख्य रोल हा तेथील सेक्रेटरीचा असतो. एकदा संचालक मंडळ निवडून आले की, या सेक्रेटरीची नेमणूक संचालक मंडळाच्या माध्यमातून होते. एका बाजूला कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये ज्यांचे बहूमत आहे ते आणि त्यांच्या मर्जीतील सेक्रेटरी असे हे संगनमत होते आणि तेथेच खरा काळाबाजार सुरू होतो. मग तेथे शेतकऱ्यांचे हित जोपासले जाते की, नाही हे कोणी पाहत नाही. व्यापाऱ्यांचे हित होते की, नाही हे कोणी पाहत नाही. हे संचालक मंडळ आणि सेक्रेटरी हे मिळून त्या कृषी उत्पन्न बाजार समितीची पिळवणूक करतात. त्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समितीचे उत्पन्न वाढवावयाचे असेल आणि तिला जर व्यवस्थित चालवावयाचे असेल तर या सेक्रेटरीची नेमणूक पणन संचालकाच्या माध्यमातून करायला पाहिजे. त्यावर पणन संचालकांचा कंट्रोल राहिला पाहिजे अशी एक दुरुस्ती मंत्री महोदयांनी केली तर मला वाटते की, शासनाचे त्यावर डायरेक्ट नियंत्रण राहील. अन्यथा असे घडते की, आम्ही जरी डीडीआरकडे तक्रार केली की, या कृषी उत्पन्न बाजार समिती असा असा गैरप्रकार होतो आहे किंवा अशी अशी अनियमितता होत आहे तर ते डीडीआर सांगतात की, ते सेक्रेटरी आम्ही नेमलेले नाहीत. त्यामुळे त्यांच्यावर आमचा कंट्रोल नाही, आम्ही त्याला काहीही करु शकत नाही. म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीची मनमानी चालते. त्यामुळे या सेक्रेटरीची पणन संचालकाच्या मार्फत नेमणूक झाली तर त्यावर काही तरी कंट्रोल राहील अशी माझी एक सूचना आहे आणि ती माननीय मंत्री महोदयांनी विचारात घ्यावी, अशी मी विनंती करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रदीप नरके (करवीर) : अध्यक्ष महोदय, सन 2016 चे विधानसभा विधेयक क्रमांक 7 महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) या विधेयकावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, खरे बघायला गेले तर यामध्ये दोन कामगार प्रतिनिधींची नेमणूक करावयाची आहे. ज्या सहकारी संस्थेमध्ये सदस्यांची संख्या 25 पेक्षा अधिक आहे. अशा सहकारी संस्थेमध्ये 2 कामगार प्रतिनिधी नेमावयाचे आहेत आणि तो नेमायचा अधिकार त्या सहकारी संस्थेमध्ये असलेल्या नोंदणीकृत संघटनेने ते दोन प्रतिनिधी सूचवावयाचे आहेत आणि ते संचालक मंडळाने घ्यायचे आहेत.

अध्यक्ष महोदय, दुसरा एक विषय असा आहे की, ज्या संस्थेमध्ये 17 पेक्षा अधिक सदस्य आहेत त्या संस्थांमध्ये एक तज्ज्ञ संचालक शासन नियुक्त करणार आहे आणि एक शासकीय अधिकारी शासन नियुक्त करणार आहे. ज्या सहकारी संस्थांमध्ये शासकीय भाग भांडवल आहे अशा संस्थांचा संबंध यामध्ये आहे. मला असे वाटते की, दोन कामगार प्रतिनिधी नेमण्यासंबंधी कुणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. माननीय सहकार मंत्री महोदय या संदर्भात जी वस्तुस्थिती आहे ती मी आपल्यासमोर मांडतो. दोन कामगार प्रतिनिधी नेमण्यासाठी यामध्ये कोणाचीही अडचण नाही. कारण पूर्वीपासून सहकारी संस्थांमध्ये दोन कामगार प्रतिनिधी नेमतच आले आहेत.

अध्यक्ष महोदय, दुसरी बाब अशी की, तज्ज्ञ संचालकांची नेमणूक फक्त शासनाने करावयाची आहे. मागे आपण सहकारी संस्थेच्या संदर्भातील विधेयक मंजूर केले आणि राज्यघटनेमध्ये ही 97 वी घटना दुरुस्ती झाली, तिला आम्ही त्यावेळी विरोध केला होता. कारण देशामधील निम्म्या राज्यांनी ती घटना दुरुस्ती मान्य करावयास पाहिजे होती. परंतु ती मान्य न होता गुजरात राज्याने उच्च न्यायालयामध्ये स्थगिती मिळविली होती. असे असताना महाराष्ट्राचे विधेयक स्वतंत्र करु आणि महाराष्ट्रासाठी आपण एक नवीन कायदा करु असे विचार करुन महाराष्ट्र सहकारी संस्था सुधारणा विधेयक 2 हे मागच्या सरकारमध्ये माननीय श्री हर्षवर्धन पाटील त्यावेळी सहकार मंत्री असताना केलेली आहे. त्यावेळी आम्ही त्यांना निदर्शनास आणले होते की, आपण जी घटना दुरुस्ती करीत आहात मूळात याला कायद्याने मान्यता आहे काय, त्यावेळी या सुधारणा विधेयकासाठी विधानसभा आणि विधान परिषद यांची एक संयुक्त समिती केली होती आणि त्या समितीचा मी एक सदस्य होतो त्यावेळी हे विधेयक आणताना मी काम केले होते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रदीप नरके.....

अनेक सहकारी संस्थांना शासनाने जनरल सभेला अगोदर मंजूरी करण्यासाठी कायद्याच्या प्रोव्हीजन दिल्या आणि त्यानंतर आम्ही सुधारणा विधेयक 2 केले. अनेकवेळा त्यामध्ये अनेक बाबी चुकीच्या घडल्या आणि हे बिल आणत असताना सुधारणा विधेयकामध्ये अनेक बाबी आणायला पाहिजे होत्या. वार्षिक सर्वसाधारण सभेला एखादा सदस्य सलग 4-5 वेळा गैरहजर असेल तर त्याला कारखान्याचे किंवा त्या सहकारी संस्थेचे सक्रीय सभासद राहता येत नाही. त्यामुळे आम्ही त्यास विरोध केला होता. खरे म्हणजे हे चुकीचे आहे. मला एक सांगा की, एखाद्या नागरिकाने किंवा एखाद्या मतदाराने विधानसभेला 4-5 वेळा मतदान केले नसेल तर आपण त्याचे मतदान घालवितो काय ? या सर्व गोष्टी मांडल्यानंतर त्यातून पळवाट काढण्यात आली की, त्याची रजा मंजूर करावयाची. त्यामुळे सहकारी कायदा आणताना अनेक पळवाटा त्यामध्ये आहेत. मघापासून सहकारी संस्थांच्या सुधारणा विधेयकावर बोलताना सर्व सहकार चुकीच्या पध्दतीने चालला आहे अशा पध्दतीने काही सन्माननीय सदस्यांनी वक्तव्ये केली आहेत. साप साप म्हणून भाई धपाटणे हे अत्यंत चुकीचे आहे.

अध्यक्ष महोदय, सहकाराच्या माध्यमातून या महाराष्ट्रात विकास घडला आहे. बाळासाहेब विखे-पाटील यांचा पहिला प्रवरा सहकारी साखर कारखाना काढण्यात आला. सहकाराच्या माध्यमातून अनेक सहकारी साखर कारखाने आणि सहकारी संस्था निर्माण झाल्या. स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स उघडले, अनेक लोकांना नोकरी आणि व्यवसाय मिळाले. त्या सहकाराकडे बघण्याचा दृष्टीकोन चांगला असला पाहिजे. जेथे चुकीचे सुरू आहे ते चुकीचे म्हटले पाहिजे. मी माननीय सहकार मंत्री महोदयांचे मुद्दाम अभिनंदन करतो की, या महाराष्ट्रामध्ये जवळ जवळ 2 लाख 47 हजार सहकारी संस्था वेगवेगळ्या कॅटॅगरीमधून निर्माण झालेल्या आहेत. मला वाटते शासनाने एक निर्णय घेतला की, ज्या संस्था आणि पतसंस्था अवसायनात आहेत किंवा मतदानापुरत्या आहेत, त्यांच्यापैकी अनेक संस्थांची आपण नोंदणी रद्द केलेली आहे.

अध्यक्ष : आपण फक्त दोन सदस्यांबद्दल बोलावे. हे विधेयक दोन नव्याने घ्यावयाच्या सदस्यांपुरतेच मर्यादित आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रदीप नरके.....

सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सन 1960 पासून माहिती दिली. मुळात ज्याठिकाणी चुकीच्या पध्दतीने सहकारी संस्था चालू आहेत त्या ठिकाणी सन्माननीय मंत्री श्री.चंद्रकांत पाटील यांनी चांगल्या पध्दतीने ॲक्शन घेतल्या. राजकीय क्षेत्रामध्ये खेळीमेळीच्या छोट्यामोठ्या लढाया व्हायच्या. जेथे चुकीचे घडले तेथे त्यांनी सहकार मंत्री म्हणून चांगल्या पध्दतीने कार्यवाही केली. जेथे चांगले चालू आहे त्याठिकाणी माननीय मंत्री सकार्याची भूमिका घेतील. सहकारी संस्थांमध्ये शासनाने भागभांडवल निश्चितपणाने आहे. अनेक संस्था आणि कारखान्यांमध्ये ज्यांचे भाग भांडवल फिटले त्याठिकाणी शासन नियुक्त करु शकत नाही. या विधेयकाला एका बाजूने विरोध होतो आणि एका बाजूने पाठिंबा दिला जातो. शेवटी मी हिंदूह्दयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी सांगितले आहे की, इथून जे काही निघेल ते स्पष्ट बोला आणि ते स्पष्टपणे सांगायला मी उभा राहिलेलो आहे. सन्माननीय सदस्य श्री.शंभूराजे देसाई थोडे स्पष्ट बोलले नाही. एखादी चांगली संस्था चालली असेल आणि त्याठिकाणी चांगल्या पध्दतीने कारभार चालला असेल तर यामध्ये प्रोव्हीजन ठेवली. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील ही ऑफ द रेकॉर्ड प्रोव्हीजन आहे. चांगल्या चाललेल्या संस्थेचे संस्था प्रमुख संस्था चांगल्या चालवतील त्यांना विचारुन संचालक नेमला तर मला वाटते या विधेयकाला काही अडचण येणार नाही.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी ऐकले नाही वाटते. मी एवढेच सांगितले की, ज्या सहकारी संस्था चांगल्या चालल्या आहेत. चांगली उभारणी केली आहेत. वाद फक्त या विधेयकाला विरोध करण्यासाठी दिसतो आहे. यासाठी एक तज्ज्ञ संचालक कोण येणार. इकडून या पक्षीय राजकारणातून येतील. मंत्री महोदयांनी थोडे लिबरल राहिले तर आणि ज्यांच्या संस्था चांगल्या चालल्या आहेत तेथे त्यांना विचारुन सदस्य नेमले तर हा वाद अगदी व्यवस्थित संपून जाईल. राजकीय क्षेत्रामध्ये या सर्व गोष्टी आहेत, ज्या-ज्या ठिकाणी निवडणूका होतात त्या-त्या ठिकाणी निवडणूका होत असताना सर्व जण त्या सभासदांमधून निवडून आलेले बोर्ड असते. काही ठिकाणी विरोधी पक्षातील सदस्य सुध्दा निवडून येऊ शकतात. काही ठिकाणी विरोधी पक्षातील सदस्य निवडून येत नसतात. ज्यावेळी विरोधी सदस्य निवडून येत नसतो. त्यावेळी तेथील

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रदीप नरके.....

सभासदांनी कौल दिलेला असतो. त्याच्यावर सुध्दा पुढे जाऊन कोणीतरी म्हणेल की, लोकांनी सभासद आहे त्या पार्टीचे केले. त्यामुळे तो तेथे निवडून येऊ शकणार नाही. हा विषय त्यामध्ये निघणार आहे. याठिकाणी तज्ज्ञ संचालक नेमत असताना त्याला क्रायटेरिया लावायला पहिजे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.शंभूराज देसाई यांनी सांगितले की, तो या सहकारी संस्थेचा सभासद आहे की नाही, तो 3-4 वर्षापासून त्या कारखान्याला ऊस देतो आहे किंवा नाही. सन्माननीय सदस्य श्री.बाळासाहेब थोरात यांनी सांगितल्यानंतर सहकाराच्या क्षेत्रात जात असताना राजकारणाचे जोडे बाहेर ठेवून जायला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, आपण सर्वसाधारण परिस्थिती बघितली तर मला वाटते याठिकाणी हे विधेयक पास करीत असताना किंवा चर्चा करीत असताना सहकार मंत्र्यांनी सुध्दा या गोष्टीचा साधक बाधक विचार करावा. मला वाटते सत्तेमध्ये बदल होत असताना यापुढच्या काळामध्ये अशा गोष्टी घडत जाणार आणि आज इकडे आहेत, उद्या तिकडे आहेत. अशा पध्दतीच्या राजकारणामध्ये आपण जर मुव्हमेंट घेत गेलो तर निश्चितपणे सहकार क्षेत्रात काही गोष्टींच्या बाबतीत चुकीचे पायंडे सुध्दा पडले जाण्याची शक्यता आहे. एखाद्या सहकारी संस्थेवर आपण कंट्रोल करतो. आज वर्तमानपत्रामध्ये वाचले असेल की, नॅशनलाईज बँकांचे एनपीएचे प्रमाण आणि त्यांचा सीआर रेशयो वाढला आहे. नॅशनलाईज बँकेचा सीआर रेशयो वाढल्यामुळे भागभांडवल पुरविण्यासाठी केंद्र सरकारने मदत केली. अशा पध्दतीने जर नॅशनलाईज बँका चुकीच्या पध्दतीने चालत असतील तर सहकारातील चांगली माणसे त्याठिकाणी नेमणार काय हा सुध्दा भविष्यात प्रश्न निर्माण होईल. हे विधेयक पास करीत असताना मी जरी सत्ताधारी पक्षात असलो तरी शेवटी तडजोडीने मार्ग काढणे हा सर्वात महत्वाचा विषय आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील आपले तडजोडीने मार्ग काढण्यामध्ये प्राविण्य आहे. त्यामध्ये आपला हात कोणी धरणार नाही हे मला माहिती आहे. कारण माननीय मुख्यमंत्री सुध्दा सातत्याने आपले विचार घेत असतात. मला वाटते आपण सर्व जर एकत्र बसलो तर चांगल्या चाललेल्या सहकारी संस्थांमध्ये एखादा प्रतिनिधी नेमत असतील तर सहकार मंत्री महोदय चर्चेविना एखादा निर्णय घेणार नाहीत. पण चुकीचे जर चालत असेल तर त्या संस्थेला पर्यायाने पुढे नेण्याच्या दृष्टीने त्यांच्या आचारसंहितेमध्ये किंवा त्या संस्थेचा संचालक कसा असावा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रदीप नरके.....

यासाठी काहीतरी नियम आणि अटी घालतील. हा प्रश्न सोडविण्यासाठी एक चांगल्या पध्दतीने हे विधेयक आणले असले तरी यामध्ये दुमत आहे. एका बाजूला नाकारण्यात यावे असे सांगण्यात येते आणि दुसऱ्या बाजूला घेण्यात यावे असे सांगण्यात येते.

अध्यक्ष महोदय, मी याठिकाणी निश्चितपणे जे मत व्यक्त केले त्या पध्दतीने आपण या विधेयकाचा विचार करावा. शेवटी एखादी गोष्ट विधेयक पास करीत असताना एखाद्या सहकारी संस्थेमध्ये चुकीचा माणूस तज्ज्ञ म्हणून जाणे आणि मग चुकीच्या पध्दतीने त्याठिकाणी विचार केला गेला तर निर्णय चुकीचा होईल अशा पध्दतीने कार्यवाही व्हायला नको. तज्ज्ञ संचालक नेमत असताना त्याला नियम आणि अटी घालून विशेष करून त्या संस्थेचा चांगल्या पध्दतीने प्रयत्न करणारा तज्ज्ञ संचालक असावा. अशाप्रकारची या विधेयकावर विनंती करून माझे दोन शब्द संपवितो.

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धैर्यशील पाटील (पेण) : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा 1960 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी मांडण्यात आलेल्या विधेयकावर बोलण्याकरिता मी उभा आहे.

या विधेयकाला मी दुरुस्ती दिलेली आहे. दुरुस्तीमध्ये देत असताना उद्देश व कारणांमधील उद्देशांमध्ये स्पष्टता देण्याचा प्रयत्न याठिकाणी केला आहे. महाराष्ट्रामध्ये सहकारी चळवळ खूप चांगल्या पध्दतीने रुजली, वाढली, त्याच्यावर वेगवेगळ्या पक्षांचे राजकारण, समाजकारण सुध्दा सकारात्मकदृष्ट्या त्याठिकाणी उभे राहिले. हळूहळू चळवळ जसजशी पुढे गेली, तसतसे प्रत्येक चांगल्या गोष्टीमध्ये ज्या पध्तीने चुकीचे घटक शिरतात त्या पध्दतीने सहकारी चळवळीमध्ये सुध्दा शिरले. हे घटक ज्यावेळी शिरले त्यावेळी सहकारी चळवळीचा त्यांनी तोटा सुध्दा केला. काही ठिकाणी खूप फायदा झाला, काही ठिकाणी तोटा झाला. पण एक गोष्ट निश्चित आहे की, आतापर्यंत सर्वसामान्य माणसांच्या मनामध्ये केवळ भांडवलदारच काम करु शकतात अशा पध्दतीची भावना होती. परंतु लहान लहान माणसे एकत्रित आली आणि त्यांनी सुध्दा वारुळ बांधून दाखविले.

.....3F-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धैर्यशिल पाटील.....

1000 मुंग्या एकत्रित आल्या आणि त्यांनी सुध्दा मोठे वारूळ बांधून दाखविण्याची किमया केली. ज्या ठिकाणी गोड, गुळाची ढेप आली, तेथे मुंगळे सुध्दा आलेच. त्या मुंगळयांनी सुध्दा आपापले काम बजावले. आता ज्यावेळी हे मुंगळे बाहेर काढायचे आहेत अशी भूमिका सरकारच्या मनामध्ये येते, सहकार हा निव्वळ निकोप मनाने, स्वच्छ मनाने व्हावा, अशी अपेक्षा सरकारच्या माध्यमातून येते. त्यावेळी खरोखर आपल्याला अपेक्षित असलेल्या उद्देशामुळे आणि सांगत असलेल्या उपायांमुळे नक्की काय होणार आहे याचा विचार प्रामाणिकपणाने केला पाहिजे. बऱ्याचवेळा आजारावर उपाय करायला जातो नंतर त्याचे साईट इफेक्ट दिसतात. सहकार चळवळ खाल्ली गेली. ही गोष्ट खरी आहे. त्यामुळे आपण उपाय सूचवितो आहे. तो उपाय मुळ आजारापेक्षा भयंकर नसेल ना ! याचा सुध्दा विचार केला गेला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, या दुरूस्त्यांमध्ये जी पहिली दुरूस्ती सूचविली आहे, सहकारी संस्थांचे कर्मचारी असले पाहिजे, मुळात काही संस्थांमध्ये तसे आहेत. कर्मचा-यांचा प्रतिनिधी असण्यामध्ये काही चुकीचे असण्याचे काही चुकीचे मानण्याचे कारण नाही. या चर्चेतून संशयाचे धुके तयार झाले आहे. ते राज्य शासनाकडून जो अनुभव असलेली व अर्हता धारण केलेली व्यक्ती नियुक्त करण्याबाबत तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे. अशा पध्दतीची नॉन इलेक्टेड निवडून न आलेली व्यक्ती आतापर्यंत ज्या-ज्या ठिकाणी देण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये नगरपालिकांमधील शिक्षण मंडळाचे उदाहरणादाखल घ्यावे लागेल. या शिक्षण मंडळामध्ये कोण नॉमिनेट होते. कुणाची येथे नाम नियुक्ती केली जाते. मला येथे निश्चितपणाने सांगावे लागेल ही नामनियुक्ती कोणाची करतात. ज्याला आतापर्यंत कधी तिकीट दिले नाही. ज्याला तिकीट दिले. तरी तो निवडून येत नाही. निवडून आला तरी तो स्वस्थ बसत नाही. अशी साधारणत: उपद्रव मुल्य असलेली व्यक्ती किंवा बाहेर ती व्यक्ती काहीच काम करीत नाही. त्याला कुठे चिटकवावे, तर त्याला घ्यायचे आणि भिंतीला चिटकवून द्यायचे. तिथे त्याला जो काही व्याप करायचा तो करेल. तिथे त्याला वाटोळे करायचे असेल तो करेल. अशी भूमिका घेतली जाते. अनुभव असलेली व्यक्ती म्हणजे कोणता अनुभव, दुस-याला त्रास देण्याचा अनुभव, ती व्यक्ती चांगली भांडू शकते. यामध्ये अनुभव म्हणजे काय, अर्हता म्हणजे काय ? याचा कोणताही उल्लेख याच्यामध्ये नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : तो उल्लेख त्या-त्या संस्थेतल्या बायलॉजमध्ये करायला संधी आहे.

श्री.धैर्यशिल पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांना मनातले बोलण्याची खूप इच्छा होती. दादा चांगले आहेत. ते असे करणार नाहीत. ते नेहमी योग्य भूमिका घेतील. परंतु भविष्य काळामध्ये त्या पदावर चांगला माणूस राहिल अशातला काही प्रकार नाही. शेवटी त्या पदावर असणारी व्यक्ती ही वेगळा हेतू, वेगळा उद्देश घेऊन ज्यावेळी येईल. त्यावेळी राजकीय हेतू घेऊन येईल. त्यावेळी या तरतुदीचा वेगळा गैरवापर होऊ शकतो. म्हणून मला निश्चितपणाने सांगायचे आहे की, सहकारामध्ये सदस्य किंवा सभासद ही मंडळी निवडून आलेली असतात. विश्वासाने तिथे ती बॉडी निवडून देतात. त्यांच्यावर असा अविश्वास कसा दाखविता येईल. हयांनी निवडून दिलेली व्यक्ती ही पूर्णतः क्षमतेची नाही. म्हणून तिथे दुसरी व्यक्ती देतो आहे. असा अविश्वास कसा दाखविता येईल. उद्या निवडून आलेल्या कॅबिनेट मंत्रीमंडळामध्ये विरोधी पक्षाचा एखादा माणूस जामिन म्हणून लक्ष ठेवण्यासाठी बसवायचे ठरला तर ते लोकशाहीवर अविश्वास दाखविणारे होईल. ज्याने मत दाखवून दिले त्याच्यावर अविश्वास दाखविणारे होईल. याच पध्दतीने हा सुध्दा विश्वास लक्षात घेतला पाहिजे. मला असे वाटते कोणी गाय मारली म्हणून वासरु मारण्याची तयारी ठेवू नये. पेण अरबन बँक, सहकार क्षेत्रातील घोटाळा मी खूप जवळून पाहिला, जो घोटाळा झाला. घोटाळयामध्ये सहकारातून निवडून दिलेली चुकीची माणसे होती हा जसा होता. तसा रिझर्व बँकेची जी काही रेग्युलेशन्स् आहेत. त्याच्यामधली कमतरता ही सुध्दा भ्रष्टाचाराला कारणीभूत होते. मला असे वाटते भरपूर चांगले झालेले आहे, थोडेफार वाईट झालेले आहे. ते वाईट कसे या ठिकाणी निस्तरता येईल. याचा विचार निश्चितपणाने करावा. एक जिन्सी असलेल्या त्या बॉडीमध्ये एका विशिष्ट हेतूने एकत्रित आलेल्या, लोकांनी निवडून दिलेल्या त्या बॉडीमध्ये एखादा असा फॉरेन फॅक्टर टाकतो, शरीरामध्ये एखादा बाहेरचा अवयव पडला तर शरीर ते बाजूला काढून टाकते. शरीर एकजीव असते ते बाहेरचा पदार्थ स्विकारत नाही. फॉरेन बॉडी स्विकारत नाही.

....3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धैर्यशिल पाटील.....

अध्यक्ष महोदय, याचा मागचा उद्देश जरी चांगला असला तरी येणारा प्रत्येक माणूस, येणारी उद्याची सत्ताधारी ताकद असेल, ती या सगळया गोष्टींचा वापर चांगल्यासाठीच करेल असे समजण्याचे कारण नाही. म्हणून मी आपल्या माध्यमातून अशी मागणी करतो की, ठरावाला विधेयकाला विरोध करतो आणि संयुक्त चिकित्सा समितीकडे हे विधेयक पुढील चिकित्सेसाठी पाठवावे अशी विनंती करतो.

.....

.....4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.उन्मेश पाटील : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फॉरमेशन आहे. महाराष्ट्रातील आशिया खंडात उभारलेला पहिला साखर कारखाना श्री.विखे-पाटलांचा सहकारी साखर कारखाण्यामध्ये स्फोट होऊन पाच कर्मचारी मृत्युमुखी पडलेले आहेत. 10 ते 12 कामगार जखमी आहेत. त्या संदर्भात योग्य त्या विभागाला आदेश देऊन सहकार्य पोहचविण्यासंदर्भात सूचना द्याव्यात. धन्यवाद.

ज्या पध्दतीने सुधारणा विधेयक सुरु आहे. त्यापध्दतीने सन्माननीय सदस्य श्री.शंभूराज देसाई यांनी सांगितले की, 147 वा यशस्वी गळीत हंगाम सुरु केला. नवीन पिढीने सहकार उभारलेला नाही. आमच्या वाडवडीलांचा सहकार आहे. त्या दृष्टीने सहकार सुधारण्याबरोबर सेफ्टीच्या अनुषंगाने बिल आणता आले तर गांभीर्याने विचार करावा.

.....

श्री.उल्हास पाटील (शिरोळ) : अध्यक्ष महोदय, सरकारच्या वतीने चांगले बिल आणण्याचा प्रयत्न आहे. याला पाठींबा देण्याकरिता उभा आहे. सहकार चळवळीच्या माध्यमातून पूर्ण महाराष्ट्राचे चित्र बदललेले आहे. हे जरी वास्तव असले तरी यामध्ये पुर्वीच्या लोकांचा फार मोठा त्याग आहे. त्यांची त्यावेळची मानसिकता तळागाळातील सहका-यांना बरोबर घेऊन जाण्याच्या दृष्टीने त्या काळातील लोकांनी प्रयत्न केले. खडतर परिस्थितीमध्ये एकमेकांना सहकाराचा हात देऊन ही सहकार चळवळ सुरु केली. मधल्या काळामध्ये 1995-96 च्या दरम्यान युती शासनाच्या माध्यमातून काही चांगले निर्णय घेतले गेले. त्याचे फळ शेतकऱ्याच्या पदरामध्ये झोन बंदी उठविण्याच्या माध्यमातून काही चांगले निर्णय झाले.

3G-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.उल्हास पाटील .....

तशाच प्रकारचा निर्णय या विधेयकाच्या निमित्ताने व्हावा अशा प्रकारची अपेक्षा माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला वाटते. सहकार चळवळीच्या माध्यमातून लोकांनी एकमेकांना सहकार्याचा हात दिल्यामुळे किती मोठी क्रांती घडू शकते हे सर्व भारतात, महाराष्ट्रात खास करुन पश्चिम महाराष्ट्रात चांगल्या प्रकारची उदाहरणे आपणास पहावयास मिळतील. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील, श्री.बाळासाहेब पाटील, श्री.शंभुराज देसाई, श्री.चंद्रदीप नरके बोलत असताना त्यांनी खडतर मते मांडली आहेत. झोनबंदीचा निर्णय उठवत असताना त्या काळात अशाच पध्दतीने निर्णय झाला असणार आहे. आम्ही पहिल्यांदा सभागृहात आलेलो आहे. पण या चळवळीच्या माध्यमातून काम करीत असताना सहकार चालवित असताना त्या काळातील लोकांनी सहकार कायद्यात काही नियम केलेले होते. त्यामध्ये झोनबंदीचा नियम घालण्यात आलेला होता. आम्ही 1991-92 पासून सहकार चळवळीमध्ये काम करीत आहोत. एखाद्या कारखान्याने दोन-दोन वर्षे बील दिले नसले तरी शेतकऱ्यांनी त्याच कारखान्याला ऊस घालायचा, अशा नियम होता. एका बाजूला शेतकऱ्याच्या घामाचे दाम त्याला द्यायचे नाही, त्याची रोजीरोटी कशी चालली आहे हे बघायचे नाही व ऊस मात्र तेथेच घातला पाहिजे हा दंडक होता. युती शासनाच्या माध्यमातून झोन बंदीचा कायदा झाला. झोन बंदीची बेडी शेतकऱ्यांच्या पायातून तुटली. चांगल्या कारखान्याला ऊस देण्याचा प्रयत्न शेतकऱ्याला करता आला. सन्माननीय सदस्य श्री.बाळासाहेब पाटील हे अतिशय पोटतिडकीने बोलले आहेत मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. मला कोणत्याही एका कारखान्याबाबत आक्षेप असण्याचे काही कारण नाही. मात्र त्यावेळी झोनबंदीचा निर्णय झाला नसता तर आज आम्ही ऊस लावण्याचे बंद केले असते किंवा आत्महत्या केल्या असत्या. झोनबंदीचा कायदा झाला म्हणून एक कारखाना सोडून दुसऱ्या कारखान्याला ऊस गेला. यामुळे आमची रोजीरोटी चालू राहिली. मधल्या काळात काय चमत्कार झाला, काही कारखाने अपवादात्मक परिस्थितीत का बंद पडले ? सहकाराच्या माध्यमातून वेगळया पध्दतीने वाटचाल करणारा पश्चिम महाराष्ट्र व खासकरुन कोल्हापूर जिल्हा आहे. येथील पंचगंगा सहकारी साखर कारखान्याची अवस्था अशी का झाली, दौलत साखर कारखान्यासारख्या महाराष्ट्रात रिकव्हरीबाबत उच्चांक गाठणारा कारखाना आज बंद का पडला आहे ? 2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : सन्माननीय सदस्यांनी विधेयकातील दोन संचालकांच्या तरतुदीबाबत बोलावे.

श्री.उल्हास पाटील : अध्यक्ष महोदय, सहकारात केवळ साखर कारखाने नव्हेतर दूधसंघ, पतसंस्था, बँका संचालक मंडळाने चांगल्या प्रकारे चालविल्या आहेत. त्यामध्ये एक-दोन संचालक बाहेरुन आले तर काय फरक पडणार आहे. कर नाही त्याला डर कशाला. असे माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला वाटते. जे कारखाने चांगले आहेत ते चांगलेच आहेत. त्यामुळे या विधेयकाला मी माझ्या तमाम सहकाऱ्यांच्या, शेतकऱ्यांच्या व कामगारांच्या वतीने जाहीर पाठींबा देऊन माझे मनोगत थांबवितो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयकुमार गोरे (माण-खटाव) : अध्यक्ष महोदय, सन 2016 चे विधानसभा विधेयक क्रमांक 7 महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) यासंदर्भात काल सायंकाळपासून आतापर्यंत चर्चा होत आहे. सहकारावर खूप मोठे संकट येते की काय अशा पध्दतीचे वातावरण या सभागृहात व सहकार चळवळीमध्ये निर्माण झालेले आहे. या विधेयकाला दोन बाजू आहेत. महाराष्ट्रातील सहकार चळवळीकडे ग्रामीण शेतकरी जीवनाचा कणा म्हणून बघितले जाते. सहकाराने खूप मोठी क्रांती महाराष्ट्रात केलेली आहे. शेतकऱ्याला स्वतःच्या पायावर उभा करण्याचे काम सहकार चळवळीने केलेले आहे याबाबत कोणाचेही दुमत नाही. ही सहकार चळवळ उभी राहिल्यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना स्वतःच्या पायावर उभे राहता आले. दूध व्यवसाय, ऊस व्यवसाय, सहकारी बँकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना झालेले अर्थसहाय्य यामुळे सहकार चळवळीतून शेतकऱ्यांना खूप मोठी ताकद दिली. ही ताकद देत असताना मी सांगू इच्छितो की, अनेक कारखाने आज आदर्शरित्या चाललेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.बाळासाहेब पाटील यांचा कारखाना चांगला चालला आहे म्हणून त्यांच्याकडे पश्चिम महाराष्ट्र व जिल्हा पहात आहे. मघाशी सहकार मंत्री महोदंयानी काही भूमिका मांडल्या आहेत, चेअरमन बदलले पाहिजे असे सांगितले. ज्या घराचा कारभारी चांगला असतो त्याचे घर चांगले चालते. कारखाना घडवायचा, चालवायचा आणि शेतकऱ्यांना न्याय द्यायचा हे एवढे सोपे नाही. आपण समोर बसून टीका करतो पण कारखाना चालविणे एवढे सोपे नाही याची आम्हाला नक्की जाणीव आहे. हे सर्व करीत असताना अलिकडच्या काळामध्ये सहकार चळवळ बदनाम करण्याचे काम झाले. आज सहकार का बदनाम झाला आहे. सहकाराकडे लोक बोट का दाखवायला लागले याचा विचार सहकारातील कर्त्या मंडळींनी केला पाहिजे. अनेक सहकारी साखर कारखाने अवसायनात निघाले की काढले गेले. त्यानंतर सहकार चळवळीकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला गेला. सहकारी संस्था काढायच्या, सहकाराचे नाव द्यायचे, त्या सहकारी संस्था मोडकळीस आणायच्या, याकरिता आपणाकडे असणाऱ्या दुस-या सहकारी संस्थांचा वापर करायचा. मग त्या बँकांच्या स्वरूपातील असतील किंवा दुसऱ्या असतील. त्यांचा वापर करून या संस्था डबघाईस आणायच्या, नंतर त्या संस्था विकत घ्यायच्या व त्यांचे खाजगीकरण करायचे. अलिकडच्या कालखंडात असा नवीन ट्रेंड सहकारामध्ये

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

06-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) 3G-4

PNG/ ST/ AKN/ 19:40

श्री.जयकुमार गोरे.....

आलेला आहे यामुळे सहकार बदनाम झाला. सरकारने विधेयक आणले आहे की, कामगारांचा एक प्रतिनिधी यामध्ये घेतला पाहिजे. याबाबत कोणाचेही दुमत असण्याचे काही कारण नाही. दुसरा संचालक घेत असताना सरकारची भूमिका प्रामाणिक असेल व स्वच्छ मनाने सरकार ही भूमिका घेत असेल तर दुसरा संचालक नेमका कशासाठी पाहिजे याबाबत सरकारकडून स्पष्टीकरण द्यावे. मी खासकरुन जिल्हा बँकेच्या बाबतीत सांगणार आहे. जिल्हा सहकारी बँका म्हणजे शेतकऱ्यांची रक्तवाहिनी म्हटले तर वावगे होणार नाही. जिल्हा बँकाशिवाय पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी उभा राहू शकत नाही. विदर्भातील शेतकऱ्यांना आत्महत्या का करावी लागते ? सहकार वाढवावा लागतो, सहकार चालवावा लागतो. जेथे सहकार मोडून खाल्ला, जेथे बँका मोडून खाल्ल्या तेथे शेतकऱ्याला सावकाराकडे जावे लागले. सावकारांनी शेतकऱ्यांकडील शेती नावावर करुन घेतली. त्यात त्यांनी प्रचंड व्याजदर लावले. यातून शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत. आजही पश्चिम महाराष्ट्रात आत्महत्या होत नाहीत याला वेगळी कारणे आहेत. सहकारामध्ये काही माणसे अशा प्रकारे उभी राहिली आहेत की, सहकारी संस्था शेतकऱ्यांसाठी नाही तर आमच्या राजकारणासाठी महत्वाच्या झालेल्या आहेत. सहकारी संस्थांचा वापर अलिकडे राजकारणासाठी होत आहे. त्यातून आज आपणहे विधेयक आणले आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, ज्या संस्थामध्ये सरकारी भागभांडवल आहे, त्या संस्थामध्ये भागभांडवलाच्यारुपाने सरकार एक प्रतिनिधी नेमणार आहे. मी याबाबत मंत्री महोदयांना अनेकदा भेटलो आहे की, जिल्हा सहकारी बँकावर डी.डी.आर. चे स्थायी पद आहे. डी.डी.आर. ची बदली झाली तरी संचालक मंडळामध्ये नवीन आलेला डी.डी.आर. संचालक असतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयकुमार गोरे.....

राज्यातील आठ-दहा जिल्हा बँका बुडाल्या, काय करतो डीडीआर ? या बुडालेल्या बँकांवर डीडीआर आणि शासनाचा प्रतिनिधी नव्हता का ? काय केले डीडीआरने तेथे ? या शासनाच्या प्रतिनिधीने शासनाच्या लक्षात का आणून दिले नाही की, या बँकेमध्ये काहीतरी चुकीचे होत आहे, या बँकेचे संचालक मंडळ चुकीच्या पध्दतीने काम करीत आहे, हे शासनाच्या लक्षात आणून देणे आवश्यक होते. राज्य बँका बरखास्त झाल्यावर त्या संचालक मंडळामध्ये असणा-या संचालकाला पुढील दहा वर्षे संचालक होता येणार नाही, हा निर्णय शासनामार्फत चांगला घेतला गेला होता. राज्य बँकेला अनेक पुरस्कार मिळाले होते. त्याचे सर्वत्र कौतुक होत होते. अनेक ट्रॉफीज मिळाल्या होत्या. कोणतीही बँक बुडत असताना ती एक-दोन वर्षात बुडत नाही. बँक पूर्णपणे बुडण्याकरिता पाच-दहा वर्षांचा कालावधी लागतो. बँकेमध्ये बुडण्याची कीड हळू हळू पसरते मग ही पसरलेली कीड बँकच खाऊन टाकते. अनेक जिल्हा बँकेत आजही तीच परिस्थिती आहे. सहकारी बँकांवर शासनाचा प्रतिनिधी म्हणून डीडीआर आणि एएआर काम करीत आहेत. पतसंस्थांमध्येही ब-याच ठिकाणी एएआर आणि डीडीआर शासकीय प्रतिनिधी म्हणून काम करीत असतात. बँका बुडल्या की शासन त्यांना मदत करावयाची भूमिका घेते. आम्ही सर्व जण सभागृहामध्ये सामान्य माणसांच्या ठेवींकरिता शासनाकडे बँकेला मदत करण्यासाठी मागणी करतो. सामान्य माणसांच्या ठेवींसाठी शासनाने बुडणा-या जिल्हा बँकांना मदत केली पाहिजे, अशी सर्व जण त्यावेळी भूमिका घेतात. ज्यावेळी सहकारी संस्थांमध्ये, कारखान्यांमध्ये पतसंस्थांमध्ये चुकीच्या गोष्टी चालत असतात, त्यावेळी शासनाचा प्रतिनिधी तेथे काय करीत असतो ? हा शासनाचा प्रतिनिधी नेमका कुठे असतो? या संदर्भात मी उपोषणाला बसलेलो असताना माननीय मंत्री महोदयांनी मला आठ दिवसांमध्ये बैठक लावण्याचे आश्वासन दिले होते. आता या गोष्टीला किती दिवस झाले ? याबाबत आपण माझ्याशी फोनवर बोलला की, सन्माननीय सदस्य श्री.जयकुमार गोरे आपण काही काळजी करून नका काही अडचण असेल तर ती आपण आठ दिवसांमध्ये सोडवू. जिल्हा बँकेची बैठक घेण्यासंदर्भात आपल्यावर कोणाचा दबाव आहे ? दिल्लीमध्ये सर्वात जास्त जर कोणाचे वजन असेल तर ते माननीय सहकारमंत्री यांचे आहे,असे आम्हाला वाटते. असे असताना कोणत्या दबावाखाली आपण जिल्हा बँकेची बैठक लावत नाहीत ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयकुमार गोरे.....

बँकेमध्ये असताना डीडीआरला स्वत:चे मत मांडण्यास सांगावे. बँकेमध्ये चुकीची गोष्ट होत असेल तर डीडीआरने आपले स्वत:चे मत मांडले पाहिजे. शासनाला त्या संदर्भात सविस्तर माहिती दिली पाहिजे. डीडीआरलाही शासनाने चुकीच्या कामाकरिता जबाबदार धरले पाहिजे. आता जो संचालक शासन नेमणार आहे, त्या मत मांडण्याचा अधिकार नसेल तर त्याचा काही उपयोग नाही. चुकीच्या कारभाराबद्दल शासनाला कळविण्याचा अधिकार संचालक म्हणून काम करणा-या शासकीय प्रतिनिधीस असेल तर चांगली गोष्ट आहे. परंतु कोणाला नेमणार आहात, याच्यावर पुढील गोष्टी अवलंबून आहेत. शासनाने आमच्या येथील मार्केट कमिटयांवर दोन संचालक नेमलेले आहेत. हे दोन्ही संचालक अनुक्रमे भाजप व शेतकरी कामगार पक्षाचे तालुका अध्यक्ष आहेत. याच्यासाठी हे असले तर हे चुकीचे आहे. माननीय मंत्री यांच्या मताचा चांगला माणूस असेल तर जरूर या संचालक मंडळावर नेमला तरी हरकत नाही. शासनाने अनेक सहकारी सुतगिरण्यांना पैसे दिलेले आहेत. अनेकांना माझे भाषण रूचणार नाही. शासनाने अनेक सहकारी सुतगिरण्यांना भागभांडवल दिलेले आहे. नवीन अर्थसंकल्पामध्ये सुतगिरण्यांकरिता तरतूद केलेली आहे. किती तरतूद कोणाला दिली जाणार आहे, याची आम्हाला माहिती नाही. हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या सुतगिरण्या सोडल्या तर कोणीच शासनाचे भागभांडवल परत दिलेले नाही. या अशा सहकारी सुतगिरण्यांपैकी किती सुतगिरण्या चालू आहेत ? अशा वेळी संचालक मंडळावरील शासकीय प्रतिनिधी किंवा डीडीआर काय करतो ? तो त्या सहकारी संस्थेमध्ये चुकीचे चालू आहे, याबाबत शासनाला माहिती का देत नाही ? ही माहिती कधीही कागदावर आलेली नाही. आजही याबाबत शासनाने माहिती मागविली तर वेगळीच माहिती समोर येईल. खरी माहिती समोर येत नाही.

अध्यक्ष महोदय, मी जिल्हा बँकेचा संचालक आहे. माझ्या आठ महिन्याच्य कार्यकाळामध्ये कर्जमंजूरीचे एकही प्रकरण संचालक मंडळाच्या समोर आणले नाही. या बँकेमध्ये अनेक ट्रॉफीज येतात. राज्यातील चांगली बँक म्हणून आमच्या जिल्हा बँकेचे कौतुक केले जाते. शासन संचालक मंडळातील संचालकाला चुकीच्या कारभाराबद्दल जबाबदार धरले जाते. बँकेत चुकीचे घडले तर प्रत्येक संचालकावर जबाबदारी ठेवलेली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयकुमार गोरे.....

कर्जमंजूरीचे एकही प्रकरण संचालक मंडळाच्या समोर येत नसेल तर संचालक मंडळाच्या संचालकाला शासन कसे जबाबदार धरणार ? याबाबत मी डीडीआर आणि सह निबंधक यांच्याकडे तक्रार केली. याबाबत मी शासन म्हणून मंत्री महोदयांकडेही तक्रार केलेली आहे. पण यावर काही झाले नाही. हे काम नेमके कसे चालते ? शासन मंडळावर केवळ नामधारी माणसे नेमली जात असतील आणि डीडीआर आणि जे.आर. तेथे असताना जर चुकीचे कामकाज होत असेल आणि तो आपले मत नोंदवित नसेल किंवा ते आपले मत नोंदवित नसतील तर त्यामध्ये सर्वप्रथम सुधारणा करण्यात यावी. जिल्हा बँकेत असणा-या डीडीआरने सर्वप्रथम आपले मत मांडले पाहिजे. चुकीचे कामकाज होत असेल तर....

अध्यक्ष : हे सर्व बैठकीला आले तर होते. बैठकीला ते येतच नाहीत.

श्री.जयकुमार गोरे : अध्यक्ष महोदय, बैठकीला आलेच पाहिजे. माझ्या उपोषणानंतरच्या तीनही बैठकीला शासनाचा डीडीआर आलेला नाही. बैठकीला डीडीआरला उपस्थित राहणे सक्तीचे करणे आवश्यक आहे. या जिल्हा बँका 5-7 हजार कोटी रुपयांच्या असतात. सहकारमंत्री महोदय या नात्याने डीडीआरला बैठकीला उपस्थित राहणे सक्तीचे करण्यात यावे. एखाद्या बैठकीला डीडीआरला येणे जमत नसेल तर त्याच्या जागी जो काम पाहणारा असतो, त्याने तरी बैठकीला उपस्थित राहण्याची सक्ती शासनाने या माध्यमातून करावी. संचालक मंडळावरील शासकीय अधिका-याचा अधिकार सर्वप्रथम फायनल करण्यात यावा. नवीन कार्यसंचालक आणण्यापूर्वी हे सुधारण्यात यावे. सहकारी बँकेत घोटाळा झाला तर संचालक मंडळावर असलेल्या शासकीय अधिका-याला जबाबदार धरल्याशिवाय चालणार नाही. येथे बॉक्समध्ये बसलेले याकरिता कधीच मान्यता देणार नाहीत, परंतु आपल्याला सहकार मंत्री म्हणून जबाबदारी घ्यावी लागेल. अन्यथा संचालक मंडळामध्ये चालू असलेल्या चुकीच्या कारभारावर शासकीय अधिकारी संचालक म्हणून लक्ष ठेवणार नाही. याबाबत शासनाला निर्णय घ्यावा लागेल. याबाबत शासकीय अधिकारी जबाबदारी घेत नाहीत. संचालक मंडळामध्ये काय चालू आहे, याबाबतचे सातत्याने नियमितपणे खरे मत मागविणे आवश्यक आहे. कार्यकारी समितीला कर्ज मंजूर करण्याचे अधिकार आहेत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

का ? यावर ते प्रचलित पध्दतीने असे करता येते, असे लिहून देतात. परवा आमच्या राज्यमंत्री महोदयांना असेच लिहून दिले होते. 4

06-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) 3H-4

JN/ ST/ AKN/ AKN 19:50

श्री.जयकुमार गोरे.....

अध्यक्ष महोदय, अनेक सहकारी सुतगिरण्यांवर शासनाने शासकीय प्रतिनिधी नेमलेले आहेत. ते नेमत असताना सुतगिरणीच्या संचालक मंडळामध्ये कशा पध्दतीने कारभार चालू आहे,याची माहिती घ्यावी. ज्या ज्या लोकांनी सुतगिरण्या उभ्या केल्या नाहीत. शासनाचे कोटयवधी रूपयांचे भागभांडवल घेतले ते परत केले नाही, अशा ज्या सुतगिरण्यांचे लोक आहेत, ते शोधून काढले पाहिजे. या अर्थसंकल्पात मागासवर्गीयांच्या सुतगिरण्यांकरिता नियोजन केलेले आहे. किती मागासवर्गीयांनी एकत्र येऊन सुतगिरण्या काढलेल्या आहेत, हे मला दाखवावे. येथे बसलेल्या सर्व नेत्यांच्या मागासवर्गीय सुतगिरण्या आहेत.

3आय-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयकुमार गोरे.....

कार्यकर्ते पोसले जातात. भागभांडवल दिल्यानंतर संबंधितांना निवडणुकीमध्ये उभे केले जाते. यासाठी हा सर्व खटाटोप सुरु आहे. आता अशी परिस्थिती समोरच्या बाकावर निर्माण झाली आहे की काय अशी शंका आमच्या मनात येत आहे. सन्माननीय सदस्य श्री. नसीम खान यांनी आम्हाला पैसे दिले होते. माझ्याही मतदारसंघात मला देण्यात आलेले पैसे निवडणुकीसाठी वापरले होते. परंतु, त्यावेळी सूतगिरणी सुरु झाली नव्हती. संस्थेमध्ये अशा सदस्यांची आवश्यकता किती आहे, ते सांगण्याचा प्रयत्न केला जात आहे. या सर्व गोष्टी सांगितल्याशिवाय सदस्याला किती महत्व आहे ते कळणार नाही. विधेयकला समर्थन देत असताना आपल्या सर्वांचा हेतू स्वच्छ असला पाहिजे. निवडणुक न घेता संचालकांची नेमणुक केली जाणार असेल तर ते बरोबर नाही. चांगले संचालकांना घेण्याबाबत कोणतीही अडचण येणार नाही. मंत्री महोदयांनी संस्थेच्या हिताचे रक्षण करणारा संचालक नेमण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. धैर्यशील पाटील यांनी मघाशी त्यांच्या भाषणात जो मुद्दा उपस्थित केलेला होता, तो रास्त होता. निवडणुकीत संचालक निवडून आल्यानंतर त्यांचा बॉडीवर विश्वास नसेल तर अशा वेळी प्रश्न निर्माण होणार आहे. संस्थेमध्ये शासनाचे भागभांडवल आहे. अशा ठिकाणी संचालकांना पाठविण्याबाबत कोणतीही अडचण नसावी असे माझे मत आहे. हे फक्त कागदावर ठेऊन चालणार नाही. शासनाने ठेवीदारांना ठेवी परत मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. असे असले तरी आता सहकार बिघडलेला आहे.

अध्यक्ष महोदय, सातारा जिल्ह्यातील बँक चांगली आहे. मी त्या बँकेला कोणताही दोष देणार नाही. कोणतीही संस्था एका वर्षात बुडत नाही. संस्थेमधील मंडळी सर्वसामान्य जनतेच्या हिताचा विचार सोडून आपल्या राजकारणाचा विषय घेतात तेव्हा ती संस्था 100 टक्के अडचणीत येते.

अध्यक्ष महोदय, माझ्या जिल्ह्यात जिल्हा बँकेने पीक पाणी बघितल्याशिवाय अल्प मुदतीचे कर्ज वाटप करावयाचे नाही, अशा प्रकारचा एक नवीन फतवा काढलेला आहे. डीडीआर कोठे आहे, त्याचा आम्हाला पत्ता लागत नाही. महाराष्ट्र राज्यावर गेल्या 3 वर्षापासून दुष्काळ आहे. अशा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयकुमार गोरे.....

वेळी पीक पाणी बघितल्याशिवाय कर्ज मिळणार नसेल तर ते योग्य नाही. शेतीला पाणी मिळत नाही. जिल्हा बँकेने काढलेल्या फतव्यामुळे आमच्या जिल्ह्यातील शेतकरी हैराण झालेला आहे. मशागत, खतासाठी, पिकासाठी आणि बियाणासाठी अल्प मुदतीचे कर्ज दिले जाते. नाबार्डने 2014 मध्ये जे परिपत्रक निर्गमित केलेले होते, ते मी वाचलेले आहे. अल्प मुदतीच्या कर्जाच्या वापराबाबत अंतिम पाहणी करावे असे त्यामध्ये नमूद केलेले आहे. अंतिम पाहणी म्हणजे त्याचा वापर झाला आहे किंवा कसे याची तपासणी करण्याची आवश्यकता आहे. नाबार्डच्या परिपत्रकात कोणतीही चूक नाही. परंतु, जिल्हा बँकेन पीक पाणी बघितल्याशिवाय अल्प मुदतीचे कर्ज देऊ नये असे म्हटले आहे. आज कोणत्या शेतकऱ्याच्या शेतामध्ये पाणी आहे, याची माहिती माननीय श्री. चंद्रकांत पाटील यांनी आम्हाला देण्याची गरज आहे. शेतकऱ्यांनी आतापर्यंत घेतलेले कोणतेही कर्ज थकविलेले नाही. 99 टक्के शेतकरी मार्च महिला आल्यानंतर आपले कर्ज बँकेत भरत असतो. अशा वेळी शेतकऱ्यांना जी अडवणुकीची भूमिका घेतली जाते त्यावेळी शासनाच्या वतीने काम करणारा संचालक कोठे असतो असा आमचा प्रश्न आहे. यासंदर्भात मी पूर्वी प्रश्न विचारला होता. परंतु शासनाने तशा प्रकारचे आदेश दिले नव्हते. दुसरा संचालक निवडण्यापूर्वी शासनाच्या वतीने जो मूळ संचालक काम करीत असतो अशा संचालकाच्या जबाबदाऱ्या निश्चित करण्याची आवश्यकता आहे. जो संचालक निवडला जाणार आहे, हा सहकार विभागातील तज्ज्ञ असला पाहिजे, त्याचा हेतू स्वच्छ असला पाहिजे. आज सहकार चळवळीत सर्वजण बदनाम आहे, असे नाही. कोणत्याही परिस्थितीत सहकार वाचलाच पाहिजे. सहकार चाललाच पाहिजे. एक एकरामध्ये ऊस आला नाही तर संबंधित शेतकरी हवालदिल होतो. कारखानादारी बंद पडली तर शेतकरी कोठे जाणार ? दूध सहकारी संस्था बंद पडली तर जोडधंदा करणाऱ्या शेतकऱ्यावर संकट कोसळते. आज दोन्ही बाजूने आपण काय केले अशा प्रकारचे युध्द होऊ नये, अशी आमची प्रामाणिक इच्छा आहे. जे शासकीय अधिकारी या ठिकाणी नेमलेले आहेत, अशा अधिकाऱ्यांची संस्थेमध्ये जबाबदारी काय आहे याची माहिती देण्याची आवश्यकता आहे. आपण फक्त नॉमिनल संचालक नेमले आहेत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयकुमार गोरे.....

काय ? विधेयक मंजूर करण्यापूर्वी या सर्व प्रश्नांची आम्हाला उत्तरे देण्याची आवश्यकता आहे. अन्यस्था तशा प्रकारची विधेयकात दुरुस्ती करावी. संचालकांचे अधिकार काय, त्यांची जबाबदारी काय आहे, हे पहिल्या प्रथम अंतिम करण्याची आवश्यकता आहे. त्यानंतरच विधेयक संमत करावे, अशा पध्दतीची विनंती करतो आणि थांबतो.

जय हिंद.

.....4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी) : अध्यक्ष महोदय, सभागृहातील ज्येष्ठ आणि सहकार क्षेत्रात अनुभव असणाऱ्या सन्माननीय सदस्यांनी आपली भूमिका मांडलेली आहे. माननीय अध्यक्षांना आता विधेयक मंजुर करावयाचे असल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश आबिटकरला कशाला संधी द्यायची, असे वाटले असावे.

अध्यक्ष महोदय, सदर विधेयकात दोन ते तीन मुद्यांकडे लक्ष वेधणार आहे. सदर विधेयकात आणखी काही सूचना करणे आवश्यक आहे असे मला वाटत आहे. विधिमंडळात आपण कायदे तयार करीत असतो. त्यामुळे विधिमंडळातील सदस्य या नात्याने मला माझी भूमिका मांडणे ही माझी नैतिक जबाबदारी आहे असे मी समजतो.

अध्यक्ष महोदय, राजकीय व्यासपीठावरील मान्यवरांनी खरे बोलावे की बरे बोलावे असे ज्यावेळी आपण म्हणतो, त्यावेळी नेहमीच सर्वांना बरे वाटावे म्हणून आम्ही बरेच बोलत असतो. कारण खरे बोलले की, ते कोणाच्या तरी अंगाशी येते. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. चंद्रदीप नरके यांनी त्याच उद्देशाने भाषण केले होते.

अध्यक्ष महोदय, आताच सन्माननीय सदस्य श्री. जयकुमार गोरे यांनी काही मुद्दे मांडलेले आहेत. त्याच मुद्याच्या अनुषंगाने मी फक्त दोनच मुद्दे मांडणार आहेत.

अध्यक्ष महोदय, सदर विधेयकामध्ये संदिग्धता आहे. मागील वेळेस मार्केट कमिटीच्या विषयामध्ये माझ्या मनात शंका होती. राजकारण करीत असताना ताकाला जाऊन भांडे लपविण्याचे काहीच कारण नाही. एखाद्या संस्थेवर आपला माणूस जातो, त्यावेळी अशा व्यक्तीकडे कोणते ज्ञान किंवा शिक्षण असले पाहिजे, त्याने काय केले पाहिजे आणि त्या ठिकाणी त्याचा कोणता रोल असणार आहे अशा सर्व गोष्टी क्लिअर केल्या नाही तर अशा वेळी सर्वांनी जे राजकारण केले तेच राजकारण आपण करतो असे होईल. आज सहकारामध्ये वाईट अवस्था आहे. सहकारामध्ये एका बाजुला कारखाना, बँक, वेगवेगळ्या संस्थांमध्ये वित्तीय सल्लागार कोणीही नव्हते. शेतकऱ्यांनी मिळून कारखाना काढला आहे. आम्ही निवडणुका लढवित असतो. अशा वेळी अकाऊंटिंगचे शून्य ज्ञान आमच्याकडे असते. लोकांची मते घेऊन आम्ही निवडून येत असतो. परंतु, आमच्याकडे फायनांशिअल नॉलेज नसते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश आबिटकर...

आज सुध्दा तिच वाणवा असल्यामुळे तेथिल माणूस चांगला असेल तरच सहकार चालणार आहे. पलिकडच्या बाजूचे सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, श्री.बाळासाहेब थोरात, श्री.चंद्रदीप नरके, श्री.शंभूराज देसाई या सर्वांनी आपल्या सहकारी चळवळीच्या माध्यमातून आपला विश्वास संपादित करुन सहकार चालविला. परंतु दुसऱ्या बाजूला जे कारखाने बंद पडले, ते कशामुळे बंद पडले, ज्या ज्या कारखान्यांची ही अवस्था झाली, ती कशामुळे झाली, याला कोण जबाबदार आहे? या कारखान्याचे नेतृत्व करणारे जे लोक होते त्यांच्याकडे फॉयनान्सियल नॉलेज कमी होते. त्यांच्यावर कोणीतरी मॉनिटरिंग करायला पाहिजे होते ते केले नाही. मला या विधेयकामध्ये एक महत्वपूर्ण सूचना करायची आहे. संचालकाची नियुक्ती करताना किमान त्याचे शिक्षण एम.कॉम., बी.कॉम असावे. त्याने दिलेल्या सूचनांचा विचार संचालक मंडळाने केला पाहिजे अन्यथा "बिन पगारी फूल अधिकारी" असे होता कामा नये. केवळ आमच्या कार्यकर्त्याची सोय लावण्यासाठी हे केले होते, असे होता कामा नये. त्या संस्थेला सुध्दा त्याचा चांगला उपयोग करता आला पाहिजे. या विधेयकाच्या माध्यमातून सहकारामध्ये सुधारणा करण्याचे आणखी एक चांगले पाऊल आपण टाकत आहात. मागील वेळेस माननीय सहकारी मंत्र्यांनी एक चांगल्या प्रकारचे विधेयक आणले होते. आरबीआयने जेथे प्रशासक आणला त्या ठिकाणी दहा वर्षासाठी विद्यमान संचालकांना अपात्र करण्याचा निर्णय घेतला. यासंदर्भात खूप लोकांनी उलट सुलट भूमिका घेतली. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचा उल्लेख केला, त्या बँकेचा मी साक्षीदार आहे. माझ्या जिल्ह्यात प्रशासक येईपर्यंत अगदी धडधडीत बोनस वाटायचे, देशातील एक नंबरची बँक अशा पध्दतीने वल्गना करीत होते. आरबीआयने राज्य शासनाला तंबी दिली आणि नाईलाजाने तेथे प्रशासक आणला. त्यानंतर गेल्या सात वर्षापासून शेकडो कोटी रुपयांच्या ठेवी, छोट्या मोठ्या संस्था, दुध संस्था, विकास संस्था, वेगवेगळ्या संस्थांचे सर्व शेअर कॅपिटल त्या बँकेत आहे, त्यांना एक रुपयांचा डिव्हीडंड मिळाला नाही, याला जबाबदार कोण आहे? हे सर्व कोणी केले? तेच लोक आज विकासाच्या प्रक्रियेमध्ये बोलत आहेत. चांगल्या गोष्टी करण्यासाठी कोणाचा वाईटपणा घ्यायचा असेल तर त्यासाठी आपण आणखी दोन पाऊल पुढे जाऊ. कोणाचाही रोष पत्करु या, परंतु समाजाचे भले करण्याच्या दृष्टीकोनातून आपण

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश आबिटकर...

पुढे जाऊ या. त्यातील एक रोल म्हणून आपण जी भूमिका घेत आहात, त्या भूमिकेचे मी स्वागत करतो. भविष्यकाळात यापेक्षाही चांगल्या प्रकारचे कायदा करण्याची अपेक्षा आहे. ते कायदे करण्याच्या दृष्टीने आपण पाऊल उचलावे अशी मी विनंती करतो. सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रदीप नरके, बाळासाहेब पाटील आपण सर्वजण मघापासून अस्वस्थ होत आहेत की, आमच्याकडे अनावश्यक माणूस कशाला येतो, अशी आपल्या मनामध्ये भीती आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सुध्दा आता ऐकायला पाहिजे होते. मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस अतिशय चांगल्या पध्दतीने काम करीत आहेत. एक पारदर्शी, अभ्यासु मुख्यमंत्री म्हणून श्री.देवेंद्र फडणीवस यांचेकडे पाहिले जात आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांचे काम चांगले असले तरी त्यांचे काय चुकले हे बघणारे सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील आहेत. तिकडच्या बाजूला सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील बसले आहेत म्हणून आम्ही चांगले काम करीत आहोत. तसेच काम संस्थांमध्ये व्हायचे असेल आणि भविष्यामध्ये संस्था सुरक्षित ठेवायच्या असतील तर अशा प्रकारची विधेयके आली पाहिजेत. या विधेयकाला आपण सर्वजण पाठिंबा देऊन मी माझे दोन शब्द संपवितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद) : अध्यक्ष महाराज, मी या सहकार विधेयकावर फक्त दोनच सूचना करणार आहे. आपण या संचालक मंडळावर तज्ज्ञ संचालक नेमत असताना त्या पाठीमागचा चांगला उद्देश आहे. सर्वच संस्थेमध्ये शासनाचे भाग भांडवल आहे त्यामुळे त्याची अकौंटिबिलिटी निश्चित झाली पाहिजे. त्या तज्ज्ञ संचालकाने त्या संस्थेमध्ये अनियमितता, भ्रष्टाचार होत असेल, काही गैरकाम होत असेल तरशासनाला कळविलेच पाहिजे, ही जबाबदारी त्यांचेवर निश्चित केली पाहिजे. जेणेकरुन तज्ज्ञ संचालकामार्फत संस्थेत अनियमितता होत असेल ती शासनाला कळाली तर त्यावर शासनाला ॲक्शन घेता आली पाहिजे. ही तज्ज्ञ संचालकांची अकौंटिबिलिटी निश्चित करावी, एवढीच सुधारणा करण्यात यावी, अशी माझी विनंती आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पुरे करतो.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दादाजी भुसे (सहकार राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, सन 2016 चे सहकार विधेयक क्रमांक 7 वर या सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले. त्यामध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, उन्मेश पाटील, अमित देशमुख, शंभूराज देसाई, शरद सोनावणे, डॉ.अनिल बोंडे, सर्वश्री बाळासाहेब थोरात, जैनुद्दीन, डॉ.जयप्रकाश मुंदडा, सर्वश्री बाळासाहेब पाटील, संजय सावकारे, चंद्रदीप नरके, धैर्यशील पाटील, उल्हास पाटील, प्रकाश आबिटकर, डॉ.संजय कुटे या अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अनेक सूचना या ठिकाणी करण्यात आल्या.

अध्यक्ष महाराज, मी सुरुवातीस सांगू इच्छितो की, या विधेयकावर काल चर्चा करीत असताना सुरुवातीलाच सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील आणि दिलीप वळसे-पाटील यांनी संविधनाचे मोठे पुस्तक सभागृहात आणले. हे सहकार विभागाचे विधेयक घटनेचा भंग करीत आहे, हे सांगण्याचा प्रयत्न केला. सन्माननीय सदस्य या सदनाचे ज्येष्ठ सदस्य आहेत. त्यांनी संविधनाच्या भाग-9 (ख) 243 मधील एक परिच्छेद वाचला. सहकारी संस्थांच्या संचालकांची कमाल संख्या 21 पेक्षा अधिक असणार नाही, एवढी एक सोईची ओळ त्यांनी वाचली. हे विधेयक आणून सहकार विभाग त्या घटनेचा भंग कसा करतो, हे मांडण्याचा काल प्रयत्न करण्यात आला. आम्ही आज संविधानाचे लहान पुस्तक आणले आहे. संवधिनाची तरतूद एकच आहे, त्याच पानावर खालच्या ज्या ओळी आहेत, त्या सोईस्कररित्या सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी काल वाचल्या नाहीत. या ठिकाणी काय लिहिलेले आहे ते मी वाचून दाखवितो. "परंतु तसेच सहकारी संस्थेचे कार्यकारी संचालक हे मंडळाचे सदस्य देखील असतील आणि अशा सदस्यांना खंड-1 च्या पहिल्या परंतुकात विनिर्दिष्ट केलेल्या संचालकाच्या एकूण संख्येची गणना करण्याच्या प्रयोजनासाठी वगळण्यात येईल. 97 व्या घटना दुरुस्तीमध्ये जी कमाल मर्यादा आपल्याला घालून दिलेली आहे त्याच्यामध्ये याची मोजदाद केली जाणार नाही." अशा प्रकारच्या तरतूद त्याच संविधनामध्ये केलेली आहे. म्हणून पहिला जो मुद्दा होता, तो या ठिकाणी लागू होत नाही. हे मला नम्रपणे येथे सांगावयाचे आहे. या सहकार क्षेत्रात कामकाज करणारी ज्येष्ठ मंडळी आहेत. आपल्याला ठाऊक आहे. सहकार विभागाला शेकडो वर्षाची परंपरा आहे. एक व्यक्ती

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दादाजी भुसे....

एखादे कार्य करु शकत नसेल तर अनेक लोकांच्या समूहाने एकत्र यायचे आणि ते कार्य पार पाडायचे. ते कार्य पार पाडल्यानंतर जी काही फळ मिळणार असतील ती सर्वांनी वाटून घ्यावयाची, असा गोड सहकार शेकडो वर्षाची परंपरा या सहकाराला आहे.

यानंतर 3 K-1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दादाजी भुसे ...

अध्यक्ष महोदय, आज महाराष्ट्रात या सहकाराच्या माध्यमातून गावपातळीवरील विका सोसायट्यांपासून ते राज्य पातळीवरील बँकेपर्यंत साधारणतः सव्वादोन लाखांपेक्षा जास्त संस्था अस्तित्वात आहेत. ही गोष्ट खरी आहे की, या सहकाराच्या माध्यमातून लाखो लोकांना रोजगार मिळाला. लाखोंचे संसार चांगले उभे राहिले. अनेक शेतकऱ्यांना त्या माध्यमातून मदत झाली आणि आजही अनेक चांगल्या संस्था सहकाराच्या माध्यमातून काम करीत आहेत.

अध्यक्ष महोदय, काहींनी म्हटले की, हे बिल आणत असताना अगदी काही तरी जगावेगळे किंवा सूडबुध्दीने सरकार काम करत आहे काय] अशाप्रकारच्या शंकाही काही सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केल्या. या बिलाचा गाभा काय आहे, हे खऱ्या अर्थाने पाहायला गेले तर बिलाचे दोन भाग आहेत. 11 सदस्य असलेल्या संचालक मंडळावर कर्मचाऱ्यांचा 1 सदस्य नियुक्त करायचा आणि 11 ते 21 सदस्य असलेल्या संचालक मंडळावर कर्मचाऱ्यांचे 2 सदस्य नियुक्त करायचे. मला असे वाटते की, सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी कर्मचाऱ्यावर सहमती दर्शविलेली आहे. कर्मचारी देखील कोणते देणार तर त्या संस्थेमध्ये ज्या अधिकृत कर्मचाऱ्यांची संघटना आहे, ती संघटना डायरेक्ट त्या कर्मचाऱ्याचा नामनिर्देश करणार आहे. ज्या ठिकाणी कर्मचाऱ्यांची अधिकृत मान्यताप्राप्त संघटना नसेल, त्या ठिकाणी कर्मचारी आपल्यामधून तो सदस्य निवडून देतील. जो कर्मचारी निवडून दिला जाणार आहे तो कर्मचारी त्या ठिकाणी आपण संचालक म्हणून घेणार आहोत. याच्या पाठीमागची भूमिका काय आहे तर, आज या महाराष्ट्रामध्ये सव्वादोन लाख संस्था अस्तित्वात असताना काही संस्था चांगले कामही करीत आहेत, हे मी पहिलेच नमूद केले आहे. परंतु, या चांगल्या पवित्र सहकारक्षेत्रात काही मूठभर लोकांनी स्वतःच्या स्वार्थासाठी भ्रष्टाचार करून या पवित्र क्षेत्राला गालबोट लावण्याचे मोठे काम या संस्थांमध्ये केलेले आहे. आज एकूण 2 लाख 25 हजार संस्थांपैकी 53 हजारपेक्षा जास्त संस्था तोट्यामध्ये आहेत. गावपातळीवरील अनेक विका सोसायट्या आज डबघाईस आलेल्या आहेत. आम्ही सहकार विभागाच्या माध्यमातून पतसंस्थांना मान्यता देतो सर्वसामान्य नागरिकाला वाटते की, हा सरकारचाच काही तरी अंगीकृत भाग आहे. ठेवीदार आपल्या कष्टाचे पैसे या पतसंस्थांमध्ये ठेवत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दादाजी भुसे ...

असतात. आज महाराष्ट्रामध्ये 15 हजारपेक्षा जास्त पतसंस्था असताना, 5 हजारपेक्षा जास्त पतसंस्था अडचणीत आलेल्या आहेत. त्यामुळे हजारो, लाखो ठेवीदारांचे पैसे अडचणीत आलेले आहेत. या ठिकाणी मला हे देखील नमूद करावयाचे आहे की, त्यामुळे अनेक लोकांचे संसारही अडचणीत आलेले आहेत. एकेकाळी साखर कारखान्यांच्या बाबतीत बोलायला गेलो की, काही लोकांना मोठी भीती वाटली की, बॅकडोअर एंट्री होणार आहे काय, आमच्यावर वॉच ठेवला जाणार आहे काय, परंतु, तो दुसरा टप्पा आहे.

अध्यक्ष महोदय, कर्मचाऱ्यांना प्रतिनिधित्व का देतो आहे तर, कर्मचाऱ्यांची ती रोजीरोटी आहे. संचालक मंडळाचे कामकाज संस्थेचा उद्धार करणे, कामकाज वाढविणे आहे तेवढीच जास्तीची जबाबदारी त्या कर्मचाऱ्यांचीही आहे. त्याची ती रोजीरोटी आहे म्हणून तो जास्तीचे लक्ष तेथे देईल. ती संस्था जर टिकली तर, त्याचे घर चालणार आहे, त्याला पगार मिळणार आहे, त्यामुळे आपण कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व त्या ठिकाणी देत आहोत.

अध्यक्ष महोदय या बिलाचा दुसरा भाग असा आहे की, ज्या संस्थांमध्ये शासकीय भागभांडवल आहे, अशा संस्थांवर एक शासकीय अधिकारी आणि एक शासननियुक्त प्रतिनिधी असे दोन प्रतिनिधी आपल्याला द्यायचे आहेत. 97 व्या घटनादुरुस्तीपूर्वी हे ऑलरेडी कार्यरत होतेच. आपल्या सर्वांना ठाऊक आहे. आता चर्चा करताना कोठल्याकोठे विषय नेण्यात आले. आज महाराष्ट्राच्या पातळीवर शासकीय भागभांडवल असलेल्या संस्थांचा आपण विचार केला तर साधारणत: 1 ते 2 हजारांच्या आसपास संस्था असतील, या 1 ते 2 हजार संस्थांमध्ये फक्त हा तज्ज्ञ संचालक किंवा कार्यलक्षी संचालक आपण नियुक्त करणार आहोत. त्यामुळे खूप भीती आणि हे सरकार सहकार उद्ध्वस्त करायला निघाले आहे अशाप्रकारे काही सन्माननीय सदस्यांनी शंका उपस्थित केली मला असे वाटते की, अशी भीती बाळगायचे काही कारण नाही.

आपण पाहिले असेल की, आज सव्वादोन लाख सहकारी संस्था महाराष्ट्रात अस्तित्वात आहेत. हा आकडा कदाचित त्यापेक्षाही जास्त असू शकेल. परंतु, याचा जेव्हा आपण आढावा घेण्यास जातो

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दादाजी भुसे ...

तेव्हा यापैकी किती संस्था कार्यरत आहेत हा देखील संशोधनाचा विषय आहे. पाठीमागच्या काळात आपण जेव्हा याची पडताळणी सुरु केली, त्यावेळेस असे दिसून आले की, हजारोंच्या संख्येमध्ये काही संस्था अशा आहेत की, ज्या केवळ कागदावर काम करीत आहेत. काही संस्था अशा आहेत की, ज्या फक्त मतदानाची वाट पाहतात. सन्माननीय सदस्य श्री. बाळासाहेब थोरात यांना याचा चांगला अनुभव असेल. काही अशा संस्था आहेत की, काही पिशवीतील दादांनी त्यांना पिशवीतील संस्था असे नाव ठेवलेले आहे. या संस्था पिशवीमध्ये असतात, कपाटात असतात सहकारी चळवळीतील एखाद्या शेतकी संघाची, जिल्हा बँकेची निवडणूक लागली की, ती संस्था कपाटातून बाहेर येते. मतदानाला मला कोणी विचारायला येईल का, अशा पद्धतीने वाट पाहणाऱ्याही काही संस्था आहेत. याकरिता आपण पाहिले असेल की, मागच्या वर्षभराच्या कालावधीत सहकार क्षेत्राला बदनाम करणाऱ्या अशा ज्या संस्था आहेत, त्यांची पडताळणी करण्याचे काम सहकार विभागाच्या माध्यमातून सुरु करण्यात आलेले आहे. मी आपल्याला खात्रीने सांगू शकतो की, हा आकडा साधारणत: 50 हजारांच्या आसपास येईल. ह्या संस्था फक्त प्रत्यक्ष काम करत नाहीत. त्यांची नोंदणी करीत असताना उद्दिष्ट फार चांगली असतात, आम्ही हे कार्य करणार, ते कार्य करणार असे सांगून खूप गोंडस नाव दिलेली असतात, उद्दिष्टही खूप गोंडस असतात परंतु, प्रत्यक्ष कृतीत तसे काम नसते. याकरिता अशा संस्था कायमस्वरूपी रद्दबातल करण्याचे काम सहकार विभागाच्या माध्यमातून सुरु केलेले आहे. मला असे वाटते की 50 हजारांच्या आसपास किंवा त्याच्याही पुढे हा आकडा जाऊ शकतो.

काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, पाठीमागच्या काळात ज्या जिल्हा बँका आहेत किंवा इतर बँका आहेत त्यांनी, त्यांच्या संचालक मंडळांनी घोटाळे केले, त्या बँका अडचणीत आल्या. रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार वारंवार सूचना देऊनही त्यांच्या कामामध्ये सुधारणा झाली नाही, अशा बँकावर सामुदायिक जबाबदारी देऊन रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार प्रशासक नियुक्त करण्यात आले.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दादाजी भुसे.....

अध्यक्ष महोदय, यानंतरही आपल्याला पुढील चर्चा करायची आहे. सहकार विभागाने हे चांगले बील आणलेले आहे. आपल्याला तज्ज्ञ संचालक नियुक्त करायचा आहे. त्याची आचार संहिता आणि त्याची नियमावली आपण करणार आहोत. सन्माननीय सदस्यांच्या सूचनांचा आदर केला जाईल. त्या पद्धतीने सूचनांची अंमलबजावणी येणाऱ्या काळामध्ये केली जाईल. सहकार चळवळ बळकट झाली पाहीजे, चांगले काम झाले पाहीजे, सहकार संस्कारक्षम झाला पाहीजे. त्यामुळे चांगल्या संस्थेंना बळकटी देणे, आणि जे भ्रष्टाचारी असेल त्यांना खड्यासारखे दूर करणे यासाठी आपण हे चांगले बील आणलेले आहे. हे बील मंजूर करण्यात यावे, अशी मी आपल्यामार्फत सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

अध्यक्ष : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 5 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. दादाजी भुसे (सहकार राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 7 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

अध्यक्ष : सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 7 संमत झाले आहे.

---*---

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: मुंबई महानगरपालिकेतील उघडकीस आलेली गैरकारभार व भ्रष्टाचाराची प्रकरणे व पेंडसे-केंद्रेकर अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणी संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही

मु.शी.: मुंबई महानगरपालिकेतील उघडकीस आलेली गैरकारभार व भ्रष्टाचाराची प्रकरणे व पेंडसे-केंद्रेकर अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणी संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही या विषयावर सर्वश्री राधाकृष्ण विखे पाटील, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, जयंत पाटील, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री दिलीप वळसे-पाटील, गणपतराव देशमुख, बाळासाहेब थोरात, भास्कर जाधव, मो. आरिफ नसीम खान, जितेंद्र आव्हाड, गोपालदास अग्रवाल, जयदत्त क्षीरसागर, विजय वडेट्टीवार, हनुमंत डोळस, नितेश राणे, पांडुरंग बरोरा, अब्दुल सत्तार, डॉ. सतीश पाटील, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री नरहरी झिरवाळ, सुनिल केदार, दिपक चव्हाण, सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री अस्लम शेख, वसंतराव चव्हाण, डी.पी.सावंत, कालीदास कोळंबकर, मधुकरराव चव्हाण, काशीराम पावरा, अमिन पटेल, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री जयकुमार गोरे, राहुल बोंद्रे, अमित झनक, अमर काळे, ॲड. के. सी. पाडवी, सर्वश्री डी. एस. अहिरे, हर्षवर्धन सपकाळ, रणजित कांबळे, श्रीमती अमिता चव्हाण, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री कुणाल पाटील, शेख आसिफ शेख रशिद, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, ॲड. त्र्यंबक भिसे, सर्वश्री अमित देशमुख, बसवराज पाटील, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री सिध्दाराम म्हेत्रे, भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव

(प्रस्ताव पुढे सुरु ...

श्री. सुभाष पाटील (अलिबाग) : अध्यक्ष महोदय, म.वि.स. नियम 293 अन्वये कोकण आणि मुंबई या विषयावरील प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्राच्या निर्मितीपासून आमच्या कोकणावर अन्याय झालेला आहे. महाराष्ट्राची निर्मिती झाली तेव्हा घटनेच्या 371 व्या अनुच्छेदानुसार विभाग झाले. त्यावेळी

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुभाष पाटील.....

कोकणाचा उर्वरित विकास महामंडळात समावेश झाला. सातत्याने या कोकणावर अन्यायाची परंपरा झाली. परंतु स्व. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी कोकणाच्या अनुशेषासाठी बर्वे आयोगाची स्थापना केली. त्यानंतर वर्दे आयोगाची स्थापना झाली. प्रख्यात विचारवंत व अर्थतज्ज्ञ वि.म. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधन समितीची नियुक्ती करण्यात आली. या समितीने विदर्भ, मराठवाडा व कोकण असा प्रादेशिक अभ्यास न करता जिल्हावार विकासाचा असमतोलपणा व अनुशेष शोधण्याचा प्रयत्न केला. दांडेकर समितीच्या अहवालावर भाष्य करताना माजी मंत्री भाऊसाहेब वर्तक यांनी दांडेकर समितीचा अनुशेष चुकीचा असल्याचे सांगितलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी बऱ्याच कालावधीनंतर कोकणाची चर्चा लावली. परंतु दुर्दैवाने कोकणाच्या बाजूने बोलणारे आमदार सभागृहामध्ये कमी आहेत. यापूर्वी आम्ही लक्षवेधी सूचना, प्रश्न या माध्यमातून या विषयामध्ये हात घालण्याचा प्रयत्न केला. कोकणातील एकही मंत्री येथे उपस्थित नाहीत. हा ठराव शिवसेना पक्षामार्फत यायला पाहीजे होता, परंतु दुर्दैवाने तो विरोधी पक्षाने आणला आहे. शिवसेनेचे कोकणातील चार सदस्य मंत्रिमंडळामध्ये आहेत. केंद्रामध्ये देखील कोकणातील एक मंत्री आहे. असे असताना कोकणाच्या विकासासाठी विरोधी पक्षाला प्रस्ताव आणावा लागला आहे.

अध्यक्ष महोदय, मागच्या आघाडी सरकारने देखील आमच्या कोकणावर अन्याय केला. आतापर्यंत कोकणामधील चार मुख्यमंत्री होऊन गेले आहेत. स्व.बॅरिश्टर अंतुले यांनी कोकणाचा कॅलिफोर्निया करायला पाहीजे याकरिता प्रयत्न केले. परंतु दुर्दैवाने 18 महिन्यामध्ये त्यांचे पद गेले. त्यानंतर माननीय श्री. नारायण राणे हे मुख्यमंत्री झाले, त्यांना देखील थोडाच अवधी मिळाला. त्यानंतर माननीय श्री. मनोहर जोशी मुख्यमंत्री झाले, त्यांनीही उर्वरित महाराष्ट्रावर लक्ष दिले. आज कोकणावर फार मोठा अन्याय होत आहे. एका बाजूला मुंबई असून एका बाजूला गोवा आहे व यामध्ये कोकण आहे. एका बाजूला सह्याद्रीच्या पर्वत रांगा तर एका बाजूला अरबी समुद्र आहे. कोकणाने मोठा त्याग केला आहे. अलिबाग येथे आरसीएफचा कारखाना होऊ घातला त्यावेळी तेथील शेतकऱ्यांनी स्वस्तामध्ये जमिनी दिल्या. जेएनपीटी बंदराकरिता देखील आमच्या ऊरण व पनवेल येथील लोकांनी जमिनी दिल्या. भारताचे पंतप्रधान माननीय श्री. नरेंद्र मोदीजी आमच्या ऊरणला आले होते. तेव्हा साडेबारा टक्के विकसित प्लॉट देण्याचे त्यांनी जाहीर केले

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुभाष पाटील.....

होते. परंतु आज 22 महिने झाले तरी अद्यापपर्यंत त्यासंदर्भात प्रमाणपत्र मिळाले नाही. दोन, चार महिन्यांनी त्याचे फोटो येतात आणि ते दाखविले जातात...(अडथळा)...

अध्यक्ष महोदय, कोकणामध्ये पर्यटनाला वाव असून त्याला चालना मिळाली पाहीजे. कोकणामध्ये साधनसामग्री फार मोठ्या प्रमाणात आहे. कोकणामध्ये ठराविक पीक घेतले जाते. पूर्वी आमचा रायगड जिल्हा भातासाठी प्रसिद्ध होता. परंतु तेथे केमिकलचे कारखाने आले. त्यामुळे आम्हाला निसर्गाने दिलेल्या नद्या प्रदूषित झाल्या. कोकणातील लोकांनी त्याग केला. बाजीराव पेशव्यांचे वंशज बाळाजीपंत पेशवे हे कोकणातीलच होते. त्यांनी अटकेपार झेंडे लावले. रामदास स्वामी देखील आमच्या कोकणात आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे देखील चळवळ करण्यासाठी चिपळूण येथे आले होते. आमची कोकणाची भूमी पवित्र भूमी आहे. प्रभू श्री रामचंद्र श्रीलंकेला जात असताना कोकणातून गेले. परंतु श्रीलंकेला जाताजाता सितामाईच्या पायात काटा टोचला. त्यावेळी सितामाईने कोकणाच्या भूमीला शाप दिला की, "जळो ती काटेरी भूमी". परंतु तेव्हा श्रीरामाने उपशाप दिला की, ही भूमी जळली तरी ती पुन्हा बहरेल. हे सांगायचे कारण असे आहे की, आज पर्यावरणाचा समतोल ढासळलेला आहे.

...3M/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष पाटील.....

कोकणामधील वनांना वनवे लागतात त्यामुळे पर्यावरण, प्राणी जीवन व औषधी वनस्पती नष्ट होते. मी माननीय वन मंत्री महोदयांना सांगितले होते की, या वनव्याच्या संदर्भात उपाययोजना करण्यात यावी, रोजगार हमी योजनेतून त्याकरिता लाभ देण्यात यावा. हजारो हेक्टर वनक्षेत्र नष्ट होत चालले आहे.

तालिका सभाध्यक्ष (श्री.योगेश सागर) : सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या चर्चेसाठी आपल्या पक्षाला बोलण्यासाठी जो वेळ दिला होता त्यापेक्षा जास्त वेळ आपल्या पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री.धैर्यशील पाटील हे बोलले आहेत. आपण आपले भाषण लवकर संपवावे.

श्री.सुभाष पाटील : अध्यक्ष महोदय, सदनामध्ये ही चर्चा मी उपस्थित केली आहे. यावरील दोन-चार मुद्दे मला मांडून देण्यात यावेत. आपणच मला सांगितले होते की, तुमचा आवाज ऐकला नाही. तुम्ही मला डिस्टर्ब करुन नका, अशी माझी विनंती आहे. मी दोन तास या विषयावर बोलू शकतो.

अध्यक्ष महोदय, मी मुद्यावर बोलत आहे. खार भूमीसाठी केवळ 2 कोटी रुपये निधी देण्यात येतो व जलसंपदा विभागाला 8000 कोटी रुपये निधी देण्यात येतो. खार भूमीची शेती बाधीत झालेली आहे त्यामुळे आमच्या भागातील शेतकरी देशोधडीला लागला आहे. जलसंपदा विभागाला जो निधी देण्यात येतो त्यामधील अर्धा टक्का निधी खार भूमीसाठी देण्यात यावा, अशी माझी मागणी आहे. खारभूमीसाठी जो निधी दिला जातो त्यामधून यंत्रणेच्या वेतनावर अर्धा खर्च होतो. 40 कोटी रुपये निधी खार भूमीसाठी दिला तर त्यामधील 20 कोटी रुपये वेतनावर खर्च होतो. आम्ही किती अन्याय सहन करावयाचा ? एका बाजूला शेतकऱ्यांची शेती 3 वर्ष पिकली नाही म्हणून सरकार पॅकेज जाहीर करते. दुसऱ्या बाजूला माझ्या मतदार संघातील शेती 20-20 वर्षे पिकत नाही तरी देखील कोणतेही पॅकेज देण्यात येत नाही. खार भूमीचे पाणी शेतीबरोबरच गावामध्ये आले आहे तरी शासन आमच्याकडे लक्ष देत नाही. शासनाला केवळ रायगडचे पाणी पाहिजे, कचरा टाकण्यासाठी जागा पाहिजे. कोकणातील रायगड जिल्ह्यावर फार मोठा अन्याय झाला आहे. कोकणातील जनता आत्महत्या करीत नाही.

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष पाटील.....

अध्यक्ष महोदय, आमच्या भागात अंगणेवाडी येथील भराडी देवी आहे तिला मुंबईचे लोक नवस करण्याकरिता येतात. अष्टविनायकचे दोन गणपती आमच्या भागात आहेत त्यांचे दर्शन घेण्यासाठी सर्व लोक आमच्याकडे येतात. छत्रपती शिवाजी महाराजांचा रायगड किल्ला हा आमच्या रायगड जिल्ह्यामध्ये आहे. किल्ल्यांच्या विकासासाठी असलेल्या 550 कोटी रुपयापैकी केवळ 3 कोटी रुपये रायगड उत्सवासाठी देण्यात आले. त्यावेळच्या राज्यकर्त्यांना समजत होते की सिंधुदुर्ग येथे विजयदुर्ग किल्ला आहे, कुलाबा येथे कुलाबा किल्ला आहे.

अध्यक्ष महोदय, अतिरेकी मुंबईमध्ये हल्ला करण्यासाठी आले होते ते आमच्या उरण येथील सागरी मार्गाने आले होते. सागरी रस्ते सुरु करावयास पाहिजेत. उद्योगांना चालना दिली पाहिजे. अल्पसंख्याक विभागाच्या अनुदानावरील मागण्यावर आज सभागृहामध्ये चर्चा झाली. या विभागास निधी देण्याची आवश्यता आहे. आमच्या जिल्ह्यामध्ये 5 लाख लोकसंख्या आहे परंतु तेथे अल्पसंख्याक विभागाचे एकही वसतिगृह उभारण्यात आले नाही.

अध्यक्ष महोदय, सागरी महामार्गाला बॉर्डर रोड म्हणून ट्रीट केले पाहिजे. माननीय मंत्री श्री.बापट साहेबांना वृक्षांची फार आवड आहे. ते मंत्री नसताना आमच्या कोकणामधून अनेक वृक्षांची रोपे घेऊन जात असत. कोकण भूमी परशुरामाची भूमी आहे.

अध्यक्ष महोदय, कोकणामध्ये 48 बंदरे आहेत. कोकणातील बंदरांचा विकास करण्यात येतो परंतु रस्ते जोडण्यात येत नाहीत. मुंबईतील पैसे कमवणाऱ्यांना बंदरे पाहिजे, आमच्या भागातील पाणी पाहिजे, कचरा टाकण्यासाठी जागा पाहिजे परंतु पैसे देण्याच्या बाबतीत ते काटकसर करतात. या राज्याची लोकसंख्या 12 कोटी आहे त्यामधील 4 कोटी जनता कोकणामध्ये राहते त्यांच्याकरिता कोणताच निधी देण्यात येत नाही. शासन सांगते की लोकसंख्येच्या आधारावर विकासाकरिता निधी देऊ परंतु त्याप्रमाणे प्रत्यक्षात कृती करण्यात येत नाही.

अध्यक्ष महोदय, कोकणामध्ये 11 लाख हेक्टर पडीक जमीन आहे. श्री.शरद पवार हे सन 1990 मध्ये मुख्यमंत्री झाले त्यावेळी त्यांनी फलोद्यान योजनेला इन्क्लूड केले त्यामुळे कोकणातील 3-4 हजार हेक्टर क्षेत्र लागवडी खाली आले. कोकणामध्ये हापूस आंबा पिकतो परंतु तो लंडन येथे पाठविण्याकरिता त्याची तपासणी होत नाही. त्याकरिता निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष पाटील.....

अध्यक्ष महोदय, मच्छिमारांच्या माध्यमातून 3 हजार कोटी रुपये परकीय चलन मिळते. परंतु मच्छिवर प्रक्रिया करणारे कारखाने कोकणामध्ये नाहीत. राज्यात चार विभाग असून त्यामधील कोकण विभाग हा वेगळा आहे. या विभागातील भौगोलिक परिस्थिती वेगळी आहे. त्यानुषंगाने शासनाने कोकणाकडे लक्ष दिले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, या राज्य सरकारने धुप प्रतिबंधक बंधाऱ्यासाठी वेगळा लेखाशिर्ष निर्माण केला त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. पनवेल ते इंदापूर हा रस्ता कधी करणार. मागील वेळी बांधकाम मंत्री महोदयांनी सांगितले होते या मार्गासाठी पैसे ठेवण्यात आले आहेत. कासवाची गती परवडली परंतु बांधकाम खात्याची गती परवडत नाही. सदर रस्ता कधी तयार करण्यात येणार आहे, त्याच्या शुभारंभाचा नारळ कधी फुटणार आहे ?

अध्यक्ष महोदय, कोकणामध्ये प्रदूषण निर्माण करणारे कारखाने येता कामा नयेत. जैतापूर येथील प्रकल्प होता कामा नये, अशी माझी मागणी आहे. कोकणामध्ये निसर्गाने आम्हाला नद्या दिल्या त्या दूषित करण्याचे काम राज्यकर्त्यांनी केले आहे.

अध्यक्ष महोदय, आम्हाला पिण्यासाठी पाणी मिळत नाही, शेतीला पाणी मिळत नाही. रेती काढल्याने आमच्या भागातील जमिनी खचत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांना मी धन्यवाद देतो. कोकण भूमी ही परशुरामाची भूमी आहे. मी माझ्या भाषणाच्या शेवटी एवढेच सांगेन की, बर्वे आयोग झाला, वर्तक आयोग झाला, दांडेकर समिती झाली यासर्व समित्या कालबाह्य झाल्या. कोकणाचा अनुशेष किती आहे याकरिता राज्य सरकारने नव्याने श्री.बापट समिती गठीत करावी, अशी मागणी मी करतो.

अध्यक्ष महोदय, "परशुरामाची लेक लाडकी माहेरवाशीन बाय गं, कोकणभूमी हीच आमची माय गं" एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद !

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नितेश राणे (कणकवली) : अध्यक्ष महोदय, म.वि.स.नियम 293 अन्वये प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी हा प्रस्ताव सदनामध्ये मांडून सुरुवात केली आहे. कोकणावर स्वतंत्र चर्चा सभागृहात झाली पाहिजे अशी कोकणातील आमदार महोदयांची इच्छा होती. परंतु शासनाने कोकण व मुंबई असा एकत्रित चर्चेचा प्रस्ताव मान्य केला. कोकणातील अनेक सन्माननीय सदस्यांनी कोकणाबाबतचे आपले मत सदनासमोर मांडलेले आहे. स्वतंत्र कोकणावर चर्चा घेता असती.

यानंतर NNN-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नितेश राणे.....

कोकणावर एक स्वतंत्र चर्चा या सभागृहामध्ये झाली असती तर या सभागृहाला कोकणावर कोणत्या पध्दतीने गेल्या दोन वर्षात अन्याय होतो आहे, हे आम्हा सर्वांना आपल्याला सांगण्याची संधी मिळाली असती. या शासनाला कदाचित गैरसमज असेल की, कोकणामध्ये सर्व आलबेल आहे, सर्व काही व्यवस्थित चालले आहे. कोकणात भरपूर पाऊस पडतो, आंबे चांगल्या पध्दतीने येतात, पर्यटन चांगल्या पध्दतीने फुलते, रोजगार निर्मिती चांगल्या पध्दतीने मिळतो, असे काही गैरसमज यांच्या नजरेसमोर असतील. म्हणून कदाचित ते कोकणासाठी स्वतंत्र चर्चा होऊ देत नाहीत. पण मी या ठिकाणी विचार मांडताना जी माहिती आपल्यासमोर ठेवणार आहे ते पाहिल्यानंतर गेल्या दोन वर्षापासून आमच्या कोकणावर कोणत्या पध्दतीने अन्याय होतो हे आपल्या लक्षात येईल.

अध्यक्ष महोदय, या प्रस्तावामध्ये कोकणाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने शासनाचे होत असलेले दुर्लक्ष हे सरकारने स्वत:हून स्वीकारले आहे. दुर्लक्ष होत आहे. सत्तेमध्ये असलेले कोकणातील जे लोकप्रतिनिधी आहेत त्यांनी जी धूळफेक सुरु ठेवल्यामुळे एक संभ्रमाचे वातावरण आमच्या कोकणामध्ये निर्माण झालेले आहे. असंख्य महत्वाचे मुद्दे मी आपल्या माध्यमातून सभागृहासमोर ठेवणार आहे. खरे म्हटले तर ही चर्चा आपण 1 एप्रिलला घेतली असती तर खरंच या चर्चेला न्याय मिळाला असता. कारण 1 एप्रिल हा एप्रिल फूल असा दिवस म्हणून साजरा करतो आणि म्हणून गेल्या दोन वर्षापासून कोकणी माणूस रोज एप्रिल फूल डे साजरा करीत आहे, अशी परिस्थिती आज कोकणामध्ये निर्माण झाली आहे. कोकणी माणसाची सतत धूळफेक केली जात आहे. मोठमोठे आकडे दिले जाऊन आम्ही फार मोठा निधी आणला असे सांगितले जाते. पण वस्तुस्थितीत असे कोठेही नाही.

अध्यक्ष महोदय, मी तळ कोकणातील आमदार असून सिंधुदुर्ग जिल्ह्यावर होणाऱ्या अन्यायाचे चित्र आपल्यासमोर ठेवणार आहे. विधान परिषद सभागृहामध्ये वित्त व नियोजन राज्यमंत्री, जे आमच्या सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री सुध्दा आहेत, त्यांनी केलेले अर्थसंकल्पिय भाषण मी आपल्यासमोर ठेवणार असून त्यांच्या भाषणातून मांडलेल्या असंख्य मुद्यांचा भरघोस समाचार मी घेणार आहे. कारण ज्या पध्दतीने धूळफेक चालली आहे, आणि खोटे आकडे दिले जात आहेत तर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नितेश राणे.....

कोकणी माणसाने नेमकी शासनाकडून काय अपेक्षा ठेवावी ? सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव साहेब किंवा सन्माननीय सदस्य श्री. सुभाष पाटील साहेब यांनी कोकणाबद्दल परशुरामाची भूमी वगैरे अशा सर्व चांगल्या बाबी सांगितल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, अर्थकारणामध्ये सुध्दा आमचा कोकण मागे राहिलेला नाही. सन 2014 मध्ये महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न 1 लाख 17 हजार रुपये आहे तर आमच्या कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्याचे उत्पन्न 1 लाख 70 हजार रुपये आहे. समोरच्या बाकावरील आमदार आम्हाला सतत सांगत होते की, आपण मागील 15 वर्षात काय केले ? मी त्यांना सांगू इच्छितो की, आमच्या आघाडी सरकारने गेल्या 15 वर्षात हे दरडोई उत्पन्न 1 लाख 70 हजार पर्यंत आणण्याचे काम केलेले आहे. आता सन 2014 पासून 2016 पर्यंत काय परिस्थिती आहे, कुठल्या पध्दतीने कारभार चालला आहे, अपेक्षा तर असंख्य करु शकतो. पण सर्वच बाबी खोट्या सांगावयाच्या असतील तर आणि आकडे फुगवून सांगावयाचे असतील तर विकास होणे शक्य आहे काय ? मघाशी जसे सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी सांगितले की, आमच्याकडे मनीऑर्डर संस्कृती होती, दरम्यानच्या काळात ती बंद झाली आहे. आता ती मनीऑर्डर संस्कृती पुन्हा सुरु होऊ पाहते की काय असे भितीचे वातावरण आमच्या कोकणी माणसामध्ये निर्माण झालेले आहे.

अध्यक्ष महोदय, आम्ही कोकणातील लोकप्रतिनिधी आणि सिंधुदुर्गातील आमदार म्हणून जेव्हा हे आकडे ऐकतो तर मनाला वेदना होतात. एका कार्यक्रमामध्ये आमच्या सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री जातात आणि त्या जाहीर कार्यक्रमामध्ये सांगतात की, शासनाने सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या विकासासाठी 600 कोटी रुपये आणले आहेत. आम्हाला आनंद झाला की, सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या विकासासाठी जर 600 कोटी रुपये येत असतील तर ती निश्चितच आनंदाची बाब आहे. व्यासपीठावर ते असे म्हणतात की, विरोधकांना याबद्दल माहिती हवी असेल तर त्यांनी जिल्हाधिकारी यांना पत्र लिहावे. मी लगेच दुसऱ्या दिवशी आमच्या सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहिले आणि विचारणा केली की, सिंधुदुर्गाचे पालकमंत्री सांगतात की, जिल्ह्याच्या विकासासाठी 600 कोटी रुपये आणले आहेत, तर हा निधी नेमका कोणत्या हेडखाली

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नितेश राणे.....

आणला आहे, याची आम्हाला माहिती द्यावी. चार दिवसानंतर त्यांचे पत्र आले की, आपल्या पत्राचे उत्तर जिल्हा नियोजन अधिकारी देतील. 6 दिवसानंतर जिल्हा नियोजन अधिकारी मला पत्र लिहून कळवितात की, आपले हे पत्र आम्ही पालकमंत्री यांच्या पी.ए.कडे पाठविले आहे. त्यामुळे हे 600 कोटी रुपये कोठे हरविले आहेत. खरोखरच 600 कोटी रुपये आणले आहेत काय, हे जेव्हा आम्ही विचारण्यास जातो तेव्हा अशी पत्रांची फिरवा-फिरवी होते.

अध्यक्ष महोदय, जिल्हा नियोजनाची बैठक ज्यावेळी होते त्यावेळी आम्ही सर्वजण त्या ठिकाणी उपस्थित असतो. पालकमंत्री असतात, जिल्हाधिकारीही असतात. त्या ठिकाणी आम्ही विचारणा केली की, आपण सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या विकासासाठी 600 कोटी रुपये आणले म्हणता तर हे 600 कोटी आपण कोणत्या हेडखाली आणले आहेत, हे आम्हाला सांगावे. त्यावेळी काँग्रेसच्या 17 च्या 17 सदस्यांना निलंबित केले की, आपण आम्हाला प्रश्न कसे विचारता, आपल्याला प्रश्न विचारण्याचे अधिकार नाहीत. त्याचप्रमाणे डीपीसीच्या बैठकीसाठी जे पत्रकार आले होते त्या सर्व पत्रकारांना बाहेर काढण्यात आले होते. कारण की, हे पत्रकार सत्य माहिती छापून आणतील. असा कारभार चालला आहे. एका बाजूला 600 कोटी रुपये आणतो, 900 कोटी रुपये आणतो आणि दरवेळी जिल्ह्यामध्ये जेव्हा येतात यांचा आकडा फुगत जातो. पण निधी काही खालपर्यंत येत नाही. अध्यक्ष महोदय, 600 कोटी रुपये येतात असे ऐकल्यावर आनंद होतो. पण त्यानंतर संभ्रमाचे वातावरण निर्माण होते. पालकमंत्री ज्या पक्षाचे आहेत त्याच पक्षाचे दुसरे आमदार पोलीसांच्या लाठ्या खातात. म्हणजे एकाच पक्षाच्या दोन आमदारांना अशा प्रकारची वागणूक कशी दिली जाते, असा प्रश्न आमच्या मनामध्ये निर्माण होतो.

अध्यक्ष महोदय, या निमित्ताने मी जिल्ह्याला किती निधी प्राप्त झाला याची माहिती काढली असता या 500 कोटीच्या हिशेबापैकी 1-2 उदाहरणे सांगू इच्छितो की, यामध्ये कोकण ग्रामीण पर्यटनासाठी 12 कोटी 22 लाख आणल्याचे समजले. संबंधित अधिकाऱ्यांना विचारणा केली असता जे 13 कोटी आणल्याचे बोलले जाते त्याच्यातले फक्त 34 लाख हेडखाली आलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, दुसऱ्या दिवशी जेव्हा पर्यटन विकासासाठी 100 कोटी रुपये आणले असे जे सांगितले जाते. आमचे कुडाळ-मालवण मतदार संघाचे आमदार भाषणातून पालकमंत्र्यांचे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नितेश राणे.....

अभिनंदन करताना सांगतात की, पर्यटनासाठी 100 कोटी रुपये आणले आहेत. याबाबत आम्ही जेव्हा संबंधित अधिकाऱ्यांना विचारणा केली तेव्हा सत्य परिस्थिती समजली की, फक्त 60 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यापैकी एकही रुपया प्राप्त झालेला नाही, अशी परिस्थिती आहे. अशा प्रकारे कारभार चालला आहे. दोन वर्षामध्ये केलेल्या कारभारासंबंधी आम्ही आपल्यासमोर भाषणे करु. आम्ही अपेक्षा ठेवताना असे खोटे बोलले जात असेल तर आम्ही काय अपेक्षा करावयाची ? आपण निधी कसा आणि कोठून आणणार व आलेल्या निधीचे मोजमाप कसे असेल हेही कोणी सांगायला तयार नाही. भाषणातून मोठमोठे वादे केले जातात.

OOO-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नितेश राणे....

माननीय राज्यमंत्री तथा पालक मंत्री श्री.दिपक केसरकर बोलतात की, कधी काळी माझ्या शहरासाठी 1 कोटी रुपये दिले होते. मी तर माझ्या शहरासाठी 15 कोटी रुपये आणलेले आहेत असा उल्लेख करतात. माहिती काढल्यानंतर कळले की फक्त 8 कोटी रुपये आणलेले आहेत. तुमच्या वतीने कोकणातील मी एकच माणूस बोलणारा आहे. सन्माननीय सदस्य श्री.नसीम खान संख्या वाढवायची आहे म्हणून बोलतो आहे. हा जो खोटारडेपणा आहे तो मुद्दाम आपल्यासमोर आणत आहे. या सरकारची दोन वर्षे अशी जात असतील तर पुढची तीन वर्षे कशी जाणार आहेत याचाही विचार करायला पाहिजे. एक लाखाचे दरडोई उत्पन्न असलेला आमचा सिंधुदूर्ग जिल्ह्याला हजारामध्ये घेऊन जाण्याचा प्रयत्न सरकार करीत नाही ना असा प्रश्न माझ्या समोर निर्माण झालेला आहे. 720 किलोमीटरची किनारपट्टी आमच्या कोकणाला लाभलेली आहे. पर्यटनावरच खूप काही गोष्टी कोकणामध्ये चालतात. लोकांची पोटही पर्यटनावर भरतात. पण 100 कोटी आणले ते कुठे निघाले. कायदा आणि सुव्यवस्थेची काय परिस्थिती आहे. शेवटी पर्यटक याठिकाणी जात असताना स्थानिक विभागाच्या पर्यटनाच्या कायदा व सुव्यवस्थेचा विचार करुन या भागामध्ये पर्यटक आपल्या कुटूंबियांसमवेत येत असतात. गोव्याला येणारे पर्यटक आणि सिंधुदूर्गमध्ये येणाऱ्या पर्यटकांमध्ये फरक आहे. कोकणामध्ये जेव्हा पर्यटक येतो तेव्हा कायदा व सुव्यवस्थेचा विचार करीत नाही. म्हणून कायदा व सुव्यवस्थेचा विचार केला तर सिंधुदूर्गचे तिनतारा वाजलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, सिंधुदूर्ग जिल्ह्याच्या माननीय पालक मंत्र्यांना विचारा, त्यांच्या मतदारसंघामध्ये कधी नव्हे तो मटका, जुगार आणि वेश्या व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालू आहे आणि हे करणारे सर्व त्यांचेच कार्यकर्ते आहेत. मंत्री महोदय विधान परिषद सभागृहामध्ये भाषण करतात की, मी घराघरात पर्यटक पाठवेल. या ठिकाणी मटका, जुगार सुरु झाल्यानंतर सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये कोणी पाऊल ठेवणार आहे काय? याचाही विचार होण्याची आवश्यकता आहे. भाषणामध्ये सांगितले की, आम्ही चांद्यापासून बांद्यापर्यंत विकास करु. या सरकारचे दोन अर्थसंकल्प झाले. पण या अर्थसंकल्पामध्ये वित्त मंत्री महोदयांचा चांदा कुठेतरी दिसला, पण माननीय राज्यमंत्री श्री.दिपक केसरकर यांचा बांदा कुठे दिसलाच नाही. आम्ही रोज शोधतो

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नितेश राणे....

आहोत की, कुठे बांदा दिसतो काय आणि कोकणाच्या पारड्यात काही पडते काय? परंतु दुर्दैवाने सांगावे लागते की, आमच्या पारड्यात काहीच पडत नाही. माननीय मंत्री श्री.गिरीश बापट चांदा, बांदा, कांदा सर्वेच झालेले आहे. या अर्थसंकल्पामध्ये खूप काही गोष्टी करु शकला असता. धार्मिक स्थळांच्या बाबतीत बोलायचे झाल्यास, गणपतीपुळे सोडता दुसऱ्या कोणत्याही धार्मिक स्थळांचा यामध्ये उल्लेख केल्याचे दिसत नाही. आंगणेवाडी, कुणकेश्वर अशा कोणत्याही धार्मिक स्थळांचा अर्थसंकल्पामध्ये समावेश केल्याचे दिसत नाही. एक गणपतीमपुळे घेतले आणि सरकारला वाटले कोकणी माणूस खूष झाला, लोकप्रतिनिधी काही बोलणार नाहीत. म्हणून आमच्यावर असा अन्याय करण्यात आला.

अध्यक्ष महोदय, मत्स्य व्यवसायाबद्दल माननीय राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव यांनी सांगितले. आदरणीय केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरी मत्स्य व्यवसाय नागपूर येथे घेऊन गेलेत. ज्याठिकाणी एवढ्या मोठ्या प्रमाणात मत्स्य उत्पादन होते, तेथे एकही मत्स्य विद्यालय नाही याबाबत मंत्री महोदय, माननीय मुख्यमंत्री यांनी विचार करण्याची गरज आहे. सरकारला असे वाटते की, सिंचनामध्ये सर्व काही आलबेल चाललेले आहे. बंदरांसाठी खूप पैसे येतात असा गैरसमज आहे. गेल्या दोन वर्षात जेवढी बंदरे सुरु होती ती पैशाअभावी बंद पडलेली असताना कोकणाचा विकास कसा काय होणार आहे. महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्राची सिंचन क्षमता पाहता कोकणातील 5 टक्के सिंचन क्षमता ही अन्याय करणारी आहे. जेव्हा कोकणामध्ये मंत्री महोदय येतात, तेव्हा काय बोलून जातात. एका बाजूला जलपुरुष राजेंद्र सिंग आहेत. 6 जानेवारीला सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये येतात आणि सांगतात मराठवाड्याची दुष्काळी परिस्थिती पाहता कोकणाची परिस्थिती चांगली आहे. मात्र कोकणात जाणारे पाणी आताच रोखायला पाहिजे नाहीतर येत्या 3-4 वर्षामध्ये कोकणाचा मराठवाडा व्हायला वेळ लागणार नाही असे जलतज्ज्ञ बोलतात माननीय मंत्री महोदय, हे आम्ही बोलत नाही.

अध्यक्ष महोदय, दिनांक 11 फेब्रुवारी, 2016 ला माननीय जलसंधारण मंत्री श्रीमती पंकजा मुंडे सिंधुदूर्ग जिल्ह्यात आल्या, तेव्हा त्यांनी सांगितले की, कोकणात भरपूर पाऊस पडतो. त्यामुळे याठिकाणी पाणी साठवून ठेवण्याची काहीही गरज नाही. ही कामे रद्द केल्याने उन्हाळ्यात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

06-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) 3O-3

SSK/ ST/ AKN/ AKN/ ST/ 21:00

श्री.नितेश राणे.....

पाणीटंचाई निर्माणच होणार नाही असे वाक्य जलसंधारण मंत्री महोदय सांगून जातात. अशी भूमिका ज्येष्ठ मंत्री आणि शासनाची असेल तर पुढील तीन वर्षामध्ये कसा कारभार असेल याचे प्रतिबिंब यातून चांगल्याप्रकारे दिसते. माननीय आरोग्य मंत्री हे कोकणातील देवगड येथील आहेत. आम्ही त्यांच्या घरासमोर मोर्चाही काढला होता की, माननीय मंत्री डॉ.दिपक सावंत तुम्ही राज्यात डॉक्टर घेऊन फिरतात, सगळीकडे डॉक्टर वाटत आहेत. पण ज्याठिकाणी तुम्ही राहता त्याठिकाणी सर्वात कमी डॉक्टर कसे देऊ शकता. गणपतीसाठी फक्त कोकणामध्ये येतात. वर्षातून दोन वेळा आले तर त्यांना कळेल की सिंधुदूर्ग जिल्ह्यासाठी किती डॉक्टर लागतात. हा कोकणावर तसेच कोकणातील अन्य भागावर अन्याय होत आहे. मी स्थानिक आमदारांची भाषणे ऐकली. कोकणाचा कायापालट करणारा एक प्रकल्प आघाडी सरकारने सुरु केला. कुठल्याही सन्माननीय सदस्यांनी याबाबत उल्लेख केला नाही. सी-वर्ल्ड प्रकल्प आघाडी सरकारने आणला. या सी-वर्ल्ड प्रकल्पामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर सिंगापूर गोल्ड कोस्ट, फ्लोरिडा, कॅलिफोर्निया या देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती तयार झाली आहे. सरकार या सी-वर्ल्डबाबत नेमके काय करणार आहे, हे कोणीही सांगायला तयार नाही. स्थानिक आमदार सन्माननीय सदस्य श्री.वैभव नाईक भाषण करतात. पण सी-वर्ल्डबाबत एकही शब्द बोलत नाहीत. ज्याच्यामुळे कोकणाचे अर्थकारण बदलू शकते, या सी-वर्ल्डबाबत कोणी उल्लेख करायला देखील तयार नाही.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.पराग अळवणी यांनी भाषण करीत असताना सांगितले की, कोकणामध्ये वॉटर स्पोटर्स तयार झाले पाहिजेत. तारकर्ली भागामध्ये वॉटर स्पोटर्स सुरु आहेत. त्याठिकाणचे स्कुबा डायव्हींगचे व्यवसायिक आहेत. त्यांच्यावर महसूल विभागाने एवढी कारवाई सुरु केलेली आहे की, त्या सर्वांवर रस्त्यावर येण्याची पाळी आलेली आहे. एका बाजूला वॉटर स्पोटर्स सुरु करायचे म्हणतात आणि दुसऱ्या बाजूला चालू असलेले वॉटर स्पोटर्स बंद करण्याचे काम जर शासन करीत असेल तर कसे शक्य आहे. मेरीटाईम बोर्डच्या माध्यमातून वॉटर स्पोटर्स चालू करण्याचे जे टेंडर आहेत. त्यातील अटी बघितल्या तर कोणताही तरुण त्याठिकाणी जाण्याचे धाडस करणार नाही. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, वॉटर स्पोटर्स

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

06-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) 3O-4

SSK/ ST/ AKN/ AKN/ ST/ 21:00

श्री.नितेश राणे....

करण्यासाठी जे काही नियम घातलेले आहेत ते शिथील करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, मी विनंती करतो की, मला आणखी दहा मिनिटे बोलायला देण्यात यावे. मुंबईवर सर्वच सन्माननीय बोलत असतात. सिंधुदूर्ग आणि कोकणामध्ये गौण खनिज आणि मत्स्य व्यवसायावर खूप काही अवलंबून आहे. आज या गौण खनिजाची परिस्थिती अतिशय दयनीय आहे.

3P-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नितेश राणे .....

महसूल खाते मोठया प्रमाणावर कार्यवाही करते. डंम्परच्या बद्दल आंदोलन करायला लागले या बद्दल आपल्याला चांगली परिस्थिती आहे. हे बातम्यांमध्ये वाचायला मिळाले अशातला भाग नाही. ज्या लोकांवर अन्याय होतो म्हणून ते आंदलनाच्या पवित्र्यामध्ये आलेल आहेत. मासे व्यवसायावर आमच्या कोकणाची अर्थव्यवस्था अवलंबून आहे. ती पुर्ण ठप्प पडलेली आहे. पर्ससीन नेट आणि पारंपारिक विषयामध्ये नेमकी शासनाची काय भूमिका आहे ? हे अजून पर्यंत कळायला तयार नाही. सिंधुदुर्गतील शिवसेनेचे आमदार बोलतात की, आम्हाला पारंपारिक मच्छिमार पाहिजे. सिंधुदुर्गामध्ये पारंपारीक पध्दत आहे. रत्नागिरीचे आमदार ते पर्ससीन नेटच्या बाजूने आहेत. नागपूर हिवाळी अधिवेशनातील हा फोटो मुद्दाम दाखवतो. विधान भवनाच्या या पाय-यांवर उभे राहून सिंधुदुर्ग आणि रत्नागिरीचे सर्वच सन्माननीय बसून पर्ससीन नेट बंद करण्याची हाक देता आहेत. डिसेंबर नंतर मार्च आले, मार्चमध्ये राजापूरचे सन्माननीय आमदार श्री.राजन साळवी म्हणतात पर्ससीन नेट चालू ठेवा. पारंपारीक पध्दत बंद करा. म्हणजे नेमके पर्ससीन नेट सुरु ठेवायचे, पारंपारीक सुरु करायचे आहे, याबाबतीत एक सरळ भूमिका घ्यावी. शासनामध्ये सत्तेमध्ये असलेले दोन सन्माननीय सदस्य वेगवेगळी भूमिका घेत आहेत. याच्यामुळे मच्छिमार मरत आहे.

अध्यक्ष महोदय, आनंदवाडी प्रकल्प, नरवडेचा प्रकल्प, अरुणा प्रकल्प हे महत्वाचे प्रकल्प आहेत. याबाबत शासनाची नेमकी काय भूमिका आहे. याबाबत शासनाने भूमिका स्पष्ट करावी. आंबा, काजू हे कोकणातील प्रमुख पीक आहे. या वर्षी मोठया प्रमाणामध्ये अवकाळी पाऊस आल्यामुळे पिकाचे नुकसान झाले आहे. यावर्षी आंब्याच्या पिकाचे नुकसान 80 टक्यावर गेले आहे. जी काही भरपाई दिली गेली. ती 25000/- रुपये जाहीर केली. आबां बागायतदाराच्या हातामध्ये पैसे येईपर्यंत ती 6500/- रुपये झाली. माझा मतदार संघ देवगडमध्ये एका आंबा बागायतदाराने आत्महत्या केली आहे. मी खोटे बोटे बोलत नाही. जे सत्य आहे त्याबाबत सरकारने विचार केला पाहिजे.

.....2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नितेश राणे.....

अध्यक्ष महोदय, आमचा पर्यटन जिल्हा असल्यामुळे कायदा आणि सुव्यवस्था फार महत्वाची आहे. आमच्या मुख्यमंत्री महोदयांकडे गृह खाते आहे. जशी आमच्यावर तडकाफडकीने कार्यवाही होते, तशी सत्तेमध्ये बसलेल्या आमदारांवरही तशी कारवाई झाली तर समाधान वाटेल. माझ्यावर कलम 353 नुसार कारवाई झाली. सत्तेमध्ये बसलेले सन्माननीय सदस्य श्री.वैभव नाईक सत्तेमध्ये बसलेले आहेत. 1 मे, ला त्यांच्यावर वाळू उपसण्याच्या विषयावर आज कलम 353 आहे. त्या नुसार वॉन्टेड आहेत. ते सभागृहामध्ये बसत आहेत. म्हणजे एका बाजूने काँग्रेसच्या आमदारावर कारवाई होते. सहा सहा दिवस आम्ही तुरुंगात जातो, शिवसेनेचे आमदार सभागृहामध्ये आपल्या समोर बसतात ही चुकीची गोष्ट आहे. मी शेवटी आपल्याला एवढेच सांगतो, आमच्या कोकणावर मोठयाप्रमाणावर हे शासन अन्याय करत आहे. समोर बसलेल्या सन्माननीय सदस्यांसारखे आम्ही स्वतंत्र मराठवाडा किंवा स्वतंत्र विदर्भ मागणार नाही. आम्ही महाराष्ट्रामध्ये राहून आमचा विकास करुन घेऊ. अखंड महाराष्ट्र ठेवूनच कोकणचा विकास कसा साधता येतो हे निश्चितपणाने पाहू. मुख्यमंत्री महोदयांनी जसे ठणकावून सांगितले, आम्हाला कुठली गोष्ट द्या किंवा नका देऊ, "अखंड महाराष्ट्राचा विजय असो" ही घोषणा सक्ती झालीच पाहिजे एवढीच मी अपेक्षा व्यक्त करतो, आणि इथेच थांबतो जयहिंद जय महाराष्ट्र !

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी नेते यांनी नियम 293 ची मुंबई आणि कोकणावर चर्चेकरिता प्रस्ताव आणला आहे. त्याच्यावर मी माझे विचार मांडत आहे. प्रथम मी मुंबईवर बोलणार आहे. मी दहिसर मतदार संघातून निवडून आलेली आहे. त्या दहिसर मतदार संघामध्ये मुंबईकरांसाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी माझ्या मतदार संघामध्ये दहिसर नदीचा प्रोजेक्ट, मॅन्ग्रोज पार्क तसेच मेट्रोचे प्रोजेक्ट केले त्याबद्दल मुख्यमंत्री महोदयांनी अभिनंदन करते.

अध्यक्ष महोदय, आघाडी सरकारने आजपर्यंत कोकणाची व्याख्या म्हणजे रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग, ब्रिटीशांपासून कोकण म्हणजे ठाकूर, ठाकूर म्हणजे पूर्वी ठाणे, कुलाबा, रत्नागिरी हे तीन जिल्हे म्हणून केळशी पासून ते झाई देहरीपर्यंतचा हा 720 किलो मीटरचा समुद्र किनारा, सर्व सदस्य बोलता आहेत. कोकण म्हणजे रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग, पण उत्तर कोकण म्हणजे ठाणे आणि पालघर जिल्हा आहे. या दोन जिल्हयांमध्ये आत्तापर्यंत श्री.भाऊसाहेब वर्तक, श्रीमती तारामाई वर्तक हे दोन मंत्री होऊन गेले. त्या दोन मंत्र्यांनी ठाणे जिल्हयासाठी दोन मोठे प्रोजेक्ट आणले, त्यातील पहिला प्रोजेक्ट म्हणजे दापचरी दुध त्यावेळेला त्यांची कल्पना होती की, मुंबईमधले सर्व तबेले आहेत. ते दाबचरीला न्यावेत व दुधाची गंगा दाबचरीपासून इकडे आणावी. साडेसहा हजार एकर जमीन ही दाबचरी प्रकल्पासाठी शासनाने दिली. पण त्यावेळेला ज्या गिरगाई आणल्या त्यांना ते हवामान मानवल नाही. आज कोकणाचा आणि उत्तर कोकणाचा जर विकास व्हायला पाहिजे असेल तर मी मुख्यमंत्री महोदयांना सांगू इच्छिते की, या दाबचरी प्रकल्पालामध्ये आपण लक्ष द्यायला पाहिजे.

माननीय श्री.शरद पवार ज्यावेळी मुख्यमंत्री होते, त्यावेळेला डहाणूला थर्मल पावर आणला त्याला खार जमीन दिली. डहाणू आणि पालघर तालुक्यातील डहाणू तालुक्यातील लोकांवर 91 नोटीफिकेशन बसविले. सन 1991 पासून जस्टीस धर्माधिकारी यांची कमिटी बसविलेली आहे. पर्यावरणामुळे डहाणूकरांची काय हालत आहे ? डहाणूच्या तरुण माणसाला स्वत:च्या जागेमध्ये स्वत:ची पीठाची गिरणी जरी काढायची असेल तरी त्यांना या जस्टीस धर्माधिकारी कमिटीकडे यावे लागते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती मनिषा चौधरी.....

उत्तर कोकणाचा विकास व्हायचा असेल तर जस्टीस धर्माधिकारी कमिटी बरखास्त करायला पाहिजे. संपूर्ण विकास रखडलेला आहे. आदिवासी उप योजनेपासून अनेक योजना राबवू शकतो. हया जस्टीस धर्माधिकारी यांच्या कमिटीमुळे तिकडे विकास होत नाही.

अध्यक्ष महोदय, आज तिकडे धरणे तयार झाली, तरी लोक प्रकल्पाला का विरोध करतात ? सन 1972 सालानंतर सुर्या धरण हे आदिवासी उपयोजनेमधून हे धरण बनले, याचे पाणी मुंबई, मीरा भाईंदर, वसई, पालघर, तारापूर अनुशक्ती केंद्र, एमआयडीसी असो सर्व ठिकाणी पाणी गेले. आजपर्यंत पूर्वचे पाणी पश्चिमेला आले नाही. हे शेतक-यांच्या इरिगेशनसाठी बनविलेले धरण आहे. आज माझ्या बांधवांची काय परिस्थिती आहे. भूर्गभामध्ये पाण्याची लेव्हल खाली गेली आहे. त्या ठिकाणी वसईची केळी फेमस होती. केळवा माहिमची पाने पाकिस्तान देशात पालघर येथून जात होती, त्या बागायती तिकडून नष्ट होऊ लागल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, मी या चर्चेच्या मार्फत सांगू इच्छिते की, पूर्वेचे पाणी पश्चिमेला यायला पाहिजे. सुर्या धरणाची जी प्रकल्पग्रस्त लोक आहेत, चंद्रनगर आणि सूर्यनगर वानगांवमध्ये आहेत. या वानगावमध्ये प्रकल्पग्रस्तांना आणून सोडले पण आजही त्यांना कुठल्याही सुविधा नाहीत. या वानगावमधी सुर्यनगर आणि चंद्रनगर मधील लोकांसाठी ग्रामपंचायत नाही. दुसरा महत्वाचा प्रश्न आहे की, आपले शासन वाडवन बंदर करते आहे. हे बंदर व्हायला पाहिजे. हे बंदर कसे असणार. या बंदरामुळे किती लोक विस्तापित होणार हा विषय लोकांसमोर आणणे गरजेचे आहे.

3Q-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.मनिषा चौधरी .....

अध्यक्ष महोदय, ही प्रभू रामचंद्राची भूमी आहे. तिकडे वाढवण बंदर तयार होत आहे. वाढवण बंदरामध्ये शंखोदर आहे. या शंखोदरावर प्रभू रामचंद्रांनी दशरथाचे पिंड दिले होते. हे बेट फक्त अक्षय तृतीयेला उघडे होते. लाखो शंख तेथून बाहेर येतात. अशा पवित्र स्थानाच्या ठिकाणी आपण बंदर तयार करीत आहात. येथील मच्छिमार व शेतकऱ्यांमध्ये भिती आहे. यामुळे हा प्रकल्प कसा असणार आहे हे आपण सांगितले पाहिजे. डहाणू पालघर परिसरात फळांवर प्रक्रिया करणारे प्रकल्प आणणे गरजेचे आहे. माझा आदिवासी बांधव जगण्यासाठी का बाहेर जातो आहे कारण तिकडे रोजगार नाही. सन्माननीय सदस्य बोलत आहेत की, डहाणू, विक्रमगड, जव्हार तालुक्यामध्ये आज कुपोषण आहे. हे कुपोषण कशासाठी व कशामुळे होते. जोपर्यंत तिकडे विकास होत नाही, तोपर्यंत माझा आदिवासी बांधव स्थलांतरीत होणार आहे.

(वेळ संपल्याची घंटी वाजविण्यात येते)

अध्यक्ष महोदय, मला बोलण्याची संधी द्या. आम्ही रोज उशिरापर्यंत थांबतो. कारण आमच्या भागातील प्रश्न आहेत.

अध्यक्ष महोदय, मी सरकारचे अभिनंदन करते की, सरकारने सागरी पोलीस स्टेशन केलेली आहेत. पण सरकारने ती अत्याधुनिक करणे गरजेचे आहे. आज कोकणात सागरी आयुक्तालय असणे गरजेचे आहे. मी सागरी आयुक्तालयाची मागणी आज येथे करीत आहे. कसाब कोठून आला ? कसाब समुद्रमार्गाने कोकणातील बंदरपाडीतून आला. अनेक ठिकाणी गस्ती नौका नादुरुस्त आहेत या नौका दुरुस्त केल्या पाहिजेत. गस्ती नौकांबरोबर स्पीड बोटी देणे गरजेचे आहे. आज मच्छिमारांचे अनेक प्रश्न आहेत. सन्माननीय सदस्य श्री.निलेश राणे या प्रस्तावावर बोलले आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, त्यांचे पिताश्री महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते, ते कोकणातील आहेत. ते व तुम्ही कोकणामध्ये इतकी वर्षे काम करीत आहात. पण कोकणाकडे कोणी दुर्लक्ष केलेले आहे हे आपण प्रथम पाहिले पाहिजे. कोकणातील सागरी किनाऱ्याच्या रक्षणासाठी सागरी रक्षक दल देण्यात यावे. तसेच स्थानिक लोकांच्या सुरक्षा दलास मान्यता देऊन त्यांना मानधन देण्यात यावे. आज अनेक तटरक्षक आहेत पण त्याच्याकरिता कोणत्याही सुविधा नाहीत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती मनिषा चौधरी ....

अध्यक्ष महोदय, बोर्डी, केळवा, डहाणू अशा अनेक ठिकाणी पर्यटनाचा दर्जा दिलेला आहे पण त्याकरिता ज्या सुखसोयी हव्या आहेत त्या मिळालेल्या नाहीत हे मी आपल्या मार्फत सांगू इच्छिते. अध्यक्ष महोदय, मुंबईतील कुत्र्याची समस्या आहे.

तालिका सभाध्यक्ष : कुत्र्यांची समस्या महानगरपालिकेमध्ये मांडावी.

श्रीमती मनिषा चौधरी : अध्यक्ष महोदय, डॉग हाऊससाठी सरकारने कोठे तरी जागा द्यावी. याद्वारे मुंबईतील कुत्रे हटविणे गरजेचे आहे. तसेच फेरीवाल्यांच्या समस्या खूप आहे.

तालिका सभाध्यक्ष : महानगरपालिकेशी संबंधित समस्या महानगरपालिकेमध्ये मांडाव्यात. यानंतर सन्माननीय सदस्य श्री.सुनील प्रभू यांनी बोलावे. उद्याही महत्वाची चर्चा आहे. लांबून येणारे सदस्य थांबतात. माझी विनंती आहे की, उद्या लक्षवेधी झाल्यानंतर आपण चर्चा सुरु करु व नंतर उत्तर घेऊ.

श्री.गिरीष बापट : अध्यक्ष महोदय, आज सन्माननीय सदस्य श्री.सुनील प्रभू यांनी बोलावे. सन्माननीय सदस्या श्रीमती तृप्ती सावंत यांना थोडा वेळ बोलू द्यावे. विरोधी पक्षातील बरेच सदस्य बोलले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.धैयशिल पाटील व श्री.नितेश राणे बोलले आहे. इतर सदस्यांना उद्या बोलण्याची संधी मिळणार आहे.

तालिका सभाध्यक्ष : वे 30 मिनट बोले. आपने ही कहा कि उनको बोलने दीजिए. कल माननीय मुख्यमंत्री सदन में रहेंगे तब आप अपना भाषण कीजिए.

श्री.नसीम खान : अध्यक्ष महोदय, माझे काही पॉईंटेड मुद्दे आहेत. मी ते बोलून संपवितो. उद्या मराठवाड्याच्या प्रस्तावावर चर्चा आहे. त्यामुळे उद्याही बोलणे शक्य होणार नाही. उद्या माननीय मुख्यमंत्री प्रस्तावावर उत्तरही देणार आहे.

तालिका सभाध्यक्ष : उद्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्याही नाहीत. उद्या आपणास भरपूर चर्चा करण्यास मिळेल. उद्या लक्षवेधी सूचना संपल्यानंतर आपण चर्चा सुरु करु

श्री.नसीम खान : अध्यक्ष महोदय, आपण घोषणा करावी की, उद्या लक्षवेधी सूचनेनंतर चर्चा करण्यात येईल.

तालिका सभाध्यक्ष : याबाबत माननीय अध्यक्षांना विचारुन ठरवितो. उद्या विशेष बैठकही घेऊ. तुम्ही काही काळजी करु नका.

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) : अध्यक्ष महोदय, वान्द्रे (पूर्व) विधानसभा क्षेत्रातील अनेक (एसआरए) झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प रखडलेले आहेत. भारतनगर, बेहरमपाडा, अहिंसानगर यामध्ये प्रामुख्याने सांगायचे तर खार गोळीबार येथील शिवालिक व्हेंचर्स राबवित असलेले झोडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात अनेक अनियमितता असून विकासक जाणीवपूर्वक विलंब करीत आहे. तसेच संबंधित पात्र झोपडपट्टीधारकांना सात ते आठ महिने घरभाडे सुध्दा देत नाही. प्रामुख्याने सांगायचे झाले तर 8 ते 10 वर्षापासून स्वत:च्या हक्काच्या घराच्या प्रतिक्षेत ते आहेत. ते 8 हजार रुपये भाडे देऊन शहरात राहत आहेत. तरी माझी अशी मागणी आहे की, आजच्या बाजार भावाप्रमाणे 12 हजार ते 15 हजार प्रमाणे भाडे मिळावे. कारण बाजूला विकासकाची कामे चालू आहेत तिथे 12 हजार ते 15 हजारपर्यंत भाडे मिळत आहे. त्यामुळे सदर झोपडपट्टीधारकांवर अन्याय होत आहे. आपण त्यांच्या व्यथा जाणून घेऊन विकासकावर योग्य कारवाई करावी व रहिवाशांना योग्य तो न्याय द्यावा.

अध्यक्ष महोदय, वांद्रे पूर्व येथे गांधीनगर, खेरनगर, विजयनगर, चैतन्यनगर व निर्मलनगर येथे म्हाडाच्या अनेक इमारती गेली 50 ते 60 वर्षे जुन्या आहेत. इमारतीची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून संबधित रहिवाशांना पुनर्विकास हवा आहे. चटई क्षेत्राकरिता अधिमुल्य व चटईक्षेत्रातील म्हाडाची भागीदारी हे दोन्ही पर्याय उपलब्ध असावेत. जेणेकरुन पुनर्विकासास चालना मिळेल. अल्प उत्पन्न गटातील रहिवाश्यांना किमान 484 चौरस फुटांची घरे मिळावीत.

अध्यक्ष महोदय, वांद्रे पूर्व येथील बेहरमपाडा, नवपाडा तसेच अनंत काणेकर मार्गावरुन रात्रीच्या वेळेस रहदारी कणाऱ्या अनेक नागरिकांना विशेषकरुन महिलांना स्थानिक गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींपासून फार त्रास सहन करावा लागतो. सदर ठिकाणी सोनसाखळी चोरीचे प्रमाण खूप आहे. महिलांच्या व मुलींच्या छेड-छाडीचे प्रमाणही खूप जास्त आहे. तरी यावर त्वरीत योग्य ती कारवाई करण्यात यावी. मेट्रो-3 या भूयारी रेल्वे मार्गासाठी वांद्रे पूर्व ज्ञानेश्वरनगर या झोपडपट्टीचा सर्व्हे एमएमआडीएमार्फत झाला असून येथील अनेक झोपड्या या प्रकल्पांतर्गत रद्द होणार आहेत. संबंधित प्रकल्पबाधित झोपडपट्टीधारकांना पर्यायी घरे कुर्ला येथे दिली जाणार आहेत. परंतु स्थानिकांना आहे त्याच ठिकाणी पर्यायी घरे देण्यात यावीत. संबंधित रहिवाशी अत्यंत गरीब असून

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती तृप्ती सावंत....

तेथील महिला घरकाम करुन आपली उपजिविका करतात. त्यांना त्यांच्या उपजिविकेच्या दृष्टीकोनातून विचार करुन वांद्रे येथील जवळपासच्या एसआरएमध्ये समाविष्ट करावे अशी मागणी मी नियम 293 अन्वये प्रस्तावाच्या माध्यमातून आपणास करीत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री मंगल प्रभात लोढा (मलबार हिल) : अध्यक्ष महोदय, मैं नियम 293 के अंतर्गत जो प्रस्ताव सदन के सामने पेश किया गया है, उस प्रस्ताव पर बोलने के लिए खड़ा हुआ हूं.

अध्यक्ष महोदय, मैं दो-तीन मुद्दों पर ही बोलना चाहता हूं. मंत्री महोदय मेरे मुद्दे को नो करेंगे, ऐसी आशा करता हूं. म्हाडा और हाऊसिंग के बारे में मेरी कुछ डिमांड और सूचनाएं है. पिछली सरकार ने डिम्ड कन्व्हेयन्स के बारे में कानून लाया था. वह कानून बिल्कुल लागू नहीं हुआ है. ˙क्योंकि डिपार्टमेंट के अंदर कोई कोऑर्डीनेशन नहीं है. सरकार डिम्ड कन्व्हेयन्स के बारे में स्पेशल सेल बनाकर, पूरे महाराष्ट्र की जितनी भी कोऑपरेटीव सोसायटीज है उनको डिम्ड कन्व्हेयन्स करने के लिए कोई वॉलेंटरी स्कीम लाकर, तीन महीने के अंदर उनकी समस्या का समाधान होना चाहिए. म्हाडा की जो सोसायटीज है और हाऊसिंग सोसायटीज है इन दोनों के बारे में मेरा कहना है.

अध्यक्ष महोदय, मॉडेल एग्रीमेंट बनाया है. फ्लॅटओनर को मॉडेल एग्रीमेंट में जाना पड़ता है. टेनेन्ट के लिए कोई बंधन नहीं है. टेनेन्ट के सामने जब बिल्डर आता है तो उसको लगता है कि भगवान आ गया है तो बिल्डर टेनेन्ट को जो लिखवाता है, मालिक जो भी लिखवाता है टेनेन्ट उस पर साइन कर देता है. बाद में कोर्ट में उनको कोई समाधान नहीं मिलता है. इसलिए मॉडेल एग्रीमेंट जो फ्लॅट ॲण्ड ओनरशीप अपार्टमेंट ॲक्ट है, उसी धर्ती पर म्हाडा के फ्लॅट ओनर के लिए, रिडेवलपमेंट बिल्डिंग के लिए भी एक मॉडेल एग्रीमेंट का ड्राफ्ट किया जाना चाहिए ताकि लोगों को टेनेन्ट की रक्षा हो सके. यह विषय बहुत महत्वपूर्ण है. सरकार ने इस बारे में इसी सेशन में घोषणा करनी चाहिए.

अध्यक्ष महोदय, बिल्डिंग के रिपेअर के लिए करोड़ों रुपये फंड...लोगों का सेस का फंड और म्हाडा का भी फंड जाता है. उसमें सरासर 40 प्रतिशत पैसा भ्रष्टाचार में चला जाता है. कॉन्ट्राक्टर और अधिकारी पैसा खा जाते है, किसी के हाथ में कुछ नहीं आता. नई सरकार पारदर्शक काम करना चाहती है. सरकार यदि टेनेन्ट्स को, टेनेन्ट भाडोत्री है. उनको ही टेंडर प्रक्रिया करके अपना काम...उनसे ज्यादा खुद के फंड की रक्षा कोई नहीं करता. यह सरकार का फंड नहीं है. इसमें उनके सेस का फंड भी लगा हुआ है. खुद का फंड कोई बिगाड़ेगा नहीं.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री मंगल प्रभात लोढा.....

उनको बिल्डिंग में रहना है. टेनेन्ट को यदि ऑप्शन दिया जाता है कि वह खुद का कॉन्ट्राक्टर नियुक्त कर सकते है तो 15-20 साल में जो बिल्डिंग रिपेअर करनी पड़ती है उस बिल्डिंग की लाइफ 40 साल बढ़ जाएगी. वे खुद इस काम पर ध्यान देंगे.

अध्यक्ष महोदय, मुंबई में महानगरपालिका की 100 से ज्यादा स्कूलों या तो पूरी तरह से बंद पड़ी है या फिर वहां पर केवल 5-10 ही विद्यार्थी है. महानगरपालिका का जो लोग टैक्स भरते है, टैक्स का बहुत बड़ा नुकसान है. एक तरफ बच्चों को स्कूल में एडमिशन नहीं मिलता है. एक लाख रुपये फीस भरनी पड़ती है. पांच लाख रुपये कॅपिटेशन फीस भरनी पड़ती है. दूसरी तरफ स्कुलों में पढ़ने के लिए कोई बच्चा नहीं है. सरकार से मेरा निवेदन है कि स्कुलों के बारे में महाराष्ट्र सरकार महानगरपालिका को इसके बारे में निर्देश दे. पिछली बार एक पॉलिसी बनायी गई थी वह फ्लॉप हो गई है. उसमें कोई आगे नहीं आते है. नई पॉलिसी बनायी जानी चाहिए और बंद पड़ हुए महानगरपालिका के स्कूल इस साल शुरु होने चाहिए. एक साल में 25 हजार नये एडमिशन स्कूलों में हो सकते है. नियम अच्छी तरह से बनाए तो जो दूसरी स्कुलों में भिड़ लगी रहती है वह बंद हो जाएगी और महानगरपालिका की सभी स्कूलें चलने लगेगी. आपने मुझे बोलने के लिए मौका दिया उसके लिए मैं आपको धन्यवाद देता हूं और अपना भाषण पूरा करता हूं.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभाध्यक्ष (श्री.योगेश सागर) : सभी सदस्यों से मेरी विनती है कि कल सुबह 10.00 से 10.45 बजे विशेष बैठक लेंगे. सभागृहाच्या दुस-या फेजमध्ये प्रश्नोत्तरे, लेयिंग, लक्षवेधी सूचनांवरील चर्चा झाल्यानंतर या प्रस्तावावर चर्चा घेण्यात येईल. त्यावेळी आता सभागृहामध्ये जेवढे सन्माननीय सदस्य थांबलेले आहेत, त्या सर्वांना बोलायला देण्याबद्दल सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात येईल.

श्री.गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, त्यावेळी आपण आता जे सन्माननीय सदस्य थांबलेले आहेत, त्यांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल. त्यानंतर यावरील रिप्लाय होईल. उद्या रोजी भाषण करीत असताना सर्वांनी वेळेचे गणित सांभाळावे,एवढी विनंती आहे.

श्री.सुनील प्रभू : अध्यक्ष महोदय, आम्ही गेल्या चार दिवसांपासून बोलण्याकरिता रोज रात्रीपर्यंत सभागृहामध्ये थांबत आहोत. उद्या रोजी आमच्या प्रभाग समितीची बैठक आहे, त्यामध्ये आम्हाला निवडणुकीचे अधिकार आहेत.....(अडथळा)

तालिका सभाध्यक्ष (श्री.योगेश सागर): ठीक आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.सुनील प्रभू यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील प्रभू (दिंडोशी): अध्यक्ष महोदय, नियम 293 अन्वये विरोधी पक्षाने मांडलेल्या प्रस्तावाला काही अंशी विरोध करण्याकरिता मी उभा आहे. मुंबई महानगरपालिकेमध्ये भ्रष्टाचाराच्या केलेल्या आरोपाला विरोध करण्याकरिता आणि गिरणी कामगारांच्या घरांकरिता विलंब झाल्याने मगरमच्छचे आसूँ ढाळणा-या विरोधी पक्षाच्या प्रस्तावातील आरोपाला विरोध करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, कोकणाच्या विकासाबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना मांडलेल्या आहेत. कोकण या भूमीबद्दल अनेक लोकांनी आपली मते व्यक्त केलली आहेत. युती सरकारच्या वतीने या कोकणच्या विकासाबाबत मला विश्वास आहे. शिवशाहीचे सरकार असताना ख-या अर्थाने कोकणचा विकास झाला. आता या युती शासनाच्या काळामध्ये चांगल्या योजना कोकणामध्ये नेऊन येणा-या भविष्यकाळात कोकण समृध्द कसे होईल याकडे सरकार निश्चित लक्ष देईल, अशा पध्दतीच्या योजना युती शासनाने आणाव्यात, असे माझे वैयक्तिक मत आहे.

अध्यक्ष महोदय, या प्रस्तावामध्ये मुंबई महानगरपालिकेसंदर्भात विरोधी पक्षाने ज्या पध्दतीचे आरोप केलेले आहेत, त्याचे खंडन माझ्या आधीच्या वक्त्यांनी केलेले आहे. ज्या ज्या गोष्टी मुंबई महानगरपालिकेच्या अधिकारामध्ये आहेत, त्या करण्याचे माननीय मुख्यमंत्री यांनी धाडस दाखविलेले आहेत. मुंबई महानगरपालिकेमध्ये ज्या ठिकाणी गैरकारभार होत आहे, तो निदर्शनास आल्यावर त्याच्याविरुध्द कारवाई करण्यात आली. सदर कारवाई झाल्यानंतर संबंधित दोषी ठेकेदार पोलीस कस्टडीत होऊन कोठडीमध्ये आहेत. यातून अत्यंत चांगल्या पध्दतीचे काम मुंबई महानगरपालिका प्रशासनाने केलेले आहे. मुंबई महानगरपालिकेवर भ्रष्टाचाराचे आरोप लावून महानगरपालिकेच्या कारभाराबाबत ज्यांनी ज्या काही वल्गना केल्या त्यांना माझा या वक्तव्यातून एक सवाल आहे. मुंबई महानगरपालिकेचे अधिकार या पूर्वी कमी करण्याचे काम लोकशाही आघाडी सरकारने केले होते. लोकशाहीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकार कमी करण्याचा तत्कालीन शासनाच्या माध्यमातून जो काही घाट घातला गेला होता. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेचे नुकसान झालेले आहे. मी राजकीय भाषण करीत नाही. या सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांनी मुंबई महानगरपालिकेत काम केलेले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील प्रभू.....

अध्यक्ष महोदय, भुखंडाच्या मूळ आरक्षणातून निवासी असा बदल करण्याकरिता आणि त्यायोगे अनेक भूखंडांचे आरक्षण बदलण्याकरिता 37/1 च्या अंतर्गत आतापर्यंत डीसीआरमध्ये अनेक वेळा बदल करण्यात आलेले आहेत. हे बदल करण्यामागचे कारण काय होते ? एखाद्या जमिनीच्या मूळ आरक्षणामधील आरक्षण बदलण्यामागील परवानगी स्थानिक स्वराज्य संस्थांनी दिल्यानंतर राज्य शासन नगरविकास खात्यामार्फत हा बदल करु शकत होते. यामुळे भुखंडाची लूट तत्कालीन सरकारला करता येत नव्हती. तत्कालीन राज्य शासनाने विशेष अधिकार वापरुन 37/1ए अशा पध्दतीचा डीसीआरमध्ये बदल करुन त्या संदर्भातील राजपत्र आणले. या माध्यमातून मागील काळामध्ये भुखंडांचे श्रीखंड लुटण्यात आले होते. याबाबतच्या माहितीच्या अधिकाराची कागदपत्रे माझ्याकडे आहेत. तत्कालीन राज्य शासनाकडून 62+18 भुखंडांचे वितरण 37/1ए अंतर्गत आरक्षण बदलवून अनेक गृहनिर्माण सोसायटयांना झाले होते. त्या सोसायटया कोणत्या आहेत ? माननीय मुख्यमंत्री यांनी 37/1ए अंतर्गत या अशा पध्दतीच्या 62+18 भुखंड गृहनिर्माण संस्थांना आरक्षण बदलवून वितरण केलेले आहे. या संदर्भातील राजपत्र शासनाने रद्दबातल करुन या संबंधित सोसायटयांची चौकशी करावी व या भुखंडांचे वाटप कसे झाले ? याचा शोध घ्यावा.

अध्यक्ष महोदय, लोअर परळ, मुंबई येथील भुखंड क्रमांक 65, शक्ती मिलचा 30,064 यार्डचा भाडेपट्टा संपुष्टात आलेला आहे. हा भूखंड ताब्यात घेण्याचे आदेश 10.8.2014 रोजी माननीय महसूलमंत्री यांनी दिलेले असताना अद्यापपर्यंत हा भूखंड ताब्यात घेतलेला नाही. या पाठीमागचे कारण काय ? तो भूखंड ताब्यात घेण्याबाबत शासन कोणती कारवाई करणार आहे ? हे कळणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी एक खाजगी बिल सभागृहामध्ये आणले होते. मुंबई महानगरपालिकेच्या ऐच्छिक कर्तव्यामध्ये उद्याने आणि मैदानांचा अंतर्भाव करण्यात यावा, नगरविकास राज्यमंत्री महोदयांनी येणा-या काळामध्ये ऐच्छिक कर्तव्यांमध्ये उद्यान आणि मैदाने यांचा स्वीकार करण्यात येईल, अशा भावना व्यक्त केलेल्या आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील प्रभू.....

मी मुंबई शहरातून निवडून आलेला आमदार या नात्याने आपले मनापासून अभिनंदन करीत आहे. मुंबई शहरामध्ये 400 उद्याने आहेत. यापैकी जवळ जवळ 216 उद्याने मुंबई महानगरपालिकेच्या अख्यत्यारित येत आहेत. आतापर्यंत उद्यानावर जवळ जवळ 270 कोटी रुपयांचा खर्च केलला आहे. महानगरपालिकेने मुंबई शहरातील उद्याने विकसित करण्याची करण्याची गरज आहे. यासंदर्भात मुंबई महानगरपालिकेने योग्य तो पुढाकार घेतला पाहिजे. प्रायव्हेट एनजीओला निधी देऊन मुंबई शहरातील उद्याने विकसित केली जात असून, त्यावर आळा घालण्याची आवश्यकता आहे. काही एनजीओ स्वत:च्या उत्पन्नातून मुंबई शहरातील उद्याने विकसित करीत आहेत, अशा एनजीओवर सरसकट कारवाई करु नये, अशी माझी आग्रहाची विनंती आहे. मुंबई शहरातील स्वयंसेवी संस्था आणि एनजीओला ही कामे करुन घेण्यासाठी सहभागी करुन घेतले तरच चांगल्या पध्दतीची कामे होण्यास मदत होणार आहे.

अध्यक्ष महोदय, सेक्शन 61 अन्वये मुंबई शहरातील उद्याने आणि मैदाने ऐच्छिक कर्तव्यात घेतली जाणार आहेत, याच धर्तीवर मुंबई शहराती शाळा, हॉस्पिटल, आरोग्य आणि शिक्षण घेतले तर शहरातील राहणीमान उंचावण्यास मदत होणार आहे. म्हणून 1888 च्या सेक्शन 61 अन्वये मुंबई शहरातील शाळा, हॉस्पिटल, आरोग्य आणि शिक्षण ऐच्छिक कर्तव्य म्हणून घेण्यासाठी कायद्यात बदल करुन परिपत्रक काढण्याची विनंती मुख्यमंत्री महोदयांना करीत आहे. मुख्यमंत्री महोदयांनी त्याबाबतची माहिती उत्तराच्या भाषणातून आम्हाला द्यावी, अशी माझी त्यांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्यांनी सदरहू प्रस्तावाच्या अनुषंगाने गिरणी कामगारांचे प्रश्न उपस्थित केलेले आहेत. मी यासाठी मगरमच्छ के आसू याकारणासाठी म्हणालो होतो की, महानगरपालिकेत आपण सुधार समितीचे अध्यक्ष म्हणून काम करीत होता. आपल्याला कल्पना असेल की, या सर्व प्रकल्पामध्ये मुंबई शहरातील डीसीआर बदलण्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी केलेला होता. सेक्शन 58 अंतर्गत डीसीआरमध्ये बदल करण्याचे काम केले. परिणामी वनथर्ड, वनथर्ड, वनथर्ड, जमिनीचा

.....2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील प्रभू.....

शेअर म्हाडा आणि महानगरपालिकेला देण्यासंदर्भातील निर्णय आहे. केवळ मिल मालकांना फायदा व्हावा म्हणून सेक्शन 58 अंतर्गत डीसीआरमध्ये बदल करुन मोकळ्या जमिनीवरील वनथर्ड, वनथर्ड, वनथर्ड देण्याचा निर्णय तत्कालीन मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख यांच्या सरकारने घेतलेला होता. त्यामुळे असे भूखंड गिरीणी कामगारांना मिळण्याबाबत विलंब झालेला होता. अशा प्रकारचे काम काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने केलेले आहे, असा माझा आरोप आहे. वनथर्ड, वनथर्ड, वनथर्डच्या माध्यमातून 200 एकर जमीन म्हाडा आणि मुंबई महानगरपालिकेला मिळाली असती तर म्हाडाच्या माध्यमातून आपल्याला चांगली घरे बांधण्यास मदत झाली असती. परंतु, आजमितीला केवळ 20 एकर जमीन मिळालेली आहे. मुंबई शहरातील गिरण्यांची जागा वनथर्ड, वनथर्ड, वनथर्ड जेव्हा घेतली जाणार आहे, तेव्हा 50 एकर जमीन म्हाडा आणि मुंबई महानगरपालिकेला मिळणार आहे. या भूखंडाच्या श्रीखंडाला काँग्रेस आणि राष्ट्रवादी-काँग्रेस पक्ष जबाबदार आहे, असा माझा आरोप आहे. याबाबत राज्य शासनाने निर्णय घेण्याची गरज आहे. राज्य शासनाने 1958 मध्ये निर्गमित केलेले परिपत्रक रद्द करुन भूखंडाचे श्रीखंड कसे झाले, भूखंड कशा पध्दतीने वाटले, यापाठीमागचे खरे सूत्रधार कोण आहेत, हे करण्यामागची कारणे काय आहेत, याबाबतची माहिती मुख्यमंत्री महोदयांनी सदनाला देण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरात एमएसडीपी प्रोजेक्ट आहे. यासंदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी त्याबाबतची भूमिका स्पष्ट केलेली आहे. 250 कोटी रुपये खर्च करुन ब्रिटीशकालीन बोगदे मुंबई महानगरपालिकेने ट्रेन्सलेस पध्दतीने केलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, एमएसडीपी-3 साठी फिल्टर प्रोजेक्ट कार्यान्वित करण्याची गरज आहे. यासाठी पर्यावरण विभागाची परवानगी घेणे अत्यंत आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री. अस्लम शेख यांनी मालाडमधील फिल्टर प्रोजेक्टला उशीर होत आहे, म्हणून खंत व्यक्त करुन दाखविली होती. मुंबई महानगरपालिकेने सीआरझेडअंतर्गत सर्व गोष्टी त्यांचे सरकार असताना केंद्र शासनाकडे पाठपुरावा केलेला होता. केंद्रामध्ये काँग्रेसचे सरकार असल्यामुळे पर्यावरणाची परवानगी मिळाली नव्हती. सीआरझेडमध्ये हे सर्व प्रकल्प अडकल्यामुळे वॉटर ट्रीटमेंट प्लॅन्टसाठी

.....3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील प्रभू.....

विलंब झालेला होता. मला विश्वास आहे की, हे राज्य सरकार केंद्र शासनाकडे मालाड आणि अन्यभागातील वॉटर ट्रीटमेंट प्लॅन्टसाठी आवश्यक त्या परवानग्या घेऊन येतील. यासंदर्भात टेंडर कंडिशनच्या अटी महानगरपालिकेने पूर्ण केलेल्या आहेत. या माध्यमातून वॉटर ट्रीटमेंट करुन पाणी समुद्रात सोडण्याबाबत महानगरपालिकेला यश मिळणार आहे, असा मला विश्वास आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरात 26 जुलै, 2005 रोजी प्रलयकारी पाऊस पडलेला होता. त्यानंतर माननीय पंतप्रधांनानी मुंबई शहरासाठी 1 हजार कोटी रुपयांचे पॅकेज दिले होते. मुंबई शहरात अशा प्रकारची परिस्थिती भविष्यात निर्माण होऊ नये म्हणून ब्रीमस्टोवॅट प्रकल्प पूर्ण झाला पाहिजे, यासाठी राज्य आणि केंद्र शासनाने आवश्यक ती मदत देण्याची गरज आहे. ब्रीमस्टोवॅट प्रकल्पासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकारने पैसे दिले नाहीत. ब्रीमस्टोवॅट प्रकल्प हा पूर्वी 1800 कोटी रुपयांचा होता, आता त्याचा खर्च 3000 कोटी रुपयांपर्यंत गेलेला आहे. महानगरपालिकेने अर्थसंक्ल्पाच्या माध्यमातून भविष्यात मुंबई शहरात पंपीग स्टेशन उभारण्याचे काम करण्याची आवश्यकता आहे. मुंबई शहरात प्रलयकारी परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी पंपीग स्टेशन, नाले हे मुंबई शहरातील समुद्रापर्यंत जोडण्याची आवश्यकता आहे. या कामासाठी केंद्र शासनाने विशेष बाब म्हणून निधी दिला तर मुंबई शहरातील ब्रीमस्टोवॅट प्रकल्पातील अडचणी दूर होण्यास मदत होणार आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई महानगरपालिकेने मध्यवैतरणा प्रकल्प उभा केलेला ओह. हा प्रकल्प आपण पाण्यासाठी केलेला आहे. या माध्यमातून मुंबई शहराला 350 एमएलडी पाणी मिळणार आहे. परंतु, भविष्यातील मुंबई शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता मध्यवैतरणा प्रकल्प पूर्ण करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी गारगाई आणि पिंजाळ प्रकल्प हा राष्ट्रीय प्रकल्प मुंबई शहरासाठी मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. जेणेकरुन पाण्याचा फायदा ठाणे आणि तेथील शेतकऱ्यांना होणार आहे. तसेच मुंबई शहराला अतिरिक्त पाणी उपलब्ध होणार आहे. दमनगंगा आणि पिंजाळ नद्या एकमेकांना जोडून टनेलच्या माध्यमातून आपल्याकडे पाणी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील प्रभू.....

आणले जाणार आहे. सदरहू प्रकल्प मुंबई शहराच्या दृष्टीने अतिशय महत्वकांशी प्रकल्प आहे. मुंबई महानगरपालिकेने मध्यवैतरणा प्रकल्प उभा केलेला आहे. मुंबई महानगरपालिकेने त्यावेळी 2300 कोटी रुपये खर्च करुन मध्यवैतरणा प्रकल्प उभा केलेला आहे. मध्यवैतरणा प्रकल्प 30 मेगावॅट विजनिर्मितीसाठी विद्युत केंद्र होण्यासाठी मी महापौर असताना राज्य शासनाला पत्र दिले होते. राज्य शासनाने या प्रकल्पास मंजुरी दिली होती. मुंबई महानगरपालिकेने धरण बांधले असेल तर महानगरपालिकेच्या अख्यत्यारित विद्युत केंद्र उभारणे हे देखील क्रमप्राप्त होते. त्या काळातील सरकाराने, ऊर्जा मंत्र्यांनी घाईगर्दीने मुंबई महानगरपालिकेला विचारात न घेता विद्युतनिर्मितीचे काम एक खाजगी कंपनीला दिले होते. खाजगी कंपनीने आजतागायत विद्युत केंद्राचे काम केलेले नाही. या प्रकल्पाची सद्य:परिस्थिती काय आहे हे जाणून घेण्यासाठी चौकशी करण्याची गरज आहे. टोपी खाली दडले काय ? मुठीमध्ये बंद काय आहे ? कोणती कंपनी होती ? त्या कंपनीला काम का दिले ? याबाबतची चौकशी करण्यासाठी आदेश का दिले नाहीत ? आज संबंधित कंपनीचे विद्युतनिर्मितीचे कंत्राट रद्द करुन महानगरपालिकेला अधिकार दिले असते तर कोणती कार्यवाही केली असती याची माहिती देखील येण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, अनेक मुद्दे आहेत. उद्या प्रभाग समितीची बैठक असल्यामुळे मला मतदानासाठी जावयाचे आहे. सदर प्रस्तावास विरोध करणारे अनेक प्रश्न माझ्या मनात आले होते आणि ते सभागृहात उपस्थित करणे आवश्यक होते म्हणून मी बोललो आहे. माननीय तालिका सभाध्यक्षांनी मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल त्यांना मनापासून धन्यवाद देतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभाध्यक्ष (श्री. योगेश सागर) : सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार दिनांक 7 एप्रिल, 2016 रोजी सकाळी 10 ते 10.45 वाजेपर्यंत म.वि.स. नियम 293 अन्वये प्रस्तावासंबंधी विशेष बैठक होईल. सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागहाची बैठक रात्रौ 9 वाजून 49 मिनिटांनी गुरुवार दिनांक 7 एप्रिल, 2016 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION